म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १४५६



REFBK-0011226

# महाराष्ट्र - गाथा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम २५५८ वि: ३.१०५
क्रमांक ११४५४ नों दि: २४/५/६०

: संपादक :

कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी

प्रल्हाद केशव अत्रे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११२२६

शिवजयंती १९६०

REFBK-0011226

भारती प्रकाशन, मुंबई

प्रकाशक :

**य. कृ. कुलकर्णी**
भारती प्रकाशन
बांबुळी निवास
लेडी जमशेटजी रोड
माहीम मुंबई १६.

**ह्या संग्रहामध्यें समाविष्ट झालेल्या उताऱ्यांच्या सर्व विद्यमान लेखकांचें नि कवींचे कृतज्ञतापूर्वक आभार.**

[ सर्व हक्क संपादकांकडे ]

**किंमत ३ : ५० रुपये**

मुद्रक :

**श. कृ. सापळे**
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस
रुक्मिणी निवास
मोरबाग रोड
दादर मुंबई १४.

# मंगलाचरण

साडेतीन कोटि मराठी जनतेच्या आयुष्यांतला आजचा परम भाग्याचा आणि हर्षाचा दिवस आहे. भारताच्या इतिहासांत आणि नकाशांत मुंबई राजधानी असलेलें "महाराष्ट्र राज्य" आज प्रथमच प्रकट होत आहे. अशा ह्या महन्मंगल दिवसाचें स्वागत "महाराष्ट्र–रसा"नें आमूलाग्र ओथंबलेल्या या "महाराष्ट्र गाथ्या"नें करतांना आम्हांला अनावर आनंद होत आहे. महाराष्ट्रांत जन्माला आल्याबद्दल कृतार्थ वाटण्यासारखा आजचा समय आहे.

भारतांत अनेक भाषांचीं अनेक राज्यें आहे. तीं तीं राज्यें त्या त्या भाषिकांना प्राणापलिकडे प्रिय असलीं पाहिजेत हें काय सांगावयाला हवें? पण 'महाराष्ट्र' हें आमच्या भाषाप्रदेशाचें आणि भाषिक राज्याचें नांव अभूतपूर्व आहे. त्या नांवातच केवढें आव्हान आणि अभिमान भरलेला आहे. नुसतें नांव सांगितलें म्हणजे त्यांत सगळें आलें. मग ह्या देशाचें वर्णन किंवा त्यांतील लोकांचा इतिहास सांगण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. जगामध्यें इतकें सार्थ आणि समर्पक नांव क्वचित्च एखाद्या देशाला प्राप्त झालें असेल. शब्द आणि अर्थ ह्यांची एवढी सुरम्य सांगड बसलेली आहे या नांवांत कीं, ज्यानें हें नामकरण केलें असेल, त्याच्या विशाल कल्पकतेचा खरोखरच अचंबा वाटतो.

कदाचित्, 'महाराष्ट्र' या नांवांत कुणाला आत्मप्रशंसा किंवा अहंकार प्रतिबिंबित झालेला आहे असें वाटेल. पण तसें नाहीं. ह्याचा ज्याला पुरावाच हवा असेल त्यांनीं ही 'महाराष्ट्र-गाथा' नुसती चाळून पहावी. पांचव्या सहाव्या शतकापासून महाराष्ट्राच्या नांवाचे आणि गौरवाचे उल्लेख प्राचीन संस्कृत आणि प्राकृत वाङ्मयांत आढळतात; अर्थात् महाराष्ट्राचा इतिहास ह्याही पेक्षां जुना असला पाहिजे. पंढरपूरची यात्रा दोन हजार वर्षांपासून भरत आहे असें संशोधन प्रा. कोसांबी ह्यांनीं नुकतेंच केलें आहे. महाभारतांतहि 'अश्मक, कलिंग आणि अपरान्त' ह्या तीन महान् राष्ट्रांचा उल्लेख आहे आणि ह्या तीन महा-राष्ट्रांवर सत्याश्रय पुलकेशीनें स्वामित्व मिळविलें असा स्पष्ट निर्देश सातव्या शतकांतल्या 'ऐहोळ शिलालेखां'त आढळतो. महाराष्ट्राची व्याप्ति काय आहे आणि त्यामध्यें कोणत्या प्रदेशांचा समावेश होतो ह्यासंबंधीं आजकाल कित्येकांना शंका पडावी याचा विस्मय वाटतो. पण श्री-

चक्रधरांनीं सहा सातशें वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत समाविष्ट होत असलेल्या सर्व 'खंडमडळां'चा स्पष्ट निर्देश केलेला आहे.

'महाराष्ट्र' ह्या नांवानें ह्या देशांतील लोकांचें एकंदर वर्णन सूचित होतें किंवा त्यांच्याबद्दल इतरांच्या ज्यां अपेक्षा निर्माण होतात, त्याचे उदंड दाखले प्राचीन इतिहासांत आणि साहित्यांत आढळतात. 'प्राकृत पैंगलम्' ह्या पिंगलाचार्यांच्या छंदःशास्त्रीय ग्रंथाचा काळ अनिश्चित आहे. पाहिल्या किंवा चौदाव्या शतकांतला असू् शकेल. पण त्या ग्रंथांत 'मरहट्ठा धिट्ठा' असा मराठी लोकांच्या धाडसी स्वभावाचा गौरव करून 'बंगा, कालिंगा, तेलंगा, आणि सौरट्ठा' हे लोक भित्रे आहेत असें स्वच्छ म्हटलें आहे. सातव्या शतकांत महाराष्ट्रांत असलेला चिनी बौद्ध भिक्षु ह्यूएन त्सँग ह्यांनीं तर मराठी लोकांच्या शौर्याची आणि लढवय्येपणाची मुक्तकंठानें प्रशंसा केली आहे. विशेषतः "मराठी लोक हे साधे असून प्रामाणिक आहेत. त्यांचा स्वभाव निग्रही व करारी आहे. मित्रांशीं कृतज्ञ तर शत्रूंशीं निर्दय अशी त्यांची वृत्ति आहे. त्यांचा कोणी अपमान केला तर ते केव्हांही सहन करणार नाहींत. त्यांचा सूड घेतल्याखेरीज ते राहत नाहींत. मग त्यांत त्यांच्या प्राणावर संकट आलें तरी त्याला ते भीत नाहींत," हें मराठी स्वभावाचें वर्णन इतकें अचूक आहे कीं ह्युएन त्सँग सारख्या परदेशीय प्रवाशानें इतक्या थोड्या वेळांत महाराष्ट्रांतल्या माणसांची स्वभाव-परीक्षा कशी केली याचें नवल वाटतें. आठव्या शतकांत उद्योतनसूरीनें 'मरहट्टे' हे 'अहिमाणे कलहसीले म्हणजे अभिमानी आणि भांडखोर असून त्यांची वृत्ति 'दिण्णले गहिल्ले म्हणजें प्रसन्न झाले तर ते देतील अन् घ्यायचें म्हटलें तर घेतल्यावांचून रहाणार नाहींत अशी असल्याचें नमूद केलें आहे. मुक्तेश्वरानेंहि 'महाभारतां'त महाराष्ट्रीयांच्या लढवय्येपणाची स्तुति केलेली आहे. मराठी लोक हे 'सूड उगवण्याची प्रतिज्ञा करणारे, 'आणि मरे तो न हटणारे' असल्याची त्यानें ग्वाही दिली आहे.

महाराष्ट्राचा इतिहास हा त्याच्या नांवाला सर्वथैव शोभणारा तर आहेच, पण साऱ्या भारतवर्षालाहि तो भूषविणारा आहे. किंबहुना भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास म्हणजे निव्वळ महाराष्ट्राच्या पराक्रमाचाच इतिहास आहे. मोगलांची आणि इंग्रजांची सत्ता ह्या देशांतून उखडून टाकण्याचा प्रयत्न प्रथमतः महाराष्ट्रांत व्हावा हें अद्भुत नव्हे काय? महाराष्ट्राच्या मातींत आणि मराठी माणसांच्या रक्तांत असें काय

विलक्षण रसायन भरलें आहे कीं भारताच्या स्वातंत्र्यावर घाला आला कीं पहिल्यांदा महाराष्ट्रांतलीं माणसें खवळून उठतात ? ह्याची उत्कृष्ट मीमांसा न्यायमूर्ति रानडे ह्यांनीं आपल्या ' मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष ' या ग्रंथांत केली आहे. ते म्हणतात, " व्यक्तिस्वातंत्र्याचें प्राबल्य महाराष्ट्रांत फार असल्यानें महाराष्ट्रांतील लोकामध्यें स्वातंत्र्यप्रियता आणि परस्परास मदत करण्याची इच्छा हे गुण साहाजिकच उत्पन्न झाले. ह्याच गुणांचा स्वराज्य उभारण्याच्या कामीं त्यांना फार उपयोग झाला. धर्माचें आग्रही स्वरूप महाराष्ट्रांत आढळून येत नाहीं. महाराष्ट्रावर कोणत्याही एकाच राजसत्तेचा अंमल फार वेळ कधींच टिकला नाहीं. उलट, एकछत्री अंमल चालू न देण्याबद्दल त्यांची सतत खटपट चाललेली दिसते. उत्तरेकडून आलेल्या शत्रूस पादाक्रांत करण्यास एकजुटीनें ते नेहेमीं तयार असतात.'

भारताचे पहिले स्वराज्य संस्थापक श्रीशिवछत्रपति हे महाराष्ट्रांत जन्माला यावेत, आणि त्यांनीं लावलेल्या स्वराज्य वृक्षाचा वैभवशाली विस्तार सर्वत्र भारतामध्यें पसरून, त्याचे कित्येक अवशेष तर भारताचें सध्यांचें प्रजासत्ताक राज्य येईपर्यंत टिकावेत हा या देशाच्या इतिहासामधला एक फार मोठा चमत्कार आम्ही समजतों. न्या. रानडे म्हणतात त्याप्रमाणें, ' महाराष्ट्र—सत्ता ही राष्ट्रीय चळवळ होती. हिंदुस्थानमध्यें अशा प्रकारचा स्वराष्ट्रस्थापनेचा प्रयोग महाराष्ट्रानेंच प्रथम केला, म्हणून मराठ्यांचा इतिहास एका खऱ्या हिंदी राष्ट्राच्या रचनेचा इतिहास होय.' अशा दैदिप्यमान इतिहासाबद्दल महाराष्ट्रांतील लोकांना विलक्षण प्रेम आणि अभिमान वाटावा हें साहजिकच आहे. किंबहुना, महाराष्ट्राच्या कर्तृत्वाला आणि पराक्रमाला चिरंतन स्फूर्ति देणारा ज्वलन्त अंगार ह्या इतिहासाच्या पानापानामधून धगधगत आहे. त्याचें दर्शन ह्या ' महाराष्ट्रगाथां ' त घडेल.

स्वदेशापुढें आणि स्वातंत्र्यापुढें मराठ्यांना आपल्या प्राणाची किंमत वाटत नाहीं. अन्याय आणि अपमान तर कालत्रयींहि ते सहन करणार नाहींत. औरंगजेबाच्या दरबारांत आपला अपमान होतो आहे, हें पहातांच शिवाजी महाराज एखाद्या वाघाप्रमाणें कडाडले, " अरे, आग लागो ह्या बादशहाच्या मनसबीला ! माझा अपमान करतो ? लाथ मारतों मी त्या खिलातीवर ! करा मला ठार. नाहीं तर टाका तुरुंगांत ! " क्रूर आणि हिंस्र शत्रूंच्या गुहेंत शिरून त्याच्या तोंडावर

त्याचा पाणउतारा करणारा शिवाजी महाराजांसारखा अफाट हिंमतीचा नरवीर ह्या त्रिखंडांत अजून जन्माला यावयाचा आहे.

पहिल्या छत्रपतीचा जो वज्रकठोर मराठी बाणा तोच शेवटचा छत्रपति प्रतापसिंहाचा! दोहोंत कांहींच फरक नाहीं. त्यांच्यावर इंग्रजांनीं फितुरीचे आरोप ठेवले, आणि ते कबूल कराल तरच तुम्हांला आम्ही गादीवर बसून देऊं अशी धमकी दिली. तेव्हां प्रतापसिंहांनीं त्या वेळच्या गव्हर्नर-जनरलला जें उत्तर दिलें ते अजब आहे: 'तुम्ही मला समजतां कोण रे? मऱ्हाठी स्वराज्यसंस्थापक शिवाजी महाराजांच्या गादीवरचा त्यांचा खास वंशज आहें मी. त्या स्वराज्यावरचा हक्क सोडून देऊं म्हणतां? तुमच्या अटी मान्य करण्यापेक्षां मी मरण पत्करीन!' हीच मराठी जिद्द आणि हाच मराठी बाणा साऱ्या मराठी इतिहासामध्यें एखाद्या विद्युल्लतेच्या अग्निरेषेसारखा झगझगतो आहे. सत्तावनी स्वातंत्र्यसंग्रामाचे सेनापति नानासाहेब पेशवे पराभूत झाल्यानंतरहि निर्वाणीच्या क्षणीं त्यांनीं इंग्रजांना काय निरोप धाडला? "मी बलाढ्य इंग्रजांचा या देशांतला एकमेव शत्रू आहे. यांतच मला समाधान आहे. पुन्हां आपण रणांगणांतच भेटूं. मी जें करीन तें तरवारीनेंच करीन. तुमच्या रक्ताच्या नद्या वाहतील. गुडघ्याइतका लोंढा वाहील. मृत्यु कधीं तरी येणारच. मग मी अपमानानें कां मरावें? माझ्या जिवांत जीव आहे, तो पर्यंत मी तुमच्याशीं लढणारच. मी मारला जावो, पकडला जावो, फांशी दिला जावो." मराठी माणसांखेरीज असली भाषा ह्या भारतांत कोण बोलणार? उघड्या डोळ्यांनीं मृत्यूला आव्हान देण्याचें सामर्थ्य ह्या देशांतच नव्हे—तर या जगांत फक्त मराठ्यांतच आहे. फांशी जाण्यापूर्वी तात्या टोपे ह्यांचे उद्गार काय तर "इंग्रजांविरुद्ध लढल्याबद्दल मला मरणास सिद्ध राहिलें पाहिजे हें मला पूर्णपणें माहीत होतें. म्हणून आतां लौकरांत लौकर मला फांसावर चढवून किंवा तोफेच्या तोंडीं देऊन माझी सुटका करा!" वासुदेव बळवंत फडक्यांनीं ब्रिटिश सरकाराविरुद्ध बंड पुकारलें. कां? ते म्हणतात, "माझा देशाभिमान अतिशय जाज्वल्य होता. ईश्वराला माझी हीच प्रार्थना होती कीं, त्यानें माझे प्राण घ्यावे. पण माझ्या देशबांधवांना सुखी करावें." प्लेगच्या अमदानींत पुण्यांतील जनतेवर रँड साहेबांनीं जे अत्याचार केले ते बघवेनात म्हणून चाफेकर बंधूंनीं त्याचा खून केला. वीर सावरकरांनीं ब्रिटिशांच्या राजकीय दास्यांतून मातृभूमीस स्वतंत्र करण्यासाठीं "अभिनव भारत" ही जेव्हां क्रांतिसंस्था काढली, तेव्हां त्या कार्यांत आपला देहपात अंदमानांत

होऊन आपल्या अस्थि आणि रक्षा त्या निर्जन आणि भेसूर प्रदेशांत कुठें तरी पडतील ह्याची त्यांना पूर्ण कल्पना होती, असें त्यांनीं स्वतःच लिहून ठेवलें आहे. स्वातंत्र्यासाठीं आणि स्वदेशासाठीं सर्वस्वाचें बलिदान करण्याची ही प्रवृत्ति आणि परंपरा आजतागायत महाराष्ट्रांत चालू आहे.

शिवाजी महाराजांनीं महाराष्ट्रांत जी राज्यक्रांति घडवून आणली तिच्या आधीं मराठी साधुसंतांनीं सामाजिक आणि धार्मिक क्रांतीनें महाराष्ट्रांतली सारी जनता जागृत केली होती हें विसरून चालणार नाहीं. महाराष्ट्राच्या इतिहासांत राजकीय व धार्मिक उन्नतीची एक बेमालूम सांगड बनली आहे. ह्या सांगडीचें महत्त्व बरोबर कळलें नाहीं तर मराठ्यांचा अभ्युदय हें एक मोठेंच गूढ होऊन बसेल असें न्या. रानडे जें म्हणतात तें बरोबर आहे. “ मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ’ हा जो महाराष्ट्रधर्माचा महामंत्र समर्थांनीं उच्चारला, त्या महाराष्ट्रधर्माचें खरें इंगित काय आहे? महाराष्ट्र धर्माचा प्रसार करा म्हणजे कांहीं वैदिक, पौराणिक किंवा हिंदुधर्माचा प्रसार करा असें नाहीं.

महाराष्ट्र धर्म म्हणजे कांहीं नुसताच देवधर्म नव्हता. देशधर्म आणि भक्ति-धर्म ह्यांची सांगड घालण्याचा तो महाराष्ट्रांतल्या संतांचा अभिनव प्रयत्न होता. “ मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ” हें त्या धर्माचें सूत्र होतें. तर “ मारितां मारितां मरावें। तेणें गतीस पावावें। फिरोन येतां भोगावें। महद्भाग्ये,” “ देव मस्तकीं धरावा। अवघा हलकल्लोळ करावा। मुलुख बुडवा का बुडवावा। धर्म-संस्थापनेसाठीं ” आणि “ धटासी आणावा धट। उद्धटाशी पाहिजे उद्धट। खटनटासी खटनट अगत्य करी, ” हें त्या महाराष्ट्र धर्माचें तंत्र होतें. जन्ममूलक वर्णभेद, आचार आणि सांप्रदाय ह्यांविरुद्ध महाराष्ट्रधर्माचा फार मोठा कटाक्ष होता. “ समर्थांसी नाहीं वर्णावर्ण भेद। राजा आणि रंक सारिखेची ” “ जें जें भेटे भूत। तें तें भासे भगवंत ” ही त्यांची प्राणिमात्राकडे पहाण्याची दृष्टि होती. यज्ञयाग, जपजाप्य आणि कर्मकांड ह्याचें त्या काळांत प्रचंड प्रस्थ माजलें होतें. त्यामुळें धर्म आणि मोक्ष ह्या गोष्टी सामान्य माणसाच्या आटोक्याबाहेर होत्या. ह्या दंभावर महाराष्ट्रधर्माच्या प्रचारकांनीं फार मोठा हल्ला चढवला आणि शुद्ध अंतःकरण, प्रेमळ बुद्धि अन् भक्तिभाव एवढें भांडवल जवळ असलें म्हणजे प्रपंच करतां करतां नुसत्या नामसंकीर्तनानेंसुद्धां परमार्थ साधतां येतो असा ईश्वरप्राप्तीचा अगदीं साधा आणि सरळ मार्ग संतांनीं

सांगितला. " सोपें वर्म आम्हां सांगितलें संतीं । टाळ दिंडी हातीं घेऊन नाचा." रंजल्या गांजल्यांना नि अनाथ अपंगांना हृदयाशीं जो धरतो, अन् पुत्रांवर जें प्रेम करतो, तेंच " जो दासावर करतो, तोच साधु आणि तो देव," ही तुकोबाची शिकवण तर ह्या महाराष्ट्र धर्माच्या मानवतावादाचा आणि समतावादाचा कळस होय ! अशा, ह्या बहुजनसमाजाच्या उदार आणि व्यापक महाराष्ट्र–धर्माचें पंढरपूर हें धार्मिक पीठ बनलें, तर रायगड हें त्याचें राजकीय केंद्र झालें . वारकरी आणि धारकरी ह्यांच्या " पुंडलीक वरदा हरिविठ्ठल " आणि " हर हर महादेव " ह्या गर्जनांनीं सारा महाराष्ट्र देश दणाणून गेला. आणि पारतंत्र्याचा नाश होऊन स्वराज्याचा सूर्य क्षितिजावर उगवला. महाराष्ट्रधर्माचें अध्यात्मिक अधिष्ठान जर लाभलें नसतें, तर हिंदवी स्वराज्याची मुहूर्तमेढ महाराष्ट्रांत कधींच रोवली गेली नसती.

महाराष्ट्रधर्माची प्रतिष्ठापना करणारी ही साधुसंत मंडळी प्रामुख्यानें बहुजन समाजांतलीच होती. सर्व जातींचा त्यांत समावेश झाला होता. ब्राह्मण होते, शूद्र होते, शिंपी, सुतार, कुंभार, माळी, वाणी, न्हावी आणि महारहि होते. दोनशें वर्षें होऊन गेलीं तरी ह्या संतकवींच्या नांवाची पकड महाराष्ट्राच्या जनमानसावर एवढी जबरदस्त आहे कीं, तुकाराम, रामदास, एकनाथ, नामदेव, चोखामेळा, गोराकुंभार आणि सावंतामाळी हीं नांवें कानावर पडतांच आजहि मराठी लोकांना प्रेमाचें भरतें येतें आणि " राम कृष्ण हरि " म्हणत ते आनंदानें डोलूं लागतात. महाराष्ट्रधर्माच्या या प्रतिष्ठापनेच्या काळांत मराठी भाषेला आणि साहित्याला असें कांहीं तेज चढलें कीं मराठीचिये नगरीं साक्षात् सोनियाच्या खाणी उघडल्या आणि त्याच्या झगझगाटानें सारा महाराष्ट्र दिपून गेला. 'माझा मऱ्हाठाचि बोलु' हा अमृताशीं पैजा जिंकणारा आहे असा आत्मविश्वास मराठी भाषिकांत निर्माण झाला. सर्व शास्त्रें, सर्व तत्वज्ञान आणि सर्व विद्या ह्यांचीं भांडारें संस्कृत भाषेच्या कड्या–कुलुपांत अडकून पडलीं होतीं. तीं सर्व भांडारें आमच्या संत कवींनीं फोडून मराठीं भाषेंत वाहून आणलीं आणि सर्वत्र ब्रह्मविद्येचा सुकाळ करून टाकला. संकृत भाषेची सर्व घमेंड अशा रितीनें आमच्या मराठी कवींनीं जिरवून टाकली. एकनाथांनीं तर छातीठोकपणें विचारलें कीं, " अरे संस्कृतवाणी देवें केली। आणि प्राकृत काय चोरापासोनि

झाली ?" दासोपंत आणखी त्याच्या पुढें गेले नि म्हणाले की, "संस्कृतांत मातीच्या भांड्याला 'घट' हा एकच शद्ब आहे, तर मराठींत डेरा, रांजण, घडा, मडकें, वोळकें असे छपन्न शद्ब आहेत! तेव्हां तुमची संस्कृतची मिजास आमच्या पुढें सांगू नका!" गेल्या दोनशें वर्षांत महाराष्ट्राचें सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन ज्या ज्या विविध आणि अभिजात वाङ्मयानें समर्थ आणि समृद्ध झालें, त्याच्या नवनीताचा मधुर आस्वाद या 'गाथ्यां'त मिळेल.

महाराष्ट्र हा जसा वीरांचा आणि संतांचा देश आहे, तसा कलावंतांचाहि देश आहे. महाराष्ट्राच्या प्राकृतिक रचनेंत सौंदर्य आणि भव्यता ह्यांचा उदात्त आणि उग्र समन्वय झाला आहे. सह्याद्रीचीं उत्तुंग आणि दुर्गम शिखरें आणि त्याचा लांबलचक अजस्र विस्तार बघून आश्चर्य आणि भीति ह्या भावनांनीं महाराष्ट्राचे प्राचीन कलावंत भारून गेले असले पाहिजेत. आणि म्हणून साहजिकच शिल्पकलेचा ह्या देशांत जास्त विचार आणि विकास झाला. उंच उंच गिरीशिखरांवरील महाबळेश्वर, भीमाशंकर, सप्तश्रृंगी, जेजुरी, हीं सुरम्य देवालयें; धिप्पाड कड्यांच्या मस्तकावर ठायीं ठायीं बांधलेले लढाऊ गड, कोट किल्ले, उत्तुंग पहाड फोडून देश आणि कोंकण ह्यांना जोडण्यासाठीं काढलेले प्रचंड घाट आणि मोठमोठे खडक पोखरून आंतमध्यें खोदलेलीं कलापूर्ण लेणीं हे महाराष्ट्राच्या शिल्पकलेचे एकाहीपेक्षां एक अद्‌भुत चमत्कार नव्हेत काय? गिरिदुर्गाप्रमाणेंच महाराष्ट्राच्या पश्चिमेस खळाळणाऱ्या सिंधु सागरांतही जे जलदुर्ग बांधण्यांत आलेले आहेत, तेहि पाहिल्यानंतर मन थक्क होतें. दुर्ग, देवालयें, मंदिरें, विहार, लेणीं, स्तूप आणि मूर्ति हें महाराष्ट्राच्या शिल्पकलेचें विविध वैभव अलौकिक आहे. आणि वेरूळ–अजंठानें तर महाराष्ट्राचें नांव जागतिक कलेच्या नकाशांत अमर केलें आहे. शिल्पकलेप्रमाणेंच चित्रकला, गायनकला आणि नाट्यकला ह्या कलेच्या क्षेत्रांत महाराष्ट्रानें असामान्य पराक्रम केलेले आहेत. त्यांचा निर्देश ह्या 'गाथां'त स्वतंत्रपणें केला आहे.

प्राचीन कवींप्रमाणेंच आजचे कवी आणि शाहीरहि महाराष्ट्राच्या पराक्रमाचें आणि वैभवाचे पवाडे अत्यंत आवेशानें आणि तन्मयतेनें गात असलेले आढळतात. नाथांच्या 'भागवता'ची पैठणी नेसलेली, तुकयाच्या 'गाथ्या'चा मुकुट मस्तकीं घातलेली आणि ज्ञानेशाच्या 'ज्ञानेश्वरी'चा मळवट कपाळीं लावलेली

अशी ही मराठी भाषा 'आमुची मायबोली' आहे असें सांगताना आमच्या कवींचें ऊर अभिमानानें भरून येतें. कोंकणाच्या किनाऱ्यावरील 'आंबे व पोफळि साग, नारळी' ह्या वैभवाचें आणि घाटमाथ्यावरील "कळकिचें बेट आकाशांत झुकांड्या मारी । करवंदी बाभळ बोरी । चिलार कठिण कांटेरी' या सौंदर्याचें वर्णन करतांना अथवा वरी, नाचणी, भात, बाजरी, कापूस, शाळू पिकवणाऱ्या आणि 'कांबळ खांदी, वहाण पायीं, डोइस मुंडासें' घालणाऱ्या मराठी शेतकऱ्यांचें वर्णन करतांना आमचे कवि अक्षरशः देहभान विसरतात. महाराष्ट्राच्या प्रेमानें आणि अभिमानानें सारी मराठी जनता अक्षरशः भारून गेलेली आहे. महाराष्ट्राचें हें अंतःकरण

**अहा, देश कसा छान**
**माझें गेलें देहभान**
**हिरवें हिरवें सारें रान**
**कुठें नागवेली पान**
**कसा पिकला ग गहूं हरवरा**
**हा शाळू मक्याचा तुरा**
**महाराष्ट्र देश सुंदरा**

ह्या शाहीर गीतांत जितक्या हृदयंमग रीतीनें प्रकट झालें आहे तितकें अन्यत्र कुठेंच झालें नाहीं. मराठी माणसांच्या अंतःकरणातले हे महाराष्ट्राच्या प्रेमाचे, भक्तीचे, अभिमानाचे आणि आदराचे उमाळे खळबळून उचंबळावेत आणि त्यांच्या परिमळानें हें सारें महाराष्ट्र दरवळून स्वर्गाप्रमाणें तें अक्षरशः 'आनंदवन भुवन' व्हावें ह्या भावनेनें हा 'महाराष्ट्र–गाथा' गुंफला आहे. ह्यांत आमचें स्वतःचें असें कांहीं नाहीं. उगमाचें 'अमृत' आम्ही कावडीमध्यें भरून घरोघर पोहोंचवलें आहे. महाराष्ट्राचा नुसता आंधळा अभिमान काय कामाचा ! आमच्या इतिहासांतलीं, भाषेंतलीं, वाङ्मयांतलीं आणि परंपरेंतलीं सारीं 'देवटाकीं' आम्हीं डोळ्यांनीं पाहिलीं पाहिजेत, आणि त्यांतलें चैतन्यजल आम्हीं स्वतःच्या ओंजळीनें पोटभर प्यालें पाहिजे. तरच 'महाराष्ट्रसंस्कृति'चा साक्षात्कार आम्हांला होईल. नाहीं तर कसा होणार ?

शिवशक्ति,
शिवजयंती १९६०

**कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी**
**प्रल्हाद केशव अत्रे**

# अनुक्रमणिका

(आंकडे पृष्ठांचे आहेत)

**प्रस्तावना :** (२–१०) अनुक्रमणिका : (११–१२)

१ **महाराष्ट्र देश** : (१–४) १ कौटिल्य अर्थशास्त्र, बौधायन स्मृति, म. भारत–वन, सभा २; महावंस, वायुपुराण, मत्स्यपुराण, ब्रह्म ३; महावंस, ऐहोळ, बाल रामायण ४.

२ **महाराष्ट्रीय लोक** : (५–२०) गाथा सप्तशती, बिल्हण ५, ह्यूएनत्सँग ६, कुवलयमाला ७, नलचंपू, महानुभावी वाङ्मय, ऋद्धिपूर वर्णन ८, आचारमाहात्म्य, विश्वगुणदर्शचंपू ९, आनंदवन-भुवन १५, उदो ! उदो ! १८, पांच देवीचा पाळणा १९.

३ **मराठी भाषा** : (२१–३४) २१ धनकथा, श्रवणबेळगोळ, मुकुंदराज २२, ज्ञानेश्वर २३, योगवासिष्ठ २४, नरेंद्र २५, त्र्यंबकराय, अज्ञानसिद्ध, संतोषमुनि २६, एकनाथ २७, दासोपंत २९, फादर स्टीफन्स, मुक्तेश्वर ३०, कृष्णदास, रामदास ३१, माधव जुलियन ३२, सोपानदेव चौधरी ३३.

४ **मराठ्यांचा इतिहास** : (३५–८४) भोंसले क्षत्रियच, मालोजी, शहाजी ३६, शिवाजी महाराजांचा जन्म ३७, स्वराज्याची शपथ ३८, अफजलप्रसंग ४०, आग्र्यास भेट ४१, शिवराज्याभिषेक ४३, शिवरायाचा गौरव ४७, शिवरायाचीं पत्रें ४८, महाप्रस्थान ५१, संभाजी : कांहीं प्रसंग ५३, राजाराम ५४, ताराबाई, बाजीराव ५५, वसई ५६, शाहूचें पत्र ५७, पानिपत कहर ५८, सवाई माधवराव ५९, खर्ड्याचा तह ६२, प्रतापसिंहाचा बाणेदारपणा ६३, रंगोबापूजींची हांक ६६, सत्तावन्न साल ६७, नानासाहेबांचा जाहीरनामा ६८, तात्या टोपे–उद्‌गार ७२, वासुदेव बळवंत-निवेदन ७३, चापेकर ७७, अभिनव भारत ७९, वीर

सावरकर पत्र ८०, लो. टिळकांचे उद्‌गार ८२, म. इतिहास-रानडे ८३, राजवाडे ८४.

५ **साहित्य सोनेयाचिया खाणी :** (८९–१६५) ज्ञानेश्वरी, अभंग ८६, ताटीचे अभंग, नामा म्हणे ८७, म्हणे नामयाची जनी ९१, सेना न्हावी, चोखा मेळा, भारुडें ९३, मुक्तेश्वराचा वाग्विलास ९९, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची १००, समर्थवाणी १०४, करुणाष्टकें १०५, पदें १०९, वामन ११२, रघुनाथ पंडित ११३, मयूराच्या केका ११४, भूपाळ्या ११६, आरत्या ११८, जानपद वाङ्मय १२१, पंचकल्याणी घोडा, महाराष्ट्र देशसुंदरा १२५, पोवाडे १२६, अर्वाचीन काव्य १३८.

६ **महाराष्ट्रांतील कला :** ( १६६–१८६ ) शिल्पकला १६६, भाजें, कार्लें १६७, नाशिक, अजिंठा, वेरूळ १६८, दुर्ग १६९, सौंदर्यस्थळें, १७२, गायनकला १७६, नाट्यकला १७८, चित्रकला १८२, महाराष्ट्र स्तोत्र १८३, परिशिष्ट १८५, शुद्धिपत्रक १८६.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 25680 वि: 3/64
7848 25/5/60

# महाराष्ट्र-गाथा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 99228

## १ : महाराष्ट्र

[महाराष्ट्र म्हणजे मोठें राष्ट्र. पुष्कळ लहान लहान राष्ट्रें मिळून महाराष्ट्र झालें आहे. महाभारतांत 'अश्मक, कालिंग व अपरान्त' अशीं तीन महान् राष्ट्रें सांगितलीं आहेत. विदर्भाला पूर्वी महाराष्ट्र म्हणत. त्याचीं विदर्भ, कैशिक, भोज, भोजकर, वर्धा-तट व महाराष्ट्र अशीं सहा नांवें होतीं. महाराष्ट्रांतील कांहीं कांहीं विशिष्ट भागांना गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, पांडुराष्ट्र हीं नांवें होतीं, असा उल्लेख महाभारतांत आहे. हा सर्व प्रदेश प्राचीन दक्षिणापथाचा भाग होय. दक्षिणापथ म्हणजे दक्षिणेकडील मार्ग, म्हणजेच दक्षिण मार्गाकडील प्रदेश. ह्या सर्व भू-भागां-संबंधांचे निर्देश प्राचीन ग्रंथांमध्यें आले आहेत, ते पुढें क्रमानें दिले आहेत.]

(१)

**अर्धत्रयोदशमश्मकानाम् अमितमपरांतानाम्**

—कौटिल्य अर्थशास्त्र, अ. २.

(अश्मक देशांत अर्धत्रयोदशात्मक द्रोण व अपरान्तांत अपरिमित असें पावसाचें प्रमाण होतें. १ द्रोण = दोन इंच)

(२)

**अवन्तयोऽगमगधाः सुराष्ट्रा दक्षिणापथाः ।**
**उपावृत् सिंधुसौवीरा एते संकीर्णयोनयः ॥**

—बौ. स्मृति.

(ह्या श्लोकांत भारतांतील अवन्ती, अंग, मगध, सुराष्ट्र, सिंध व इतर देशांबरोबर 'दक्षिणापथा'चा उल्लेख आहे.)

(३)

**एते गच्छंति बहवः पंथानो दक्षिणापथम् ।**
**अवंतींच ऋक्षवंतं च समतिक्रम्य पर्वतम् ॥**
**एष विन्ध्यो महाशैलः पयोष्णी च समुद्रगा ।**
**एष पंथा विदर्भाणामसौ गच्छति कोसलान् ॥**
**अतःपरं च देशोऽयम् दक्षिणे दक्षिणापथे ॥**

—म. भा. वन.

(ह्या श्लोकांत मुख्य मुख्य ठिकाणचे मार्ग सांगितले आहेत. हा रस्ता अवंती व ऋक्षपर्वत ओलांडून दक्षिणापथांत जातो. हा विन्ध्य. ही तापी नदी. ही समुद्रास मिळते. हा मार्ग विदर्भांचा. हा दुसरा कोसल देशास जातो. ह्याच्या नंतर दक्षिणेस दक्षिणमार्गावर हा देश आहे.)

(४)

**युयुधे पांड्यराजेन दिवसं नकुलानुजः ।**
**तं जित्वा स महाबाहुः प्रययौ दाक्षिणापथम् ॥**

—म. भा. सभा, अ. ११–१६

(पांड्य राजाशीं लढून व त्याला जिंकून सहदेव दक्षिणापथांत गेला.)

(५)

सम्राट् अशोक मौर्य राज्यावर आल्यावर सतरा वर्षांनीं मोग्गलिपुत्त तिष्य ह्यानें 'थेरो योनधम्मरक्खिताला अपरांतक देशास व थेरो महाधम्मरक्खिताला महाराष्ट्र देशास धर्मप्रसारार्थ पाठविलें.

—महावंस, इ. स. ५ वें शतक.

(६)

सेतुका मूषिकाश्चैव कुमनाः वनवासिकाः ।
महाराष्ट्राः माहिषकाः कलिङ्गाश्चैव सर्वशः ॥

(ह्या श्लोकांत उल्लेखिलेल्या जानपदांत महाराष्ट्राचा उल्लेख आला आहे. वायु ४६–१२५. मत्स्य, मार्कण्डेय ह्या पुराणांत थोड्याफार फरकानें हाच उल्लेख आला आहे. काळ अजमासें इ. स. ३००)

(७)

सह्यस्यानन्तरे चैते तत्र गोदावरी नदी ।
पृथिव्यामपि कृत्स्नायाम् स प्रदेशः मनोरमः ॥
यत्र गोवर्धनो नाम मन्दरो गंधमादनः ।
रामप्रियार्थं स्वर्गीया वृक्षास्तथौषधीः ॥
भरद्वाजेन मुनिना प्रियार्थमवतारिताः ।
ततः पुष्यवरो देशस्तेन मनोरमः ॥

—मत्स्य पु. ११४,३७–३९

(सह्यपर्वतानंतर गोदावरी नदी. तिच्या कांठचा प्रदेश जगांत सुंदर आहे. तेथील गोवर्धन पर्वतावर दिव्य औषधी आहेत. भारद्वाज ऋषींच्या वास्तव्यानें पुनीत झालेला पुष्यवर हा देशहि फार मनोरमआहे.)

(८)

कृष्णा भीमरथी चैव तुङ्गभद्रा तु नारद ।
तिसृणां सङ्गमो यत्र तत्तीर्थम मुक्तिदं नृणाम् ॥

—ब्रह्म पु.

(कृष्णा, भीमा, तुङ्गभद्रा ह्या तिहींचा संगम म्हणजे सर्वांना मोक्ष देणारें क्षेत्र आहे.)

( ९ )

**वेण्णातटे विशुद्धं शिरीषकुसुमोपमं च कौशलकम्**

— ब्रह्म. पु. ७७–५.

( वज्र नांवाचे हिरे वेण्णा नदीच्या पात्रांत सांपडतात. )

( १० )

**महाधम्मरखितानें महाराष्ट्रांतून जातांना महानरद कस्सपो जातकाचा उपदेश केला.**

— महावंस; इ. स. ५ वें शतक

( ११ )

**विधिवदुपचिताभिशक्तिभिश्शक्रकल्पः ।**
**तिसृभिरपि गुणौघैस्स्वैच्छमाहाकुलाद्यैः ॥**
**अगमदधिपतित्वं यो महाराष्ट्रकाणाम् ।**
**नवनवतिसहस्रगामभाजां त्रयाणाम् ॥**

— ऐहोळ शिलालेख, इ. स. ६३४.

( ज्यानें तिन्ही शक्ति विधियुक्त आपल्या ताब्यांत ठेविल्या आहेत व म्हणून जो इंद्रासारखा असून उच्चकुलांत जन्म, उत्कृष्ट गुण आणि इच्छा ह्या तिन्हींच्या सामर्थ्यानें ज्यानें ९९ हजार खेडीं असलेल्या तिन्हीं महाराष्ट्रावर–अष्मक, कुंतल, अपरांत ह्यांवर स्वामित्व मिळविलें आहे, तो सत्याश्रय पुलकेशी. )

( १२ )

**सुग्रीवः—भरताग्रज, अयमग्रे महाराष्ट्रविषयः ।**
**रामः—सोऽयम् सुभ्रु, पुरो विदर्भविषयः सरस्वतीजन्मभूः ।**
**सीताः—यत्रोत्पन्ना मे पितामहश्वशुरस्य गृहिणीन्दुमतिः ।**

— रा. शेखर, बा. रा. १०–७४.

( सुग्रीवः—हा पहा महाराष्ट्र देश पुढें आहे, रामचंद्रा.
राम —सीते, हा पुढचा विदर्भदेश–सरस्वतीची जन्मभूमीच ही.
सीताः—हाच काय माझ्या आजेसासू–इंदुमतीचा जन्मदेश )

[ ह्या विभागांत महाराष्ट्र व विशेषतः महाराष्ट्रीय लोक ह्या संबंधाचे उल्लेख कालक्रमानें दिले आहेत. कांहीं प्रसिद्ध अशीं महाराष्ट्रगीतेंहि दिलीं आहेत. हीं महाराष्ट्रस्तोत्रेंच आहेत. त्यांत देशाच्या वर्णनाबरोबर लोकांचेंहि वर्णन आहे. ]

(१)

( शालिवाहनप्रसस्ति )

आवण्णाइँ कुलाइं दो च्चिव जाणन्ति उण्णइं णेऊम् ।
गौरीअ हिअअदइओ, अहवा सालाहण णरिन्दो ॥

संस्कृत च्छाया —

आपन्नानि कुलानि द्वावेव जानन्ति उन्नतिं नेतुम् ।
गौर्या हृदयदयितोऽथवा शालिवाहननरेन्द्रः ॥

( विपन्नावस्थेंतील कुलांचा उद्धार करणें फक्त दोघेच जाणतात. एक गौरीचा हृदयेश्वर शंकर आणि दुसरा शालिवाहन राजा. )

— गाथासप्तशती ४६७.

(२)

( महाराष्ट्रीय लोकांचें निर्भयत्व )

लोकांचीं निर्भयता इतकी पराकाष्ठेची असे कीं, ते रात्रीं आपल्या घराचीं दारें बंद करण्याचीदेखील काळजी घेत नसत. चोरांच्या-ऐवजीं उघड्या खिडक्यांतून चंद्रकिरण आंत शिरत. चोर शिरत नसत.

— बिल्हण, वि. दे. चरित्

(३)

[प्रसिद्ध चिनी बौद्ध भिक्षु ह्यूएन त्सँग हा बौद्धधर्माच्या पुण्यक्षेत्रांचें दर्शन घेण्यासाठीं पुष्कळ देशांत फिरला. तो बौद्धधर्माच्या मूळपीठाची यात्रा करण्यास भारतांत आला. तो भारतांत ज्या ज्या प्रांतांत फिरला, त्या त्या प्रांताचीं व तेथील लोकांचीं त्यानें वर्णनें केलीं आहेत. हा भारतांत इ. स. ६२५–६४९ पर्यंत होता. त्यानें महाराष्ट्रांतील बौद्धधर्मक्षेत्रांचीहि यात्रा केली. त्याचें मूळ वर्णन चिनी भाषेंत आहे. त्याचें इंग्रजी भाषांतर आहे. त्या इंग्रजी वर्णनाचें मराठी भाषांतर पुढें दिलें आहे. ह्यांत महाराष्ट्रदेश व तेथील लोक ह्यांचें वर्णन आहे. महाराष्ट्राला तो 'मोहोलाच्छा' म्हणजे मोठें राज्य असें म्हणतो.]

'हा देश अजमासें ५०० ली (सुमारें ८०० मैल) परिघाचा आहे. ह्या देशाची राजधानी (पैठण) एका नदीच्या तीरावर वसली आहे. तिचा परीघ अजमासें पांच मैल आहे. ह्या देशांतील जमीन फार सुपीक आणि धान्यसंपन्न आहे. पिकें नियमित निघतात व तीं भरघोस असतात. ह्या देशाचें हवामान उष्णच आहे. येथील लोक साधे असून प्रामाणिक आहेत. त्यांचा बांधा उंच व त्यांचा स्वभाव निग्रही व करारी आहे. मित्राशीं कृतज्ञ तर शत्रूशीं निर्दय अशी त्यांची वृत्ति आहे. त्यांचा जर कोणी अपमान केला, तर ते केव्हांहि सहन करणार नाहींत. त्यांचा सूड घेतल्याखेरीज ते राहत नाहींत, मग त्यांत त्यांच्या प्राणावर संकट आलें तरी ते त्याला भीत नाहींत. संकटांत सांपडलेल्याला मदत करण्यास नेहमीं ते तयार असतात. तेव्हांहि ते आपल्या प्राणाकडे बघत नाहींत. शत्रूचा सूड घ्यावयाचा जरी असला तरी ते त्याला अगोदर त्याची जाणीव देतील. त्याला शस्त्र घ्यायलासुद्धां ते अवसर देतील व नंतरच ते त्याच्याशीं लढायला तयार होतील. युद्धांत ते धर्मयुद्धाचे नियम पाळतात. शत्रु हार खाऊन पळूं लागला तर त्याचा ते पाठलाग करतील, पण त्याला ते मारणार नाहींत. शरणागताला नेहेमीं ते अभय देतात. आपल्या सेनापतीचा पराजय झाला तर ते त्याला शिक्षा करीत नाहींत. त्याला ते स्त्री-भूषणें

वहाल करतात! अर्थातच त्या सेनापतीला आपला जीव नकोसा होतो. ह्या देशांत सैनिकहि हजारों आहेत. प्रत्येक सैनिक उत्तम लढवय्या असतो. युद्धावर निघतांना ते आपली यथायोग्य तयारी करून घेतात. त्यांचा एक भालाईत हजारों सैनिकांनासुद्धां भारी असतो. भालाइताच्या हातून जर कोणी दगावला तर त्याला त्याबद्दल शासन केलें जात नाहीं. लढाईस निघतांना ते डिण्डिमांचा वाद्यघोष करतात. त्यांच्या सैन्यांत हस्तिदल हें मुख्य असतें. सैन्य निघालें कीं हजारों हत्ती निघतात. ते वेफाम हत्ती जें वाटेंत येईल त्याचा पायाखालीं चुराडा करून टाकतात. अशा हत्तींपुढें शत्रूचा काय टिकाव लागणार?"

"ह्यांचा राजा ह्या चतुरंगी सैन्याच्या जोरावर शत्रूबद्दल बेफिकीर असतो. तो त्याला तुच्छ लेखतो. महाराष्ट्र देशाचा राजा क्षत्रिय आहे. त्याचें नांव पुलकेशी आहे. त्याच्या योजनाहि मोठ्या व त्याचें राजकारणहि मोठें. त्याचा दबदबा सर्वत्र आहे. त्याची प्रजा त्याच्या आज्ञा शिरसावंद्य मानते. त्याची सर्व प्रजा मोठी विद्याभिलाषी आहे. जुन्यानव्या अशा दोन्ही धर्मग्रंथांचें ते पठण करतात. ह्या देशांत सुमारें १०० विहार असून ५००० भिक्षु तेथें असतात. तेथें हिंदु देवतांचीं देवालयेंहि शंभरावर आहेत. निरनिराळ्या पंथांचेहि लोक ह्या देशांत बरेच आहेत."

—सॅम्यूएल बिल: "ह्यूएन त्सँग ग्रंथ." २, पृ. २५५–७

(४)

'दढमडह सामलंगे अहिमाणे कलहसीले ये।
दिण्णले गहिल्ले उल्लविरे तत्थ मरहट्टे ॥'

—उद्योतनसूरि, कु. माला, इ. स. ७७८ सुमारें.

(बळकट, ठेंगण्या, सांवळ्या अंगाच्या, काटक, अभिमानी, भांडखोर व दिण्णले (दिले), गहिल्ले (घेतले) असें म्हणणाऱ्या मरहाठ्यास त्यानें पाहिलें.)

(५)

ह्या महाराष्ट्र देश वीरपुरुषांचा आहे. त्याला वर्धातट म्हणतात. वर्धा (विदर्भा) नदी ह्या देशांत वाहते. तिला दक्षिण सरस्वती म्हणतात. येथील प्रजा त्यागी व न्यायप्रिय आहे. येथील भूमि समृद्ध आहे. ह्या देशाचे सरदार राजाच्या बरोबरचे आहेत. ते औदार्यांत कधीं हार जात नाहींत. येथील लोक स्वाभिमानी आहेत. ते शरीरानें बळकट असून रणशूर आहेत.

— त्रिविक्रम, नलचंपू.

(६)

साठी लक्ष देश महाराष्ट्र। तेथिचे शिहाणे सुभट्ट : वेदशास्त्र-चातुर्याची पेठ्ठ : भरली तिये देशीं ॥ ऐसे ते महाराष्ट्रराये सुंदरू : वरी महाराष्ट्रभाषाचतुरु : तेहीं वसविलें गंगातीरू : क्षेत्र त्र्यंबकूवेऱ्हीं : पश्चिमे त्र्यंबकूपूर्वे सागरवेऱ्हीं : द्वादश योजनें उभय गंगातारीं : ऐसें तें गंगातट महाराष्ट्रीं : वसिजे पुण्यातन ॥ तिये महाराष्ट्रीं गंगातीरीं महंतु : तेथ सदां ईश्वरावतारू क्रीडतु ॥ देश म्हणजे खंडमंडळ : जैसें फलेठाणापासौनि दक्षिणेसि मऱ्हाटी भाषा जेतुलां ठाइं वर्ते तें एक मंडळ : तयासि उत्तरे बालेघाटाचा सेवट असे : ऐसें एक खंडमंडळ : मग उभय गंगातीर तेंहि एक खंडमंडळ : आन तयापासौनि मेघकरघाट तें एक मंडळ : तयापासौनि आवघें वराड : तेंहि एक मंडळ : पर आघवीचि मिळौनि महाराष्ट्रचि वोलिजे : किंचित किंचित भाषेचा पालट असें म्हणौनि खंडमंडळें म्हणावीं : मग ऐसे मंडळीचा पैला मंडळीसि जाए आन पैले मंडळींचा ऐलासि ए : तया पुरुषाचे तेचि सेवट जाणावे ॥

— मानभावी वाङ्मय, १३ वें शतक.

(७)

कलयुगीं अवतरूनि प्रशान्तें : अंगिकरोनि चक्रधर नामातें :
महाराष्ट्रीं केलें निर्माण तीर्थातें : क्रीडा करोनियां ॥ १ ॥

विंध्याद्रिपासोनि दक्षिण दिशेसीं : कृष्णानदीपासुनि उत्तरेशी :
झाडी मंडळापासोनि पश्चिमेसीं : कोंकणपर्यंत ॥ २ ॥
महाराष्ट्र बोलिजे चक्रधर : क्रीडा केली जेथ जेथें :
तीये जाणावीं पवित्र माहातीर्थें : महात्म्ये दर्शनीचें ॥ ३ ॥

—'ऋद्धिपूरमाहात्म्यां' तील महाराष्ट्रवर्णन ५.

(८)

(श्री चक्रधर स्वामी हे मूळ गुजरातमधील भडोचचे. पण त्यांनीं महाराष्ट्र देश आपला केला. 'महाराष्ट्री असावें' हें त्यांचें सर्व शिष्यांना नेहमीं सांगणें असे. महानुभाव पंथीयांची महाराष्ट्र व तेथील लोक ह्यांसंबंधीं भावना खालील उल्लेखावरून स्पष्ट होतें.)

जंगम म्हणजे चरणाल ते। तयांचे भेद सूक्ष्म जंतुपासौनि मनुष्यपर्यंत इतुकेयांसि अभय वर्ते जयाचे ते पुरुष महाराष्ट्रा।
महंत म्हणजे महंत राष्ट्र। म्हणौन महाराष्ट्र। महंत म्हणजे थोर। तर तेचि थोरी कवण कवण अर्थें असे पा। ना।
सात्त्विक हा एक। दुसरा सुखरुप। तिसरा इष्टकारक। चौथा निर्दोष। पांचवा सगुण। तर निर्दोष म्हणजे अनिष्ट न निफजे आन सगुण म्हणजे इष्टचि निफजे। ऐसे पांच अर्थभेदी महाराष्ट्र थोर। आणिक कैसे थोर। ना! जेतुका अर्थीं आपली थोरी असे तेतुलाहि अर्थीं आणिकांसि थोरी करी। थोरापासौनि महाथोर तयातें महाराष्ट्र म्हणिजे।
एवं जडचेतनांमध्यें मागिलां पाचां गुणांचें अनुवर्तन जेतुला ठाईं असेल तेतुला ते तुले ते महाराष्ट्रची जाणावे

—आचारमाहात्म्य.

(९)

## विश्वगुणादर्शचंपू

['विश्वगुणादर्शचंपूः'—हा एक चंपूप्रकारांपैकीं ग्रंथ आहे. गद्यपद्यात्मक काव्याला 'चंपू' असें म्हणतात. ह्या काव्याचा कर्ता वेंकटाध्वरि हा होय. हा

प्रसिद्ध अप्पयगुरूचा नातू व रघुनाथ दीक्षिताचा मुलगा होय असें म्हणतात. हा अप्पयगुरु कुवलयानन्दकर्ता अप्पय दीक्षिताहून निराळा. कोणी म्हणतात कीं वेङ्कटाध्वरि हा नीलकण्ठ दीक्षिताचा समकालीन आणि नीलकण्ठ दीक्षित हा अप्पय दीक्षिताचा नातू व नारायण दीक्षिताचा मुलगा. त्याच्या नीलकण्ठचंपूचा रचनाकाल इ. स. १६३७ असा मानितात. ह्याचा वेङ्कटाध्वरि हा समकालीन. तेव्हां त्याच्या विश्वगुणादर्शचंपूचा रचनाकाल ह्याच सुमारचा असावा. तो इ. स. १६४० समजतात. ह्या काळाला त्यांतील हूणांचा उल्लेख दुजोरा देतो. हूण म्हणजे गौरकाय इंग्रज. हा ग्रंथ कृशानु–विश्वावसु ह्या दोन गंधर्वांच्या संभाषणरूपांत लिहिला आहे. कृशानु हा दोषान्वेषी असून विश्वावसु हा गुणग्रहण-कौतुकी आहे. त्यामुळें संभाषणाला स्तुतिनिंदात्मक स्वरूप प्राप्त झालें आहे. महाराष्ट्र-वर्णनाच्या बाबतींतहि कृशानु हा त्यांचे दोष दाखवितो तर विश्वावसु त्या दोषांचें निराकरण करतो व महाराष्ट्राचें गुणवर्णन करतो. ]

**कत्यौषधीः कति तरून् कति वा महीध्रान् ।**
**कत्यम्बुधीन् कति नदीः कति पुंस एतान् ॥**
**कत्यङ्गनास्त्वमसृजः कति नाथ देशान् ।**
**मन्ये तवैष महिमा नहि माति बुद्धौ ॥ १ ॥**

( हे ईश्वरा, ह्या महाराष्ट्र देशांत तूं किती औषधीवल्ली, किती वृक्षतरू, किती जलसंचय, किती नद्या, किती पुरुष व किती स्त्रिया निर्माण केल्या आहेस ! हा तुझा मोठेपणा, हे ईश्वरा, माझ्या बुद्धीस संपूर्ण आकलन होत नाहीं. )

**महाराष्ट्राभिख्यो मधुरजलसांद्रो निरुपमः**
**प्रकाशो देशोऽयं सुरपुरनिकाशो विजयते ॥**
**गृहस्था यत्रामी गुणजलधयः केऽपि विभवैः**
**समृद्धाः श्रद्धातो मुहुरतिथिपूजां विधदते ॥ २ ॥**

( हा महाराष्ट्र प्रदेश प्रत्यक्ष स्वर्गाची बरोबरी करतो. येथें गोड मधुर पाण्याचे संचय तरी किती आहेत, त्यांना उपमाच नाहीं. येथील रहिवासी तर गुणांचे सागरच आहेत. कांहीं तर मोठे ऐश्वर्यसंपन्न आहेत. ते नेहमीं मोठ्या श्रद्धेनें अतिथींची सेवा करतात )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........

अत्रापि सन्ति बहवः कलिताग्निहोत्राः ।
शास्त्रार्थबोधकुशलाः किल शान्तिमन्तः ॥
अन्तर्मुखा सततमात्मविदो महान्तो ।
निर्धूतवाह्यविषया निगमाध्वनिष्ठाः ॥ ३ ॥

(अरे, ह्या महाराष्ट्रांत सुद्धां किती तरी विद्वान् असे आहेत कीं ते सतत अग्निहोत्र चालवितात! कितीतरी विद्वान् येथें असे आहेत कीं ते शास्त्राचा मूळ खरा अर्थ जाणतात. पुनः कितीतरी असे आहेत कीं, ते आपल्या संन्यस्त व निष्काम वृत्तीमुळें शांतिब्रह्माचे प्रत्यक्ष अवतार आहेत. ते सतत आत्मनिरीक्षण करून अन्तर्मुख झालेले आहेत. त्याना बाह्यविषयाचा लेप नाहीं. ज्ञानावर व कर्मयोगावर त्यांची निष्ठा पूर्ण आहे.)

अन्यच्च—

शुचिभूर्ताः स्नानैः श्रुतहितपुराणाश्च नियमा-
दपूतानां स्पर्शानवहितहृदोऽमी विजहतः ॥
सुराभ्यर्चां कृत्वा शुचिकृतमदन्त्यन्नमनघं ।
महाराष्ट्रे देशे विलसति महानेष हि गुणः ॥ ४ ॥

(शिवाय महाराष्ट्रीय लोकांत आणखी एक मोठा गुण शोभून दिसतो तो हा कीं ते रोज नियमानें स्नान करून, शुचिर्भूत होऊन कल्याणकारक व भक्तिप्रधान भागवत वगैरे पुराणग्रंथांचें संपूर्ण पठण व रहस्यग्रहण करतात. त्यांचें सारें लक्ष श्रुतिस्मृतिमध्यें सांगितलेल्या धर्मांचें पालन करण्याकडे असतें. असे हे लोक अपवित्र विटाळापासून नेहमीं दूर राहून परमेश्वराची पूजाअर्चा करून नंतर पुण्यवान् लोकांनीं सिद्ध केलेलें पवित्र अन्न सेवन करतात.)

किंच —

चमूनियमनेन वा जनपदाधिकारेण वा
द्विजव्रज उपव्रजन्प्रभुपदं महाराष्ट्रजः ।
न वृत्तिमिह पालयेद्यदि धरासुराणां ततो
भवेद्यवनवेष्टितं भुवनमेतदब्राह्मणम् ॥ ५ ॥

(आणखी पहा—महाराष्ट्रीय ब्राह्मण लोक सेनापतिपद घेऊन लोकांवर आपला अधिकार प्रस्थापित करतात. ते राजपदहि प्राप्त करून घेतात. हें पद जर त्यांना

नीट रक्षण करतां आलें नाहीं, तर म्लेंच्छांचें येथें प्राबल्य होईल. त्यांच्याकडून सर्व देश वेढला व व्यापला जाईल. सर्व वर्णाश्रमधर्मोचा लोप होईल. )

**यच्च दोषान्तरं भवता परिभाषितं तदशेषमपि साधुजनोपकारेण परिहीयते।**

**अलं मङ्क्षु संहर्तुमंहस्सहस्रं स एकोऽपि विप्रप्रवेकोपकारः ॥**
**कठोरः कुठारः किलैकोऽपि तिग्मो विनिर्भेत्तुमीष्टे विषद्रूननेकान् ॥६॥**

(आतां तुम्ही जे त्यांचे दोष पूर्वी सांगितले – वेळेवर त्यांचीं धार्मिक कृत्यें होत नाहींत वगैरे – त्या दोषांचें परिमार्जन तेथील पुण्यशील साधुसंतांच्या सहवासानें होतें. त्या लोकांवर त्यांचा उपकारच होय.

ह्या पुण्यशील साधुसंतांचा उपकार म्हणजे हजारों पापांचें निर्मूलन व नाश. इतकें त्याचें सामर्थ्य आहे. तीक्ष्ण कठोर कुठार एकच, पण ती अनेकविषवृक्ष तोडून मुळांसकट नाहींसे करण्यास समर्थ असते. )

**कृशानु :-**
**अस्त्वेवमथाप्यत्रत्यानामाद्येतरवर्णप्रभवानां पुनरतिदुस्सहं चेष्टितम् ॥**

**पश्य :-**

**देशे देशे लम्पटाः पर्यटन्तो भञ्जं भञ्जं ब्राह्मणादीनशेषान् ॥**
**हारं हारं हन्त सर्वस्वमेषां पापा एते स्वोदरं पूरयन्ति ॥ ७ ॥**

( कृशानु : हें असो, पण अरे, येथील इतर जातींच्या लोकांचें जीवन फार कष्टमय आहे, त्यावर काय तुझें म्हणणें आहे, हें पहा. हे इतर लोक निरनिराळ्या देशांत फीरफीरून, ब्राह्मणांच्या नोकरींत राहून त्यांना लुबाडून, लुबाडून आपला चरितार्थ चालवितात; काय त्यांची ही स्थिति ! )

**विश्वावसु :**

**सत्यमेवमथापि महनीयमेव तेषामेवं चेष्टितम्**

**तथाहि :**

**मायाचञ्चुतया भयावहगतिः प्रत्यर्थिपृथ्वीभुजाम्**
**माहाराष्ट्रभटच्छटा रणपटुर्नोपर्यटाट्येत चेत् ॥**

देवब्राह्मणवर्गनिग्रहकृतो देशांस्तुरुष्का इमे
निष्प्रत्यूहमनोरथा वितनुयुर्निर्देव-भूमीसुरान् ॥ ८ ॥

( विश्वावसु : अरे तूं म्हणतोस हें खरें, पण तोच त्यांचा एक मोठा गुण आहे; कारण युद्धांत पटाईत असल्यामुळें महाराष्ट्रीय योद्धे हे कपटी शत्रूंचे प्रत्यक्ष काळच होत. ते असे जर मोहिमेवर न जाते, तर तुर्कशत्रूंना सर्व रान मोकळें सांपडून त्यांनीं देव ब्राह्मणांचा उच्छेदच करून टाकला असता. )

ततश्च

देवक्षोणीसुरहितकृते दारितम्लेच्छपङ्क्ते-
र्मह्यां सह्या कथमपि महाराष्ट्रयूथस्य चेष्टा ॥
व्याधिव्यूहप्रतिहतिकृतां व्यक्तमुग्रौषधानां
कायारोग्यप्रणयिहृदयैः काटवं मर्षणीयम् ॥ ९ ॥

( महाराष्ट्रीय तरुण रणयोद्धे देवब्राह्मणांचें रक्षण करतांना असे जरी कठोर रीतीनें वागत असले, तरी त्यांचें हें कठोर वर्तन लोकांना पसंत असतें. तें ते आनंदानें सहन करतात. असाध्य रोगानें पछाडलेला व त्यानें जर्जर झालेला मनुष्य आपला रोग नाहींसा व्हावा म्हणून कडूंतलीं कडू अशीं औषधें निमूटपणें नाहीं कां घेत व सहन नाहीं का करीत ? )

इत्यन्यतो विमानं गमयन्नग्रतो दृष्ट्वा—

क इमे बहवः समवेता मानुषा मार्गानशेषानप्य शून्ययन्ति

निपुणं निरूप्य सश्लाघम्, विश्वावसुः—

अङ्गान् वङ्गान् कलिङ्गानथ मगध-कुरून् कोसलान् केकयान्वा
काश्मीरान् कुन्तलान्वा यवनजनपदान् किंच पाञ्चालदेशान्
नेपालान् केरलान्वा कतिचन कृतिनः पाण्डय-तुण्डीरचोलान्
कर्नाटान् गौडलाटान् परगतिघटनालम्पटाः पर्यटन्ति ॥ १० ॥

( कृशानु व विश्वावसु ह्यांचें विमान जरा पुढें जातें.—अरे, पण हे येथें आपणासमोर झुंडींच्या झुंडीनें जमलेले हे लोक कोण आहेत ? )

( नीट न्याहाळून पाहून विश्वावसू : अरे, हे महाराष्ट्रीयच लोक आणि हे भारतांतील निरनिराळ्या अंग, वंग वगैरे प्रांतांत तीर्थयात्रेसाठीं जात आहेत. त्यांना मोक्षसिद्धि करून घ्यायची आहे. )

विश्वावसू :—

कथमरे हरेर्भक्तेषु विरक्तेष्वप्यमीषु दूषयितुं सन्नह्यसि ॥
दोषेभ्यो नैव भेतव्यं दृढा चेद्भक्तिरच्युते ॥
तिमिरेभ्यो नहि भयं दीपश्चेल्लभ्यते महान् ॥ ११ ॥

( विश्वावसु : हे कृशानो, अरे हे लोक म्हणजे हरीचे परमभक्त. सर्व इंद्रिय-भोगांपासून हे अत्यंत विरक्त. अशा ह्या पवित्र व परमभक्त लोकांची तूं विनाकारण निन्दा करतोस, तुला काय म्हणावें ? ज्यांची हरीवर नितांत भक्ति आहे, त्यांना तूं आतांपर्यंत जे दोष सांगितले त्यांचें काय भय ? मोठा दिवा हातांत असल्यानंतर दाट अंधकाराचें भय कांहीं असतें काय ? )

किंच —

दुःखं च जन्मदुरितं च दृढामविद्याम्
हा हन्त हन्ति परमा हरिभक्तिरेका ॥
एकोऽपि राघवशरः किल सप्ततालान्
शैलं रसातलमि त्वरया विभेद ॥ १२ ॥

( आणखी असें पहा —

एक हरिभक्ति नितांत असली कीं ती जन्माचें दुरित नाहींसें करते, अविद्या जरी कठीण तरी तिचाहि लोप करते. रामाचा एकच बाण, पण सात ताडवृक्ष, पर्वत व रसातल ह्यांना एकदम तोडून पार जातोच कीं नाहीं ? )

अपि च —

धुनोति निबिडं तमः परिलुनाति पापाटवीं
तनोति च मनोरथानुपचिनोति नानोत्सवान् ॥
अनक्ति च पुनःपुनर्ननु मनः सुधानिर्झरै
र्व्यनक्ति परिपक्त्रिमं वृषगिरीशभक्तिः शुभम् ॥१३॥

( शिवाय —

शिवाची किंवा विष्णूची भक्ति काय काय करूं शकते हें पहा. ती अज्ञानाचा दाट अंधकार नाहींसा करते. पापाच्या जंगलाचा संहार करते. सर्व मनोरथांची प्राप्ति करून देते. आनंदाचा परमोत्कर्ष करते. अमृताचा वर्षाव करते. पुण्यफलांचा लाभ करून देते. अशी ही विष्णुभक्ति किंवा शिवभक्ति होय ! )

**किंबहुना—**

**पूताङ्गानां पुण्यगङ्गादिसिन्धुस्नानान्नानाक्षेत्रापराणाम् ॥**
**दारागारापत्यवैराग्यभाजां साराभिज्ञैरादरः कार्य एषाम् ॥१४॥**

( फार काय सांगावें ?

ह्या महाराष्ट्रीय लोकांबद्दल आदरच दाखविला पाहिजे. कारण ह्यांनीं अनेक तीर्थयात्रा करून तेथील गंगासिंधुसारख्या नद्यांच्या पवित्र जलांत स्नानें केल्यानें ह्यांचीं शरीरें पवित्र झालीं आहेत; स्त्री-पुत्र-घरदार ह्यांसंबंधीं ह्यांचीं मनें पूर्ण विरक्त झालीं आहेत, ह्यांनीं जीवनाचें पवित्र साफल्य केलें आहे. अशा ह्या महाराष्ट्रीय लोकांपुढें आदरानें आपण नमलेंच पाहिजे. )

( १० )

## महाराष्ट्रीयांची युद्धनीति

**खेटक करवाळें सतेज । सूड साधनीं विशाळ पैंज ।**
**या नांवें महाराष्ट्र झुंज । खंडिताहि न खंडवे ॥**

—मुक्तेश्वर, महाभारत अ. २१–५४

( ढाल, तरवार हीं तेजस्वी शस्त्रें धारण करणारे, सूड उगविण्याची प्रतिज्ञा करणारे, मरेतों न हटणारे, कधींहि खंडिले न जाणारे असे लढणारे ते महाराष्ट्रीय होत. ह्या त्यांच्या लढण्याला महाराष्ट्रयुद्ध म्हणतात. )

( ११ )

( नाशिकापासून करवीरपर्यंतच्या स्थानास 'आनंदवनभुवन' असें श्रीसमर्थ रामदासस्वामी म्हणत. त्या स्थानाचें माहात्म्य त्यांनीं 'आनंदवनभुवन' ह्या काव्यांत वर्णिलें आहे. पुढें होणाऱ्या गोष्टी समर्थांना पंचवटीस तपश्चर्येंत असतांना दिसल्या होत्या, तसतशाच घडत आल्याचें ते सांगतात. ह्या काव्याच्या एकंदर ओंव्या आहेत ५९. त्यांपैकीं कांहीं ओंव्या येथें दिल्या आहेत. )

**जन्म ते सोसिले मोठे । अपाय बहुतांपरी ।**
**उपायें धाडिलें देवें । आनंदवनभुवनां ॥ १ ॥**

स्वप्नां जें देखिलें रात्रीं । तें तें तैसेंची होतसें ।
हिंडतां फिरतां गेलों । आनंदवनभुवनां ॥ २ ॥
स्वधर्माआड जें विघ्नें । तें तें सर्वत्र उठीलीं ।
लाटिलीं कुटिलीं देवें । दापिलीं कापिलीं वहू ॥ ३
खवळिले लोक देवाचे । मुख्य देवचि ऊठिला ।
कळेना काय होतें रे । आनंदवनभुवनीं ॥ ४ ॥
स्वर्गीची लोटली गंगा । रामगंगा महानदी ।
तीर्थासीं तूळणा नाहीं । आनंदवनभुवनीं ॥ ५ ॥
त्रैलोक्य चालिलें तेथें । देव गंधर्व मानवी ।
ऋषी मुनी महायोगी । आनंदवनभुवनीं ॥ ६ ॥
त्रैलोक्य चालिल्या फौजा । सौख्य वंदविमोचनें ।
मोहीम मांडिली मोठी । आनंदवनभुवनीं ॥ ७ ॥
सुरेश उठिला अंगें । शूरसेना परोपरी ।
विकटे कर्कशे यानें । शस्त्रपाणी महावळी ॥ ८ ॥
देव देव वहू देव । नाना देव परोपरी ।
दाटणी जाहाली मोठी । आनंदवभुवनीं ॥ ९ ॥
दिग्पती चालिले सर्वै । नाना सेना परोपरी ।
वेष्टीत चालले सकळै । आनंदवनभुवनीं ॥१०॥
मंगलें वाजतीं वाद्यें । महागणासमागमें ।
आरंभीं चालिला पुढें । आनंदवनभुवनीं ॥११॥
विजयी दीस जो आहे । ते दिसी सर्व ऊठती ।
अनर्थ मांडला मोठा । आनंदवनभुवनीं ॥१२॥
देवचि तुष्टला होता । त्याचे भक्तीस भूलला ।
मागुता क्षोभला दुःखें । आनंदवनभुवनीं ॥१३॥
कल्पांत मांडला मोठा । म्लेंच्छदैत्य वुडावया ।
कैपक्ष घेतला देवीं । आनंदवनभुवनीं ॥१४॥
वुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान वळावलें ।
कोपला देव देवांचा । आनंदवनभुवनीं ॥१५॥

त्रैलोक्य गांजिलें मागें । ठाऊकें विवेकी जना ।
कैपक्ष घेतला रामें । आनंदवनभुवनीं ॥१६॥
भीमची धाडिला देवें । वैभवीं धांव घेतली ।
लांगूळ चालिलें पुढें । आनंदवनभुवनीं ॥१७॥
येथून वाढला धर्म । रमाधर्मे समागमें ।
संतोष मांडला मोठा । आनंदवनभुवनीं ॥१८॥
बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छसंहार जाहला ।
मोडलीं माडलीं क्षेत्रें । आनंदवनभुवनीं ॥१९॥
बुडाले भेदवाही ते । नष्ट चांडाळ पातकी ।
ताडिले पाडिले देवें । आनंदवनभुवनीं ॥२०॥
गळाले पळाले मेले । जाले देशधडी पुढें ।
निर्मळ जाहाली पृथ्वी । आनंदवनभुवनीं ॥२१॥
उदंड जाहलें पाणी । स्नानसंध्या करावया ।
जप-तप-अनुष्ठानें । आनंदवनभुवनीं ॥२२॥
देवालयें दीपमाळा । रंगमाळा बहुविधा ।
पूजिला देव देवांचा । आनंदवनभुवनीं ॥२३॥
रामवरदायिनी माता । गर्द घेऊनी ऊठिली ।
मर्दिले पूर्वींचे पापी । आनंदवनभुवनीं ॥२४॥
राम कर्ता राम भोक्ता । रामराज्य भूमंडळीं ।
सर्वस्व मीच देवाचा । माझा देव कसा म्हणो ॥२५॥
वेद शास्त्र धर्मचर्चा । पुराणें महात्में किती ।
कवित्वें नूतनें जीर्णें । आनंदवनभुवनीं ॥२६॥
वेद तो मंद जाणावा । सिद्ध आनंदभूवनीं ।
अतुळ महिमा तेथें । आनंदवनभूवनीं ॥२६॥
उदंड ठेविलीं नामें । आपस्तुतीच मांडिली ।
ऐसें हें बोलणें नाहीं । आनंदवनभूवनीं ॥२७॥
स्मरल लिहिलें आहे । बोलतां चालतां हरी ।
काय होईल पाहावें । आनंदवनभूवनीं ॥२८॥

महिमा तो वर्णवेना । विशेष बहुतांपरी ।
विद्यापीठ तें आहे । आनंदवनभूवनीं ॥२८॥
सर्वसद्या कळा विद्या । न भूतो न भविष्यति ।
वैराग्य जाहालें सर्वे । आनंदवनभूवनीं ॥३०॥

(१२)

(श्री शिवरायाचें चरित्र लिहितांना महाराष्ट्राच्या देवदेवतांना चरित्रकारानें पुढीलप्रमाणें स्फूर्तिदायक 'उदो उदो' केलेलें आहे.)

चंडमुंडभंडारसुरखंडिनी जगदंबे, उद्दंडदंड महिषासुरमर्दिनी दुर्गे महाराष्ट्रधर्मरक्षिके तुळजाभवानी ये। सुदिन सुवेळ मी शिवरायाच्या जन्माचें कीर्तन मांडलय्, आई तूं ऐकायला ये।

मोरगांवच्या मोरेश्वरा, आशीर्वादा ये, शिंगणापूरच्या महादेवा, डोलायला ये. जेजुरीच्या खंडेराया, दिवटी घेऊन ये. गोमंतकाचे म्हाळसाई, बुधली घेऊन ये. कोल्हापूरच्या आई, माझ्या पाठराखणी ये. चुकलंमाकलं तर तूं मला सुचवायला ये.

रामटेकच्या रामराया, झांजा वाजवीत ये. जरंड्याच्या मारुतराया चिपळ्या घेऊन ये. पंढरीच्या पांडुरंगा, मृदंग घुमवीत ये. अमरावतीचे अंबाबाई, पाळणा गायाला ये. वेरूळच्या घृष्णराया, आंदुळायला ये. वार्शीच्या भगवंता, काजळ घेऊन ये. माहूरच्या मातोशिरी, तीट लावण्या ये. अम्बे जोगाई जोगेश्वरी, औक्षणाला ये. ललाटीचा लेख लिहिण्या, सटवाई ये. जाखाई जोखाई, संरक्षणा ये. शिवनेरीच्या शिवाई, तूं नांव ठेवण्या ये. कोंकणच्या परशुरामा, साखर वांटण्या ये.

पंढरीच्या नामदेवा, कुंची घेऊन या. देहूच्या तुकारामा, कौतुकाला या. नामयाच्या जनाबाई न्हाऊं घाला या. पाळण्याला सजविण्या सांवतामाळी, या. सोनाराचे नरहरी, घाईघाई या. वाळलेणीं राजलेणीं त्वरें घेऊनि या. निंबलोण उतराया कान्होपात्रा, या. इष्टमणि गुंफोनिया बसवेश्वरा, या. वाघोलीच्या रामेश्वरा, पंचांग घेऊन या. जन्मराशी कुंडलीचे भाग्य सांगा या. मुक्ताबाई,

सखुबाई, वहिणाबाई या. बाळंतविडा पदराखालीं झाकोनि या. शेखबाबा महंमदा, हळुहळूं या. श्रीगोंद्याच्या पेठेंतुनी रिंगणी घेऊन या. आजोळीचे धवळे गाया, महदंबा, या. रिद्धपूरच्या चक्रधरा, लीळा करा या. सेना, निळा, रामदासा, एका, चोखा, या. निवृत्तीच्या शिष्यवरा, या.

महाराष्ट्राच्या गंगांनो या. कृष्णा गोदा पवनांनो या.
पूर्णे वर्धे, इंद्रायणी, ये. तापी भीमे पुष्पावती ये.
दूधसागरा, फेंसाळत ये. राजापूरच्या ये गंगे ये.
सहस्रशीर्षा सह्याद्री, ये. सात कड्यांसह सातपुड्या, ये.
किल्ल्यांच्या तटकोटांनो या. प्रचंड अवघड बुरुजांनो या.
जलदुर्गांनो दर्यासह या. तुफान गर्जत लाटांनो या.
देवगिरीच्या यादव तख्ता, छत्रचामर मुकुटासह ये.
राजकुलासह विरुदांसह ये, राजसभेसह सैन्यासह ये.

देवदेवतांनो, संतसज्जनांनो, शहाण्णव कुळवंतांनो, महाराष्ट्र मंडळींनो अवघे अवघे या. मी शिवरायाचें चरित्र गातोय्. तुम्हीं ऐकायला या.

हे नवनवोन्मेष शालिनी, चातुर्यकलाकामिनी, अभिनव-वाग्विलासिनी, वीणावादिनी, विश्वमोहिनी महाराष्ट्रशारदे, ये. आतां केवळ तुझ्याकरितां मी खोळांवलों आहें, तूं वीणा छेडीत ये.

—ब. मो. पुरंदरे.

(९)

## पांच देवींचा पाळणा

[हरएक रियासतीच्या राखणीसाठीं कोणतेंतरी एक जागृत दैवत असतें. मराठेशाहीला अशा पांच देवी संरक्षक होत्या. तुळजापूरची तुळजाई, सातारची मंगळाई, प्रतापगडची भवानीआई, पुण्याची पर्वती आणि पाराची वरदायी हीं तीं पांच पवित्र नांवें होत. या देवींनीं शिवनेरीच्या बाळाला निजविण्यासाठीं हा पाळणा श्री जिजाऊसाहेबांच्या मुखानें म्हटलेला आहे. इतिहास कल्पनेनें आधीं पाहण्याची कल्पना रामाकाळची पुराणी आहे हें सर्वांस ठाऊक आहेच.]

(चाल : अजि अक्रूर हा नेतो श्रीकृष्णाला)

गुणि बाळ असा जागसि कां रे वाया। नीज नीज रे शिवराया ॥धृ०॥
अपरात्रींचा प्रहर लोटला बाई। तरी डोळा लागत नाहीं ॥
हा चालतसे चाळा एकच असला। तिळ उसंत नाहीं जिवाला ॥
निजवायचा हरला सर्व उपाय। जागाच तरी शिवराय ॥
चालेल जागता चटका।
हा असाच घटका घटका।
कुरवाळा किंवा हटका।
कां कष्टविशी तुझी सांवळी काया। नीज रे नीज शिवराया ॥१॥

हीं शांत निजे बारा मावळ थेट। शिवनेरी जुन्नर पेठ ॥
त्या निजल्या ना तशाच घांटाखालीं। कोंकणच्या चौदा तालीं ॥
ये भिवराया बागुल तो बघ बाळा। किती बाई काळा काळा ॥
इकडे हे सिद्दी-जमान।
तो तिकडे अफझुलखान।
पलिकडे मुलुखमैदान।
हे आले रे तुजला बाळ धराया। नीज रे नीज शिवराया ॥२॥

—गोविंदाग्रज.

# ३ : मराठी भाषा

[ ह्या प्रकरणांत महाराष्ट्राची मुख्य भाषा मराठी हिचें वर्णन दिलें आहे. ह्यांतहि मराठीसंबंधींच्या गौरवाचे व तिच्या मांहात्म्याचे असे निर्देश कालक्रमानें दिले आहेत. पहिलें मराठी उपलब्ध वाक्य प्रथम दिलें आहे. तें इ. स. ९८३ सालामधील आहे. हजार वर्षांपूर्वी आपण महाराष्ट्रीय लोक बोलत असलेल्या मराठी भाषेचें स्वरूप कसें होतें ह्याची कांहीं थोडीशी कल्पना ह्या वाक्यावरून येईल. ह्याच्या अगोदर कांहींतरी तीनशें वर्षें तरी मराठी भाषा लोकांच्या बोलण्यांत असली पाहिजे. पुढें मराठीचा विस्तार झाला. प्रकटीकरणाचें तिचें सामर्थ्यहि वाढलें. तिच्या उपभाषाहि–बस्त्यारी–हळबी, नागपुरी, वऱ्हाडी, अहिराणी, डांगी, उत्तर कोंकणी व तिचे पोटभेद, दक्षिण कोंकणी व तिचे पोटभेद - महाराष्ट्राच्या त्या त्या विभागांतील लोकांच्या बोलण्यांत आहेतच. आपली मराठी मायबोली ही अशा रीतीनें गेलीं पंधराशें वर्षें आपणां महाराष्ट्रीयांच्या बोलण्यांत आहे. तिचें माहात्म्य पुढील उल्लेखांवरून स्पष्ट होईल. ]

(१)

### मरहट्ट भासा कामिनी

सललिय–पय–संचारा पयडियमअणा सुवण्णरयणेल्ला ।
मरहट्ठ भासा कामिणी य अडवीय रेहंती ॥

संस्कृत छाया—

**सललित पदसंचारा प्रकटितमदना सुवर्णरचनावती**
**मरहट्ट भाषा कामिनी या अटवीव राजन्ते ॥**

—धनकथा, इ. स. ८५९.

( मराठी भाषा ही सुंदर कामिनी सारखी आहे. सुंदर कामिनीचे पाय सुंदर असून तिची गति रमणीय असते, तर मराठी भाषेंतील शब्दांच्या मधुर पदांचा संचार म्हणजे गति रमणीय असते. सुंदर कामिनी मदनानें उद्दाम व चांगल्या मोहक वर्णाची असते, तर मराठी भाषाहि चांगल्या वर्णांची ( अक्षरांची ) व जोमाची असते. तिचीहि रचना उत्तम असते. मराठी भाषा अटवीसारखीहि आहे. अटवींत जसे मदनाचे वृक्ष, त्यांचा रंग चांगला, वाढ चांगली, तसेंच मराठी भाषेचें स्वरूप आहे. )

( २ )

( पहिलें मराठी उपलब्ध वाक्य )

**श्री चावुणराजें करवियलें**
**गंगराजें सुताले करवियले**

—श्रवणबेळगोळ लेख इ. स. ९८३

( ३ )

मऱ्हाटी वैखरी

**कल्पतरूचेनि पाडें । जरी फळती घरचीं झाडें ।**
**तरी तियें आवडीचेंनि कोडें । न लावावीं कां ? ॥ १ ॥**

**देशी हो का मऱ्हाटी । परी उपनिषदाचीच राहाटी ।**
**तरी हा अर्थु जीवाचिया गांठीं । कां न बांधावा ॥ २ ॥**

**शंकरोक्तीवरी । मी बोलिलों मऱ्हाटी वैखरी ।**
**म्हणौनि निर्धारावी चतुरीं । शास्त्रबुद्धि ॥ ३ ॥**

वेदशास्त्राचा मथितार्थु । मऱ्हाटिया होय फलितार्थु ।
तरी चतुरीं परमार्थु । कां न घेयावा ? ॥ ४ ॥

— मुकुंदराज, विवेकसिंधु, काल इ. स. ११८८.

## (४)

### माझा मऱ्हाटाचि बोलु

माझा मऱ्हाटाचि बोलु कवतुकें । परी अमृतातेंही पैजा जिंके
ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥ १ ॥
जियें कोवलिकेचेनि पाडें । दिसती नादींचे रंग थोडे ।
वेधें परिमळाचें बीक मोडे । जयाचेनि ॥ २ ॥
आइका रसाळपणाचिया लोभा । कीं श्रवणींचि होती जिभा ।
बोलें इंद्रियां लागे कलभा । एकमेकां ॥ ३ ॥
साहाजें शब्दु तरी विषो श्रवणाचा । परी रसना म्हणे रस हा
आमुचा घ्राणासी भाव परिमळाचा । हा तोची होईल ॥ ४ ॥
नवल बोलतीये रेखेची वाहाणी । देखतां डोळां धुरें लागे धणी ।
ते म्हणती उघडली खाणी । रूपाची हे ॥ ५ ॥

— ज्ञानेश्वरी, ६,१४–१८

देशियेचेनि नागरपणें । शांत शृंगारातें जिणें ।
तरी वोंविया होती लेणें । साहित्यासी ॥ १ ॥
मूळ ग्रंथींचिया संस्कृता– । वरि मऱ्हाटी नीट पाहातां ।
अभिप्राय मानिलिया चित्ता । कवण भूमी हें न चोजवे ॥ २ ॥
जैसें आंगाचेनि सुंदरपणें । लेणिया आंगचि होय लेणें ।
तेथ अळंकारिलें कवण कवणें । हें निर्वचेना ॥ ३ ॥
दाऊं वेल्हाळ देशी नवी । जे साहित्यातें वोजवी ।
अमृतातें चुकी ठेवी । गोडसपणें ॥ ४ ॥

— ज्ञानेश्वरी, १०,४०–४३

## (५)

## मऱ्हाटी भाषासुंदरी

जैसी दीपांमाझि दिवटी । कां तिथींमाझि पूर्णिमा गोमटी ।
तैसी भाषांमध्यें मऱ्हाटी । सर्वोत्तम ॥ १ ॥

तैसी सरितांमध्यें गोदावरी । कां पर्वतांमध्यें रत्नगिरी ।
तैसी भाषांमध्यें साजरी । मऱ्हाटी पैं ॥ २ ॥

हरळांमध्यें रत्नकिला । कां पुष्पांमध्यें कमळ ।
तैसी भाषांमध्यें सोज्वला । शोभिवंत दिसे ॥ ३ ॥

दुर्गांवरि शोभे चरी । कां मुक्ताफळें शोभतीं हारीं ।
तैसी शोभे भाषांमाझारी । मऱ्हाटी पै ॥ ४ ॥

तीर्थांमध्यें काशी । कां व्रतांमध्यें एकादशी ।
भाषांमध्यें तैशी । मऱ्हाटी शोभिवंत ॥ ५ ॥

परिमळांमध्यें कस्तुरी । कां अंवरामध्यें शंवरारी ।
तैसी मऱ्हाटी सुंदरी । भाषांमध्यें ॥ ६ ॥

ऐसी मऱ्हाटी सुंदरी । ते संस्कृता शोधु करी ।
शाटिक वैसवी हृदयमंदिरी । अज्ञानाची ॥ ७ ॥

मूर्ख हृदयातें वोधी । विविध अर्थातें शोधी ।
अज्ञानाची वोधी । मऱ्हाटी पै ॥ ८ ॥

मूर्खांसि चतुरां करी । साधु दावी सारासारी ।
ज्ञातव्य वाखाणी संसारी । मऱ्हाटी हे ॥ ९ ॥

वहुत संस्कृतीं अनुरागु । सर्वशास्त्रीं विचारु चांगु ।
परि मऱ्हाटी वांचूनि पांगु । कवण फेडी ॥ १० ॥

मऱ्हाटी वोलतां वरवी । सर्वत्र जाणीव मिरवी ।
दुर्जनाकरवीं सांडवी । पाषांड हे ॥ ११ ॥

एसिया मऱ्हाटिया पवित्रा । लेणें करीन अध्यात्मशास्त्रा ।
वहुतां लोकांसि पवित्रा । करावेया ॥ १२ ॥

या कारणें कष्टी । योगुसूनु दृष्टी ।
विनवीतसे श्रोतेजनां सृष्टि । ज्ञानदेवु ॥ १६ ॥

—योगवासिष्ठ, १, २९४–३०७

(६)

मऱ्हाटी बोल रसिक

तैसें आइकता श्रीकृष्णचरित्र : होय सकल सुखाचें छेत्र :
वरि जोडे ब्रह्म–सुख पवित्र : ते मऱ्हाटी बोलेन ॥ १ ॥
जिये भाषेचिये रसवृत्ती : साभाषांचे कुपे कीजेति निगुती :
ते मऱ्हाटी कवणजाणे निरूति : जें रसांचें जीवन ॥ २ ॥
ते मऱ्हाटी बोल रसिक : वरि दावीन देशियेचें विक :
म्हणौन सव्याख्यान श्लोक : मिसें वोवियेचेनि ॥ ३ ॥

—नरेन्द्र : रु. स्व. १, ४५–४८.

(७)

हे पुण्यपावन मराठी । आइकती आदरें कर्णपुटीं ।
तेयासी कव्हनीं न पडे कामाठी । संसाराची ॥

—नरेंद्र, रु. स्व.

(८)

मऱ्हाटी ब्रह्मविद्येची कसवटी

धन्य धन्य हे मऱ्हाटी । ब्रह्मविद्येची कसवटी ।
हा द्वारशिलेचा पोटीं । परिसु जोडिला ॥ १ ॥
हे घरिंची कामधेनु । अंगणींचा संतानु ॥
अमृत उकळा पूर्णु । माथणीये आला ॥ २ ॥
हा पल्लवीचा चिंतामणी । मोक्ष गिवसिला अंगणीं ।
बापु रे पवित्र वाणी । ऐसीचि आहे ॥ ३ ॥
शुद्धस्वरूपीं निर्दोस । ते हे सुदेशी सुरस ।
यास्तव घेणें सर्वांस । सादरेंसी ॥ ४ ॥

हे ब्रह्मरसाची पव्हे । नडनाचु होय जिव्हे ।
यास्तव हळवें नव्हे । बोलणें माझें ॥ ५ ॥
जैसी सुगंधाची कळी । ते विकासलियां काळी ।
गंध घ्राणां मेळीं । आनंदु दावी ॥ ६ ॥
तेवीं या ग्रंथाचि खोली । सगर्भ मना नाहीं आली ।
तव वरि हे महाराष्ट्र बोली । आहाच वाटे ॥ ७ ॥

— त्र्यंबकराय, बालबोध १.

( ९ )

जेथची नांव तऱ्ही मऱ्हाटी । परि षड्दर्शनातें दळवटी ।
प्रमेय धांडोळितां सृष्टीं : आथी चिना ॥

— नारायण बहाळे, ऋद्धिपूरवर्णन.

( १० )

मऱ्हाटी – भीतरीं अमृतरस गोडी

तैसी उखर वाणी मऱ्हाटी । परी भीतरार्थी घालितां दृष्टि ।
होईजे सुख संतुष्टी । स्वानुभव ज्ञान ॥ १ ॥
कीं कर्दळीं फल पक्कघडीं । वरीवरी घालितां सालडी ।
भीतरीं अमृतरस गोडी । तैसी वाणी मऱ्हाटी ॥
इक्षुदंड कृष्णवर्ण । परी रसीं गौल्यता संपूर्ण ।
तैसें म्हाराष्ट्रवचन । भीतरार्थ जाण गौल्यता ॥
जे संस्कृताचा गर्व घेती । आणि प्राकृतातें निंदिती ॥
ते गर्विष्ठ अहंकृती । आपस्वार्थी बोलके ॥

— अज्ञानसिद्ध, वरदनागेश.

( ११ )

पवित्र महाराष्ट्री वाणी

मागां व्यासादिक महामुनी । कथा बोलिले संस्कृतवाणी ।
ते आतां महाराष्ट्र भाषा करौणि । वाणीजताहे ॥ १ ॥

अपभ्रंश पिशाच्च आणी । मागधी आणि शौरसेनी ।
संस्कृत प्राकृत या षट्वाणी । आणि कै छपन्न भाषा ॥ २ ॥
या सां भाषांचे प्राक् विस्तार । करावेया मऱ्हाटी एक चतुर ।
तियेचेनि प्रसादें जाणिजेति विचार । षट्भाषांचे ॥ ३ ॥
म्हणौनि संस्कृताची टीका । महाराष्ट्री म्हणिजताये आइका ।
जैसी हेमाची मुद्रिका । गरुड पाचु ॥ ४ ॥
तैसी हे छपन्न भाषांचा मुकुटीं । शोभे सुहावी सुंदर गोमटी ।
आणि संस्कृता वाढविलें पोटीं । वागवी करीं धरोनियां ॥ ५ ॥
जैसी स्नेहाळु जननी । आपल्या वागवी करीं धरौनि ।
तैसी षट् भाषा लागौनि । व्यापारुवीतु असे ॥ ६ ॥
येणें श्रोते कोपते मनीं । म्हणती संस्कृत तंव देववाणी ।
तियेसि उपमा कारे सानी । दीधली तुवां ॥ ७ ॥
तरी सांघेन एक परिहारु । आइका करौणि विचारु ।
हा सहजेंचि शब्दोच्चारु । पदघटना ऐसीचि असे ॥ ८ ॥
महाराष्ट्री स्त्रीलिंग वाक्य । आणि संस्कृत तंव नपुंसक ।
म्हणौनि वालकत्व आइक । तेयासिचि साजे ॥ ९ ॥
ऐसीं ते सर्व भाषांची जननी । उत्तम पवित्र महाराष्ट्री वाणी ।
कां आदिपुरुषें अंगिकारिली म्हणौनि । अनिवार ब्रीदें जाली ॥१०॥
तिया महाराष्ट्रीया भाषा । रुक्मिणीस्वयंवरु आइका ।
तें श्रवण जालिया महापातकां । क्षालन करी ॥११॥

—संतोषमुनि कृष्णनाथ, इ. स. १५५२.

(१२)

## मराठी भाषावैभव

(आतां) वंदूं प्राकृत कवीश्वर । निवृत्तिप्रमुख ज्ञानेश्वर ।
नामदेव चांगदेव वटेश्वर । ज्याचें भाग्य थोर गुरुकृपा ॥ १ ॥
जयांचे ग्रंथ पाहतां । ज्ञान होय प्राकृतां ।
तयांचें चरणीं माथा । निजात्मता निजभावें ॥ २ ॥

संस्कृत ग्रंथकर्ते ते महाकवि । मां प्राकृतीं काय उणिवी ।
नवीं जुनीं म्हणावीं । केसेनि केवीं सुवर्णसुमनें ॥ ३ ॥

कपिलेचें म्हणावें क्षीर । मां इतरांचें तें काय नीर ।
वर्णस्वादें एकचि मधुर । दिसे साचार सारिखें ॥ ४ ॥

जें पाविजे संस्कृत अर्थे । तेंचि लाभ प्राकृतें ।
तरि न मनावया येथें । विषमचि तें कायी? ॥ ५ ॥

कां निरंजनीं वसला रावो । तरी तोचि सेवकां पावन ठावो ।
तेथें सेवेसी न वचतां पाहो । दंडी रावो निजभृत्यां ॥ ६ ॥

कां दुबळी आणि समर्थ । दोहींसे रायें घातले हात ।
तरी दोघींसिही तेथें । सहज होत समसाम्य ॥ ७ ॥

देशभाषावैभवें । प्रपंच पदार्थी पालटलीं नांवें ।
परि रामकृष्णादिनामां नव्हे । भाषावैभवें पालटु ॥ ८ ॥

संस्कृतवाणी देवें केली । तरी प्राकृत काय चोरापासोनि झाली ।
असोतु ह्या अभिमानभुली । वृथा बोला काय काज ॥ ९ ॥

आतां संस्कृता किंवा प्राकृता । भाषा जाली जे हरिकथा ।
ते पावनचि तत्त्वतां । सत्य सर्वथा मानिली ॥१०॥

सद्गुरुकृपा समर्थ । तेणें कृपें श्रीभागवत ।
वाखाणिलें जी प्राकृत । शुद्ध मथितार्थ सोलींव ॥११॥

जनार्दनकृपादृष्टि । माझ्या मराठ्या आरिखा गोष्टी ।
रिघाल्या एकादशाच्या पोटीं । स्वानंदतुष्टी निजबोधें ॥१२॥

संस्कृत प्राकृत परवडी । सज्ञान सेविती स्वानंद गोडी ।
गाय काळी आणि तांबडी । परी दुधीं वांकुडी चवी नाहीं ॥१३॥

तेवीं संस्कृत प्राकृतभाखा । ब्रह्मासि पालट नाहीं देखा ।
अभय अभेदें वदला एका । साह्य निजसखा जनार्दन ॥१४॥

— एकनाथ : भागवत.

(१३)

## मराठीची शब्दसंपत्ति

संसार नागरपेठें । नाना भाषांचें नाणवटें ।
यैका खरें तें खोटें । आना ऐकां ॥ १ ॥

येथें संस्कृताचि केवळ । न सरे नाणें सकळ ।
कोण्ही येक स्थळ । ऐसें आहे ॥ २ ॥

संस्कृतें घट्ट म्हणती । आतां तयाचे भेद किती ।
कवणा घटाची प्राप्ति । पावावी तेणें ? ॥ ३ ॥

हारा डेरा रांजणु । मुढा पडगा आनु ।
सुगडतौली सुजाणु । कैसी बोलैल ? ॥ ४ ॥

घडी घागरी घडौली । अलंदे वाचिकें वौळीं ।
चिटकी मोखा पातली । सांजवणें तें ॥ ५ ॥

ऐसे प्रतिभाषे वेगळाले । घट असती नामाथिले ।
एकें संस्कृतें सर्व कळे । ऐसें कैसेन ? ॥ ६ ॥

सनवट चोपण गव्हाळी । चिकणी पन्हवट मळी ।
चुनवट माळवट खळी । खळगा खात ॥ ७ ॥

उतें गोटल खडाळ । पांढरी सेड्डू मुरुबाळा ।
तांबट काळी करळ । भेद मृत्तिकेचे ॥ ८ ॥

नदु नदी ओहळ । झोती झिरपे खळाळ ।
धार घाळणी पीळ । भंवरा धोंधे ॥ ९ ॥

टांकें वावी पोखरणी । बाख विहिरी अडु धरणी ।
विहिरीतळें रानीं । हळता घुमे ॥ १० ॥

ऐसे भेद जळ स्थानाचे । एक एक बहुता नामाचे ।
सारी प्रयोजन तयांचें । संस्कृत कैसें ? ॥ ११ ॥

— दासोपंत

## (१४)

## मराठिया भासा

परमशास्त्र जगीं प्रघटावेया । बहुतजनां फलसिधी होवावया ।
भासा वांधोनी मराठिया । कथा निरोपिली ॥ १ ॥
जैसी हरळांमाजीं रत्नकिळा । कीं रत्नामाजीं हिरा निळा ।
तैसी भासांमाजीं चोखळा । भासा मराठी ॥ २ ॥
जैसी पुस्पांमाजीं पुस्प मोगरी । की परिमळांमाजीं कस्तुरी ।
तैसी भासांमाजीं साजिरी । मराठिया ॥ ३ ॥
पखियांमधें मयोरू । वृखियांमधें कल्पतरु ।
भासांमधें मानु थोरू । मराठियेसी ॥ ४ ॥
तारांमधें बारा रासी । सप्तवारांमधें रवि ससी ।
यां द्विपिचेयां भासांमधें तैसी । बोली मराठिया ॥ ५ ॥

— फादर स्टीफन्स खि. पु.

## (१५)

## महाराष्ट्रभापारंभापर्ण

सुरस सुंदर पवित्र सृष्टीं । बोनें निपजवुनी पाठीं ।
संस्कृतशब्द सुवर्णतार्टीं । श्रेष्ठश्रेष्टा बोगरिलें ॥ १ ॥
तेचि रसोय दुर्बळपर्णीं । महाराष्ट्रभापारंभापर्णीं ।
वाढिली तरी भुकाळु जर्नीं । न सेविजे किमर्थे ॥ २ ॥
समर्थपणें कविपंडितीं । सर्वज्ञतेच्या रत्नदीप्तीं ।
गीर्वाणपद्योत्तरीं निगुती । कनककमळीं अर्जिजे ॥ ३ ॥
तेथ हा भावार्थाचा वेल । धत्तुरपुष्प आमुचे बोल ।
अल्पमतिचेनि मोल । काळवाती केउती ॥ ४ ॥
तथापि दोहीं ठायीं सरिसा । मोहो कराल भरंवसा ।
सानें थोर हें महेशा । भजतां असे कडसणी ॥ ५ ॥
आणि ईश्वरस्वरूपीं डोळस । त्यासीं वर्णावर्णीं द्वेष ।
नुपजे जैसा सूर्यप्रकाश । नेणें प्रकाशतमातें ॥ ६ ॥

तेवीं अर्थीं घालितां दृष्टि । न म्हणे संस्कृत मराठी ।
रत्नकुंभीं कां मृद्धटीं । गंगोदक सारिखें ॥ ७ ॥
श्रोते म्हणती नवलप्रीती । आमंत्रणींच झाली तृप्ती ।
पुढील भोजनाची गती । अनिर्वाच्य सर्वथा ॥ ८ ॥

—मुक्तेश्वर, आदिपर्व १,८७–९४

## ( १६ )

## महाराष्ट्रवचनें मधूतें स्रवती

कथापंथीं महाराष्ट्रवचनें । परी हीं रसिकें अतिगहनें ।
जैसीं वनमाक्षिकांचीं वदनें । मधूतें स्रवती ॥
ना ना संस्कृत हें चंद्रमंडळ । महाराष्ट्री चंद्रिका केवळ ।
संस्कृत स्वातीचें फळ । मराठी मुक्ताफळें ॥
दधीचें मंथन केलें । त्यातूनि नवनीत निवडिलें ।
तैसें संस्कृतापासूनि जाहलें । महाराष्ट्र कवित्व ॥

— कृष्णदास मुद्गल, युद्धकांड १.

## ( १७ )

## मराठी भाषेनें 'अध्यात्म लाभे अकस्मात्'

येक म्हणती मऱ्हाटें काये । हें तों भल्यांसि ऐकों नये ।
तीं मूर्खें नेणती सोये । अर्थान्वयाची ॥ १ ॥
लोहाची मांदुस केली । नाना रत्नें साठविलीं ।
ते अभाग्यानें त्यागिलीं । लोखंड म्हणोनी ॥ २ ॥
तैसी भाषा प्राकृत । अर्थ वेदांत आणि सिद्धांत ।
नेणोनि त्यागी भ्रांत । मंद बुद्धिस्तव ॥ ३ ॥
आहाच सांपडतां धन । त्याग करणें मूर्खपण ।
द्रव्य घ्यावें साठवण । पाहोंच नये ॥ ४ ॥
परिस देखिला आंगणीं । मार्गी पडिला चिंतामणी ।
आव्हावेल महागुणी । कूपांमध्यें ॥ ५ ॥

तैसें प्राकृतीं अद्वैत । सुगम आणि सप्रचित ।
अध्यात्म लाभे अकस्मात् । तरी अवश्य घ्यावें ॥ ६ ॥
न करितां व्युत्पत्तीचा श्रम । सकळ शास्त्रार्थ होये सुगम।
सत्समागमाचें वर्म । तें हें ऐसें असे ॥ ७ ॥
जें व्युत्पत्तीनें न कळे । तें सत्समागमें कळे ।
सकळशास्त्रार्थ आकळे । स्वानुभवासी ॥ ८ ॥
भाषापालट कांहीं । अर्थ वायां जात नाहीं ।
कार्यसिद्धि ते सर्वही । अर्थाच पासीं ॥ ९ ॥
तथापि प्राकृताकरितां । संस्कृताची सार्थकता ।
येऱ्हवीं त्या गुप्तार्था । कोण जाणे ॥१०॥
आतां असो हें बोलणें । भाषा त्यागूनि अर्थ घेणें ।
उत्तम घेऊनि त्याग करणें । साली टरफलांचा ॥११॥
अर्थसार भाषा पोंचट । अभिमानें करावी खटपट ।
नाना अहंतेनें वाट । रुधिली मोक्षाची ॥१२॥
नाना रत्नें नाना नाणीं । दुश्चीतपणें घेतां हानी ।
परीक्षा नेणतां प्राणी । ठकला तेथें ॥१३॥
तैसे निरूपणीं जाणा । आहांच पाहतां कळेना ।
मऱ्हाटेंचि उमजेना । कांहीं केल्या ॥१४॥
जेथें निरूपणाचे बोल । आणि अनुभवाचीं ओल ।
तें संस्कृतापरीस खोल । अध्यात्मश्रवण ॥१५॥

—रामदास : दा. बो. ७–१

## ( १८ )

## आमुची मायबोली

मराठी असे आमुची मायबोली
जरी आज ती राजभाषा नसे
नसो आज ऐश्वर्य या माउलीला
यशाची पुढें दिव्य आशा असे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
२५५८४ ३१०५
अनुक्रम ......मराठी भाषा वि: ..........
क्रमांक ........ नों: दि: २५/५/५० ३३

जरी पंचखंडांत ही मान्यता घे
स्वसत्ताबळें श्रीमती इंग्रजी
मराठी भिकारीण झाली तरीही
कुशीचा तिच्या तीस केवीं त्यजी ?
मराठी असे आमुची मायबोली
जरी भिन्नधर्मानुयायी असूं
पुरी बाणली बंधुता अंतरंगीं
हिच्या एक ताटांत आम्ही बसूं
हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडूं
वसे आमुच्या मात्र हृन्मंदिरीं
जगन्मान्यता हीस अर्पूं प्रतापें
हिला बैसवूं वैभवाच्या शिरीं !

— माधव जुलियन.

(१९)

## मायबोलीचें माहेर

माझी मायबोली आज आली माहेराला
सभोंवतीं संतयोगी सुपुत्रांचा मेळा ॥ धृ० ॥

नेसलीसे भागवत नाथाचें पैठणीं
माथां शोभे मुगुट गाथा तुकयाचा नामी
ज्ञानेशाची ज्ञानेश्वरी मळवट भालां ॥ १ ॥

अंगीं शोभे नामयाची कीर्तन-कंचुकी
निळोबाची गाथा दंडी बाजुबंद बांकी
मुक्तेश्वरी मौक्तिकांची नथ नासिकेला ॥ २ ॥

मुक्ता-जनीचे अभंग कर्णफुलें कानीं
अंगुठींत फांके प्रभा चोख्याची खुलुनी
समर्थाचा दासबोध चंद्रहार गळां ॥ ३ ॥

भाट बांधी कंकणें तीं छातीनें निधड्या
शाहिरी लावण्या तुझ्या बिल्लोर बागड्या
पठ्ठयाची ती धीटवृत्ती तीट शोभे गालां ॥ ४ ॥

आधुनिकांतहि एक राष्ट्रसंत थोर
पंढरीच्या पाषाणांना फोडितो पाझर
साने गुरुजींचा लळा कटीसी मेखला ॥ ५ ॥

उच्चनीच आतां येथें नाहीं भेदाभेद
नव्या मानवी धर्माचा मुखें गात वेद
उधळित शक्ति आणि भक्तिभाव भोळा ॥ ६ ॥

जें जें मनीं तेंच जनीं ऐसें हें सोज्ज्वळ
मराठवाड्यांत माझें नांदतें आजोळ
आढळेल तुम्हां येथें जीवींचा जिव्हाळा ॥ ७ ॥

— सोपानदेव चौधरी.

[ महाराष्ट्रांत भोंसले वंशाचें राज्य प्रस्थापित होण्याच्या फार पूर्वी तेथें ऐतिहासिक कालांत प्रथम मौर्य सम्राटांचें साम्राज्य खि. पू. ३२१ पासून खि. पू. १८४ पर्यंत होतें. नंतर आंध्रभृत्य सातवाहनांची सत्ता खिस्तोत्तर २०० पर्यंत होती. आंध्रांनंतर त्रैकूटक राजांनीं, त्यांच्यानंतर वाखाटकांनीं, नंतर कलचूरी राजांनीं राज्य केलें. कलचूरींचा पराभव मंगलेश चालुक्यानें करून महाराष्ट्राची सत्ता आपणांकडे घेतली. ती इ. स. ७५३ पर्यंत त्या घराण्यांत निर्वेध चालली. राष्ट्रकूटांनीं चालुक्यांचा पराभव करून आपली सत्ता स्थापली. ह्या घराण्यांत १९ राजे झाले व त्यांनीं इ. स. ७५३ पासून इ. स. ९७४ पर्यंत राज्य केलें. नंतर पुनः चालुक्यांनीं आपलें राज्य परत घेऊन इ. स. ११८९ पर्यंत चालविलें. चालुक्यानंतर यादवांची राजवट सुरू झाली. भिल्लम्–जैत्रपाळ–सिंघण–कृष्ण–महादेव – रामचंद्र–शंकर हे त्या राजवटींतील राजे. सिंघण हा मुख्य प्रसिद्ध यादवराजा. यादव राजवट इ. स. १३१२ मध्यें अस्त पावली. पुढें महाराष्ट्र दुर्दैवानें यवनाक्रांत झाला.

ह्यानंतर पुढें साडेतीन शतकांनंतर शिसोदे–भोंसले वंशांत श्रीशिवाजी महाराजांचा अवतार होऊन त्यांनीं महाराष्ट्रांत मऱ्हाष्ट्र हिंदवी स्वराज्य स्थापन केलें. ]

( १ )

## भोंसले हे सूर्यवंशी क्षत्रियच

श्रीशिवाजीमहाराज ह्यांचा जन्म भोंसले वंशांत इ. स. १६३० सालीं झाला. भोंसले वंश हा मूळ सूर्यवंशी क्षत्रिय असून त्याचा संबंध राजपुतान्यांतील गुहिलोतवंशी रजपुतांशीं लागतो. गुहिल (इ. स. ५६६) हा श्रीरामचंद्रापासून ८३ व्या पिढींतील पुरुष मानिला जातो. गुहिलनंतर तेहत्तीसाव्या पिढींतील कर्णसिंह (इ. स. ११५८) ह्याच्यापासून मेवाडची रावळ शाखा व सिसोद्यांची राणा शाखा ह्या दोन शाखा सुरू झाल्या. सिसोद्यांच्या बाराव्या पिढींत अजयसिंह हा राजा झाला. ह्यानें आपल्या मुलांना राज्य न देतां आपला पराक्रमी पुतण्या हंमीर ह्यास राज्य दिलें. त्यामुळें त्याच्या एका मुलानें वैतागून आत्महत्या केली व दुसरा मुलगा-सजनसिंह आपलें दैव काढण्यासाठीं हसन गांगो बहामनी ह्या सरदाराबरोबर दक्षिणेकडे देवगिरी-दौलताबादेकडे आला (इ. स. १३३४). त्याच्यानंतर सातव्या पिढींतील शुभकृष्णापासून एक मुधोळचा घोरपडेवंश व दुसरा देवगिरीचा भोंसलेवंश हे दोन वंश सुरू झाले. शुभकृष्णापासूनच्या दहाव्या पिढींत श्रीशिवाजी महाराज झाले. ह्या वंशांतील पुरुष पुढीलप्रमाणें आहेत :—

शुभकृष्ण, रूपसिंह, धोपजी, खेलकर्ण, जयकर्ण, संभाजी, बाबाजी, मालोजी, शहाजी, शिवाजीमहाराज.

—द. वि. आपटे : घोरपडे घराण्याचा इतिहास.

( मालोजीराजे भोंसले ह्यांच्यापासून शिवाजी महाराजांच्या अफझलप्रसंग-प्रभनवल्लीजयापर्यंतची हकीकत शिवभारतांत परमानंद कवीनें दिली आहे. )

( २ )

## मालोजी व शहाजीराजे

दक्षिणस्यां दिशि श्रीमान् मालवर्मा नरेश्वरः
बभूव वंशे सूर्यस्य स्वयं सूर्य इवौजसा ॥१-४२॥

**महाराष्ट्रं जनपदं महाराष्ट्रस्सभूमिपः ।**
**प्रशशास प्रसन्नात्मा निजधर्मधुरंधरः ॥४३॥**

( स्वतः सूर्याप्रमाणें तेजस्वी असा श्रीमान् मालोजी राजा दक्षिणेंत सूर्यवंशांत होऊन गेला. क्षात्रधर्मी व प्रसन्न मनाचा तो मराठा राजा महाराष्ट्रांत राज्य करीत होता.)

### शिखरशिंगणापूरचें मालोजीचें तळें

**स शंभुप्रीतये शंभोर्भक्तस्सागरसन्निभम् ।**
**मधुरं खानयामास तडागं शंभुपर्वते ॥१-५४॥**

( त्या शिवभक्त राजानें शंकराला प्रसन्न करण्यासाठीं सागराप्रमाणें विस्तीर्ण असा गोड पाण्याचा तलाव खोदविला. )

### शहाजी व शरफोजीराजे ह्यांचा जन्म

**तस्य शाहश्च शरीफश्च सिद्धनामांकितावुभौ ।**
**ववृधाते श्रिया सार्धं कुमारौ कुलदीपकौ ।**

( सिद्धांचीं नांवें धारण करणारे असे त्याचे कुलदीपक पुत्र शहाजी व शरीफजी वर्धमान झाले व त्यांच्याबरोबर त्यांचेंहि वैभव वाढलें. )

### शहाजी राजे ह्यांचा जिजाबाईशीं विवाह

**सा** (यादवकन्या जिजूः) **तं महाशयं प्राप्य विभ्रति वपुरुज्वलम् ।**
**गंगेव गुणगंभीरा व्यराजत महोदधिम् ॥**

( ज्याप्रमाणें शुभ्र व खोल गंगा सागरास मिळाली असतां शोभते, त्याप्रमाणें तेजस्वी शरीर धारण करणारी व गुणवंती जिजाबाई गुणानें गंभीर व मनानें थोर अशा शहाजी पतीशीं शोभूं लागली. )

( २ )

### शिवाजी महाराजांचा जन्म

**भूबाणप्राणचंद्राद्वैः सम्मिते (शके १५५१) शालिवाहने**
**शके संवत्सरे शुक्ले प्रवृत्ते चोत्तरायणे ॥ ६-२६ ॥**
**शिशिरर्तौ वर्तमाने प्रशस्ते मासि फाल्गुने ।**
**कृष्णपक्षे तृतीयायां निशि लग्ने सुशोभने ॥**

अनुकूलतरैस्तुंगसंश्रयैः पञ्चभिर्ग्रहैः
व्यंजिताशेषजगतीस्थिरसाम्राज्यवैभवम् ॥
अपारलावण्यमयं स्वर्णवर्णमनामयम् ।
कमनीयतमग्रीवमुन्नतस्कन्धमण्डलम् ॥
अलिकान्तमिलत्कान्तकुन्तलाग्रविराजितम् ।
सरोजसुन्दरदृशं नवकिंशुकनासिकम् ।
सहजस्मेरवदनम् घनगंभीरनिस्वनम् ।
महोरस्कं महाबाहुं सुषुवे साद्भुतं सुतम् ॥

( शालिवाहन शके १५५१ शुक्ल संवत्सराच्या उत्तरायणांत शिशिर ऋतूंत फाल्गुन वद्य ३ येला रात्रीं शुभलग्नीं अखिल पृथ्वीचें साम्राज्यवैभव व्यक्त करणारे असे पांच ग्रह अनुकूल व उच्चीचे असतांना जिजाबाईनें अलौकिक पुत्रास जन्म दिला. त्याचें सौंदर्य अपार, वर्ण सोन्यासारखा, शरीर निरोगी, मान अत्यंत सुंदर, खांदे भव्य, कपाळावर कुरळे केस, डोळे कमळासारखे सुंदर, नाक पळसाच्या फुलासारखें, हंसतमुख, मेघासारखा गंभीर आवाज, विशाल छाती आणि बाहु मोठे अशा दैवी राजपुत्राला तिनें जन्म दिला. )

## ( ४ )

## स्वराज्याची शपथ

( श्रीशिवाजीमहाराज ह्यांनीं रोहिडेश्वरापुढें आपल्या सवंगड्यांसह हिंदवी स्वराज्याची पहिली शपथ घेतली, त्यासंबंधीं शिवाजीमहाराज ह्यांचें स्वतःचें पत्र)

**रा. दादाजी नरस प्रभु देशपांडे व कुळत॥ रोहिरखोरें व वेलवंड-खोरें यांसी :—तुम्हांस मेहेरवान वजिराचा विजापुराहून हुकूम आला तो ठाणें सिरवलाहून अमिनांनीं तुम्हाकडे पाठविला. त्याजवरून तुमचे बाप हवालदील जाले वगैरे कितेकबहु लिहिलें. त्यास शहासीं बेमानगिरी तुम्ही व आम्ही करीत नाहीं. श्रीरोहिरिश्वर तुमचे खोरियांतील आदिकुलदेव तुमचा डोंगरमाथा पठारावर शेंद्रीलगत स्वयंभू आहे. त्यांणीं आम्हांस यश दिलें व पुढें तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे. त्यास**

बावास हवालदील होऊं देऊं नये. खामखा सांगावा आणि तुम्हीं तो कागद घेऊन सिताब हुजूर येणें. राजश्री दादापंताचे विद्यमानें बावाचें व तुमचें व आमचें श्रीपासी इमान जालें तें कायम वज्रप्राय आहे. त्यांत आम्ही व आमचे वंशज लेकराचें लेकरीं वतन वगैरे चालविण्याविसीं कमतर करणार नाहीं. हें राज्य व्हावें हें श्रीचें मनांत फार आहे. याप्रमाणें बावाचें मनाचे खातरी करून तुम्ही येणें. बहुत काय लिहिणें.

— वैशाख शु. १ शके १५६७, इ. स. १७-४-१६४५.

(स्वराज्य स्थापनेची आंच सर्व लोकांना त्या काळांत कशी तीव्र होती हें खालील नोंदीवरून कळतें.)

...त्यावरी राजश्री स्वामींनीं हुकूम केला कीं वरकड मावळचे देशमुख व तुम्हीं एक जागा बैसोन त्यांचा मुद्दा मनास आणवणें त्यावरी कान्होजी ना व अवघे मावळचे देशमुख येके जागा बैसले... तेव्हां बोलिले कीं राजश्री स्वामींच्या पायासी इमान धरून वतनास देखील पाणी सोडलें...हें मऱ्हाष्ट्र राज्य आहे. अवघियांनीं हिंमत धरून जमाव घेऊन राजश्री स्वामीसंनिध राहोन येकनिष्ठेनें शेवा करावी. येश्या हिंमतीच्या गोष्टी सांगितल्या, तेव्हां अवघे देशमुख बोलिले कीं तुमचा विचार तोच आमचा विचार इमानपुरस्कर आहे. अवघ्यांनीं शफत केली. अगदीं मावळचा जमाव केला....

— जेधेकरीना

शिवाजी महाराजांचा पहिला एक पराक्रम

"...शहाजी राजे धरिले. त्यांचा लेक सिवाजी पुरंधरीं बैसोनु
दिवाण नामजादीसी झगडों लागले. सरसुभेदार फत्त्याखान
तिही शिरवलास फाजीलशहा व आशाफशा पाठविले.
तोही कोट पर मज बलाविला. त्यावरी पुरंधरीहून
शिवाजी राजे धाविनले. झगडा जाला......"

— शिरवळच्या देशमुखांस पत्र (इ. स. १६४८)

## अफजलप्रसंग

(५)

**अफजल उवाच :—**

" तदद्य दुर्विनीतम् त्वां विनेतुमहमागतः ॥
प्रयच्छ पर्वतानेतान् गृध्नुतां त्यज मां भज ॥ १ ॥
धृत्वाहं त्वां स्वहस्तेन नीत्वा विजयपत्तनम् ॥
अल्लीशाहस्य पुरो नामयित्वा शिरस्तव ॥ २ ॥
शाहराजात्मज शिशो विहाय स्वां विहस्तताम् ॥
स्पृश हस्तेन मे हस्तमेहि देह्यंकपालिकाम ॥ ३ ॥"
एवमुक्त्वा स तद्ग्रीवां धृत्वा वामेन पाणिना ।
इतरेण च तत्कुक्षौ निचखान कटारिकाम् ॥ ४ ॥
नियुद्धविच्छिवस्सद्यस्तद्धस्तोन्मुक्तकंधरः ।
ध्वनिना धीरधीरेण प्रतिध्वानितकंदरः ॥ ५ ॥
प्रविशंतीमात्मकुक्षिभागमभ्रांतमानसः ।
किंचिदाकुंचितांगस्तां शिवः स्वयंमवंचयत् ॥ ६ ॥

**शिव उवाच :—**

" ददास्येतं कृपाणं ते गृहाण निगृहाण माम् ।"
इति विनिगदन्नेव धीरः सिंहसमस्वरः ॥ ७ ॥
सिंहयायी सिंहकायः सिंहदृक् सिंहकंधरः ।
स्वपाणाद्धितयोद्धूतविकोशायुधसुंदरः ॥ ८ ॥
तं निर्यातयितुं वैरं प्रवृत्तोसौ महाव्रतः ।
शिवः कृपाणिकाग्रेण कुक्षावेव तमस्पृशत् ॥ ९ ॥
आपृष्ठं विद्धिषत् कुक्षिं तूर्णं तेन प्रवेशिता ।
आकृष्यान्त्राणि सर्वाणि सा कृपाणी विनिर्गता ॥१०॥

— शिवभारत, २१, ३०–४०.

( अफजल म्हणाला :—" आज मी उन्मत्त झालेल्या तुला शिक्षा करण्यासाठीं आलों आहें. तूं काबीज केलेले किल्ले परत दे, लोभीपणा सोड व मला शरण ये.

मी तुला हातानें धरून विजापुरास अल्लीशहापुढें नेऊन तुला तुझें डोकें त्याच्यापुढें नमवावयास लावीन. हे शहाजीराजाच्या पुत्रा, आपली शहाणपणाची घमेंड सोड. आणि माझ्या हातांत तूं आपला हात दे. ये, मला आलिंगन दे."

असें म्हणून अफजलनें महाराजांची मान डाव्या हातानें धरून दुसऱ्या उजव्या हातानें महाराजांच्या कुशींत कट्यार खुपसली. महाराज द्वंद्वयुद्धांत पटाईत असल्यामुळें, त्यांनीं लगेच त्याच्या पकडींतून आपली मान सोडवून घेऊन सिंहगर्जना केली. गोंधळून न जातां आपलें शरीर आकुंचित करून महाराजांनीं आपल्या पोटांत घुसणारी ती कट्यार चुकविली.

महाराज म्हणाले:—"हा बघ तुझ्यावर वार करतों तो घे. मला धर." असें म्हणतच त्या सिंहासारखा स्वर, सिंहासारखी गति, सिंहासारखें शरीर, सिंहासारखी दृष्टि, सिंहासारखी मान असलेल्या व आपल्या दोन्ही हातांनीं फिरविलेल्या नागव्या तरवारीनें शोभणाऱ्या धैर्यवान, कर्तृत्वान शिवाजीमहाराजांनीं त्या शत्रूचा सूड म्हणून त्यांनीं आपल्या तरवारीचें टोंक त्याच्या पोटांत खुपसलें. ती तरवार पाठीपर्यंत खुपसली व तिनें खानाचीं सर्व आंतडीं बाहेर काढलीं.)

(७)

## शिवाजीमहाराजांची आग्र्यास भेट

(१५ मे १६६६)

(पुरंदरचा तह झाला. नंतर बादशहाच्या भेटीस महाराज आग्र्यास निघाले. आग्रा येथील सर्व व्यवस्था मिर्झाराजे जयसिंग ह्यांनीं आपला मुलगा कुमार रामसिंग ह्यांच्याकडे सोंपविली होती. महाराज ११ मेला मुलुकचंद सराईस पोहोंचले. दुसऱ्या दिवशीं नूरजंगबागेंत रामसिंग येऊन भेटले. बादशहाच्या हुकुमाप्रमाणें सर्व मानपान झाला. नंतर बादशहाचे भेटीस जायचें ठरलें. त्या दिवशीं मे महिन्याची १५ तारीख होती. तो बादशहाचा वाढादिवस होता. मोठा दरबार भरावयाचा होता. त्यावेळेस दोघांची भेट ठरली. शिवाजीमहाराज दरबारांत आले. दिवाण जाफरखान, राजे जसवंतसिंग ह्यांच्या नंतर क्रमानें त्यांना उभें करण्यांत आलें. दरबारांत सर्वांना विडे वांटून झाले. मग खिलाती अर्पण करण्याचा समारंभ सुरू झाला. त्या दोघांना अगोदर खिलाती दिल्या. महाराजांना नंतर

खिलात दिली. हें पाहून महाराज संतापले. राग अनावर झाला. बसल्याजागीं चैन पडेना. डोळे तांबडे झाले. बादशहाच्या नजरेस हें लगेच आलें. ' शिवाजीराजे हे अस्वस्थ कां, त्यांना काय होत आहे,' ह्याची त्यानें चौकशी चालविली. विचारण्यास रामसिंग जवळ आला. )

शिवाजीमहाराज त्याला उद्गारले – " तुम्हांला माहीत आहे! तुमच्या पिताजींना माहीत आहे! तुमच्या बादशहालाहि माहीत आहे! मी कोण आहे तो? आणि तरीहि तुम्हीं मला सर्वांच्या नंतर इतक्या मागें मुद्दाम उभा केलें. तुमची ही मनसब मी फेंकून देतों. मला ती नको. माझ्या योग्यतेप्रमाणें दरबारांत स्थान तुम्हीं मला द्यायला पाहिजे होतें." असें म्हणून महाराज ताटकन् उठून दरबारांत बादशहाकडे पाठ फिरवून ते जाऊं लागले. रामसिंगानें त्यांचा हात धरला. तो त्यांनीं हिसडून घेतला. ते बाहेर जाऊन बसले. रामसिंग आला. इतर सरदारहि आले. विनवण्या झाल्या. महाराजांचें त्यांना एकच ठाम उत्तर – " तुमची खिलात मला नको. बादशहा मुद्दाम ज्याअर्थीं मला जसवंतसिंगानंतर बसवितोय् त्याअर्थीं मला त्याची मनसब नको. मला त्याची खिलात नको. मला त्याची चाकरी नको. मला ठार करा, तुरुंगांत टाका. काय वाटेल तें करा. बादशहाची खिलात मी कधीं जन्मांत घालणार नाहीं."

—जयपूर दरबार पत्र.

## आग्र्याहून सुटका

" मग एके दिवशीं राजे व राजपुत्र एकाच पेटारियांत बसले. पुढें मागें पेटारे करून मध्यें पेटारियांत बसून चालिले. ते वेळीं आपला साज सर्व उतरून, हिरोजी फरजंद यास घालून आपले पलंगावर निजविला. हात मात्र त्याचा उघडा बाहेर दिसूं दिला आणि शेला पांघरून निजविला आणि एक पोरगा रगडावयास ठेवला. जवळील कारकून होते, त्यांस अगोदर दिल्लीपलीकडे तीन कोसांवर एक गांव होता तेथें ठिकाण करून पुढें रवाना केले होते. आणि आपण पेटारियांतून बसून निघोन चालिले. चौकीचे लोक

होते त्यांनीं एक दोन पुढील पेटारे उघडून पाहोन वरकड पेटारे न उघडितां जाऊं दिले. शहराबाहेर दोन कोसांवरि जाऊन, पेटारे टाकून, पायउतार होऊन, कारकून ज्या गांवीं होते त्या गांवास गेले. कारकून बराबरी घेतले. अवधियांनीं रानांत बसून विचार केला कीं, "आतां जरि नीट आपले देशास जातों, तरि तिकडे लाग करून फौजा धांवतील. तिकडे जाऊं नये. दिल्लीपलिकडे जावें, वाराणशीकडे जावें." असें करून राजे व संभाजीराजे व निराजी राऊत व दत्ताजी त्रिंबक व राघो मित्रा मराठा ऐसे निघोन चालिले. वरकडांस मनास मानेल तिकडे जाणें, म्हणून सांगितलें. आपण व राजपुत्र व इतर लोक कारकून ऐसे वाराणशीकडे आंगास राखा लावून, फकिराचें सोंग घेऊन मथुरेकडे गेले.

......पोलादखानानें पादशहाजवळ वर्तमान सांगितलें कीं, "राजा कोठडींत होता. वरचेवर जाऊन पहात असतां एकाएकीं गइब जाहाला, पळाला किंवा जमिनीमध्यें घुसला कीं अस्मानामध्यें गेला, हें न कळे. आम्हीं जवळच आहों. देखत देखत नाहींसा झाला. काय हुन्नर जाहला न कळे.."

......आणि पातशहांनीं मनांत शंका धरली कीं, "राजा शहरांत दडून राहिला असेल, आणि रात्रीं आपणांस दगा करील." म्हणून तजवीज करून बहुत सावध चौकी पहारा ठेवून जागेच पलंगावर राहून बैसले. लोक कंवरबस्ती करून रात्रंदिवस जवळ ठेवले. ये जातीनें राहूं लागले.

—सभासदबखर.

## (८)

## श्रीशिवराज्याभिषेक

(शनिवार ज्येष्ठ शुद्ध १३ शके १५९६ –६–६–१६७४)

(वेदमूर्ति राजश्री गागाभट्ट म्हणून वाराणशीहून राजियाची कीर्ति ऐकून दर्शनास आले. भट गोसावी थोर पंडित. चार वेद सहा शास्त्रें योगाभ्याससंपन्न,

ज्योतिषी, मांत्रिक, सर्व विद्येनें निपुण, कल्युगींचा ब्रह्मदेव असे पंडित. त्यांस राजे सरकारकून सामोरे जाऊन भेट घेऊन सन्मानें आणिलें. 'मऱ्हाठा राजा छत्रपति व्हावा असें त्यांनीं मनांत आणिलें!' आणि हें राजियासही मानिलें. तेव्हां भट गोसावी म्हणूं लागले कीं 'तक्ती बसावें.' तेव्हां राजियाचे वंशाचा शोध करतां राजे शुद्ध क्षेत्री. शिसोदे उत्तरेहून दक्षिणेस एक घराणें आलें तेंच राजियाचें घराणें असें शोधिलें. हा विचार करून राजियाचा क्षेत्रीं व्रतबंध केला. शुद्ध क्षत्रिय आधीं केला.)

पुढें तक्तारूढ व्हावें. तक्त सुवर्णाचें बत्तीस मणांचें सिद्ध केलें. मोठीं मोलाचीं रत्नें तक्तास जडाव केलीं. जडितसिंहासन सिद्ध केलें. रायरीचें नांव रायगड म्हणोन ठेविलें. तक्तास स्थळ तोच गड नेमिला. सप्त महानादियांचीं उदकें व थोर थोर नदियांचीं उदकें व समुद्राचीं उदकें तीर्थक्षेत्र नामांकित तेथील तीर्थोदकें आणिलीं. सुवर्णाचे कलश केले, व सुवर्णाचे तांबे केले. आठ कलश व आठ तांबे यांनीं अष्ट प्रधानांनीं राजियास अभिषेक करावा असा निश्चय करून सुदिन पाहून मुहूर्त पाहिला. शालिवाहन शके १५९६ ज्येष्ठ मासी शुद्ध १३ स मुहूर्त पाहिला. ते दिवशीं राजियांनीं मंगल स्नानें करून श्री महादेव व श्री भवानी कुलस्वामी व उपाध्ये व श्रेष्ट भट व सत्पुरुष अनुष्ठित यांची पूजा यथाविधि अलंकारवस्त्रें देऊन सर्वांस नमन करून अभिषेकास सुवर्ण चौकावर बसले. अष्टप्रधान व थोर थोर ब्राह्मणांनीं स्थळोस्थळींची उदकें करून सुवर्ण कलशपात्रीं अभिषेक केला. दिव्य वस्त्रें दिव्य अलंकार घेऊन सर्व पूज्य मंडळीस नमस्कार करून सिंहासनावर बसले. कित्येक नवरत्नादिक सुवर्णकमळें व नाना सुवर्णफुलें व वस्त्रें उदंड दिधलीं. दानपद्धतीप्रमाणें षोडष महादानें इत्यादिक दानें केलीं. सिंहासनास अष्ट खांब जडित केले. त्या ठिकाणीं अष्ट प्रधानांनीं उभें राहावें असें केलें. छत्र जडावाचें मोतीलग झालरीचें करून मस्तकावर धरिलें. छत्रपति असें नांव चालविलें. स्वस्तिश्री शक त्या दिवसापासून सुरू केला. वैदिक ब्राह्मण, तपोनिधी, संन्यासी अतिथी, मानभाव जटाधारी, जोगी जंगम नानाजाति, मिळाले

तितक्यास मिष्टान्न उनफे चालविले. द्रव्य अलंकार, भूषणें, वस्त्रें अमर्याद दिधलीं. गागाभट्ट मुख्य अध्वर्यु त्यास अपरिमित द्रव्य दिलें. संपूर्ण खर्चाची संख्या एक कोड वेताळीस लक्ष होन झाले. एणेंप्रमाणें राजे सिंहासनारूढ झाले. ही गोष्ट कांहीं सामान्य झाली नाहीं.

—सभासदबखर.

( शिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेकास हजर राहाण्यासाठीं मुंबईकर इंग्रजांनीं ऑक्झिडेन, रॉबिनसन व टॉमस् ह्या आपल्या वकिलांना पाठविलें होतें. त्यांच्या बरोबर नजराणे व अहेरहि पाठविले होते. ही मंडळी १६७४ मेच्या शेवटीं रायगडावर येऊन पोहोंचली. त्यांनीं समारंभाचें केलेलें वर्णन पुढें दिलें आहे. )

आम्हीं सकाळीं साताच्या सुमारास दरबारांत गेलों. छत्रपति एका भव्य व सुंदर सिंहासनावर अधिष्ठित झाले होते. सभोंवतीं सरदार दरकदार आपल्या उंची पोषाखांत उभे होते. सिंहासनाच्या पायरीवर खालीं एका बाजूस संभाजीराजे व दुसऱ्या बाजूस मोरोपंडित पेशवे व प्रसिद्ध वेदशास्त्रसंपन्न गागाभट्ट बसलेले होते. बाकीचे सरदार, सैनिक वगैरे सर्व मोठ्या अदबीनें उभे होते. मी जरा लांबूनच लवून मुजरा केला. नारायण शेणवी ह्यांच्याकरवीं छत्रपतींना मी हिरेजडित अंगठी दिली. महाराजांनीं आम्हांला पाहिलें व सिंहासनाजवळ बोलावून घेतलें. तेथें सिंहासनाच्या प्रत्येक बाजूस सोनेरी भाल्यांच्या टोंकांवर अनेक राजचिन्हें झळकत होतीं. उजव्या कोपऱ्यांत सोन्याचे मत्स्य लाविले होते. डाव्या कोपऱ्यांत सोन्याचे अश्व होते. एका सुवर्ण भाल्याच्या टोंकावर न्यायचिन्ह म्हणून एक सुवर्ण तराजू समांतर स्थितींत तोलत ठेविला होता. आम्हांला पोषाख दिले. आमचा मानपान झाला आणि आम्ही परत फिरलों. प्रवेशद्वारांत अंबारी घातलेले दोन

ज्योतिषी, मांत्रिक, सर्व विद्येनें निपुण, कलयुगींचा ब्रह्मदेव असे पंडित. त्यांस राजे सरकारकून सामोरे जाऊन भेट घेऊन सन्मानें आणिलें. 'मऱ्हाठा राजा छत्रपति व्हावा असें त्यांनीं मनांत आणिलें!' आणि हें राजियासही मानिलें. तेव्हां भट गोसावी म्हणूं लागले कीं 'तक्ती बसावें.' तेव्हां राजियाचे वंशाचा शोध करतां राजे शुद्ध क्षेत्री. शिसोदे उत्तरेहून दक्षिणेस एक घराणें आलें तेंच राजियाचें घराणें असें शोधिलें. हा विचार करून राजियाचा क्षेत्रीं व्रतबंध केला. शुद्ध क्षत्रिय आधीं केला.)

पुढें तक्तारूढ व्हावें. तक्त सुवर्णाचें बत्तीस मणांचें सिद्ध केलें. मोठीं मोलाचीं रत्नें तक्तास जडाव केलीं. जडितसिंहासन सिद्ध केलें. रायरीचें नांव रायगड म्हणोन ठेविलें. तक्तास स्थळ तोच गड नेमिला. सप्त महानदियांचीं उदकें व थोर थोर नदियांचीं उदकें व समुद्राचीं उदकें तीर्थक्षेत्र नामांकित तेथील तीर्थोदकें आणिलीं. सुवर्णाचे कलश केले, व सुवर्णाचे तांवे केले. आठ कलश व आठ तांवे यांनीं अष्ट प्रधानांनीं राजियास अभिषेक करावा असा निश्चय करून सुदिन पाहून मुहूर्त पाहिला. शालिवाहन शके १५९६ ज्येष्ठ मासी शुद्ध १३ स मुहूर्त पाहिला. ते दिवशीं राजियांनीं मंगल स्नानें करून श्री महादेव व श्री भवानी कुलस्वामी व उपाध्ये व श्रेष्ठ भट व सत्पुरुष अनुष्ठित यांची पूजा यथाविधि अलंकारवस्त्रें देऊन सर्वांस नमन करून अभिषेकास सुवर्ण चौकावर बसले. अष्टप्रधान व थोर थोर ब्राह्मणांनीं स्थळोस्थळींचीं उदकें करून सुवर्ण कलशपात्रीं अभिषेक केला. दिव्य वस्त्रें दिव्य अलंकार घेऊन सर्व पूज्य मंडळीस नमस्कार करून सिंहासनावर बसले. कित्येक नवरत्नादिक सुवर्णकमळें व नाना सुवर्णफुलें व वस्त्रें उदंड दिधलीं. दानपद्धतीप्रमाणें षोडष महादानें इत्यादिक दानें केलीं. सिंहासनास अष्ट खांब जडित केले. त्या ठिकाणीं अष्ट प्रधानांनीं उभें राहावें असें केलें. छत्र जडावाचें मोर्तीलग झालरीचें करून मस्तकावर धरिलें. छत्रपति असें नांव चालविलें. स्वस्तिश्री शक त्या दिवसापासून सुरू केला. वैदिक ब्राह्मण, तपोनिधी, संन्यासी अतिथी, मानभाव जटाधारी, जोगी जंगम नानाजाति, मिळाले

तितक्यास मिष्टान्न उनफे चालविले. द्रव्य अलंकार, भूषणें, वस्त्रें अमर्याद दिधलीं. गागाभट्ट मुख्य अध्वर्यु त्यास अपरिमित द्रव्य दिलें. संपूर्ण खर्चाची संख्या एक क्रोड बेताळीस लक्ष होन झाले. एणेंप्रमाणें राजे सिंहासनारूढ झाले. ही गोष्ट कांहीं सामान्य झाली नाहीं.

—सभासदबखर.

( शिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेकास हजर राहाण्यासाठीं मुंबईकर इंग्रजांनीं ऑक्सिंझडेन, रॉबिनसन व टॉमस् ह्या आपल्या वकिलांना पाठविलें होतें. त्यांच्या बरोबर नजराणे व अहेरहि पाठविले होते. ही मंडळी १६७४ मेच्या शेवटीं रायगडावर येऊन पोहोंचली. त्यांनीं समारंभाचें केलेलें वर्णन पुढें दिलें आहे. )

आम्हीं सकाळीं साताच्या सुमारास दरबारांत गेलों. छत्रपति एका भव्य व सुंदर सिंहासनावर अधिष्ठित झाले होते. सभोंवतीं सरदार दरकदार आपल्या उंची पोषाखांत उभे होते. सिंहासनाच्या पायरीवर खालीं एका बाजूस संभाजीराजे व दुसऱ्या बाजूस मोरोपंडित पेशवे व प्रसिद्ध वेदशास्त्रसंपन्न गागाभट्ट बसलेले होते. बाकीचे सरदार, सैनिक वगैरे सर्व मोठ्या अदबीनें उभे होते. मी जरा लांबूनच लवून मुजरा केला. नारायण शेणवी ह्यांच्याकरवीं छत्रपतींना मी हिरेजडित अंगठी दिली. महाराजांनीं आम्हांला पाहिलें व सिंहासनाजवळ बोलावून घेतलें. तेथें सिंहासनाच्या प्रत्येक बाजूस सोनेरी भाल्यांच्या टोंकांवर अनेक राजचिन्हें झळकत होतीं. उजव्या कोपऱ्यांत सोन्याचे मत्स्य लाविले होते. डाव्या कोपऱ्यांत सोन्याचे अश्व होते. एका सुवर्ण भाल्याच्या टोंकावर न्यायचिन्ह म्हणून एक सुवर्ण तराजू समांतर स्थितींत तोलत ठेविला होता. आम्हांला पोषाख दिले. आमचा मानपान झाला आणि आम्ही परत फिरलों. प्रवेशद्वारांत अंबारी घातलेले दोन

शोभिवंत हत्ती व सोन्याचे लगाम घातलेले दोन घोडे उभे असलेले आम्हीं पाहिले.

ऑक्झिडननें पुढीलप्रमाणें अहेर केले.

| | | |
|---|---|---|
| शिवाजीमहाराजांस | हिरेजडित शिरपेच | ६९० रु. |
| ,, | हिरेजडित सलकडीं | ४५० रु. |
| ,, | ३ मोती | ५१० रु. |
| संभाजीमहाराजांना | | ३७५ रु. |
| मोरो पंडितांना | | ४०० रु. |
| | एकूण खर्च | २४२५ रु. |

( राज्याभिषेकसमारंभाचा कार्यक्रम पुढीलप्रमाणें झाला. )

२९-मे-१६७४ रोजीं सुवर्णतुला झाली. राजांचें वजन १६००० होन झालें. ( १६० पौंड ). त्यांत एक लक्ष होन अधिक घातले व ब्राह्मणांस प्रत्येकीं १०० होन वांटले.

५-६-१६७४ रोजीं गंगाजलानें स्नान झालें.

६-६-१६७४ रोजीं पहांटे पांच वाजतां सिंहासनारोहण झालें.

८००० होनांनीं मोरोपंडित पेशव्यांनीं शिवरायास स्नान घातलें.

७००० होन हिशेबनीस निळो पंडित-अहेर.

५००० होन प्रत्येक सरकारकून.

—इंग्रजी पत्रव्यवहार

( ९ )

छत्रपति शिवाजी महाराजांची राजमुद्रा

प्रतिपच्चंद्र<br>लेखेव वर्धिष्णु<br>विश्ववंदिता । साहसू<br>नोः शिवस्यैषा मुद्रा<br>भद्राय राजते ॥

(१०)

( तुळजाभवानीस समर्थांनीं मागितलेला वर )

एकचि मागणें आतां । द्यावें तें मजकारणें । तुझा तूं वाढवी राजा । सीघ्र आम्हांचि देखतां ॥ १ ॥ दुष्ट संहारिले मागें । ऐसे उदंड ऐकतों । परंतु रोकडें कांहीं । मूळ सामर्थ्य दाखवी ॥ २ ॥ देवांचीं राहिलीं सत्त्वें । तूं सत्त्व पाहिसी किती । भक्तासीं वाढवी वेगीं । इच्छापूर्ण परोपरी ॥ ३ ॥ रामदास म्हणे माझें । सर्व आतुर बोलणें । क्षमावें तुळजे माते । इच्छा पूर्णचि ते करीं ॥ ४ ॥

—समर्थ रामदास, तुळजाभवानीस्तोत्र.

(११)

शिवरायाचा गौरव

निश्चयाचा महामेरु । बहुत जनांसी आधारु । अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ॥ १ ॥ परोपकाराचिया राशी । अखंड घडती जयासी । तयाचे गुण महत्त्वासी । तुळणा कैंची ॥ २ ॥ नरपति हयपति गजपति । गडपति भूपति जळपति । पुरंदर आणि छत्रपति । शक्ति पृष्ठभागीं ॥ ३ ॥ यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत । पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ॥ ४ ॥ आचारशीळ विचारशीळ । दानशीळ धर्मशीळ । सर्वज्ञपणें सुशीळ । सकळां ठायीं ॥ ५ ॥ धीर उदार गंभीर । शूर क्रियेसी तत्पर । सावधपणें नृपवर । तुच्छ केलें ॥ ६ ॥ देव धर्म गो-ब्राह्मण । करावया संरक्षण । हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली ॥ ७ ॥ या भूमंडळाचे ठायीं । धर्मरक्षी ऐसा नाहीं । महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं । तुम्हांकरितां ॥ ८ ॥ कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले । कित्येकांस आश्रय जाले । शिव कल्याण राजा ॥ ९ ॥ सर्वत्र मंडळी धर्ममूर्ति । सांगणें काय तुम्हां प्रति । धर्मस्थापनेची

कीर्ति । सांभाळली पाहिजे ॥ १० ॥ उदंड राजकारण तटलें । तेणें चित्त विभागलें । प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केली पाहिजे ॥११॥

—समर्थांचें शिवाजीमहाराजांस पत्र.

(१२)

( शिवाजीमहाराजांनीं लिहिलेलीं पुष्कळ पत्रें उपलब्ध झालीं आहेत. तीं सर्व हिंदवी स्वराज्याच्या निष्ठेचीं व प्रजेच्या हिताचीं आहेत. त्यांची मराठी भाषाहि फार तेजस्वी आहे. महाराजांची शिस्त व जरब त्यांत दिसून येते. )

( अ ) मशहुरल अनाम राजेश्री जुमलेदारांनीं मौजे हलकर्णी. . .प्रति

**राजश्री शिवाजीराजे......**

**...त्यास तुम्हीं मनास मानेल ऐसा दाणा-रातीव व गवत मागाल, असेल तोंवरी धुंदी करून चाराल, नाहींसें झालें म्हणजे मग कांहीं पडत्या पावसांत मिळणार नाहीं, उपास पडतील, घोडीं मरायला लागतील, म्हणजे घोडीं तुम्हींच मारलीं ऐसें होईल. व विलातीस तसवीस देऊं लागाल. ऐशास लोक जातील. कोणी कुणब्याचे येथील दाणे आणील, कोणी भाकर, कोणी गवत, कोणी फाटे, कोणी भाजी, कोणी पाले ऐसें करूं लागलेत म्हणजे कुणवी जे घर करून जीवमात्र घेऊन राहिले आहेत तेहि जाऊं लागतील. कित्येक उपाशीं मराया लागतील, म्हणजे त्यांला ऐसें होईल कीं मोंगल मुलकांत आले त्याहूनहि अधिक तुम्ही, ऐसा तळतळाट होईल, हें तुम्ही बरें जाणून, शिपाई हो, अगर पावखलक हो, बहूत यादी धरून वर्तणूक करणें......**

—१९ मे १६७३.

( आ ) मशहुरल हजरती रा. जिवाजी विनायक सुभेदार मामले प्रभावळी प्रति

**राजश्री शिवाजी राजे दंडवत—**

**...येवढी हरामखोरी तुम्ही कराल आणि रसद पाठवून मजरा करूं म्हणाल त्यावरी साहेब रिझतील कीं काय ? हे गोष्ट घडायची तऱ्ही होय. न कळे कीं हवासियानी कांहीं देऊन आपले चाकर**

तुम्हांला केले असतील. त्याकरतां यैसी बुद्धि केली असेल. तरी अशा चाकरास ठाकेठीक केले पाहिजेत. ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करूं पाहतो?...गनिमाचे चाकर गनीम जालेस यैसें जाणून वरा नतीजा तुम्हांस पावेल. ताकीद असे.

—इ. स. १६७५.

(इ) श्री सहस्रायु चिं. अखंडित लक्ष्मी अलंकृत राजश्रिया विराजित रा. रा. येकोजीराजे प्रति...राजश्री शिवाजीराजे, आशीर्वाद—

—कैलासवासीं साहेवीं कैलासवास केला त्यास आज तेरा वर्षे जालीं. महाराजांचे पैके व जडाव व हत्ती व घोडे अवघेंहि राजश्री रघुनाथपंतीं तुम्हांस राज्यावर वैसवून संपूर्ण राज्य तुमचे हातीं दिलें. पेशियास आमचा अर्धा वांटा तेरा वर्षे तुम्हींच खादला, आम्हीं जरी तुम्हांजवळीं मागावें तर वहूत दूर होतों...मनामध्यें ऐसा विचार केला कीं वरें, महाराजांचे पुत्र तेहि आहेत. खाती तोंवर खात...आपल्यांत आपण गृहकलह करावा आणि कष्टी व्हावें ह्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. याउपरी तरी आमचा आपला संधि व्हावा असे बुद्धि मनीं धरून वांटियाचा व्यवहार निर्गमून टाकणें आणि सुखें असणें. वहुत काय लिहिणें. मर्यादेयम् विराजते.

— १ मार्च १६७८.

(ई) श्रीशिवाजी महाराजांचे समर्थ रामदास ह्यांना पत्र

चरणरज शिवाजी राजे यांनीं चरणावरी मस्तक ठेवून विज्ञापना जे, मजवर कृपा करुनु सनाथ केलें. आज्ञा केली कीं, तुमचा मुख्य धर्म राज्यसाधन करुनु, धर्म स्थापना, देव ब्राह्मणांची सेवा, प्रजेची पीडा, दूर करून पाळण रक्षण करावें. हें व्रत संपादून त्यांत परमार्थ करावा. तुम्हीं जें मनीं धराल तें श्री सिद्धीस पाववील त्याजवरून जो जो उद्योग केला व दुष्ट तुरुक लोकांचा नाश करावा; विपुल द्रव्य करुनु राज्य परंपरा अक्षई चालेल ऐशीं स्थळें दुर्घट करावीं; ऐसें जें जें मनीं धरलें तें तें स्वामींनीं आशीर्वाद प्रतापें

मनोरथ पूर्ण केले. या उपरीं राज्य संपादिलें तें चरणीं अर्पण करून, सर्वकाळ सेवा घडावी ऐसा विचार मनीं आणिला, तेव्हां आज्ञा जाली कीं, तुम्हांस पूर्वीं धर्म सांगितले तेच करावे. तीच सेवा होय. ऐसें आज्ञापिलें. यावरून निकट वास घडुनु वारंवार दर्शन घडावें ऐशी प्रार्थना केली. तेही आसंमतात गिरिगव्हरीं वास करुनु चाफळी श्रीची स्थापना करुनु सांप्रदाय शिष्य दिगंत विस्तीर्णता घडली......

— सज्जनगड, इ. स. १६७९.

(उ) श्रियासह चिरंजीव अखंडितलक्ष्मी अलंकृत राजश्रिया विराजित

**महाराज एकोजीराजे** प्रति **राजश्री शिवाजीराजे** आशीर्वाद......

...तुम्ही आपले ठायीं उदासवृत्ति धरून पहिलेंसारखें आपलें संरक्षण करीत नाहीं. सणवार उत्सवादि हेंहि कांहीं करीत नाहीं. वैराग्य धरिलें. एखादे तीर्थीचे जागीं वसून कालक्रमण करूं ऐशा गोष्टी सांगतां. तरी या गोष्टी आम्हांस बहुत अपूर्व वाटल्या. तुम्हांला ऐसा कोणता प्रसंग पडला जे इतक्याच मध्यें नसतें वैराग्य मनावरी आणून आपल्या शरीराची उपेक्षा करणें हें कोण शहाणपण व कोणती नीती? आम्ही तुम्हांस वडिल मस्तकीं असतां चिंता कोणे गोष्टीची आहे? पुरुषार्थ व कीर्ति अर्जणें. काल व्यर्थ न गमावणें. कार्यप्रयोजनाचे दिवस हे आहेती. वैराग्य उत्तर वयीं कराल तें थोडें. आज उद्योग करून आम्हांसहि तमासे दाखविणें. बहुत काय लिहिणें? तुम्ही सुज्ञ असा.

—जानेवारी १६८०

(ऊ) नेकीची इच्छा करणारा **सत्यवचनी शिवाजी......**

**औरंगजेब** बादशहा प्रति

......सारांश शिपाईलोक हैराण व सौदागर पुकारा करतात व मुसलमान रडतात व हिंदु लोक मनांत जळतात. आणि कित्येक लोकांस पोटास मिळत नाहीं असें आहे. तेव्हां राज्य चालविणार कसें? त्यांजवर जझियापट्टीचा उपद्रव या प्रकारचा, तो पूर्व-

पश्चिमेपावेतों जाहीर जाहला आहे कीं, हिंदुस्थानचे पातशहा, फकीर, ब्राह्मण, जैन, जोगी, संन्यासी, वैरागी, अनाथ, गरीब व थकलेले पडलेले असे एकंदर लोकांपासून जझिया घेतात व त्यांतच पुरुषार्थ असें समजतात व तैमुर पादशहाचें नांव बुडवितात असें जाहलें आहे. जुलूम ज्यावर जाला त्याणें खेद करून 'हाय हाय' म्हणून मुखानें धूर काढल्यास त्या धुरानें जितकें लवकर जळेल तितकें जलदीनें जळतां अग्निहि संमधास जाळणार नाहीं. परंतु गरीबअनाथ मुंग्याचिलटांसारखे आहेत. त्यांस उपसर्ग करण्यांत कांहीं मोठेपणा नाहीं. पदरची मंडळीहि पाहतां पाहतां अग्नि तृणानें झाकितात याचें आश्चर्य वाटतें !

मराठी — इ. स. १६७९ अखेर
११८

(१२)

## शिवाजी महाराजांचें महाप्रस्थान

( चैत्र शु. १५ रविवारीं दोन प्रहरीं, ता. ४–४–१६८० )

मग कांहीं दिवसांनीं राजांस व्यथा ज्वरांची जाहली. राजा पुण्यश्लोक कालज्ञान जाणे. विचार पाहतां आयुष्याची मर्यादा झाली असें कळून जवळील कारकून हुजरे लोक होते त्यांमध्यें सभ्य भले लोक बोलावून आणिले. मग त्यांस सांगितलें कीं, आपल्या आयुष्याची अवधि झाली आणि कैलासास श्रीचें दर्शनास जाणार. शरीर क्षीण देखून पन्हाळियावरी संभाजीराजे वडीलपुत्र यांस सांगितलें कीं, 'तुम्हीं दोघे पुत्र आपणांस, त्यास राज्य वांटून देतों आणि उभयतां सुखरूप राहणें" म्हणोन सांगितलें. परंतु वडीलपुत्र संभाजीराजे यांनीं ऐकिलें नाहीं. "शेवट तो आपला निदान समय दिसताहे राज्य म्यां शिवाजीनें चाळीस हजार होनांचा पुणें महाल होता त्यावरी एक क्रोड होनांचें राज्य पैदा केलें. हे गडकोट लष्कर पागा ऐसें मेळविलें, परंतु मज माघारें हें राज्य संरक्षण करणार ऐसा पुत्र दिसत नाहीं. कदाचित् धाकटा कुंवर राजाराम वांचला तर तो एक हें राज्य वृद्धीतें पाववील. संभाजीराजे

वडील पुत्र जाणता आहे. परंतु बुद्धि फटकळ आहे. अल्पबुद्धि आहे. त्यास काय करावें? आपण तों प्रयाण करतों. तुम्हीं कारकून व हुजरे व मराठे कदीम या राज्यांतील आहां. तुम्हांस या गोष्टी कळल्या असाव्या. आपणामाघारें संभाजीराजे पराक्रमानें राज्य सर्व आटोपतील." एणेंप्रमाणें राजे बोलले. सर्वांचे कंठ दाटून नेत्रांतून उदक श्रवूं लागलें. परम दुःख झालें. त्याउपरी राजे बोलिले कीं, "तुम्हीं चुकूर होऊं नका. हा तों मृत्युलोकच आहे. यामागें किती उत्पन्न झाले, तितके मेले. आतां तुम्हीं निर्मल सुखरूप वृत्तीनें असणें. आतां अवघे बाहेर बैसा. आपण श्रीचें स्मरण करतों." म्हणोन अवघियास बाहेर बसविलें. आणि राजियांनीं श्रीभागीरथीचें उदक आणून स्नान केलें. भस्म धारण करून रुद्राक्ष धारण केले. आणिं योगाभ्यास करून आत्मा ब्रह्मांडास नेऊन दशद्वारें फोडून प्राणप्रयाण केलें.

शालिवाहन शके १६०२ रौद्रनामसंवत्सरे चैत्र शुद्ध १५ रविवारीं दोन प्रहरीं काळ रायगडीं झाला.

—सभासद बखर.

(१४)

## संभाजी छत्रपतीस समर्थांचा उपदेश

अखंड सावधान असावें। दुश्चित कदापि नसावें। तजविजा करीत बसावें। एकांतस्थळीं ॥ १ ॥ कांहीं उग्रस्थिति सांडावी। कांहीं सौम्यता धरावी। चिंता लागावी परावी। अन्तर्यामीं ॥ २ ॥ मागील अपराध क्षमावें। कारभारी हातीं धरावे। सुखी करून सोडावे। कामाकडे ॥ ३ ॥ सकळ लोक एक करावे। गलीम निवडुनी काढावे। ऐसें करितां कीर्ति धांवे। दिगंतरीं ॥ ४ ॥ आधीं गाजवावे तडाखे। मग भूमंडळ धाके। ऐसें न होतां धक्के। राज्यास होती ॥ ५ ॥ बहुत लोक मिळवावे। एकविचारें भरावे। कष्टे करोनि घसरावे। म्लेंछावरी ॥ ६ ॥ आहे तितुकें जतन करावें। पुढें आणीक मिळवावें। महाराष्ट्र राज्य करावें। जिकडे तिकडे ॥ ७ ॥ लोकीं हिंमत धरावी। शर्तीची तरवार करावी। चढती वाढती

पदवी । पावाल तेणें ॥ ८ ॥ शिवराजांस आठवावें । जीवित्व तृणवत् मानावें । इहलोकीं परलोकीं राहावें । कीर्तिरूप ॥ ९ ॥ शिवरायाचें आठवावें रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप । शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं ॥ १० ॥ शिवरायाचें कैसें चालणें । शिवरायाचें कैसें बोलणें । शिवरायाची सलगी देणें । कैसी असे ॥ ११ ॥ सकळ सुखाचा त्याग । करूनि साधिजे जो योग । राज्य साधनाची लगबग । कैसी असे ॥ १२ ॥ त्याहुनि करावें विशेष । तरीच म्हणावे पुरुष । याउपरी आतां विशेष । काय लिहावें ? ॥ १३ ॥

— श्रीसमर्थांचें संभाजी छत्रपतीस पत्र : इ. स. १६८१

## (१५)

## छत्रपति संभाजी महाराज

[कांहीं प्रसंग]

शके १६०३ जेष्ठ मासीं सुलतान अकबरशहा आला. औरंगजेबावर यागी होऊन त्रिंबकास आले, त्यास संभाजी राजे यांणीं कोंकणांत पालीस ठाव दिल्हा.

भाद्रपद मासीं संभाजी राजे यांणीं कवि कळशाचा बोलें मागती आणाजी दतो सचीव यांजवर इतराजी करून मार दिल्हा, त्या मारानें राजश्री आनाजीपंत व बाळा प्रभु व सोमाजी दत्तो व हिरोजी फर्जंद परळी खालें कैद करून मारिले. कर्णाटकांत शामजी नाईक यास कैद करविलें.

कार्तिक शुध १३ रविवार पातशाहापुरीं संभाजी राजे यांची व अकबराची भेट जाली. अगदीं सेनासमुदाये लश्कर व हशाम देखील समागमें होते. अकबरासमागमें दुर्गादास होता. बहुत सन्मान केला.

(शके १६०५) जेष्ठ वद्य ११ संभाजी स्वार होऊन राजापुरास गेले. फिरंगीयासीहि बिघाड केला. रेवदंडायासी वेढा घातला.

आशाढ सुध पौर्णिमा जनार्दन नारायेण यांणीं देवरूखी देह ठेविला. कार्तिक वद्य ७ संभाजी राजे हंडियास गेलें. गावीकर फिरंगीयानीं कोटास वेढा घातला होता. त्यासी लढाई करून वेढा उढविला. तेथें येसाजी कंक व त्याचा लेक कृष्णाजी कंक याणें युद्धाची शर्त केली. १ मार्गशीर्ष मासी फिरंगीयाचे कुंभार जुजे घेतले. साष्टी व वरदेस मारिला.

(शके १६०७) आषाढ मासी संभाजी राजे यांणीं विजापूरचे मदतीस कवर्जीस पाठविलें ते जाऊन पनाला राऊत फौजा रवाना केल्या. फालगुण मासीं अकवर जाहजांत वैसोन विरानांत गेला.

(शके १६१०) माघ वद्य ७ शुक्रवासरीं संभाजी राजे व कवि कलश रायगडास जावयास संगमेश्वरास आले असतां सेक निजाम दौंड करून येऊन उभयतांस जीवंतच धरून नेलें. वरकड लोक रायेगडास गेले.

फालगुण वद्य ३० अवरंगजेव तुलापुरीं संभाजी राजे व कवि कलश यास जीवें मारून सिरच्छेद केले.

— जेधे शकावली.

(१६)

## छत्रपति राजाराम : स्वराज्यविकासाची महत्त्वाकांक्षा

'वजारतमाव राजेश्री हणमंत घोरपडे गोसावी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री-प्रती राजाराम छत्रपती उपरी. तुमचे विशई राजश्री नागोजी माने येहीं विनंती केली कीं तुमचा मुदा स्वामीच्या राज्यांत यावयाचा आहे. स्वामीनें त्याजयोग्य भाग्य दिधलिया त्याप्रती राजश्री रामचंद्र पंडित अमात्य याजकडे येतील म्हणोन विदीत केलें. त्यावरून तुमचा मनोदेये कलला कीं महाराष्ट्र धर्म पूर्ण रक्षावा येसा (स) कलप (संकल्प) स्वामींनीं जानून तुम्हावरी (कृपाळ होऊन) राजश्री कृष्णाजी घोरपडे उभयतांस भाग्ये होन पा। ६,००००० दिल्हे आहे वि।। राजश्री कृष्णाजी घोरपडे यास खा। तुम्हांस भाग्य होन ५०००००

— शि. सा. खंड ५.१०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ... दि: ...

## ... ताराबाईंची योग्यता

( ह्या ओंव्या कवि परमानंदाचा नातु कवि गोविंद ह्याच्या आहेत. त्या ताराबाईनें औरंगजेबाशीं युद्ध केलें त्या संबंधींच्या आहेत. )

तुळजा प्रसन्न झाली । पातशाही हातां आली । जयलक्ष्मी माळ घाली । शिवाजीस आदरें ॥ १ ॥ दिल्ली झाली दीनवाणी । दिल्लीशाचें गेलें पाणी । ताराबाई रामराणी । भद्रकाली कोपली ॥ २ ॥ जाणा तुम्ही आजि साची । आज्ञा आली शंकराची । सर्व सेना दिल्लीशाची । अंतकास वोपली ॥ ३ ॥ मानहानी दिल्लींद्राची । सभा हासते इंद्राची । आजि काल कवींद्राची । सर्व चिंता हरली ॥ ४ ॥ रामराणी भद्रकाली । रणरंगीं क्रुद्ध झाली । प्रलय वेळ आली । मुगल हो सांभाळा ॥ ५ ॥ वसे रत्नसिंहासनीं । भोसल्यांचा शिरोमणि । शिवराज चिंतामणी । दिनमणि उदयें ॥ ६ ॥

## ( १८ )

## पहिल्या बाजीरावाची योग्यता

श्रीशंकर

पुरवनी श्रीमन्त राजश्री प्रधान पंत स्वामीजी शेवेसी. विनंती उपर दीपसिंगजी भेटीस नवाबाचे गेले होते. मेजवानी वगैरे देऊन बहुमान ( नें ) मुख्य भेटला. पोटासी धरिलें. मग येकांतीं बैसोन वर्तमान पुसिलें. मग या गोस्टी सोडून घडी घडी आम्हास पुसो लागले कीं सातारा महाराजांपासीं मातवर मनसुबेबाज राजा ज्यास मानीतो ऐसा तुमचे नजरेस कोण आला ? यानीं जाब दिल्हा कीं माहराजा जैसिंगजींनीं मजला याच कामाबद्दल बहुत करून पाठविलें जे, बाजीराऊ पंडित प्रधान यांचें नांव मुलकांत मरदुमीचें फार आहे. परंतु गिरंदारी व मुदसदगिरी व मान आदर राज्यांत व बोलोन चालोन पोख्त कारबारी मनास आणून येणें म्हणोन पाठविलें होतें, तें आपण मनास आणिलें. मग नवाब पुसों लागले कीं कोन्हास तुम्ही मातबर व पोख्तकार व साहेब तरतुद व राजा

मेहरबान गिरंदार कोन्हास वलखिलें ? दीपसिंगजींनीं उत्तर दिल्हें जे, सिवाय बाजीराऊजी आणिक कोन्ही सत्यवचनी अगर प्रामाणिक अगर पोख्तकारी अगर चलनसाहेबफौज दुसरा दिसत नाहीं. मग पुसिलें जे, राजा खुद कसा आहे ? यांनीं उतर दिल्हें की राजाहि बहुतच खुबिया राखतो. नवाबांनीं उत्तर दिल्हें जे आम्ही आयिकिलें जे कितेक गोस्टी हलकेपणाच्या आइकतो. यांनीं उत्तर दिल्हें कीं ते मजलीसीसारखें न चालत तर राज्य कैसें राहतें ? परंतु पोख्त शाहणे विवेकी. जाबसाल उत्तम करितातो यैसें उत्तर झालें.

## (१९)

## वसई काबीज

( कोंकणांत पोर्तुगीज लोकांनीं प्रजेचा अतोनात धार्मिक छळ केला. प्रजेच्या रक्षणासाठीं शाहू छत्रपतींनीं त्यांच्या विरुद्ध मोहीम उभारली आणि तिचें नेतृत्व चिमाजी आप्पा ह्यांच्याकडे दिलें. ही मोहीम दोन तीन वर्षे चालली. कित्येक लढाया झाल्या. पण तिचा पार पडेना. अखेर मराठ्यांनीं पोर्तुगीजांना नामोहरम करायचें ठरविलें व ते मोठ्या निकरांनीं लढले. शेवटचें युद्ध वसईचें झालें. पोर्तुगीजांचा पूर्ण पराजय झाला. ही लढाई ३-५-१७३९ रोजीं झाली. ह्या युद्धाचीं अस्सल वर्णनें प्रत्यक्ष लढाईत भाग घेतलेल्या मराठे वीरांनीं लिहून ठेविलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं पुढें दिलीं आहेत. )

फिरंगियांनीं हिंमत धरून शिपाईगिरी म्हणावी तशी केली कीं ज्याचें नांव शिपाईगिरी. पूर्वीं भारती युद्धांत अतिरथी महारथी झुंजले त्याच न्यायें प्रस्तुत काळीं महाराजांचे एकनिष्ठ सेवक लोकहि विरथीपणें झुंजले. इतकी आग पिऊन मराठी फौजेनें दम धरला असें कधीं झालें नाहीं. सीमा केली. फिरंगियांचा जागा वसई हस्तगत जाहालियामुळें समुद्रांत सर्वांस दहशत प्राप्त होऊन चौऱ्यांशीं बंदरींत महाराजांची सलावत झाली.

— चिमाजी आप्पांचें शाहूमहाराजांस पत्र.

—यामागें युद्धें बहुत प्राप्त झालीं परंतु मराठी फौजेस यासारखें युद्ध पडलें नाहीं! सीमासीमाच झाली. हा जागा फत्ते होणें ही देवाची दया आहे.

—चिमाजी आप्पाचें नानास पत्र.

"वसई फत्ते जाली! संस्थानच प्राप्त झालें! राज्येच येक सुटलें!! फिरंगी स्थळापासून चेवले. ईश्वरें यांस स्थळ दिलें. मोठी फत्ते जाली. याणींहि करोड रुपये खर्च केला. फार येत्न केला. यैसा यत्न या राज्यांत कोण्ही केला नाहीं!!!"

— एका यादींतील नोंद.

"दक्षिणची फौज मऊ लागलें म्हणजे वेजरव घेणार, कठीण लागलें म्हणजे फिरोन पाहणें नाहीं. ऐशी पूर्वापार या राज्यांतली तऱ्हा. सरदारांस कर्म झालें नाहीं, पुढेंहि होणें नाहीं, हा तो कृतनिश्चयच आहे. ज्या प्रकारें वानरांकडून लंका घेविली त्याप्रकारें हे गोष्ट जाहाली. दक्षिणी फौजेस उपास करून व छातीचा कोट करून झुंजावें हे हिम्मत पूर्वी कोण्ही केली यैसें ऐकलेंहि नव्हतें.

—चिमाजी आप्पाचें अभिनंदन.

तुम्हीं भारती युद्ध केलें. रामरावणीच युद्ध हें.

—एका पत्रांतील नोंद.

## (२०)

## शाहूचें अखेरचें स्वदस्तुरचें पत्र.

(थोरले शाहू छत्रपति यांच्या हातच्या या दोन याद्या आहेत. या याद्यांमुळें पेशव्यांकडे मराठा राजमंडळाचें प्रमुखत्व आलें. इ. स. १७४९)

श्री. राजमान रा वालाजी प्रधान पंडित यांस आज्ञा-तुम्ही फौज धरने सरवास आज्ञा केली त्याच्या दैव नाहीं महाराजांस दुखने जाले-नाहीं वर होत नाहीं. राजभार चाला पाहिजे तर पुढें वंस बसवने, कोलापुरचे न करने, चिटणीसास सरव सांगितले तसे करने. वंस होईल त्यांच्या आज्ञेत चालून राजमंडल चालवने

चिटणीस स्वामीचे वसवासू. त्याच्या तुमच्या विचार राज राखने. वस होईल, तो तुमची घालमल करनार नाई. सुदन आसा.

### यादी २

श्री. राजमान रा बालाजी पंडित प्रधान—आज्ञा जे राजभार तुम्ही चालवाल हा भरवसा स्वामीस आहे. पहिले सांगितले खातरजमा ती चिटणीसानी आढल कली तुमचे मसतकी हूत होईल तो तुमचें पद प्रधान चालवील, करील आंतर तास सफत आसे. त्याचे आज्ञेत चालून सेवा करने. राज राखने. वहुत काय लिहिने, सुदन असा.

## ( २१ )

## पानिपतचा कहर

( पानिपतच्या लढाईत अगदीं अखेरच्या प्रसंगापर्यंत नाना फडणीस भाऊजवळ होते. त्यानीं लिहिलेलें हें आत्मचरित्र इतिहासाचें साधन म्हणूनच नव्हे, तर मराठी वाङ्मयाचें एक बहुमोल साधन आहे. )

|| श्रीकृष्ण प्रसन्न ||

......मीही युद्धांत होतों. ईश्वरें रक्षिलें. तो इत्कियांत यवन आलीकडे आला. श्रीमंत सैन्यासहवर्तमान त्याचें समोर गेले. गांठ पडली. तेव्हां मी तर लहान, श्रीमंताचे वुद्धीस महानवुद्धी, परंतु भावी अर्थ तेणेंकरून विपर्यास पडला. आप्त होते वळवंतराव मातुल व नाना पुरंधरे वगैरे ते अनाप्त झाले. जे अनाप्त शाहनवाजखानी भवानी शंकर वगैरे ते आप्त जाहले, त्यांचें वाक्याचे ठायीं विश्वास, तेणेंकरून आपली रीत युद्धाची सोडून यवनाची रीत धरिली. परस्परें युद्ध होत असे. गोळे प्रत्यहीं शत्रूचे राहुटीवरून जात. मातोश्री व स्त्री भयभीत होत कीं कसें होईल? ते ते समयीं मातोश्रीस विनंती करीत गेलों, कीं मी विनंती करितों—एक ईश्वरीं लक्ष असावें. त्यांत मातुल युद्धांत होते ते पडले. ते दिवशींच सर्व सैन्य नाशास पावावें. परंतु रात्र जाहली यामुळें राहिलें. त्या दोन महिन्यांत मनुष्यें, पशु वहुत मेले. अन्नाची महर्गता. दुर्गंधी एकेच

ठिकाणीं. असे श्रम पाहिले. पुढें मातुळाची स्त्री समागमें गेली. मातोश्रीस फार श्रम जाहले. होणार आवश्यक होतें. यदर्थीं संदेह धरूंच नये, हा माझा निश्चय, पुढें थोरले युद्ध उदयीक होणार तो पूर्व दिवशीं संकेत कीं, पराजय आपला जाहला तरी शत्रूचे हातीं श्रीमंताचें कुटुंब व आपलें, हातीं लागूं नये. आपणच नाश करवावा. आपण तर वांचत नाहीं असा सिद्धांत करून श्रीमंतांनीं याचीही योजना केली. दुसरे दिवशीं तयार होऊन प्रातःकालचे दोन घटिका दिवसास युद्धास गोळागोळीचा प्रारंभ जाहला. श्रीमंत अति बुद्धिवान्, धैर्यवान, शूर, कृतकर्मे, गर्व मात्र विशिष्ट, परंतु तर्तुद फारच सैन्याची वगैरे केली. शेवटीं निशाणाजवळील तर्तुद एकीकडे जाऊन शत्रूची मुख्य स्थानींच गांठ पडली. मी श्रीमंतासन्निध ईश्वरस्मरण किंचित् करून असें. तों विश्वासराव यांस गोळी लागली. पडले. ते हत्तीवर श्रीमंतांनीं घालून उभेच राहिले. तो पठाण पायउतारा आंत येऊन मिसळले. तोडातोडी होऊं लागली. आणि डावे बाजूचे मातवर सरदार चौघड्याचे धनी देखील, पूर्वींच पळाले. उजवे बाजूचे होळकर शिंदे निघोन निशाण निघालें. दोन तीन शत पायदळ होतें. श्रीमंत दिसेनातसे जाहले, ईश्वरें बुद्धी दिली. माघारें फिरलों.

—नाना फडणीस, आत्मचरित्र.

## (२२)

## सवाई माधवराव ह्यांचा दिनक्रम

( 'पेशवाईतील राजपुत्रांचें शिक्षण' या विषयाची या पत्रानें बरीच कल्पना येईल. हें पत्र श्रीमंत गोपिकाबाई ह्यांचें आहे. )

'मी लहान, वडीलीं सर्व-त्याग करून श्रीक्षेत्रीं वास केला आहे, त्यास सर्व माहित वडिलांस, यास्तव कोणे रीतीनें चालावें हें सर्व ल्याहावयास आज्ञा व्हावी.' म्हणोन लिहिलें. त्यास सूर्यग्रहणसंधि अन्वयें कृष्ण पक्ष होऊन लोप जाहला होता, तो हल्लीं पुण्योदयें करून संहार व सुष्टांचें पालग्रहणार्थ तुम्हीं या कुळांत जन्म घेऊन पुरंदर

येथें उदयास आलां; त्यापक्षीं इकडून लिहावयाचें कारण दिसत नाहीं. परंतु मानवी देह आणि तुम्हीं लिहिलें, त्यापेक्षां तूर्त चालावयाचें, जें सुचलें तें लिहिलें आहे. तपसील कलमबंदी—

१. प्रातःकालचे घटका रात्रौ उठोन दिशेस जाऊन पादप्रक्षालन मुखप्रक्षालन करून दिवाणखान्यांतील श्रीमृत्तिका गणपतीचें दर्शन घेऊन प्रातस्मरणाचे श्लोक म्हणावे. नंतर सूर्योदयाबरोबर वैद्यांनीं येऊन हात पहावा. प्रकृतिन्वयें औषध द्यावें. नंतर लिहावयास बसावें. कित्यांत हात फिरवून मग ज्या कागदावर निशाणें व्हावयाचीं असतील तें लिखितान्वयेंच वाचावें.

— कलम १.

१. तालिमखान्यांत जाऊन दंड काढावे. दिवसेंदिवस शक्ति अन्वयें चढते दंड असावे. बरोबर समवयी मुलें पांच चार संभावितांचीं असावीं. जेठी यांनीं कुस्तीचे डाव शिकवावे. नंतर समवयी मुलांसुद्धां प्रकृतीस जो खुराख मानेल तो नेमेंकरून घेत जावा.

— कलम २.

१. स्नान करावयाचे समयीं पंचांग जोशी वाचून संकल्प सांगावा. नंतर गंगाष्टक म्हणावें. संध्या थोडकी, परंतु न बोलतां करावी.

— कलम ३.

१. कचेरीस यावें ते समयीं सर्वांस येऊन योग्यतेनुरूप नेत्रलाभ व भाषण होत असावें. कचेरींत लघु शब्द बोलूं नये. मनुष्यपरीक्षा असावी. गैरवाका एखाद्यानें समजाविलेंस पक्केपणीं विचार करून अपराध ठरल्यास दुसऱ्याकडून त्यास निषिद्ध करवावें. आणि आपण नेत्रकटाक्ष करून पहावें. अपराधानुरूप पारपत्य करावें, परंतु संभावित गृहस्थ बहुत दिवस पदरींचा प्रामाणिक अशानें रदबदली केली असतां क्षमा करावी. दुसऱ्याचें क्षुद्र काढूं नये. येणें करून त्याचा अपमान होतो, आणि तो त्याचे मनांत दंश राहतो, साधल्यानुरूप नाश करील. आणि आपल्यास लघुपणा येईल. थोरपणास हानि होती.

— कलम ४.

१. भोजनाचे पूर्वीं सोवळें जाहलेनंतर थोरल्या देवघरांत जाऊन फुलें घालून, नमस्कार करून, ब्राह्मणांस उदक सोडून, भोजनास बसावें.

—कलम ५.

१. भोजनोत्तर आचमन करून शतपदी करून तांबूल घ्यावा. नंतर दोन घटिका राजविलास खेळ खेळावे.

—कलम ६.

१. शास्त्रीयांजवळ विराटपर्वापासून भारतांतील चिंतनिका करीत असावी; व वृद्ध मनुष्यें पदरचीं बहुत दिवशीं व अन्यत्र शहाणें असतील, त्यांशीं दिल्लीप्रकरणीं व महाराजप्रकरणीं गोष्टी कशा जाहल्या त्या ऐकण्यांत असाव्या.

—कलम ७.

१. खर्डे लिहावयास बसावें. ते समयीं एक दोन मुलें संभावित गृहस्थांचीं बुद्धिमान् पहावयास असावीं. करदन वस्तन ( बेरीज वजावाकी ) गुणाकार भागाकार करावयाचा सराव बहुत असावा.

—कलम ८.

१. लिहिणें जाहलेंनंतर कांहीं उपकार थोडासा मर्जी असल्यास मुलांसमवेत घेऊन करावा. नंतर तांबूल घ्यावा.

—कलम ९.

१. घोडीं फेरावयास चार रोजांनीं जात जावें. दिवाण यांणीं राजकारणाचें वर्तमान व पुढील योजना करावयाचा विचार करून विनंती करीत असावी. त्यासमयीं अन्यत्र कोणी असों नये व त्यांतील अभिप्राय दुसऱ्यापाशीं निघों नये. पदरच्या मनुष्यांचें चालवावयाचें त्यास जिकीर करूं नये.

—कलम १०.

१. तिरंदाजी करावयास जावें.—तेथें बरोबर सरदार व पागे व मानकरी बरोबर असल्यास तीर कोण कसे मारताहेत ध्यानांत असावें.

—कलम ११.

१. दीपदर्शन जाहल्यानंतर संध्येस वस्त्रांतर करून वसावें. संध्या जाहलेनंतर स्तोत्रपाठ म्हणावा. नंतर पुरुषसूक्त अथवा पवमानांतील अध्याय म्हणावे. नंतर भोजनास जावें.

—कलम १२.

१. भोजनोत्तर तांबूल खावयास दिवाणखान्यांत क्षणभर वसून तांवूल घ्यावें. नंतर कार्याकारण मंडळी जवळ असावी. ते समयीं वातमीदार यांणीं वर्तमान गुप्त सांगत असावें. व हरएक वातमीचीं पत्रें आलेलीं पहावयाजोगीं असतील तीं पहावीं. नंतर निद्रेस जावें.

—कलम १३.

एकूण कलमें तेरा लिहिलीं आहेत, तीं ध्यानीं आणोन चालल्यास उपयोगीं पडतील. वहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

( २३ )

खर्ड्याचा तह

( इ. स. १७९५ सालीं मराठ्यांनीं निजामावर शेवटचा मोठा जय मिळावला. लढाई खर्डा येथें झाली. सर्व मराटे सरदार एका दिलानें लढले. नंतर हा तह झाला. )

१. मुलुख हिंदुस्थान व दक्षिण हिंदुस्थानचे पादशहाचे तावे आहेत. पादशाही वंदोवस्त त्याचे अखत्यार, त्याचे तावे दक्षण तालुका जो पातशाही कायदा आहे व तेथून जो अहकाम पोहोंचेल त्याची मुतावत असावी.

दक्षिणेंत विलकुल गोवध न करावा. मुसलमानीचा जो धर्म निमाज, रोजा, वांगसलबात इकरानें खुदापस्ती करावी.

१. हिंदुमुसलमान ईश्वराचे घरचीं, दोन्ही धर्म चालत असतां मुसलमानानें हिंदूचे जाग्यास उपद्रव करावा. हे वेमुनसफी व हिंदूनें आजतागाईत मुसलमानीचे जागे पीर पैगंवर यांसी दुसरी गोष्ट समजण्यांत आणिली नाहीं. तेव्हां मुसलमानानें हिंदूंचे धर्मास खलश करूं नये. आपले चालीनें धर्मावरीं कायम असावें. परस्परें मुजाहीम नसावें.

१. शाहाजादे पातशाही दक्षिणेंत आले त्याचा खर्च येथून निभतो, त्याची जायदाद व मकान नवावांनीं द्यावी...मीररुकनुद्दोले यास नोकरींतून काढावें इ.

( २४ )

## छत्रपति प्रतापसिंह ह्यांचा वाणेदारपणा.

( श्रीशिवछत्रपति महाराजांनीं हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. ते महाराष्ट्राचे पहिले छत्रपति. तें हिंदवी स्वराज्य इ. स. १८४८ सालीं अस्तंगत झालें. शहाजी आप्पासाहेब हे महाराष्ट्राचे शेवटचे छत्रपति. परंतु मराठा राज्य नाहींसें करण्याचे इंग्रजांचे प्रयत्न ह्याच्या अगोदर फार पूर्वीपासून चाललें होते. छत्रपति प्रतापसिंह महाराज हे शेवटच्या छत्रपतीचे थोरले बंधु. ते प्रथम छत्रपति होते. त्यांच्यावर इंग्रजांनीं फितुरीचे आरोप ठेवून त्यांना पदच्युत केलें व शहाजी आप्पासाहेबांना छत्रपति केलें. ह्यासंबंधांत गव्हर्नर कारनॅक व प्रतापसिंह ह्या दोघांचीं बोलणीं झालीं. फितुरीच्या आरोपावर प्रतापसिंह महाराजांनीं कसें वाणेदार उत्तर दिलें हें पुढील भाषणांत दिसतें. )

कारनॅक :—तुमचेकडे फीतुर शाबुद खचीत आहे.

प्रतापसिंह :—तुम्हीं म्हणतां याची चौकसी करावी. उगीच म्हणण्यांत ( फितुर ) कसे लागूं होतील ?

कारनॅक :—चौकसी करण्याची फुरसद नाहीं. चौकसी काय करावयाची ? मुधोजी वावाचीं पत्रें तुम्हांला आमच्या विरुद्ध येत होतीं ना ?

प्रतापसिंह :—तुम्हीं पत्रावर काय म्हणोन वहीम धरतां ? एखाद्यानें एखाद्याचें नांवें पत्र उगीच फितुराचें लिहिलें तर काय तो संबंध आम्हांकडे ? तेव्हां तुम्ही म्हणतां तें कसें लागूं होईल ? बरें, तें पत्र मजला दाखवावें म्हणजे समजेल तरी त्या पत्रांत मुद्दा काय आहे ? वरकड आम्हीं कोणास पत्रें पाठविलींच नाहींत व कोणाचीं उत्तरेंहि आलीं नाहींत.

कारनॅक :— असो, जें जालें तें जालें, परंतु आपण कबूल करावें म्हणजे सर्व पार पडलें.

प्रतापसिंह :—आम्हीं केलेंच नाहीं तें कबूल काय करावें ?

कारनॅक :— आम्ही एक ( आरोपांची ) यादी पाठवितों ती पाहून त्याजवर सही करावी.

प्रतापसिंह :—यादी पाहून सही करावयाजोगी असल्यास सही करूं. आपण आमचें घरीं यावें.

कारनॅक :— तुम्हीं ऐकत नाहीं. सरकारी बखेडा तसाच आहे. तेव्हां आपले महालास येण्यास मी असमर्थ आहें.

( पुढें रेसिडेंटामार्फत यादी पाठविली. त्यांत पांच कलमें होतीं त्यांचीं उत्तरें लौंच महाराजांनीं दिलीं. तीं पुढीलप्रमाणें )

| कलम | उत्तर |
| --- | --- |
| १ रेसिडेंटच्या विचारें कारभार करावा. | १ रेसिडेंटच्या विचारें कारभार करूं. |
| २ फितुरीची माफी करावी. | २ फितूर आम्हीं केलेंच नाहीं तेव्हां काय कबूल करावें ? |
| ३ बाळासाहेबास जवळ ठेवूं नये. | ३ ह्याचें कारण काय तें समजलें पाहिजे. |
| ४ आपासाहेबांस नेमणूक चालवावी. | ४ नेमणूक चालत आलेल्याप्रमाणें चालेल. |
| ५ आमच्याकडे लोक आले आहेत त्याजवर रोष नसावा. त्यांस बहादरी द्यावी. | ५ तुमच्याकडे गेलेले लोकांना नेमणूक देऊं. परंतु त्यांची बहादरी करणार नाहीं. |

प्रतापसिंह :—आम्ही आपल्या मतलबाप्रमाणें एक यादी लिहून तुमचेकडे पाठवितों. त्यावर साहेबांनीं सही करावी.

कारनॅक:—तुम्हीं ऐकत नाहीं हें चांगलें नाहीं. मी जें करीन तें होईल. तुम्हीं न ऐकल्यास राज्यावरून निघाल. ह्याकरतां विचार करून तुम्ही कबूल करावें. म्हणजे तुमचे अवलादीस चांगलें.

प्रतापसिंह:—मजला राज्य काय करावयाचें आहे? ह्याचे मागें काय आम्हास राज्यच होतें? आम्हांस अवलादहि (संततीहि) नाहीं.

(ह्या बाणेदार उत्तरामुळें गव्हर्नरनें प्रतापसिंह छत्रपतीस पदच्युत केलें. ह्या संभाषणाचा काल अदमासें इ. स. १८३९.)

(१)

## सातारचे छत्रपति सत्यनिष्ठ प्रतापसिंह ऊर्फ बुवासाहेब महाराज यांचे तेजस्वी उद्गार.

राज्य जाईल अशी धमकी देतां कशाला? मी कधींच राज्याची हांव धरलेली नाहीं. उघड चौकशीशिवाय केले आरोप मुकाट्यानें मान्य करून राज्यावर रहाण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. जे गुन्हे मीं केलेच नाहींत, त्यांना उघड चौकशीशिवाय, केवळ तुम्ही सांगतां म्हणून, मी मान्यता देऊं? प्राणांतींहि तें शक्य नाहीं, समजलांत? मी कधीं कुणाचें कांहीं वांकडें केलेंच नाहीं तर तुम्हांला किंवा प्रत्यक्ष काळालाहि मी भिणार नाहीं. नुसत्या माझ्या कबुलीच्या सहीसाठीं एवढ्या विणवण्या कशाला करतां नि धाक तरी कशाला देतां? छाती असेल तर करा ना उघड चौकशी...काय वाटेल तें केलेंत तरी असत्यापुढें या प्रतापसिंहाची मान रेसभरसुद्धां वांकणार नाहीं. फायद्याचा किंवा स्वार्थाचा लोभ धरून, मी आपलें चारित्र्य कलंकित करून घेणारा नव्हे.

(२)

## गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंजला दिलेला जबाब

तुम्हीं मला एकादा दुकानदार, महाजन, सावकार, बंगाली बाबू किंवा जमीनदार शेतकरी समजतां? समजतां तरी कोण मला तुम्हीं? मऱ्हाठी स्वराज्य-संस्थापक शिवाजी महाराजांच्या

गादीवरचा त्यांचा खास वंशज आहें मी. त्या स्वराज्यावरील हक्क मी सोडून देऊं म्हणतां? असें करून माझ्या पूर्वजांच्या नांवाला मी तरी कलंक लावणार नाहींच, पण माझा एकहि वंशज तसें करणार नाहीं. तुमच्या अटी मान्य करण्यापेक्षां मी मरण पत्करीन.

( प्रतापसिंह महाराजांना पदच्युत केल्यानंतर वर इंग्रज पार्लमेंटमध्यें दाद मागण्यासाठीं त्यांनीं रंगो बापूजी ह्यांना वकील म्हणून लंडनला रवाना केलें. )

## ( ३ )

## तमाम मऱ्हाठ्यांना लंडनहून मारलेली रंगो बापूजींची निर्वाणीची हांक

...चौकशीची ही माझी शेवटची प्रार्थना जर धुडकावली गेली, तर तुमच्या जबरदस्त पंजाखालीं सांपडलेल्या आशियांतल्या सगळ्या राष्ट्रांना जागृत करण्यासाठीं मी माझ्या कोट्यवधि हिंदी बांधवांच्या नांवानें टाहो फोडून ओरडून सांगेन कीं बापहो, जागे व्हा आणि या आंग्रेजांना नीट ओळखून सावध रहा. ...कोर्ट डरेक्टर्स याचा मतलब नजरेस येतो कीं महाराष्ट्र राज्य बुडवून आपले घरांत घालावें...सारें राज्य आपलें घरांत घ्यावें. हिंदूंचें राज्य बुडवावें आसा क्रम सुरू आहे. परंतु ईश्वर कसें करतो तें पाहावें. समय औरंगजिबियाचा, जसे सर्व हिंदू बुडवावे, तसा आहे. ईश्वर हिंदू राज्यें बुडवील असें घडणार नाहीं. कारण औरंगजीब या क्रमांत मेले. सेवटीं हिंदूलोक राज्येंसुद्धां कायेम आहेत. आसेंच ईश्वर करील असें वाटतें....याजकरितां हिंदू मंडळींतील सर्वत्र दोस्त अगर दुष्मान याणीं पुर्ते दिलांत आणावें आनि हिंदुधर्म संरक्षणावर नजर ठेऊन सर्वत्रांनीं कृपा करून येकदिलानें जसी ज्याचे हाते मदत होईल, त्याप्रमाणें करावें, हें मागणें आहे.... चोराचे टोलीस आबरू गैरआबरू पहाण्याची गरज नसती. कसाहि फायदा झाला म्हणजे झालें. त्याप्रमाणें हे ईष्ट इंडीया कंपनी वनिया व्यापारी यांचे नौकर कोर्ट डरैक्टर्स यांची रीत मारवाडी लोकांप्रमाणें आहे. जबरदस्तः जबरी करिते तरी बेहत्तर. परंतु भरंसा वचनें

देऊन, माणसास करारमदारांत गुंतवून, अखेर तेंच तरकट करून, खोटा टपका, ठेऊन, बुडवून, सर्व आपहारची अिच्छा,........ महाराष्ट्र राज्य बुडवावें, हिंदू धर्म उच्छेद करावा. असा क्रम मनोभाव नजरेस येतो. या लोकांस भ्याले किंवा नरमाअी दाखविली म्हणजे तात्काल गळा कापतात. दूरचे दूर सख्त खरेपणानीं बोलणें जेव्हांच्या तेव्हां जाहलें म्हणजे जबरदस्त लाच्यार होतात. तूर्त राज्य नाहीं, मग नरमाअी व आर्जव कर्णे कशास पाहिजे...... माझें लिहिण्याचा बेभरवसा मानू नका. न जाणें आंदेशा आल्यास, हें लिहिणें खरें किंवा खोटें, हें माझे देहसमाप्ती जाहल्यावर पुढें नजरेस येअील.

( २५ )

## सत्तावन्न सालचा प्रजेचा स्वातंत्र्याप्रीत्यर्थ उठाव

(श्रीशिवाजीमहाराजांनीं स्थापिलेलें हिंदवी स्वराज्य इ. स. १८४८ सालीं शहाजी छत्रपतींच्या कारकीर्दीत अस्त पावलें. त्याच्याहि अगोदर इ. स. १८१८ सालींच शेवटच्या बाजीरावाच्या कारकीर्दीत मराठ्यांच्या सत्तेचा लोप झालाच होता. नंतर सर्व कारभार ईस्ट इंडिया कंपनीकडे आला. आपलें राज्य कोणत्याहि भल्याबुऱ्या मार्गानें वाढविण्याचे उपाय इंग्रजांचे सारखे चाललेच होते. हिंदी राजांचीं राज्यें कोणत्यातरी निमित्तानें आपल्या राज्यांत सामावून घेण्याचा धडाका लॉर्ड डलहौसी ह्यानें चालविला. त्याचा व इतरहि कांहीं कारणांचा परिणाम असा झाला कीं भारतांत प्रजेच्या असंतोषाचा एकदम भडका उडाला.

हाच १८५७ सालचा हिंदी प्रजेचा उठाव. कोणी ह्याला शिपायांचें बंड म्हणतात तर कोणी त्याला स्वातंत्र्ययुद्ध म्हणतात. पण इंग्रजांच्या जुलुमाविरुद्ध लोकांचें हें उत्थापन होतें खरें. ह्यांत कांहीं मराठा व्यक्तींनीं फार मोठी मर्दुमकी दाखविली. त्यांत नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, झांशीची राणी लक्ष्मीबाई ह्या व्यक्ति मुख्य होत. त्यांनीं कानपूर, झांशी, काल्पी वगैरे लढायांत मर्दमुकीची शर्थ केली. दुर्दैवानें हें राष्ट्रीय उत्थापन यशस्वी झालें नाहीं. परंतु इंग्रजांनीं ह्यापासून धडा घेतला. भारताचा कारभार इंग्लंडच्या राणीनें कंपनीकडून आपणांकडे घेतला.)

## (१)

## नानासाहेब पेशव्यांचा जाहीरनामा

१८५७

" काफरांचा सत्यानाश कर व देशाचें रक्षण कर ही परमेश्वराचीच आज्ञा आहे. मशारूल सरंजामदार - जहागिरदर - देशमुखानि जमिनदारानि, दख्खन रयतप्रति श्रीमंत धोंडोपंत नाना पेशवे, पंतप्रधान याहीं कुल रयत जाहीर केलें जे, इंग्रज काफर व्यापाराचे मिसें हिंदुस्तानला आले. नंतर त्यांणीं सरंजामदारांमध्यें फितूर करून, विश्वासघातानें हिंदू व मुसलमानांचीं राज्यें काबीज केलीं. त्यांपैकीं कांहींना त्यांनीं कैद केलें; कांहींना देशोधडीस लावलें. हा त्यांचा प्रकार सर्वांना मालूम आहेच. हे काफर लोक राजे झालेमुळें अत्यंत मग्रूर झाले आहेत. बाह्यात्कारें न्यायाचा देखावा दाखवून त्यांनीं देशाची खराबी केली, मालमत्तेची लूट केली, अन्यायानें कांहींचें आयुष्य बरबाद केलें. लालूच दाखवून प्रजेला धर्म सोडायला लावला, जात सोडायला लावली. सरळ मार्गानें हें न झालें तर त्यांनीं जबरदस्ती केली. गरीब, विश्वासू, पापभीरू प्रजेवर ह्या काफरांनीं जुलूम केला, त्यांचा छळ केला म्हणून परमेश्वराची अशी आज्ञा आहे कीं, काफरांचा मोड करून पुनः हिंदु मुसलमानी राज्यांची स्थापना करावी व देशाचें रक्षण करावें. नर्मदेच्या उत्तरेस मीं हें सर्व घडवून आणलें.

अशा पापी काफरांच्या ताब्यांत राहणें ही नामुष्की आहे. ह्या फर्मानानें आम्हीं असें जाहीर करतों कीं, हें फर्मान वाचतांच प्रजेपैकीं प्रत्येकानें शौर्यानें आपली तरवार उपसावी व काफरांचे बळी घ्यावे. ह्यांत तुमचें धैर्य आहे. ह्यांत तुम्हांस पुण्य आहे.

हे वीरहो, तुमच्या पूर्वजांवर केलेल्या जुलुमांचा सूड घेण्याचा हा चांगला मोका आहे. ही संधि दवडूं नका. दवडली तर दख्खनचे सर्व लोक पापाचे धनी होतील. षंढत्वाचा व मूर्खपणाचा त्यांना कलंक लागेल. इंग्रजांत आज बेदीली निर्माण

झाली आहे. धर्माच्या बेदीलीमुळें ते आपआपसांत झगडूं लागले आहेत, एकमेकांचे गळा धरूं लागले आहेत. फरांसीस व रुसी तर पहिल्यापासून इंग्रेजांविरुद्ध आहेत. हिंदुस्तानच्या बाहेर त्यांना हाकलण्याच्या विचारांत ते आहेत. म्हणून ते गेले तीन महिने आपलीं सैन्यें पेष करीत आहेत. चिन्यांनींहि ह्या काफरांशीं युद्ध पुकारलें आहे. त्यामुळें ते फिकीरींत आहेत. इराणी, अफगाणी, बलुचिस्तानी पठाण झाडून सारे आपल्या बाजूस मदत करण्यास सज्ज आहेत. थोडक्यांत म्हणजे इंग्रजांना ह्या देशांतून समूळ उखडून काढण्यास हीच नामी संधि आहे. हे इंग्रज काफर खोट्या कंड्या काय पिकवतात ! लोकांची दिशाभूल काय करतात ! त्यांनीं म्हणे दिल्ली आमच्या जवळून पुनः काबीज केली. आमचा त्यांनीं म्हणे मोड केला. असल्या त्यांच्या थापांवर कोणीहि विश्वास ठेवूं नये. ह्या वेळेस जर तुम्ही उठला नाहीं तर तुम्ही दंडास पात्र व्हाल, तुमच्या जागिरी जप्त होतील, जमिनी जप्त होतील, तुमची गुजराण जप्त होईल.

अल्लीशान बन्दीगान अल्ली हुजूर दिल्लीचे पातशहा ह्यांच्या हुकुमावरून हें फर्मान जाहीर केलें आहे.

(२)

## नानासाहेब पेशव्याचा इस्तिहारनामा

(२४–४–१८५९)

महाराणी व्हिक्टोरिया, पार्लमेंट, कोर्ट ऑफ डैरेक्टर प्रति-श्रीमंत धोंडोपंत ऊर्फ नाना पेशवे पंतप्रधान याहीं इस्तिहारनामा केला ऐसा जे सर्व हिंदुस्थानचे गुन्हे तुम्हीं माफ केले; खुनी लोकांना तुम्हीं क्षमा केली. बहूत अद्भुत हें कीं तुमच्याच शिपायांनीं तुमचीं बायकामुलें मारलीं. मम्मूरखान आणि फरूकाबाद येथचे मनसबदार हेच खरे खुनी असोन तुम्हीं त्यांना क्षमा केली. जंगबहादुरला तुम्हींच लिहिलें कीं त्यानें आपल्या आश्रयाखालीं बेगमबाया ह्यांना देशीं पाठवावें म्हणून. हे लोकच खरे गुन्हेगार. त्यांना तुम्हीं क्षमा

केली आणि मला तुम्ही शिक्षा करीत आहांत. कारण काय तर मी बंडखोरांना सामील झालों. नाइलाज म्हणूनच बंडखोरांना मला सामील व्हावें लागलें. मी कोणाचाही खून केला नाहीं. व्हीलर साहेबानें मला व माझें कुटुंब ह्यांना धरून छावणींत आणण्यासाठीं विठूरला माणसें जर पाठविलीं नसतीं तर माझें सैन्य बिथरलें नसतें. मीं पूर्वीच तुम्हांस विदित केलें होतें कीं मी मातबर नाहीं. माझें सैन्यहि परकी उत्तरहिंदुस्तानी, माझ्या कह्यांत नसलेलें, असा मी गरीब. माझी तुम्हांला काय मदत होणार? हें माझें म्हणणें व्हीलर (हावला) साहेबांनीं मानिलें नाहीं. व मला छावणींत बोलाविलें. तुमचेंच सैन्य बिथरलें, उठलें, त्यांनीं खजिना लुटला, त्यांत माझें सैन्यहि त्यांना सामील झालें. तेव्हां मीं विचार केला कीं जर आतां इंग्रजांच्या छावणींत गेलों तर मी दुहेरी संकटांत सांपडेन. इकडे माझें सैन्य माझ्या कुटुंबाचा निःपात करील व तिकडे माझ्या सैन्यानें बंड केलें म्हणून इंग्रजहि माझा निःपात करतील. म्हणून आपणच आपला जीव घ्यावा असें मीं ठरविलें. माझ्या सैन्यानें फार विनवण्या केल्या कीं मी त्यांना सामील व्हावें. मी गेलीं दोन तीन वर्षें सरकारला अर्जविनंत्या करतों आहें. परंतु त्याची सरकारनें दाद घेतली नाहीं. कानपूर येथें माझ्या सैन्यानें माझे हुकूम पाळले नाहींत. त्यांनीं इंग्रज प्रजा व स्त्रिया ठार केल्या. त्यांना वांचविणें जेवढें मला शक्य होतें तेवढें मी केलें. त्यांना नावा दिल्या व अलाहाबादेस रवाना केलें. अशा रीतीनें बंडवाल्यांशीं रदबदली करून दोनशें तरी लोक मी वांचविले, ह्या माणसांची पुढें तुमच्याच बदमाश बंडखोर शिपायांनीं कत्तल केली असें मला कळलें. त्यांत माझ्या बंधूहि जखमी झाला.

नंतर तुम्हीं जाहीरनामा काढला व माझ्याशीं युद्ध पुकारलें. तेव्हांपासून मी तुमच्याशीं लढतों आहें व असाच सारखा लढतहि राहीन. प्राणांत प्राण आहे तों मी लढेन. तुम्हीं हें जाणतां की मी खुनी नाहीं. मी गुन्हेगार नाहीं. माझ्यावर तुम्हीं हुकूमहि कांहीं काढला नाहीं. माझ्याशिवाय तुम्हांला दुसरा शत्रु नाहीं. मी

तुमच्याशीं लढतच राहणार, तुमच्यापासून मी दोनच कोसांवर जवळच आहें. तरी पण आज दोन वर्षे तुम्हीं मला कांहीं करूं शकलां नाहीं. विशेष हें कीं मजजवळ राज्य नाहीं, सैन्य नाहीं. जें आहे तें माझे हुकूम पाळीत नाहीं. नेपाळचा राजाहि तुमचाच दोस्त. इतकें असूनहि तुम्हीं आजवर कांहींच करूं शकलां नाहीं! मी एकटाच आहें. दोन वर्षे मी काय काय केलें हें तुम्हीं जाणतां. पुनः आपण रणांगणातच भेटूं. तुमच्या रक्ताच्या नद्या वहातील. गुढघ्याइतका लोंढा वाहील. मी तर प्राणावर उदार झालोंच आहें. मी एकटा परंतु बलाढ्य इंग्रजांचा शत्रु म्हणून उभा आहें. त्यांतच मला समाधान आहे. मृत्यु हा कधींतरी येणारच. मला भय तें कसलें? जे लोक आज तुमचे म्हणून आहेत तेच तुमच्यावर उलटतील आणि तुम्हांला ठार करतील. तुम्हीं जाणते आहांत. पण त्या जाणतेपणांतच तुम्हीं चुका करतां. योग्य वाटलें तर मला उत्तर लिहा. शहाणा शत्रु मूर्ख मित्रापेक्षां कितीतरी चांगला!

—सेन, '१८५७'

## (३)

## नानासाहेवांचें दुसरें एक पत्र

(२६–४–१८५९)

दुसऱ्या कोणाचा शब्द मी मानणार नाहीं. दुसऱ्या कोणासहि मी नमणार नाहीं. खुद्द राणीचें पत्र, सहीशिक्क्यानिशीं आणि तेंहि फरांसीस सेनापतीमार्फत मजकडे आलें, तर त्याच्यावर विश्वास ठेवून मी त्याचा विचार करीन. हिंदुस्तानांत आजवर तुम्हीं केलेली दगाबाजी मी ओळखत नाहीं का? देशाचे व देशांतील प्रजेचे हाल वांचवावे अशी जर तुमची इच्छा असेल तर खुद्द राणीच्या सहीचें शिक्क्याचें पत्र आणवा व फरांसीस सेनापतीबरोबर पाठवा. पूर्वी लंदनला मी माझा वकील पाठविला त्यावेळीं राणीनें असा खलिता दिला होता. हाच एक उपाय आहे. मृत्यु कधीं तरी येणारच. तर मी अपमानानें कां मरावें! माझ्या

जिवांत जीव आहे तोंपर्यंत मी तुमच्याशीं लढणारच. मी मारला जावो, पकडला जावो, फांशीं दिला जावो. मी जें जें करीन तें तरवारीनेंच करीन. योग्य वाटत असेल तर मी सांगतों तसें राणीचें पत्र येऊं द्या. मी अवश्य विचारांत घेईन.

—सेन, '१८५७'

( ४ )

( तात्या टोपे हे सत्तावन्नच्या युद्धांत नानासाहेबांचे सेनापति होते. ह्यांचें मूळ नांव रघुनाथ पांडुरंग टोपे. ह्यांचा जन्म १८१४ सालचा. ब्रह्मावर्तास दुसऱ्या बाजीरावाच्या परिवारांत ते होते. तेथेंच त्यांनीं नानासाहेब पेशवे, राणी लक्ष्मीबाई ह्यांच्या समवेत युद्धकला आत्मसात् करून घेतली. युद्धांत दुर्दैवानें त्यांना अपयश आलें. पुढें ते पकडले गेले. त्यांच्यावर खटला झाला. त्यांना इंग्रजांनीं फांशीची शिक्षा दिली. व ती १८ एप्रिल १८५९ रोजीं अमलांत आली. )

### फांशी जाण्याचे वेळचे तात्या टोपे ह्यांचे तेजस्वी उद्‌गार

मला पूर्णपणें माहीत आहे कीं, इंग्रजांविरुद्ध लढल्याबद्दल मला मरणास सिद्ध राहिलें पाहिजे. मला कोणतेंहि न्यायालय नको आणि ह्या खटल्यांत भाग घेण्याची माझी इच्छा नाहीं. मी जें जें कांहीं केलें तें माझ्या धन्याच्या आज्ञेवरूनच होय. काल्पीपर्यंत मी नानासाहेबांच्या आज्ञेखालीं होतों आणि नंतर रावसाहेबांच्या. कोणत्याहि युरोपियनाच्या वधाशीं माझा कांहींहि संबंध नव्हता. ह्यापेक्षां मला कांहींहि सांगावयाचें नाहीं. ग्वाल्हेर येथील माझ्या कुटुंबियांचा माझ्या कोणत्याहि अपराधांत कांहीं भाग नसल्यामुळें त्यांना किंवा माझ्या वृद्ध पित्याला कांहींहि त्रास देऊं नये. फांशीच्या तख्तावरून किंवा तोफेच्या तोंडावरून, पण माझी या दुःस्थितींतून आणि बंधनांतून लवकर सुटका व्हावी इतकीच माझी इच्छा आहे.

—तात्या टोपे

( ५ )

### सेनापति म्हणून तात्या टोपे ह्यांची थोरवी.

बंडांत भाग घेणाऱ्या बंडखोरांच्या पुढाऱ्यांत योजनाचातुर्यांत

तात्याच सर्वांत अधिक साहसी आणि वृत्तीनें अधिक कणखर निश्चयाचे होते, ह्यांत कांहीं शंकाच नाहीं. त्यांचें संघटना-कौशल्यहि वाखाणण्यासारखें होतें! पेशव्यांचें सैन्य उभारण्यांत त्यांनीं केवढी बुद्धिमत्ता दाखविली ह्याची तुम्हांला कल्पना नाहीं. वेढ्याची फळी फोडण्यासाठीं लागणारे सर्व गुण त्यांच्याजवळ होते. आपल्या जवळच्या युद्धसरंजामाची त्यांना पूर्ण कल्पना असे.

—सर ह्यू रोज,–इंग्रज सेनापति.

( २६ )

( भारताच्या स्वातंत्र्याप्रीत्यर्थ सत्तावन्न सालीं पहिला उठाव झाला. तो भारतीय होता. त्याचे सेनापति नानासाहेब पेशवे, तात्या टोपे व झांशीच्या राणी लक्ष्मीबाई ही मंडळी होती. त्याच्यानंतर महाराष्ट्रांत दुसरा उठाव इ. स. १८७९ सालीं महाशिवरात्रीच्या शुभमुहूर्तावर झाला. ह्याचें नेतृत्व वासुदेव बळवंत फडके ह्यांच्याकडे होतें. फडके घराणें हें मूळ कुलाबा जिल्ह्यांतील शिरढोणचें. वासुदेव बळवंतांचा जन्म ४ नोव्हेंबर १८४५ रोजीं झाला. त्यांनीं प्रजेच्या हिताप्रीत्यर्थ व भारताच्या स्वातंत्र्याप्रीत्यर्थ इंग्रजांविरुद्ध बंड पुकारलें. दुर्दैवानें त्यांना अपयश आलें. त्यांच्यावर खटला झाला. त्यांना जन्मठेपीची शिक्षा झाली. एडनच्या तुरुंगांत भारतीय स्वातंत्र्यार्थ लढलेल्या ह्या क्रांतिकारक देशभक्तानें १७ फेब्रुवारी १८८३ ह्या दिवशीं आपला देह ठेवला. त्याचें निवेदन पुढें दिलें आहे. )

( १ )

**मीं सशस्त्र बंड कां पुकारलें?**

जे गरीब लोक उपासमारीनें मरत होते, त्यांना मीं वांचवूं कसा शकेन ह्याची कित्येक वर्षें मला चिंता लागून राहिलेली होती. ज्या भूमीचे पोटीं आपण जन्मलों तिच्याच पोटीं हीं सर्व लेकरें झालीं. त्यांनीं अन्नावांचून उपाशी मरावें आणि आपण कुत्र्याप्रमाणें पोट भरीत राहावें हें मला पाहवलें नाहीं. आणि म्हणून ब्रिटिश सरकाराविरुद्ध मीं सशस्त्र बंड पुकारलें!

( २ )

**वासुदेव बळवंतांनीं न्यायमूर्तीपुढें केलेलें तेजस्वी निवेदन**

हिंदुस्थान देशांतील लोक ब्रिटिश राज्याखालीं उपासमारीनें

मृत्युपंथाला लागलेले आहेत. ब्रिटिशांचे वरकरणी मार्ग औदार्याचे परंतु आंत पाहिलें तर विश्वासघातकीपणाचे आहेत.

एका हिंदी माणसाला कोठें एकादी मोठी जागा द्यावयाची आणि लागलीच डांगोरा पिटावयाचा कीं हिंदी माणसांना मोठ्या जागा मिळत आहेत. हिंदुस्थानांत तयार होणारा माल बाजारांत येऊं लागला मात्र, लागलीच कलकत्त्याच्या व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळांत पांच हजार रुपयांच्या पगाराची नवी जागा निर्माण करण्यांत आली आणि त्या जागेवर युरोपीयनाची नेमणूक करण्यांत आली. त्या नवीन अधिकाऱ्यानें केलें काय? तर त्यानें आयात होणाऱ्या इंग्लिश मालावरची जकात लागलीच रद्द केली! नुकतेच येथील चौदा जिल्ह्यांचे एकवीस जिल्हे करण्यांत आले; म्हणजे सहाजिकच प्रत्येकीं दोन दोन हजार रुपये पगाराचे सात नवे युरोपियन कलेक्टर आणि सात नवे युरोपियन न्यायाधीश वाढले! हिंदुस्थानांतील सैन्यांत सांवलीत बसून नोकरी करणाऱ्या युरोपियनांसहि मोठा पगार आणि ग्रॅच्युइटी देण्यांत येते! युरोपियन लोकांस हिंदुस्थानांतील लोकांपेक्षां ह्याप्रमाणें लाखों रुपये जास्त दिले जातात. हा सगळा पैसा कोणाचा? इंग्रजांच्या बापाचा काय? दुष्काळांत त्यांनीं कामें उघडलीं. पण प्रत्येकाला मजुरी दिली दीड आणा रोज! असें करणें म्हणजे तोंडानें सांगायचें खा म्हणून, पण हातांनीं म्हणायचें तसें केलेंस तर मारीन! अशा फसवेगिरीचीं हजारों उदाहरणें देतां येतील; पण आमच्यापैकीं एकालाहि ही फसवणूक नीट कळलेली नाहीं. ह्यांचा उद्देशच मुळीं, पैसा गोळा करावयाचा, हा देश वसाहत म्हणून बनवावयाचा आणि आमचा धर्म नष्ट करून टाकावयाचा हा आहे.

या आणि इतर हजारों गोष्टींचा विचार करतां करतां माझें मन इंग्रजांच्या नाशाविषयीं उद्युक्त होऊन गेलें. मला दुसरा कसलाहि विचार सुचत नव्हता. सकाळपासून संध्याकाळपर्यंत, मी शौचास

गेलों असतां कर्म करीत असतां, जेवीत असतां, आणि झोंपेंतहि आणि कधीं कधीं प्रहर अन् प्रहर त्या विचारामुळें मला झोंपहि आली नाहीं. मी त्याच गोष्टीचा विचार करीत बसें. मध्यरात्रींच्या अंधकारांतहि मी उठत असें आणि ब्रिटिश सरकारचा उच्छेद कसा करतां येईल ह्याचा विचार करीत किती वेळपर्यंत तरी बसत असें ! ह्या विचारानें मी अगदीं वेडा होऊन गेलों होतों.

अशा आपत्तींत उपासमारीनें जे गरीब लोक मरत आहेत आणि ज्यांच्या हाडांचे सांपळे राहिले आहेत, त्यांना मी कसा वाचवूं शकेल ह्याचा कित्येक वर्षे मी विचार करीत आलों आहें ? त्याकामीं माझी पै न् पै मी खर्चून टाकलेली आहे ! त्यासाठींच श्री शैल मल्लिकार्जुनीं आणि दुसऱ्या ठिकाणीं तपश्चर्येसाठीं गेलों होतों आणि तेथून परत आल्यावर माझें उद्दिष्ट साध्य झालें नाहीं तर त्यासाठीं स्वतःच मरून जावयाचें मी ठरविलें.

लोक दुःखांनीं गांजले आहेत ! तेव्हां मी म्हटलें, सुरुवात करून तर पाहूं; कदाचित् यश येईल ! आमचा द्वेष केला जातो ! ही गोष्ट आम्हां हिंदू आणि मुसलमान या दोघांनाहि लांछनास्पद आहे ! अशा स्थितींत जगण्यापेक्षां आम्हीं सर्वजण मरून गेलों असतों तर फार चांगलें झालें असतें !

मीं बंदुक उडविण्यास शिकलों. घोडदौड करण्यास, तरवार फिरविण्यास आणि भाला नि निशाण मारण्यास शिकलों. हत्यारांचा मला फार षोक. नित्य दोन तीन बंदुका, पांच चार तरवारी, पट्टे, भाले माझ्यापाशीं असत.

कित्येकदां सुटी घेऊन नाशिक, अहमदनगर, खानदेश, उज्जयिनी, वडोदा, कोल्हापूर, मिरज वगैरे शेंकडों ठिकाणचा मीं पायीं प्रवास केला. आणि भिल्ल, कोळी आणि रामोशी ह्यांना ब्रिटिश राज्याविरुद्ध उठविण्यासाठीं मीं प्रयत्न केला. कांहीं संस्थानांतील लोकांना माझ्या प्रयत्नांत मी सहभागी करून घेतलें. भोंवतालच्या रामोशांशीं मी संबंध प्रस्थापित केले. मी त्यांना पागोटीं बांधलीं; दारू पाजली आणि ब्रिटिशांविरुद्ध बंड करण्यास तयार केलें.

माझा देशाभिमान अतिशय जाज्वल्य होता. ईश्वराला माझी हीच प्रार्थना होती कीं, त्यानें माझे प्राण घ्यावे! पण माझ्या देशबांधवांना सुखी करावें! मी पुणें, पळस्पे, पनवेल येथें व्याख्यानें दिलीं. तीं कितीकांजवळ असतील! पण उपयोग झाला नाहीं! आम्हीं मूर्ख आहोंत! आम्हांला त्वरित फायदा पाहिजे! पण त्यासाठीं त्याग करायला नको.

ज्या भूमीचे पोटीं आपण जन्मलों तिच्याच पोटीं हीं सारीं लेकरें झालीं. त्यांनीं अन्नान्न करीत उपाशी मरावें, हा देश अमेरिकेप्रमाणें ब्रिटिशांची वसाहत व्हावी आणि आपण कुत्र्याप्रमाणें स्वतःचें पोट भरीत रहावें हें माझ्याच्यानें पाहवलें नाहीं! आणि म्हणून मी ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र बंड पुकारलें! कांहींहि भीति न बाळगतां मी शेवटीं नोकरीवर लाथ मारली! आणि स्वराज्यासाठीं लूट मारून पैसे मिळविण्याचें ठरविलें. त्या पैशांनीं मला वाटलें कीं, मला माणसें नोकरीस ठेवतां येतील, त्यांच्या, लढाऊ टोळ्या निर्माण करतां येतील आणि कामास प्रारंभ होईल. लहान मूल जन्मतांच कांहीं मोठ्या माणसाचीं कामें करूं शकत नाहीं! तें तसें करायला लागायला कित्येक वर्षें मध्यें जावीं लागतात. तेव्हां चांगल्या पायावर उभारलेलें लहानसें बंड उभारून शेवटीं राज्य परत कां मिळूं नये? अशा सर्व गोष्टींचा सूक्ष्मपणें विचार करून माझें सैन्य घेऊन मीं काम सुरू केलें.

पुण्याचा खजिना लुटण्याची माझी सर्व योजना पुरी झाली होती. पण आयत्या वेळेला एका मुसलमानानें ती बाहेर फोडली. त्यामुळें तो बेत मला सोडून द्यावा लागला. त्यानेंच–त्यानेंच सर्व हिंदुस्थानचा घात केला!

नंतर आम्हीं धामारी लुटली. वाल्हें आणि इतर कित्येक गांवीं लुटी मारल्या. पण चांदखेडनंतर माझ्या असें लक्षांत आलें, कीं रामोशी लोक सर्वच्या सर्व लूट परत करीत नाहींत. त्यांच्या हातून माझें उद्दिष्ट सफल होणार नाहीं असें मला वाटूं लागलें. त्या

वेळीं माझ्या अंगांत ताप होता. आणि तो किती दिवस टिकेल तें सांगतां येत नव्हतें. त्यामुळें रामोशांचा नाद सोडून मी शैल मल्लिकार्जुनीं गेलों.

माझ्या हातांत भरपूर पैसा आल्यावर मीं माझीं माणसें दोन दोन महिने आधीं पाठवून देशाच्या चारी कोपऱ्यांत बंडें करविलीं असतीं; एकाच वेळीं असा भडका उडता तर युरोपियन लोकांत भीतीचा वायुगोळा उठला असता! त्यामुळें पुढें डाका बंद झाल्या असत्या! रेल्वे मार्ग उखडले गेले असते! तारांचे खांब उपटले जाऊन तारायंत्रें मोडून पडलीं असतीं! आणि सर्व दळणवळण पार थंडावलें असतें; असें झालें असतें म्हणजे तुरुंग फोडण्यास संधी मिळाली असती. तुरुंगांतील मोठ्या ठेपीचे कैदी तरी आम्हांलाच येऊन मिळाले असते. कारण ब्रिटिश राज्य पुन्हां प्रस्थापित झालें तर ते पुन्हां पकडले गेले असते, ही भीति त्यांना असती! त्यानंतर सरकारी खजिने लुटतां आले असते! आमचें सामर्थ्य किती, आम्हीं कितीजण कोठें आहोंत इत्यादींचा -कांहींच पत्ता न लागल्यामुळें हजारों अडाणी लोक आम्हांला येऊन मिळाले असते आणि सर्वत्र एकच चमत्कार व्हावा त्याप्रमाणें होऊन माझें जें उद्दिष्ट प्रजासत्ताक राज्याची स्थापना तें पूर्णपणें सिद्धीस गेलें असतें. मग आकाशांतील बापानेंच खालीं उतरून इंग्रजांना वांचविलें असतें तर कोणास माहीत!

पण हें होऊं शकलें नाहीं. शेवटीं मला यश आलें नाहीं! मी अयशस्वी झालों! पण ईश्वरालाच माहीत आहे कीं मी हें सर्व देशासाठीं केलें! अहो, हिंदुस्थानवासी लोकहो, माझ्यामुळें तुम्हांला कांहीं सुद्धां लाभ झाला नाहीं. मी माझें उद्दिष्ट साध्य करूं शकलों नाहीं! त्या विषयीं मला क्षमा करा!

—वासुदेव बळवंतांचें निवेदन

(२७)

(इ. स. १८९६–९७ सालीं महाराष्ट्रांत प्लेग व दुष्काळ ह्यामुळें भयंकर कहर झाला. त्यांत लोकांचे फार हाल झाले. त्यांतच इंग्रज सोजिरांनीं लोकांचा अतोनात

छळ केला. प्लेगासाठीं स्थानत्याग करावयाला लावायचें ह्या सरकारी हुकुमाखालीं लोकांना त्यांनीं घराबाहेर काय काढलें, त्यांची चीजवस्त काय लुटली, अपमान काय केले ह्याला पार राहिला नाहीं. त्याचाच परिणाम म्हणून मुख्य जबाबदार अधिकारी रँड व आयर्स्ट ह्यांचे खून झाले. ते चाफेकरबंधूंनीं केले. लोकमान्य टिळकांच्यावरहि राजद्रोहाचा खटला होऊन त्यांना शिक्षा झाली. ह्या आंदोलना-संबंधीं कांहीं उतारे पुढें दिले आहेत.)

(१)

' पुण्यांत प्लेगच्या अमदानींत सोजीर लोकांनीं केलेले अत्याचार पाहून मला त्वेष आला व त्यांचा मुख्य अधिकारी रँड साहेब याला मारून सूड उगाविण्याचा मीच निश्चय केला. बंदुकी मिळविल्या, दारूगोळा मिळविला. पिस्तुलें व तरवारी घेतल्या. रँड साहेबाला मारण्याचे प्रयत्न असे तसे फसले. शेवटीं जुबिलीच्या दिवशीं दिवसभर ईश्वरप्रार्थना करून व हत्यारें बरोबर घेऊन मी व माझा भाऊ बाळकृष्ण असे गणेशखिंड रस्त्यावर गेलों. मीं रँड साहेबाला गोळी घातली. व बाळकृष्णानें लेफ्टनंट आयर्स्ट याला मारलें. व हत्यारें नाल्यावरील पुलाखालीं झांकून ठेवून आम्हीं कालव्याच्या रस्त्यानें परत आलों. दुसरे दिवशीं विहिरींत हत्यारें टाकून देऊन ता. २४ जून रोजीं मुंबईस निघून आलों व फिरून कीर्तनें करूं लागलों.

— दामोदर हरी चाफेकर ह्यांचा जबाब

(२)

## फांशी ना ती यज्ञवेदिका

हांगकांगहुनि ठिणगी उडोनि गांठी अवचित मुंबईला ॥ अपूर्व अवचित अघोर रूपें प्लेगहुताशन संचरला ॥१॥ हाय! बाप! हा! अरेरे! करी गाजि। अगाजि नर महिला ॥ भयाण शब्दश्रवणें शेषहि टाकूं पाही धृत महिला ॥२॥ भारतभूचें कुंकुम केलिस स्वतंत्रता जिथ पावतसे ॥ धन्य अशा श्रीपुण्यपत्तना पहावया हा धांवतसे ॥३॥ हां हां म्हणतां क्षणाभीतरीं असंख्य गवसति

काळ करीं ॥ उदास दुःखित जनांस छळुनी न्यायाची पर राळ करी ॥४॥ प्रेताजवळीं गिधाड धडके तसा त्वरेनें धांवतसे ॥ भूतावलीसमान मृतालयातें सोजिरगण हा पावतसे ॥५॥ क्रौर्यें उद्धत शुद्ध भैरवाचि मद्यधुंदिनें धुंद सदा ॥ आप्तवियोगें युक्तजनातें सक्त भाषणें छळति तदा ॥६॥ प्लेग मृतातें असो वा नसो वसोंचि परि धनि अटकावी ॥ शिरा घरामधिं करा लूट हो कोण तुम्हाला हटकावी ॥७॥ हाल हाल बहुकाल करोनि चार मांडिले हवे तसे ॥ छळुनि सोडिली सकल प्रजा मग 'खून' पडे हें नवल नसे ॥८॥ लालभडक ते नेत्र बंधुवर बाळकृष्ण दे धीर मना ॥ श्री दामोदर सिद्ध जाहला जायालागीं खलदमना ॥९॥ कान्ता वदली ॥ 'कान्ता जातां देशहिताला करावया ॥ पतिराया द्या निरोप जावें त्वरित कीर्तिला वरावया' ॥ १० ॥ पवन जवन परि मागें सारित 'गणेशखिंडि' प्रति आला ॥ कालासम मग समय साधितो घालायाला तो घाला ॥ ११ ॥ भक्ष्य रँड बहु मस्त देखता सिंह धांवला वगीकडे ॥ गोळी सुटली गडबड मिटली दुष्ट नराधम चीत पडे ॥ १२ ॥ न्याय–नाटकीं थाट उडाला वाट ना मिळे रतिभर ती ॥ मूर्ति मनोहर अवलोकुनिया जनकुतूहला ये भरती ॥ १३ ॥ चकित टकमकीं सर्व पाहती धंन्यचि छाती मग म्हणती ॥ कुणी धाडसी, कुणी पिसे वा कुणी वीरवर त्या गणती ॥ १४ ॥ फांशी चढती प्राणपाखरूं देह पिंजऱ्यांतुनी उडे ॥ वीर कृतीनें राष्ट्रामाजी पराक्रमाचें तेज चढे ॥ १५ ॥ फांशी ना ती यज्ञवेदिका रक्तें न्हाली जी तुमच्या ॥ सांडुनि होवो त्याचि राष्ट्ररणीं सार्थक रक्ताचें अमुच्या ॥ १६ ॥

— स्वातंत्र्यवीर सावरकर 'चाफेकर.'

## ( २८ )

## अभिनव भारताची सांगता

( इ. स. १९०७ सालीं 'अभिनवभारत' ही क्रांतिकारक गुप्त संघटना वीर सावरकरांनीं स्वातंत्र्य मिळविण्याच्या उद्देशानें स्थापन केली. ह्या संस्थेचे वीर सावरकर, त्यांचे दोघे बंधु गणपतराव व नारायणराव, कवि गोविंद, डॉ. भट,

वामनराव दातार, महाबळ, केळकर वगैरे मंडळी सदस्य होती. ह्या संस्थेनें व तदन्तर्गत 'मित्रमेळा' ह्या संस्थेनें देशोत्थापनाचें पुष्कळ कार्य केलें. अन्यायाची चीड म्हणून श्री. कान्हेरे ह्यांनीं जॅक्सन कलेक्टरचा खून केला. धरपकड झाली. कान्हेरे ह्यांना फांशीची शिक्षा झाली. वीर सावरकर ह्यांना जन्मठेपीची शिक्षा झाली. पुढें हिंदुस्थान इंग्रजांच्या पाशांतून मुक्त झाल्यावर त्या संस्थेचें ध्येय प्राप्त झालें म्हणून त्या संस्थेची सांगता करण्याच्या उद्देशानें पुणें येथें १९५२ मध्यें 'अभिनव भारताचा' सांगतासमारंभ करण्यांत आला. त्यावेळीं वीर सावरकरांनीं जें भाषण केलें त्यांतील पुढील उतारा आहे.)

(१)

**अभिनव भारताची आणि इतर बहुतेक गुप्तक्रांतिकारक संस्थांची ही गुप्त प्रतिज्ञा ही होती कीं 'ब्रिटिशांच्या राजकीय दास्यांतून भारताची मुक्तता करण्यास्तव आणि आमच्या मातृभूमीस स्वतंत्र करण्यास्तव आम्ही शस्त्र उपसून सर्व साधनांसह समरांत प्राणान्तापर्यंत लढत राहूं. ह्या प्रतिज्ञेच्या श्रद्धार्थ त्याकाळीं जिथें जिथें प्रकटपणें संघटना करणें अशक्य होतें, तिथें तिथें वरील संस्थांप्रमाणें गुप्त संघटना उभारणें भाग पडलें. पण आतां आपणा भारतीयांच्या पराक्रमानें आपण ती प्रतिज्ञा खरी करून दाखविली आहे. आज तरी सारें हिंदुस्थान ब्रिटिशांच्या पदरांतून मुक्त झालेलें आहे. अभिनव भारताची मूळ प्रतिज्ञा भारतावरील ब्रिटिश राज्य उलथून टाकण्याची होती. ती आज पूर्ण झाली आहे...पुन्हां हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, मिळविलेल्या अशा महान् विजयाचें आणि व्रतपूर्तीचे जे असे अुत्सव किंवा सांगतासमारंभ म्हणजे पुढें जें मिळवायचे असतात, त्या राष्ट्रीय विजयांचे व उरलेल्या राष्ट्रकार्यांच्या पूर्ततेचे संकल्पसमारंभहि असतात.**

—वीर सावरकर, व्याख्यान.

(२)

(वीर सावरकर ह्यांनीं बक्स्टन जेलमधून पॅरिस येथील मित्रांस लिहिलेलें पत्र.)

**मित्रांनो, ईश्वरानें आपल्यापैकीं प्रत्येकाची भूमिका ठरवून टाकली आहे. आपण प्रत्येकानें आपली भूमिका वठवावी ह्यासाठीं**

आपली ताटातूट होत आहे. ईश्वरानें नेमून दिलेली भूमिका वठवीत असतांना प्रसंगीं जळत्या खडकांना बांधून कोंडून पडावें लागेल. प्रसंगीं किर्तीच्या उसळणाऱ्या लाटांच्या शिखरावर स्वार होतां येईल. कधीं आपण लोकांना दिसूं तर कधीं अदृश्य राहूं. कधीं आपण अवनत होऊं तर क्वचित् उन्नत होऊं. जगन्नियंत्यानें कोणत्याहि परिस्थितींत ठेवलें तरी ती परिस्थिति सर्वोत्तम आहे, असें मानून, आपण असें समजलें पाहिजे कीं, आपलें जीवितकार्य पार पाडणें हेंच आपल्या वांट्याचें कार्य आहे.

एखाद्या उदात्त पौर्वात्य नाटकांत भरतवाक्याच्या वेळीं नाटकांत मेलेलीं व न मेलेलीं सर्व पात्रें एकत्र जमतात. आपण सगळे इतिहासाच्या अफाट रंगमंदिरांतील असंख्य नटच आहोंत. आपल्या कृतीची प्रशंसा करणारे मानवजातीरूपी प्रेक्षक टाळ्या वाजविण्यासाठीं आपल्या समोर बसलेले आहेत. हे प्रेक्षक कृतज्ञ व आनंदी बनून जोरजोरानें टाळ्या वाजवितील तेव्हां त्या टाळ्यांचा गरजणारा आवाज दऱ्याखोऱ्यापर्यंत जाऊन दुमदुमेल.

प्रेमळ मित्रांनो ! तो क्षण येईपर्यंत रामराम—

माझा देहपात होऊन माझ्या अस्थि आणि रक्षा कोठें पडतील ह्याचा नेम नाहीं. अंदमानचें वातावरण आधींच निर्जन व भेसूर आहे. तेथें वाहणाऱ्या नदीनाल्यांचा उदासवाणा आवाज तेथील मूळच्या निर्जनपणाला अधिकच भेसूर बनवीत असतो. कदाचित् माझ्या अस्थि नि रक्षा त्या उदास नदीनाल्यांच्या जवळ पडून राहतील किंवा असेंहि घडेल कीं मध्यरात्रीं आपला नियत खेळ आकाशांत खेळणाऱ्या तारकांचें प्रतिबिंब पोटांत सामावून घेणाऱ्या गंगा-मातेच्या स्फटिकशुद्ध प्रवाहाच्या शेजारीं कोठें तरी माझ्या अस्थि नि रक्षा पडून रहतील. त्या कोठेंहि पडलेल्या असोत. श्रीरामानें आपल्या आवडत्या लोकांचा पक्ष विजयधवल ठरविला आहे. दुष्टांना माघार घ्यावी लागली आहे आणि त्यांचा पाय जेथून पुढें पडला तेथवर त्यांना मागें हटविण्यांत आलें आहे. आपला हा भारत-

**वर्ष वैभवांत उभा आहे, मानवजातीचें मार्गदर्शन करणारा दीपस्तंभ म्हणून यापुढें तो तेजस्वितेनें तळपत राहील, असा पुकारा झाला आणि हौतात्म्य गाजविणाऱ्या विचारवीरांनो नि कृतिवीरांनो, तुम्हीं ज्या संग्रामांत लढलांत आणि पडलांत तो संग्राम यशस्वी झाला; उठा !' अशीं घोषणा झाली कीं त्यावेळीं त्या पडून राहिलेल्या अस्थि आणि ती पडून राहिलेली रक्षा यांच्यांत फिरून तेज आणि चैतन्य सळसळूं लागेल. तोंवर प्रिय मित्रांनो रामराम ! रामराम !**

( २९ )

( लोकमान्य बाळ गंगाधर टिळक ह्यांचें सर्व आयुष्य देशसेवेंतें गेलें. त्यांनीं केसरी व मराठा हीं नियतकालिकें सुरू करून मोठ्या तेजस्वितेनें चालविलीं. त्याच्या लेखांवरून त्यांना राजद्रोहाच्या गुन्ह्यांखालीं तीन वेळां कारावास सोसावा लागला. शेवटच्या प्रदीर्घ शिक्षेंतून मुक्त झाल्यानंतर त्यांनीं 'होमरूल'ची चळवळ केली. त्यांना ब्रिटिशांच्या विरुद्ध भारतीयांच्या असंतोषाचे जनक म्हणतात. त्यांनीं भारतास 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवीनच' हा मंत्र दिला. राजद्रोहाच्या शेवटच्या खटल्याच्या शेवटीं त्यांनीं काढलेले उद्गार पुढें दिले आहेत. )

( १ )

## लो. टिळकांचे अमर उद्गार

**"ज्यूरीनें मला दोषी ठरविलें तर खुशाल ठरवो. पण मी निश्चयपूर्वक सांगतों कीं मी गुन्हेगार नाहीं. लौकिक गोष्टींचें नियंत्रण करणारी अशीहि एक शक्ति न्यायपीठाहूनहि वरिष्ठ आहे. कदाचित् ईश्वराची इच्छाच असेल कीं मला शिक्षा व्हावी आणि शिक्षा भोगल्यानेंच मी अंगीकारिलेल्या कार्याला यश प्राप्त होईल."**

— १९०८ चा खटला.

( ३० )

( येथपर्यंत मराठ्यांच्या आजवरच्या इतिहासांतील मुख्य मुख्य ज्या अत्यंत निर्णयात्मक अशा बाबी त्या मांडून मराठ्यांचा इतिहास उभा केला. ह्या इतिहासाचें

महत्त्व न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे ह्यांनीं आपल्या 'मराठ्याच्या सत्तेचा उत्कर्ष' ह्या ग्रंथांत सांगितलें आहे. तें त्यांच्याच प्रभावी अर्थपूर्ण शब्दांत पुढें देत आहों. त्याचप्रमाणें 'मराठ्यांचें हिंदुस्थानांत कार्य काय ?' ह्या विषयावरील इतिहासाचार्य वि. का. राजवाडे ह्यांचे तेजस्वी विचारहि देत आहों.)

(१)

## मराठ्यांच्या इतिहासाचें महत्त्व

राष्ट्रीकरण म्हणून ज्यांस नांव देतां येईल, अशा प्रकारची एक विलक्षण वृत्तपरंपरा घडून आली, त्यामुळें मराठी सत्तेचा प्रथमारंभ झाला. एकट्या, दुकट्या, साहसी व्यक्तीच्या धाडसास यश येऊन मराठी सत्तेची उभारणी झाली नाहीं. सगळी जनता जेव्हां नवीन विचारांनीं उचंबळली आणि जात, धर्म, भाषा, वाङ्मय ह्या दृढ प्रेमबंधनांनीं परस्पर पूर्णपणें जखडून गेली, तेव्हांच मराठी सत्तेचा प्रादुर्भाव झाला. हीं प्रेमबंधनें घट्ट बसल्यानें याहून अधिक भक्कमपणा आपल्या एकजुटीस यावा अशी प्रबल इच्छा होऊन एक स्वतंत्र राजकीय जीवित सर्व राष्ट्राचें झालें पाहिजे असें प्रत्येकास वाटूं लागलें. प्रथमतः लोकांत स्वत्वाची जागृति झाली. नंतर आपण एकाच जातीचे, एकच भाषा बोलणारे आणि एकाच पवित्र ग्रंथास पूज्य मानून अध्ययन करणारे असे आहों; अशा प्रकारची ऐक्यवर्धक बुद्धि उत्पन्न झाली. अर्थात् इतकी मजल मारल्यावर आपणां सर्वांचें एक वेगळें आणि स्वतंत्र राज्य स्थापन झालें तर हें ऐक्य अधिकाधिक परिपूर्ण होत जाईल आणि तसें अवश्यमेव झालें पाहिजे, असा सर्व लोकांच्या मनांत साभिमान आवेश उत्पन्न झाला. महाराष्ट्र राज्यसत्ता ही राष्ट्रीय चळवळ होती. हा सर्व राष्ट्रांचा एकूण एक वर्णांनीं व जातींनीं मिळून केलेला देशोद्धार होता. मराठ्यांचा इतिहास म्हणजे खऱ्या हिंदी राष्ट्राच्या रचनेचा इतिहास होय.

—न्यायमूर्ति रानडे, मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष.

## (२)

## मराठ्यांचें हिंदुस्थानांत कार्य काय ?

मराठ्यांचें हिंदुस्थानांत मुख्य कार्य म्हटलें म्हणजे महाराष्ट्र-धर्माचा प्रसार करणें हें होय. समर्थांनीं ज्याला महाराष्ट्रधर्म म्हणून संज्ञा दिली तो केवळ हिंदुधर्मच नव्हे. महाराष्ट्रधर्मांत स्वराज्य स्थापनेचा व गोब्राह्मणप्रतिपालनाचाहि अन्तर्भाव होतो. हिंदुधर्म, स्वराज्य व गो-ब्राह्मणप्रतिपालन ह्या तीन गोष्टींची स्थापना करावयाची म्हटली म्हणजे राष्ट्रांतील लोकांची एकी झाली पाहिजे व त्या एकीचा पुढाकार करावयास कर्त्या लोकांनीं पुढें सरसावलें पाहिजे. ही कल्पना सिद्ध करून दाखविण्यास जी तडफ, जो निश्चय, जी जूट व जें पुढारीपण लागतें, त्याचें अस्तित्व भारतांतील इतर लोकांच्या ठायीं होतें असें इतिहासावरून दिसून येत नाहीं. सुदैवानें ह्या गुणांचें अस्तित्व त्या कालीं मराठ्यांच्या अंगीं होतें, व म्हणूनच त्यांच्या हातून स्वराज्याची स्थापना होऊन हिंदुधर्माचें व गो-ब्राह्मणांचें प्रतिपालन झालें.

— इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, ऐतिहासिक प्रस्तावना.

# ५ : साहित्य सोनेयाचिया खाणी

[ ह्या प्रकरणांत मराठींतील कांहीं मधुर व तेजस्वी साहित्यरत्नें दिलीं आहेत. तीं अर्थातच साहित्याच्या सोनेयाचिया खाणींतीलच होत. त्यांत ओंवी, अभंग, भारुडें, पदें अशीं विविध भक्तिकवनें आहेत. त्यांत ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, एकनाथ, तुकाराम, रामदास ह्या संतकवींचीं चिद्रत्नें जशीं आहेत, तशीं मुक्तेश्वर, रघुनाथ, वामन, मोरोपंत ह्यांचीं प्रतिभारत्नेंहि आहेत. हा ह्या सर्वांचा म्हणजेच प्राचीन महाराष्ट्राचा वाग्विलासच होय. ह्यांतील प्रत्येक उतारा असा निवडला आहे कीं त्यावरून त्या कवीचें तर वैशिष्ट्य दिसावेंच पण त्याबरोबर महाराष्ट्राच्या संस्कृतीचेंहि दर्शन व्हावें. ]

(१)

## ओंवी ज्ञानेशाची

म्हणौनि अंबे श्रीमंते । निजजनकल्पलते । आज्ञा दे पां माते । निरूपणीं ॥ १ ॥ नवरसां भरवीं सागरु । करवीं उचित रत्नांचे आगरु । भावार्थाचे गिरिवरु । निफजवीं माये ॥ २ ॥ साहित्य सोनेयाचिया खाणी । उघडविं देशियेचिया अक्षोणी । विवेका वेलीची लावणी । हों दे सैंघ ॥ ३ ॥ संवादफल विधानें । प्रमेयाचिं उद्यानें । लावी म्हणे गहनें । निरंतर ॥ ४ ॥ पाखांडाचे दरकुटे । मोडी वाग्वाद अव्हांटे । कुतर्कांचिं दुष्टें । सावजें दवडीं ॥ ५ ॥ श्रीकृष्णचरणिं मातें । सर्वत्र करिं वसतें । राणिवे बैसवीं श्रोते । श्रवणाचिये ॥ ६ ॥ मऱ्हाटियेचां नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकालु करीं । घेणें देणें सुखाचि वेऱ्हीं । जगा हो देईं ॥ ७ ॥ तूं आपुलेनि स्नेहपल्लवें । मातें पांगुरवीसि सदैवें । आतांचि हें आवघें । निर्मीन मीं ॥ ८ ॥ इये विनविणीयेसाठीं । अवलोकिलें गुरुदृष्टि । म्हणे

गीतार्थेसि उठी। न बोल बहूं ॥ ९ ॥ जेथ जी जी महाप्रसादु। म्हणौनि साविया जाला आनंदु। आतां निरोपिला प्रबंधु अवधान दीजो ॥ १० ॥

—ज्ञानेश्वरी अ, १२, १०–१९.

(२)

रूप पाहतां लोचनीं। सुख झालें वो साजणी ॥ १ ॥ तो हा विठ्ठल बरवा। तो हा माधव बरवा ॥ ध्रु० ॥ बहुता सुकृताची जोडी। म्हणुनि विठ्ठलीं आवडी ॥ २ ॥ सर्व सुखाचें आगर। बाप रखुमादेवीवर ॥ ३ ॥

(३)

अवघाची संसार सुखाचा करीन। आनंदें भरीन तिन्ही लोक ॥१॥ जाईन गे माये तया पंढरपुरा। भेटेन माहेरा जीवींचिया ॥ ध्रु० ॥ सर्व सुकृताचें फळ मी लाहीन। क्षेम मी देईन पांडुरंगीं ॥ २ ॥ बापरखुमादेवीवरु विठ्ठलेसी भेटी। आपुले संवसाटी करुनि ठेला ॥३॥

(४)

हरि आला रे हरि आला रे। संतसंगें ब्रह्मानंदु झाला रे ॥ ध्रु० ॥ हरि येथें रे हरि तेथें रे। हरिवांचुनि न दिसे रितें रे ॥ १ ॥ हरि पाहीं रे हरि ध्याईं रे। हरिवांचुनि दुजें नाहीं रे ॥ २ ॥ हरि वाचे रे हरि नाचे रे। हरि पाहतां आनंदु सांचे रे ॥ ३ ॥ हरि आदी रे हरि अंतीं रे। हरि व्यापक सर्वांभूतीं रे ॥ ४ ॥ हरि जाणा रे हरि वाना रे। बाप रखुमादेवीवरु राणा रे ॥ ५ ॥

(५)

देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी। तेणें मुक्ति चारी साधियेल्या ॥१॥ हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा। पुण्याची गणना कोण करी ॥२॥ असोनि संसारीं जिव्हे वेगु करी। वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ॥३॥ ज्ञानदेव म्हणे व्यासाचिये खुणे। द्वारकेचे राणे पांडवांघरीं ॥४॥

## ( ६ )

## ज्ञानेश्वरीचें भरतवाक्य

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें । तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥ १ ॥ जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो । भूतां परस्परें जडो । मैत्र जीवाचें ॥ २ ॥ दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो । जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥ ३ ॥ वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी । अनवरत भूतळीं । भेटो तयां भूतां ॥ ४ ॥ चलां कल्पतरूंचे आरव । चेतनाचिंतामणींचे गांव । बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥ ५ ॥ चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ ६ ॥ किंबहुना सर्व सुखीं । पूर्ण होवोनि तिहीं लोकीं । भजिजो आदिपुरुषीं । अखंडित ॥ ७ ॥

## ( ७ )

## ताटी उघडा ज्ञानेश्वरा

मजवरी दया करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ १ ॥ संत जेणें व्हावें । जग बोलणें सेवावें ॥ तरीच आंगीं थोरपण । जया नाहीं अभिमान ॥ थोरपण जेथें वसे । तेथें भूतदया असे ॥ रागें भरावें कवणाशीं । आपण ब्रह्म सर्व देशीं ॥ ऐशी समदृष्टि करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ २ ॥ योगी पावन मनाचा । साहे अपराध जनाचा ॥ विश्व झालिया वन्ही । संतमुखें व्हावें पाणी ॥ शब्दशस्त्रें झाले क्लेश । संतीं मानावा उपदेश ॥ विश्व परब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ३ ॥ लडिवाळ मुक्ताबाई । बीज मुद्दल ठायीं ठायीं ॥ तुम्ही तरोन विश्वतारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ४ ॥

## ( २ )

## नामा म्हणे

१

पतितपावन नाम ऐकुनि आलों मी द्वारां । पतितपावन न होसि म्हणुनी जातों माघारा ॥ ध्रु० ॥ सोडीं देवा ब्रीद आतां न होसि अभिमानी । पतितपावन नाम तुजला ठेवियलें कोणीं ॥ १ ॥ घेसी

तेव्हां देशी ऐसा असरी उदार । काय देवा ! शेधूं तुमचें कृपणाचें द्वार ॥ २ ॥ उच्छिष्टाचें शीत न देवा टाकिसि वाहेरी । कोणीं दिधली भगवंत तुला भूषणाची थोरी ॥ ३ ॥ हातीं घेउनि झांगड-झेंडा फिरेन त्रैलोक्यीं । पतितपावन न होसि हरि तूं मोठा घातकी ॥ ४ ॥ नामा म्हणे देवा तुमचें नलगे मज कांहीं । प्रेम असों द्या हृदयीं तुमचे आठवीन पाय ॥ ५ ॥

(२)

संतचरणरज लागतां सहज । वासनेचें वीज जळोन जाय ॥ १ ॥ मग रामनामीं उपजे आवडी । सुख घडोघडीं वाढों लागे ॥ २ ॥ कंठीं प्रेम दाटे नयनीं नीर लोटे । हृदयीं प्रगटे रामरूप ॥ ३ ॥ नामा म्हणे साधन सुलभ गोमटें । परी उपतिष्ठे पूर्वपुण्यें ॥ ४ ॥

(३)

तूं माझी माउली मी वो तुझा तान्हा । पाजीं प्रेमपान्हा पांडुरंगे ॥१॥
तूं माझी माउली मी तुझें वासरूं । नको पान्हा चोरूं पांडुरंगे ॥२॥
तूं माझी हरिणी मी तुझें पाडस । तोडीं भवपाश पांडुरंगे ॥३॥
तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज । चारा घालीं मज पांडुरंगे ॥४॥
नामा म्हणे होसी भक्तीचा वल्लभ । मागें पुढें उभा सांभाळिसी ॥५॥

(४)

ज्ञानराज माझी योग्यांची माउली । जेणें निगमवल्ली प्रगट केली ॥१॥
गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी । ब्रह्मानंदलहरी प्रगट केली ॥२॥
अध्यात्म विद्येचें दाविलेसें रूप । चैतन्याचा दीप उजळिला ॥३॥
छपन्न भाषांचा केलासे गौरव । भवार्णवीं नाव उभारली ॥४॥
श्रवणाचे मिसें वसावें येउनी । सामराज्यभुवनीं सुखीं नांदे ॥५॥
नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एकतरी ओंवी अनुभवावी ॥६॥

(५)

डोळुले शिणले पाहतां वाहुली । अवस्था दाटली हृदयामाजीं ॥१॥
तूं माझी जननी सरसीचे सांगातिणी । विठ्ठले धांवोनी देई क्षेम ॥२॥
तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज । क्षुधें पीडलों मज विसरलीसी ॥३॥

तूं माझी कुरंगी मी तुझें पाडस । गुंता भवपाश तोडी माझा ॥४॥
तूं माझी माउली मी तुझी तान्हुली । वोरस वो घाली प्रेमपान्हा ॥५॥
नामा म्हणे आस पुरवावी माझी । तान्हूल्या पाजी प्रेमपान्हा ॥६॥

(६)

पंढरीचा वास चंद्रभागें स्नान । आणिक दर्शन विठोबाचें ॥१॥
हेंचि घडो मज जन्मजन्मांतरीं । मागणें श्रीहरी नाहीं दुजें ॥२॥
मुखीं सदा नाम संताचें दर्शन । जनीं जनार्दन ऐसा भाव ॥३॥
नामा म्हणे तुझे नित्य महाद्वारीं । कीर्तन गजरी सप्रेमाचें ॥४॥

(७)

देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो ॥१॥ चरण मी न सोडीं सर्वथा । आण तुझी पंढरीनाथा ! ॥२॥ वदनीं तुझें मंगळ नाम । हृदयीं अखंडित प्रेम ॥२॥ नामा म्हणे केशवराजा । केला पण चालवी माझा ॥४॥

(८)

काळवेळ नसे नामसंकीर्तनीं । उंच नीच योनी हेंही नसे ॥१॥
धरा नाम कंठीं सदा-सर्वकाळ । मग तो गोपाळ सांभाळील ॥२॥
कृपाळु कोंवसा सुखाचा सागर । करील उद्धार भाविकांसी ॥३॥
नामा म्हणे फार सोपें हें साधन । वाचे नाम घेणें इतुकेंचि ॥४॥

(९)

तुझिये सत्तेनें वेदासी बोलणें । सूर्यासी चालणें तुझिया बळें ॥१॥
ऐसा तूं समर्थ ब्रह्मांडाचा धनी । वर्म हें जाणुनी शरण आलों ॥२॥
मेघांनीं वर्षावें पर्वतीं बैसावें । वायूनें विचारावें सत्ते तुझें ॥३॥
नामा म्हणे कांहीं न हाले साचार । प्रभू तूं निर्धार पांडुरंगा ॥४॥

(१०)

तुझें प्रेम माझ्या हृदया आवडी । चरण मी न सोडीं पांडुरंगा ॥१॥
इंद्रियांचे व्यापार अवघेचि तोडीं । प्रेमरसगोडी देई मातें ॥२॥
चंद्र चकोराचा पुरवी सोहळा । काय त्याच्या कळा न्यून होती ? ॥३॥
नामा म्हणे मज अनाथा सांभाळीं । हृदयकमळीं स्थिर राहें ॥४॥

(११)

काय गुण-दोष माझे विचारिसी। आहें मी तों राशी अपराधांची ॥ १ ॥ अंगुष्ठापासोनी मस्तकापर्यंत। अखंड दुश्चित आचरलों ॥ २ ॥ स्वप्नीं देवा तुझी नाहीं घडली भक्ती। पुससी विरक्ती कोठोनियां ॥ ३ ॥ तूंचि माझा गुरु तूंचि माझा स्वामी। सकळ अंतर्यामीं गाऊं तुज ॥ ४ ॥ नामा म्हणे माझें चुकवीं जन्म-मरण। नको करूं शीण पांडुरंगा ॥ ५ ॥

(१२)

ममता तुटेना मज केशिराजा। अंगीं भाव दुजा लागे पाठीं ॥ १ ॥ शरीरीं तितिक्षा नाहीं क्षमा-शांती। यालागीं श्रीपती वायां गेलों ॥ २ ॥ नामा म्हणे देवा तारिसी पतिता। म्हणोनियां सत्ता केली आम्हीं ॥ ३ ॥

(१३)

अमृताहुनी गोड नाम तुझें देवा। मन माझें केशवा कां पां नेघे? ॥१॥ सांग पंढरिराया! काय करूं यासी?। कां रूप ध्यानासी न ये तुझें॥२॥ कीर्तनीं बैसतां निद्रें नागविलें। मन माझें गुंतलें विषयसुखा ॥३॥ हरिदास गर्जती हरिनामाच्या कीर्तीं। न ये माझ्या चित्तीं नामा म्हणे ॥ ४ ॥

(१४)

हरि रे वाढवेळ झाला। कोण्या भक्तानें गोंविला ॥ १ ॥ झडकरी येई गा विठ्ठला। कंठ आळवितां शोषिला ॥ २ ॥ प्राण केव्हां येईल माझा। आलिंगील चहूं भुजा ॥ ३ ॥ नामा गहिंवरें दाटला। पूर धरणीये लोटला ॥ ४ ॥

(१५)

परब्रह्म निष्काम तो हा गौळियां घरीं। वाक्या वाळे अंदु कृष्ण नवनीत चोरी ॥ १ ॥ आणखी गौळणी हरीचीं पाउलें धरा। रांगत रांगत येतो हरि हा राजमंदिरा ॥ २ ॥ लपत छपत येतो हरि हा राजभुवनीं। नंदासी टाकुनि आपण बैसे सिंहासनीं ॥ ३ ॥ सांपडला

देव्हारा यासी वांधा दाव्यांनीं । शंखचक्रगदा पद्म शारंगपाणी ॥ ४ ॥ वहुता कष्टे वहुता पुण्यें जोडले देवा । अनंत पवाडे तुमचे न कळती मावा ॥ ५ ॥ नामा म्हणे केशवा। अहो जी दातारा। जन्मोजन्मीं द्यावी तुमची चरणसेवा ॥ ६ ॥

( ३ )

म्हणे नामयाची जनी

( १ )

वैकुठींचा हरी। तान्हा यशोदेच्या घरीं ॥ १ ॥ रांगतसे हा आंगणीं। माथां जावळाची वेणी॥२॥ पायी पैंजण आणि वाळे। हातीं नवनीताचे गोळे ॥३॥ धन्य यशोदा ते माय । दासी जनी वंदी पाय ॥४॥

( २ )

पक्षी जाय दिगंतरा । वाळकांसी आणि चारा ॥ १ ॥ घार हिंडते आकाशीं । झांप घाली पिल्लापाशीं ॥ २ ॥ माता गुंतली कामासी । चित्त तिचें वाळापाशीं ॥ ३ ॥ वानरी हिंडे झाडावरी। पिलीं वांधोनी उदरीं ॥४॥ तैसी आम्हांसी विठ्ठलमाये। जनी वेळोवेळां पाहे ॥ ५ ॥

( ३ )

गंगा गेली सिंधूपासीं। त्याणें अव्हेरिलें तिसी॥१॥ तरी तें सांगावें कोणाला । ऐसें वोले वा विठ्ठला ॥२॥ जळ कोपलें जळचरां । माता अव्हेरी कुमारा ॥३॥ जनी म्हणे शरण आलें। पाहिजे तें उद्धरिलें॥४॥

( ४ )

कोणे एके दिवसीं । विठो गेला जनीपाशीं ॥१॥ हळुंच मागतो खायासी । काय देऊं वा मी तुसी ॥२॥ हातीं धरून नेला आंत । वाढी पंचामृत भात ॥३॥ प्रेमसुखाचा ढेंकर दिला । जनी म्हणे विठो धाला ॥४॥

( ५ )

ज्याचा सखा हरी । त्यावरि विश्व कृपा करी ॥ १ ॥ उणें पडों नेदी त्याचें । वारें सोसी आघाताचें ॥ २ ॥ तयावीण क्षणभरी । कदा आपण नव्हे दुरी ॥ ३ ॥ अंग आपुलें वोडोनी । त्याला राखे

जो निर्वाणीं ॥ ४ ॥ ऐसा अंकित भक्तांसी । म्हणे नामयाची दासी ॥ ५ ॥

( ६ )

कां गा न येसी विठ्ठला । ऐसा कोण दोष मला ॥ १ ॥ माय बाप तूंचि धणी । मला सांभाळी निर्वाणीं ॥ २ ॥ त्वां वा उद्धरिले थोर । तेथें कोण मी पामर ॥ ३ ॥ दीननाथा दीनबंधु । जनी म्हणे कृपासिंधु ॥ ४ ॥

( ७ )

चिंतन चित्ताला । लावीं मनाच्या मनाला ॥ १ ॥ उन्मनीच्या सुखाआंत । पांडुरंग भेटी देत ॥ २ ॥ कवटाळुनि पोटीं-पाठीं । जनी म्हणे सांगूं गोष्टी ॥ ३ ॥

( ८ )

आम्ही पातकांची राशी । आलों तुझ्या पायांपाशीं ॥ १ ॥ मना येईल तें तूं करीं । आतां तारी अथवा मारी ॥ २ ॥ जनी म्हणे सृष्टीवरी । एक असशी तूं वा हरी ॥ ३ ॥

( ९ )

रुक्मिणीच्या कुंका । सुरां असुरां प्रिय लोकां ॥ १ ॥ धांव धांव माझे आई ! । सखे साजणी विठाबाई ॥ २ ॥ शिवाचिया जपा । मदनताता वा निष्पापा ॥ ३ ॥ दयेच्या सागरा । जनी म्हणे अमरेश्वरा ॥ ४ ॥

( १० )

भक्तामाजीं अग्रगणी । पुंडलीक महामुनी ॥ १ ॥ त्याचे प्रसादें तरले । साधुसंत उद्धरले ॥ २ ॥ तोचि प्रसाद आम्हांसी । विटेवरी हृषीकेशी ॥ ३ ॥ पुंडलीक बाप-माय । दासी जनी वंदी पाय ॥४॥

( ११ )

ये ग ये ग विठाबाई । माझे पंढरीचे आई ॥ १ ॥ भीमा आणि चंद्रभागा । तुझ्या चरणींच्या गंगा ॥ २ ॥ इतुक्यासहित त्वां बा यावें । माझ्या रंगणीं नाचावें ॥ ३ ॥ माझा रंग तुझे गुणी । म्हणे नामयाची जनी ॥ ४ ॥

(१२)

नाम फुकट चोखट । नाम घेतां न ये वीट ॥ १ ॥ जडशिळा ज्या सागरीं । आत्माराम नामें तारी ॥ २ ॥ धुव्रभावें स्मरण केलें । तया वैकुंठासी नेलें ॥ ३ ॥ नाम महिमा जनी म्हणे । ध्यातां विठ्ठलाचि होणें ॥ ४ ॥

सेना न्हावी

(१)

उदार तुम्ही संत । माय-बाप कृपावंत ॥१॥ केवढा केला उपकार । काय वानूं मी पामर ॥२॥ जडजीवां उद्धार केला । मार्ग दाविला सुपंथ ॥३॥ सेना म्हणे उतराई । होतां कांहीं दिसेना ॥४॥

(२)

तेचि एक संत जाणा । नारायणा आवडती ॥१॥ पांडुरंगावांचुनि कांहीं । न जाणे पाहीं दुसरें ॥धु०॥ मुखीं नाम अमृतावाणी । धाले मनीं डुल्लती ॥२॥ सेना म्हणे पायीं माथा । त्यांच्या आतां ठेविला ॥३॥

चोखामेळा

(१)

ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा । काय भुललासी वरलिया रंगा ॥ १ ॥ कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा । काय भुललासी वरलिया रंगा ॥ २ ॥ नदी डोंगी परी जल नोहे डोंगें । काय भुललासी वरलिया रंगें ॥ ३ ॥ चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा । काय भुललासी वरलिया रंगा ॥ ४ ॥

(२)

टाळी वाजवावी गुढी उभारावी । वाट हे चालावी पंढरीची ॥ १ ॥
पताकांचे भार मिळाले अपार । होतो जयजयकार भीमातीरीं ॥ २ ॥
हरिनाम गर्जतां नाहीं भय-चिंता । ऐसें बोले गीता भागवत ॥ ३ ॥
खट-नट यावें शुद्ध होउन जावें । दवंडी पिटी भावें चोखामेळा ॥ ४ ॥

(३)

भारुडें

(भारुडें हीं प्राचीन जातपदगीतें होत. हीं सर्वसामान्य लोकांचीं बहुरूढ, लोकप्रिय गीतें होत. ह्या काव्यांत लौकिक व्यवहाराबरोबर वेदान्त सांगितला आहे.

ह्यांत नाट्य आहे, काव्य आहे, समाज आहे, अध्यात्महि आहे. प्रत्येक व्यवसायाचें एकेक भारुड आहे. सामान्यजनांचीं भाविक प्रार्थनागीतें किंवा स्तोत्रेंच हीं आहेत.)

(१)

### ज्ञानोबांची घोंगडी

**कानोबा तुझी घोंगडी चांगली । आम्हांसी कां दिली वांगली ॥ ध्रु०॥ स्वगत सच्चिदानंदें मिळोनि शुद्धसत्त्वगुणें विणली रे । षड्गुण गोंडे रत्नजडित तुज श्यामसुंदरा शोभली रे ॥ १ ॥ काम–कर्म–अविद्या–त्रिगुण–पंचभूतांनीं विणली रे । रक्त–रेत–दुर्गंधी–जंतु–नरक–मुतानें भरली रे ॥ २ ॥ षड्गुणविकारषड्वैरी मिळोनि तापत्रयानें विणली रे । नवाठायां फाटुनी गेली ती त्वां आम्हांसि दिधली रे ॥ ३ ॥ ऋषि मुनि ध्यातां मुखिं नाम गातां संदेहवृत्ती विरली रे । बाप रखुमादेवीवर विठ्ठले । त्वत्पदीं वृत्ति मुरली रे ॥ ४ ॥**

(२)

### नामदेवांचा बोवडा

**कुत्ना ! थमाल ले थमाल अपुल्या गाई । आम्हीं अपुल्या घलासि जातों भाई ॥ ध्रु०॥ तुम्ही थोलल्या पातलाचे लेक । तुम्हांमधीं ले मी गलीब आहें येक । मदला म्हनतां ले जाई गायी लाख । किती मी धांवूं ले कांता लागला पाईं ॥ कुत्ना ॥ १ ॥ काली पिवली ले गाय आहे तान्हेली । या या गवल्याची धवली गाय पलाली । मदला देखुनि तो गवली हांका माली । काली कांवली हिलुनि घेतली थाली ॥ कुत्ना ॥ २ ॥ काल बलाचि ले वलाचि खलवस केला । तुम्हि सल्वांनीं फाल फाल घेतला । मी गलीब ले म्हनुनि थोलका दिला । तूं म्हनसिल ले ‘ याला कलताचि नाहीं ’ ॥ कुत्ना० ॥ ३ ॥**

(३)

### आदिमायेचें स्तोत्र–दार उघड बया

**नमो आदिमाया भगवती । अनादिसिद्ध मूळप्रकृती ॥ महालक्ष्मी त्रिजगतीं । बया दार उघड, बया दार उघड ॥ १ ॥ हरिहर तुझें ध्यान करिती । चंद्र-सूर्य कानीं तळपती । गगनीं ते तारांगणें**

रुळती। तेवीं भांगीं भरिले मोती ॥ वया दार उघड, वया दार उघड ॥ २ ॥ नवखंड पृथ्वी तुझी चोळी। सप्त पाताळीं पाउलें गेलीं। एकवीस स्वर्ग मुगुटीं झळाळी। वया दार उघड० ॥ ३ ॥ अलक्ष्यपुर भवानी। दार उघड, वया दार उघड ॥ माहुर-लक्ष्मी। दार उघड, वया दार उघड ॥ कोल्हापुर-लक्ष्मी। दार उघड, वया०॥ तैलंगण-लक्ष्मी। दार उघड, वया० ॥ तुळजापुर लक्ष्मी। दार उघड, वया० ॥ पाताळ-लक्ष्मी। दार उघड, वया० ॥ कानाड-लक्ष्मी। दार उघड, वया० ॥ अष्टभुजा-लक्ष्मी। दार उघड, वया० ॥

पंढरपुरनिवासिनी। दार उघड, वया दार उघड ॥ उदो उदो उदो उदो ॥ ४ ॥ चारी पुरुषार्थ गोंधळा। सनकादिक तेथें संबळी। तेहतीस कोटी भूतावळी। अठ्यांयशीं सहस्र ऋषिमंडळी। दिवट्या पाजळोनी तिष्ठती। वया दार उघड, वया दार उघड ॥ ५ ॥ वेताळ फेताळ खंकाळ। मारको मेसको मैराळ। जागाई जोखाई क्षेत्रपाळ। म्हैषासुर दैत्य मातला सवळ। अवघव पीडा केली अंबे। वया दार उघड० ॥ ६ ॥ मच्छाई! वया दार उघड। कच्छाई! वया दार उघड। वऱ्हाई! वया दार उघड। नरसाई! वया दार उघड। वामनाई! वया दार उघड। परसाई! वया दार उघड। रामाई! वया दार उघड। कृष्णाई! वया दार उघड। बोधाई! वया दार उघड। कलंकाई! वया दार उघड। महालक्ष्मी! वया दार उघड। उदो उदो ऐसा शब्द गाजतो। कामक्रोध दैत्यांवर कोरडा कडकडां वाजतो। ज्ञानपोत पाजळतो। बोधपरडी हातीं घेतो। प्रेमाचा पाऊल पुढें ठवितो। अहंशंखासुर दैत्य बळी देतो ॥ वया दार उघड, वया दार उघड ॥ ७ ॥ जगदंबा प्रसन्न झाली ॥ भक्तिकवाडें उघाडिलीं ॥ शंखचक्रांकित शोभली। रूप सुंदर सांवळी। कोटि-चंद्रसूर्यप्रभा वेल्हाळी। एका जनार्दनीं माउली। करी कृपेची सांउली। भक्तजनाकारणें संपूर्ण जाली ॥ वया दार उघड, वया दार उघड ॥ ८ ॥

(४)

येडका

येडका मदन तो केवळ पंचानन ॥ येड० ॥ ध्रु० ॥ धडक मारिली नारदा ॥ केला रावणाचा चेंदा ॥ दुर्योधना मारिली गदा ॥ घेतला प्राण ॥ तो केवळ० ॥ १ ॥ धडक मारिली शंकरा ॥ केला ब्रह्मयाचा मातेरा ॥ इंद्रा चंद्रासी भेदरा ॥ लाविला जेणें ॥ तो केवळ० ॥ २ ॥ भस्मासुर मुकला प्राणासी ॥ तेचि गति झाली वाळीसी ॥ विश्वामित्रासारिखा ऋषी ॥ नाडिला जेणें ॥ तो केवळ० ॥ ३ ॥ शुकदेवानीं ध्यान धरोनी ॥ येडका आणिला आकळोनी ॥ एका जनार्दनाचे चरणीं ॥ लाविला ज्यानें ॥ तो केवळ० ॥ ४ ॥

(५)

थट्टा

अशी ही थट्टा ॥ भल्याभल्यासीं लाविला वट्टा ॥ ध्रु०॥ थट्टा गेली शंभोपासीं ॥ कलंक लाविला चंद्रासी ॥ भगें पाडिलीं इंद्रासी ॥ बरी नव्हे थट्टा ॥ भल्याभल्यासीं लाविला वट्टा ॥ १ ॥ थट्टेनें मेला दुर्योधन ॥ भस्मासुर गेला भस्म होऊन ॥ वालीहि मुकला आपल्या प्राणा ॥ अशी ही थट्टा ॥ भ० ॥ २ ॥ थट्टा रावणानें केली ॥ नगरी सोन्याची बुडविली ॥ थट्टा ज्याची त्यास भोंवली ॥ बरी नव्हे थट्टा ॥ भ० ॥ ३ ॥ अरण्यांत होता भृगुऋषी ॥ थट्टा गेली त्याचे पाशीं ॥ भुलवुनी आणिला अयोध्येसी ॥ बरी नव्हे थट्टा ॥ भ० ॥ ४ ॥ विराटराजाचा मेहुणा ॥ नाम तयाचें कीचक जाणा ॥ त्यानें घेतले बहुतांचे प्राणा ॥ बरी नव्हे थट्टा ॥ ५ ॥ थट्टेपासून सुटले चवघेजण ॥ शुक भीष्म आणि हनुमान ॥ चौथा कार्तिकस्वामी जाण ॥ त्याला नाहीं वट्टा ॥ अशी ही थट्टा ॥ ६ ॥ गोसावीनंदन म्हणे सर्वांला ॥ थट्टेला भिऊन तुम्ही चाला ॥ नाहींतर नेईल नरककुंडाला ॥ अशी ही थट्टा ॥ भल्याभल्यासीं लाविला वट्टा ॥ ७ ॥

(६)

तलफ

निजलीस काय गे ॥ होय जागि तमाखु खायगे ॥ ध्रु० ॥ चंचींत

नाहीं तर वटव्यांत पाहिंगे ॥ वटव्यांत नाहींतर गाडग्यांत पाहिंगे ॥ गाडग्यांत नाहींतर फडक्यांत पाहींगे ॥ निजलीस० ॥ १ ॥ तमाखु आणून करतेस कायगे ॥ माझ्या कोईत चुनाच नाहींगे ॥ रात्रीं मजला झोपचि नाहींगे ॥ निजलीस० ॥ २ ॥ पहांटेस उठून शेतांत जाईगे ॥ वायशी पदरांत घेऊनि येईगे ॥ वायशी मच्छनाथाला देईगे ॥ निजलीस० ॥ ३ ॥

## (७)

## जोहार

जोहार मायबाप जोहार, मी देहगांवींचा महार ॥ पार्वतीच्या गळ्याचा हार, ईश्वराचा सर्व शृंगार ॥ कीजे मायबाप ॥ १ ॥ श्रुत करून सांगतों साचे, ॥ पैसे टाक माझ्या धन्याचे, बाकी थकवूं नका त्याची ॥ कीजे मायबाप ॥ २ ॥ पैल हा मनाजी मोठा फितवेखोर, यानें लाविला थोर घोर, आवर बुद्धाई आपुला पोर, नाहींतर धनी कोपेल ॥ कीजे मायबाप ॥ ३ ॥ विकल्पाजी शेटे सदाची धान, पाहतात आपुलाची मान, जेव्हां तोंडावर बैसेल व्हान, तेव्हां डोळे पुसाल कीं मायबाप ॥ ४ ॥ वासनाईनें फितुर केला, घरचा भेद बाहेर नेला, हा विचार जर कळला, धनी धरून नेईल ॥ कीजे मायबाप ॥ ५ ॥ तशीच हा ममताई आवा, इनें लाविला उभा दावा ॥ ती बोढील हात पायांच्या साबा, मग थुंकाल ॥ कीजे मायबाप ॥६॥ निंदाई आवाचें तोंड मोठें, ज्यां म्हटलें कोण बोलती गेटे, हाद टाकून ॥ कीजे मायबाय ॥७॥ अशा आवाचा खोटा चाळा, ज्यासी त्यासी घालिती डोळा, मागती नवनीताचा गोळा, परी अंतीं जड जाईल ॥ कीजे मायबाप ॥८॥ हा देहपाटलाचा गांव ॥ पांच पंचविसांची वेगळालीच हाव ॥ आणखी पन्नासांचें नांव ॥ घेऊन कीजे मायबाप ॥९॥

## (८)

## भवानी आई रोडगा वाहीन तुला

सत्वर पाव ग मला भवानि आई । रोडगा वाहीन तुला ॥ रो० ॥ ॥ध्रु०॥ सासरा माझा गांवीं गेला । तिकडेच खपवी त्याला

॥ भवानि ॥ १ ॥ सासू माझी फार गांजिते । मरिआइ येऊं दे तिला ॥ भ०॥ २ ॥ जाऊ माझी फडफड बोलती । बोडकी कर ग तिला ॥ भ०॥ ३ ॥ नणदचं पोर किरकिर करतं । खरूज येऊं दे त्याला ॥ भ०॥ ४ ॥ दादला मारूनि आहूति देईन । मोकळी कर ग मला ॥ भ०॥ ५ ॥ एका जनार्दनीं सगळेचि जाऊं दे । एकटीच राहूं दे मला ॥ भ०॥ ६ ॥

(९)

साप

साप चावला साप । अगागागा अवावावा । अरेरेरे साप चावला साप । स्वरूपमंदिरीं होतें मी एकली । अकस्मात् मायेच्या सांजवेळीं अविद्येच्या विळांतून लोभमोहाच्या दोन । पट्टयाचा भुजंग सरकन् बाहेर आला । त्यानें करंगुळीला डंख मारला । आशालहरींनीं देह तापला । विषयनिंव कडू पण तो गोड लागला । भजनगूळ गोड असून कडू झाला । दारिद्र्याचा झेंडू आला । असत्य रक्ताचा गुरळा आल्या । स्तुतिनिंदेनें दांत काळे झाले । सदगुरु गारुडी बोलवा माऊली बो ।

(१०)

भूत

भुत जवर मोठं ग बाई । झाली झडपण करूं गत काई । भुत जवर । भुत जवर ॥ ध्रु० ॥ आंत दिसे बाहेरीं वसे । या भुतानें लाविलें पिसें । भुत० ॥ १ ॥ भूत लागलें ध्रुववाळाला । उभा अरण्यांत ठेला । भुत० ॥२॥ भूत वसलें वाळुवंटीं । या हो पुंडलिकाचेसाठीं । भुत० ॥३॥ भूत लागलें बहुतांसी । गोरा कुंभार सांवत्यासी ॥ भुत० ॥ ४ ॥ जनार्दन एकनाथासी । तें भूत लागलें रे ॥ भुत० ॥

(११)

छंद

असा धरी छंद ॥ जाय तुटोनियां भवबंध ॥ ध्रु० ॥ छंद लागला टिटवीला ॥ तिणें समुद्र आटविला ॥ मैनावतीनें कृतार्थ केला ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
साहित्य सोनियाचिया खाणी
अनुक्रम...

गोपिचंद ॥ जाय० ॥१॥ झाले तीन जन्म भरतीला ॥ रावण रामरूपी तो झाला ॥ गोपी चढल्या वैकुंठाला ॥ यशोदानंद ॥ जाय० ॥२॥ दुधाचा सागर उपमन्यूला ॥ ध्रुव तो अढळ पदावरीं वसला ॥ मार्कंडेयें यम हटविला ॥ चालिला मंद ॥ जाय० ॥३॥ छंदें असाध्य तें साधती ॥ छंदें नर ते नारायण होती ॥ दीन जन हरि आपुला करिती ॥ जो सुखकंद ॥ जाय० ॥४॥

(४)

## मुक्तेश्वराचा वाग्विलास

### १ वर्षाकाळ

यावरी पातला वर्षाकाळ । पंचम ऋतु झाला प्रबळ । सुटला पश्चिमेचा अनिल । मेघमाला मोकली ॥ १ ॥ पृथ्वी मंडळींचा जलराशी । पारधी पातला आकाशीं ॥ पिटित मृगाचे पाठिशीं । सैरा गगनीं धावत ॥ २ ॥ इंद्रचाप धरूनि मुष्टी । रोहिणी मृगाचिया पाठी ॥ मेघधारा जीवन वृष्टी । करित वेगें पातला ॥ ३ ॥ सूर्यकिरण मृगसमुदाय । निस्तेज होऊनि पावले भय । खावया शोधीत ठाय । अभ्रें आड करूनियां ॥ ४ ॥ किं पृथ्वीखंड त्या शाळुंखा । अनेक पर्वत शिवपिंडिका । इंद्रें मांडिलें अभिषेका । गगनपात्रीं बहुधारा ॥ ५ ॥ मयूर चातक कपोतक । दर्दुर करिती महाघोष । मेघ जगाचा पालक । सर्व लोकां जाणविती ॥ ६ ॥ विद्युल्लताचे कडकडाट । घनगर्जना गडगडाट । सरितांचे संघाट । महापूर माजले ॥ ७ ॥ अठराभार वनस्पती । अंकुरवसनें वेढिलीं जगतीं । फळशाखा धान्य संपत्ती । पृथ्वी पिके जगातें ॥ ८ ॥ विष्णुजगाचा प्रतिपाळिता । तोचि होय मेघ तत्त्वतां । करूनी चंद्र सविता । आप ओपीं अयनांशें ॥ ९ ॥ मुक्तेश्वराचा वाग्विलास । देशभाषा परिसंतोष । मानुनिया साक्षीलागीं व्यास । उभा असे जवळिके ॥ १० ॥

—वनपर्व, १०, १९२.

### २ युद्धाचा हाहाकार

वाद्यें वाजूं लागलीं अपार । वळे चालिले कौरवभार । हडबडलें पांचाळपूर । वार्ता पुढें परिसोनी ॥ १ ॥ कडकडाटें वीरभारीं ।

पांचाळ पातला बाहेरी। उभयदळाचे झुंझारी। रणकल्लोळ माजला ॥ २ ॥ कुंजरावरी कुंजरभार। राउतावरी अश्वस्वार। नानाशस्त्रीं पायीचे वीर। घोर कंदना मिसळले ॥ ३ ॥ तिमिंगल निघे समुद्रजळीं। तैसा भीम पांचाळदळीं। बळें मिसळतां खळवळी। सेना पांचाळपतीची ॥ ४ ॥ असंख्य कुंजर थाट। स्रवती मदोदकाचे पाट। त्यावरी उठावला बलिष्ठ। गदाघायीं ताडित ॥ ५ ॥ अश्वरथ कुंजरभार। विभांडित रणझुंझार। रथयोद्धे शतसहस्र। बाणधारां खंडिले ॥ ६ ॥ बाणधारां अकस्मात्। शिरें उडती मुगुटांसहित। शस्त्रीं उभारिले हात। ते नभांत उसळती ॥ ७ ॥ अशुद्ध नदीचे खळखळाट। पुसती सागराचे वाट। मार्ग दाखवया नीट। अपार प्रेतें चालती ॥ ८ ॥ हाहाकार माजला प्रबळ। फुटलें पांचाळाचें दळ। एक म्हणती प्रळयकाळ। अत्यद्भुत मांडला ॥ ९ ॥

(५)

अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची

(१)

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी। कर कटावरी ठेवूनीयां ॥ १ ॥
गळां तुळसीहार कांसे पीतांबर। आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥ ध्रु० ॥
मकर-कुंडलें तळपती श्रवणीं। कंठीं कौस्तुभमणी विराजित ॥ २ ॥
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख। पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ३ ॥

(२)

सदा माझें डोळां जडो तुझी मूर्ति। रखुमाईच्या पती सोयरिया ॥ १ ॥
गोड तुझें रूप, गोड तुझें नाम। देई मज प्रेम सर्व काळ ॥ ध्रु० ॥
विठो माऊलिये हाचि वर देई। सांचरोनि राहीं हृदयामाजीं ॥ २ ॥
तुका म्हणे कांहीं न मागो आणीक। तुझे पायीं सुख सर्व आहे ॥ ३ ॥

(३)

कन्या सासुऱ्यासी जाये। मागें परतोनि पाहे ॥ १ ॥ तैसें झालें माझ्या जीवा। कधीं भेटसी केशवा! ॥ ध्रु ० ॥ चुकलिया माये। बाळ हुरूहुरू पाहे ॥ २ ॥ जीवनावेगळी मासोळी। तैसा तुका तळमळी ॥ ३ ॥

(४)

वृक्षवल्ली आम्हां सोईरीं वनचरें । पक्षीये सुस्वरें आळवीती ॥ १ ॥
येणें सुखें रुचे येकांताचा वास । नाहीं गुणदोष आंगा येत ॥ २ ॥
आकाश मंडप पृथिवी आसन । रमे तेथें मन क्रीडा करूं ॥ ३ ॥
कंथा कुमंडळ देह उपचारा । जाणवीतो वारा अवसरू ॥ ४ ॥
हरिनामें भोजन प्रवडी विस्तार । करूं ना प्रकार सेवूं रुची ॥ ५ ॥
तुका म्हणे होये मनासी संवाद । आपलासी वाद आपल्यासी ॥ ८ ॥

(५)

जे कां रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपुले ॥ १ ॥ तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥ ध्रु० ॥ मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त ॥ २ ॥ ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥ ३ ॥ दया करणें जे पुत्रासीं । तेचि दासा आणि दासी ॥ ४ ॥ तुका म्हणे सांगूं किती । तोचि भगवंताची मूर्ती ॥ ५ ॥

(६)

धन्य देहू गांव पुण्य भूमि ठाव । तेथें नांदे देव पांडुरंग ॥ १ ॥
धन्य क्षेत्रवासी लोक ते दैवाचे । उच्चारिती वाचें नामघोष ॥ ध्रु० ॥
कर कटिं उभा विश्वाचा जनिता । वामांगी ते माता रखुमादेवी ॥ २ ॥
गरुड पारीं उभा जोडूनियां कर । अश्वत्थ समोर उत्तरामुख ॥ ३ ॥
दक्षिणे शंकर लिंग हरेश्वर । शोभे गंगातीर इंद्रायणी ॥ ४ ॥
लक्ष्मीनारायण बल्लाळाचें वन । तेथें अधिष्ठान सिद्धेश्वर ॥ ५ ॥
विघ्नराज द्वारीं वहिरव वाहेरी । हनुमंत शेजारीं सहित दोघे ॥ ६ ॥
तेथें दास तुका करितो कीर्तन । हृदयीं चरण विठोबाचे ॥ ७ ॥

(७)

आलें देवाचिया मना । तेथें कोणाचें चालेना ॥ १ ॥ हरिश्चंद्र ताराराणी । वाहे डोंबा घरीं पाणी ॥ ध्रु० ॥ पांडवांचा साहाकारी । राज्यावरोनि केले दुरी ॥ २ ॥ तुका म्हणे उगेंचि राहा । होईल तें तें सहज पाहा ॥ ३ ॥

(८)

जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती। चालविसी हातीं धरूनियां ॥ १ ॥ चालों वाटे आम्ही तुझाचि आधार। चालविसी भार सवें माझा ॥ ध्रु० ॥ बोलों जातां बरळ करिसी तें नीट। नेली लाज धीट केलों देवा ॥ २ ॥ अवघे जन मज जाले लोकपाळ। सोइरे सकळ प्राणसखे ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें। जालें तुझें सुख अंतर्बाहीं ॥ ४ ॥

(९)

हेंचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥ गुण गाईन आवडी। हेचि माझी सर्व जोडी ॥ २ ॥ नलगे मुक्ति धनसंपदा। संतसंग देईं सदा ॥ ३ ॥ तुका म्हणे गर्भवासीं। सुखें घालावें आम्हांसी ॥ ४ ॥

(१०)

नीचपण बरवें देवा। न चले कुणाचाही हेवा ॥ १ ॥ महापुरें झाडें जाती। तेथें लव्हाळे वांचती ॥ ध्रु० ॥ येतां सिंधूच्या लहरी। नम्र होतां जाती दुरी ॥ २ ॥ तुका म्हणे फळ। पाय धरिल्या न चले बळ ॥ ३ ॥

(११)

कां रे नाठविसी कृपाळू देवासी। पोसितो जगासी एकलाचि ॥ १ ॥ बाळा दुग्ध कोण करितें उत्पत्ती। वाढवी श्रीपती सवें दोन्हीं ॥ ध्रु० ॥ फुटती तरुवर उष्णकाळमासीं। जीवन तयांसी कोण घाली ॥ २ ॥ तेणें तुझी काय नाहीं केली चिंता। राहे त्या अनंता आठवुनी ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्याचें नांव विश्वंभर। त्याचें निरंतर ध्यान करीं ॥ ४ ॥

(१२)

काम-क्रोध आम्हीं वाहिले विठ्ठलीं। आवडी धरिली पायांसवें ॥ १ ॥ आतां कोण पाहे मागें परतोनी। गेला हारपोनी देहभान ॥ २ ॥ रिद्धि,सिद्धि सुखें हाणितल्या लाथा। तेथें या प्राकृत्या कोण मानी ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही विठोबाचे दास। करूनि ठेलों ग्रास ब्रह्मांडाचा ॥ ४ ॥

(१३)

शुद्ध बीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥ मुखीं अमृताची वाणी । देह वेंचावा कारणीं ॥ १ ॥ सर्वांगीं चित्त निर्मळ । जैसें गंगाजळ । तुका म्हणे जाती । ताप दर्शनें विश्रांति ॥ २ ॥

(१४)

बोले तैसा चाले । त्याचीं वंदीन पाउलें ॥ अंगें झाडीन अंगण । त्याचें दास्यत्व करीन ॥ १ ॥ त्याचा होईन किंकर । उभा ठाकेन जोडोनि कर ॥ तुका म्हणे देव । त्याचे चरणीं माझा भाव ॥ २ ॥

(१५)

आवडे हें रूप साजिरें सगुण । पाहतां लोचन सुखावले ॥ १ ॥
आतां दृष्टीपुढें ऐसाचि तूं राहे । जों मी पाहें नारायण ॥ २ ॥
लांचावलें मन लागलीसे गोडी । तें जीवें न सोडी ऐसें झालें ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्हीं केली जे लडिवाळी । पुरवावी आळी माय-बापें ॥४॥

(१६)

जोडोनियां धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेंच करी ॥ १ ॥
उत्तमचि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीवखाणी ॥ २ ॥
परउपकारी नेणें परनिंदा । परस्त्रिया सदा वहिणी मायी ॥ ३ ॥
भूतदया गाईपशूंचें पालन । तान्हेल्या जीवन वनामाजीं ॥ ४ ॥
शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचें ॥ ५ ॥
तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ । परम पद्वळ वैराग्याचें ॥ ६ ॥

(१७)

घेई घेई माझे वाचे । गोड नाम विठोबाचें ॥ १ ॥ मना तेथें धांव घेई । राहीं विठोबाचे पायीं ॥ २ ॥ डोळे तुम्ही घ्या रे सुख । पाहा विठोबाचें मुख ॥ ३ ॥ तुम्ही आइका रे कान । माझ्या विठोबाचे गुण ॥ ४ ॥ तुका म्हणे जीवा । नको सोडूं या केशवा ॥ ५ ॥

(१८)

आपलें मरण पाहिलें म्यां डोळां । तो झाला सोहळा अनुपम्य ॥ आनंदें दाटलीं तिही त्रिभुवनें । सर्वात्मकपणें भोग झाला ॥ १ ॥ येक

देशीं होतों अहंकारें आथिला । त्याच्या त्यागें झाला सुकाळ हा ॥ फिटलें सुतक जन्ममरणाचें । मी माझें संकोचें दूरी झालों ॥ २ ॥ नारायणें दिला वसतिसी ठावो । ठेऊनियां भावो ठेलों पायीं ॥ तुका म्हणे दिल्हें उमटुनी जगीं । घेतलें तें अंगीं लाउनीयां ॥ ३ ॥

(१९)

आम्ही जातों आपुल्या गांवा । आमुचा रामराम घ्यावा ॥ १ ॥ तुमची आमची हेचि भेट । येथुनियां जन्मतुटी ॥ ध्रु० ॥ आतां असों द्यावी दया । तुमच्या लागतसें पायां ॥ २ ॥ येतां निजधामीं कोणी । विठ्ठल विठ्ठल बोला वाणी ॥ ३ ॥ रामकृष्ण मुखीं बोला । तुका जातो वैकुंठाला ॥ ४ ॥

(५)

## समर्थांची समर्थवाणी

(१)

(क्षात्रधर्म)

मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावें । फिरोन येतां भोगावें । महद्भाग्य ॥ १ ॥ नजर करारी राखणें । कार्य पाहुनि खतल करणें । तेणें रणशूरांचीं अंतःकरणें । चकित होतीं ॥ २ ॥ जैसा भांड्यांचा (तोफांचा) गलोला । निर्भय भारामध्यें पडिला । तैसा क्षत्रीं रिचवला । पर सैन्यामध्यें ॥ ३ ॥ निःशंखपणें भार फुटती । परि वीरांचे तवके तुटती । जैसा वळिया घालुनि घेती । भेरी उठतां ॥ ४ ॥ ऐसे अवेघच उठतां । परदळाची कोण चिंता । हरणें लोळवी चित्ता । देखत जैसा ॥ ५ ॥ मर्दे तकवा सोडूं नये । म्हणजे प्राप्त होतो जय । कार्य प्रसंग समय । ओळखावा ॥ ६ ॥ दोन्ही दळें एकवटें । मिसळतातीं लखलखाटें । युद्ध खणखणाटें । सीमा सांडूनी ॥ ७ ॥ मराठा तेतुका मेळवावा । आपुला महाराष्ट्र धर्म वाढवावा । येविषयीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ॥ ८ ॥ मरणहाक तो चुकेना । देह वांचवितां वांचेना । विवेक होऊनि समजाना । काय करावें ॥ ९ ॥ देवद्रोही तितुके कुत्ते । मारूनि घालावे परते । देवदास पावती फत्ते । येदर्थी संशय नाहीं ॥ १० ॥

देव मस्तकीं धरावा। अवघा हलकल्लोळ करावा। मुलुख बुडवा कां बुडवावा। धर्मसंस्थापनेसाठीं ॥ ११ ॥ अहो हे तुळजाभवानी। प्रसिद्ध रामवरदायिनी। रामदास ध्यातो मनीं। यन्निमित्त ॥ १२ ॥

(२)

ऐसा पाहिजे राजा

गनीमाच्या देखतां फौजा। रणशूरांच्या फुर्फुरती भुजा। ऐसा पाहिजे राजा। कैपक्षी परमार्थी ॥ १ ॥ तयास देखतां दुर्जन धाके। बैसती प्रचीतीचे तडाखे। वंडपाखांडाचे वाखे। सहजचि होती ॥ २ ॥ हीं धूर्तपणाची कामें। राजकारण करावें नेमें। ढिलेपणाच्या संभ्रमें। जाऊं नये ॥ ३ ॥ हुंव्यास हुंवा लावून द्यावा। टोणप्यास टोणपा आणावा। लौंदापुढें उभा करावा। दुसरा लौंद ॥ ४ ॥ धटासी आणावा धट। उद्धटासी पाहिजे उद्धट। खटनटासी खटनट। अगत्य करी ॥ ५ ॥ जैशास तैसा जेव्हां भेटे। तेव्हां मजलासी थाटे। इतुकें होतें परी धणी कोठें। दृष्टीस न पडे ॥ ६ ॥

(३)

धीर धरा! धीर धरा!

खलेलें खेकटीं खत्री। खलखला खर्खरे खरे। खवदारी खुसी खासा। जेथें तेथें विटेचिना ॥ १ ॥ धीर्धरा धीर्धरा तकवा। हडबडूं गडबडूं नका ॥ काळ देखोनि वर्तावें। सांडावें भय पोटींचें ॥ २ ॥ धरावा धीर तो मोठा। विचारें पाहतां बरें। अधीर माणसें खोटीं। काम कांहीं कळेचिना ॥ ३ ॥ धाकेंचि चळचळां कांपे। भेणेंचि फळफळां मुते। बोबडी पडिली तोंडीं। घाबिरे चाचिरे पडे ॥ ४ ॥ खादाड आळसी मंदू। सूचना ते कळेचिना। प्रसंगीं चळचळां कांपे। तो प्राणी आत्मघातकी ॥ ५ ॥

४ करुणाष्टकें

(१)

अनुदिन अनुतापें तापलों रामराया। परम दिनदयाळा! नीरसी मोहमाया ॥ अचपळ मन माझें नावरे आवरीतां। तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां ॥ १ ॥ भजनरहित रामा सर्वही जन्म

गेला । स्वजनजनधनाचा वेंर्थ म्यां स्वार्थ केला ॥ रघुपति! मति माझी आपुलीशी करावी। सकळ त्यजुनि भावें कांस तूझी धरावी ॥ २ ॥ तनुमनधन माझें राघवा! रूप तूझें। तुजविण मज वाटे सर्व संसार वोझें ॥ प्रचलित न करावी सर्वथा बुद्धि माझी। अचळ भजनलीळा लागली आस तूझी ॥ ३ ॥ चपळपण मनाचें मोडितां मोडवेना। सकळ स्वजन माया तोडितां तोडवेना ॥ घडिघडि विघडे हा निश्चयो अंतरींचा। म्हणउनि करुणा हे बोलतों दीन वाचा ॥ ४ ॥ जळत हृदय माझें जन्म कोट्यानुकोटी। मजवरि करुणेचा राघवा पूर लोटी ॥ तळमळ निववीं रे राम कारुण्यसिंधू। षड्रिपुकुळ माझें तोडिं याचा समंधू ॥ ५ ॥ तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी। सिणत सिणत पोटीं पाहिली वास तूझी ॥ झडकरि झड घालीं धांव पंचानना रे। तुजविण मज नेती जंबुकी वासना रे ॥ ६ ॥ स्वजन-जनधनाचा कोण संतोष आहे। रघुपतिविण आतां चित्त कोठें न राहे ॥ जिवलग जिव घेती प्रेत सांडूनि जाती। विषय सकळ नेती मागुता जन्म देती ॥ ७ ॥ उपरति मज रासीं जाहली पूर्णकामीं। सकळजनविरामीं रामविश्रामधामीं ॥ घडि घडि मन आतां रामरूपीं भरावें। रविकुळटिळका! रे आपुलेंसें करावें ॥ ८ ॥

( २ )

समाधान साधूजनाचेनि योगें। परी मागुतें दुःख होतें वियोगें ॥
घडीनें घडी शीण अत्यंत वाटे। उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ १ ॥
घरें सुंदरें सौख्य नानापरीचें। परी कोण जाणेल हें अंतरींचें ॥
मनीं आठवीतांचि तो कंठ दाटे। उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥२॥
वळें लावितां चित्त कोठें जडेना। समाधान तें कांहिं केल्या घडेना ॥
नव्हे धीर नैनीं सदा नीर लोटे। उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥३॥
अवस्था मनीं लागली काय सांगों। गुणी गुंतला हेत कोणासि मागों ॥
बहुसाल भेटावया प्राण फूटे। उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥४॥
अहा रे विधी! त्वां असें काय केलें। पराधीनता पाप माझें उदेलें ॥
बहूतांमधें चूकतां तूक तूटे। उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ५ ॥

समर्था! मनीं सांडि माझी नसावी। सदा-सर्वदा भक्तचिंता असावी॥ घडेना तुझा योग हा! प्राप्त खोटें। उदासीन हा काळ कोठें न कंठे॥ ६॥ म्हणे दास मी वास पाहे दयाळा। रघूनायका भक्तपाळा भुपाळा॥ पहावें तुला हें जिवीं आर्त मोठें। उदासीन हा काळ कोठें न कंठे॥ ७॥

(३)

तुझिया वियोगें जीवित्व आलें। शरीरपांगें वहु दुःख जालें॥ अज्ञानदारिद्य माझें सरेना। तुजवीण रामा मज कंठवेना॥ १॥ विश्रांति देहीं अणुमात्र नाहीं। कुळाभिमानें पडिलों प्रवाहीं॥ स्वहीत माझें होतां दिसेना तुजवीण रामा मज कंठवेना॥ २॥ विषयीं जनानें मज लाजवीलें। प्रपंचसंगें आयुष्य नेलें॥ समयीं वहु क्रोध शांती घडेना। तुजवीण रामा मज कंठवेना॥ ४॥

(४)

दुःखानळें मी संतप्त देहीं। तुजवीण रामा विश्रांति नाहीं॥ आधार तूझा मज मी विदेसी। सर्वोत्तमा! कैं मज भेटि देसी? ॥ १॥ संसारचिंता मज वाटते रे। रामा प्रपंचीं मन जातसे रे॥ संसर्ग आहे इतरां जनासी। सर्वोत्तमा! कैं मज भेटि देसी?॥ ३॥

(५)

नसे भक्ति ना ज्ञान ना ध्यान कांहीं। नसे प्रेम हे रामविश्राम नाहीं॥ असा दीन अज्ञान मी दास तूझा। समर्था जनीं घेतला भार माझा॥ १॥ रघूनायका! जन्मजन्मांतरींचा। अहंभाव छेदूनि टाकीं दिनाचा॥ जनीं बोलती दास या राघवाचा। परी अंतरीं लेश नाहीं तयाचा॥२॥ रघूनायका! दीन हातीं धरावें। अहंभाव छेदूनियां उद्धरावें॥ अगूणी तयालागिं गूणी करावें। समर्थें भवसागरीं ऊतरावें॥ ३॥ मज कोवसा राम कैवल्यदाता। तयाचेनि हें फीटली सर्व चिंता॥ समर्था तया काय उत्तीर्ण व्हावें। सदा-सर्वदा नाम वाचे वदावें॥ ४॥ दिनाचें उणें दीसतां लाज कोणा। जनीं दास तूझा दिसे दैन्यवाणा॥ शिरीं स्वामि तूं राम पूर्णप्रतापी। तुझा दास पाहे सदा शीघ्रकोपी॥ ५॥

( ६ )

युक्ति नाहीं बुद्धि नाहीं विद्या नाहीं विवंचिता। नेणता भक्त मी तूझा बुद्धि दे रघुनायका ॥ १ ॥ मन हें आवरेना कीं वासना वावरे सदा। कल्पना धांवते सैरा बुद्धि दे रघुनायका ॥ २ ॥ अन्न नाहीं वस्त्र नाहीं सौख्य नाहीं जनांमध्यें। आश्रयो पाहतां नाहीं बुद्धि दे रघुनायका ॥ ३ ॥ बोलतां चालतां ये ना कार्यभाग कळेचिना। बहु मी पीडिलों लोकीं बुद्धि दे रघुनायका ॥ ४ ॥ तुझा मी टोणपा जालों कष्टलों बहुतांपरी। सौख्य तें पाहतां नाहीं बुद्धि दे रघुनायका ॥५॥ नेटकें लिहितां ये ना वाचितां चुकतों सदा। अर्थ तो सांगतां ये ना बुद्धि दे रघुनायका ॥ ६ ॥ उदास वाटतें जीवीं आतां जावें कुणीकडे। तूं भक्तवत्सला रामा बुद्धि दे रघुनायका ॥ ७ ॥ काया-वायाचामनोभावें तुझा मी म्हणवीतसें। हे लाज तुजला माझी बुद्धि दे रघुनायका ॥ ८ ॥ सोडवील्या देवकोटी भूमार फेडिला वळें। भक्तांसी आश्रयो मोठा बुद्धि दे रघुनायका ॥ ९ ॥ उदंड भक्त तुम्हांला आम्हांला कोण पूसतें। ब्रीद राखणें आधी बुद्धि दे रघुनायका ॥ १० ॥ उदंड ऐकिली कीर्ति पतितपावना प्रभो। मी एक रंक दुर्बुद्धि बुद्धि दे रघुनायका ॥ ११ ॥ आशा हे लागली मोठी दयाळू वा दया करीं। आणिक नलगे कांहीं बुद्धि दे रघुनायका ॥ १२ ॥ रामदास म्हणे माझा संसार तुज लागला। संशय वाटतो पोटीं बुद्धि दे रघुनायका ॥ १३ ॥

( ७ )

उदासीन हे वृत्ति जीवी धरावी। अतीं आदरें सर्व सेवा करावी। सदा प्रीति लागो तुझे गूण गातां। रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ १ ॥ तुझें रूपडें लोचनीं म्यां पहावें। तुझे गूण गातां मनासी रहावें ॥ उठो आवडी भक्तिपंथीचे जातां। रघू० ॥ २ ॥ मनीं वासना भक्ति तूझी करावी। कृपाळूपणें राघवें पूरवावी ॥ वसावें मज अंतरीं नाम घेतां। रघू० ॥ ३ ॥ सदा-सर्वदा योग तूझा घडावा। तुझे कारणीं देह माझा पडावा ॥ नुपेक्षीं मज गूणवंता अनंता। रघू० ॥ ४ ॥ भवें तापलों प्रीतिछाया

करावी । कृपासागरें सर्व चिंता हरावी ॥ मज संकटीं सोडवावें समर्था । रघू० ॥ ५ ॥ मनीं कामना कल्पना नसावी । कुबुद्धि कुडी वासना निरसावी ॥ नको संशयो तोडिं संसारवेथा । रघू ० ॥ ६ ॥ समर्थापुढें काय मागूं कळेना । दुराशा मनीं वैसली हे ढळेना ॥ पुढें संशयो नीरसीं सर्व चिंता । रघू० ॥ ७ ॥ ब्रिदाकारणें दीन हातीं धरावें । म्हणे दास भक्तासि रे उद्धरावे ॥ सुटे ब्रीद आम्हांस सांडूनि जातां । रघू० ॥ ८ ॥

(८)

## येथें उभा कां श्रीरामा

येथें उभा कां श्रीरामा । मनमोहन मेघश्यामा ॥ चापवाण काय केलें । कर कटावरी ठेविले ॥ कां वा धरिला अवोला । दिसे वेष पालटला ॥ काय जाली अयोध्यापुरी । येथें वसविली पंढरी ॥ शरयुगंगा काय केली । कैंची भीमा मेळविली ॥ किल्किलाट वानरांचे । थवे न दिसती तयांचे ॥ दिसे हनुमंत एकला । हा कां सैन्यांतुनि फूटला ॥ काय जाली सीतासती । येथें वहुत जन दिसती ॥ रामदासी सद्भाव जाणा । राम जाला पंढरिराणा ॥

(९)

( मराठींतील कांहीं अत्यंत गोड व लोकप्रिय व भक्तिपूर्ण अशीं पदें पुढें दिलीं आहेत. हीं मराठींतील भावनापूर्ण प्रार्थनागीतेंच होत. )

## पदें

(१)

असा कसा देवाचा देव वाई ठकडा । देव एका पायानें लंगडा । ग वाई ॥ असा० ॥ ध्रु० ॥ गवळयाघरिं जातो । दहीं-दूध खातो । करि दह्या-दुधाचा रवडा । ग वाई ॥ असा० ॥ १ ॥ शिंकेंचि तोडितो । मडकेंचि फोडितो । पाडि नवनीताचा तो सडा । ग वाई ॥ असा० ॥ २ ॥ वाळवंटीं जातो । कीर्तन करितो । घेतो साधु-संतांसि झगडा । ग वाई ॥ असा० ॥ ३ ॥ एकाजनार्दनिं । भिक्षा वाढा वाई । देव एकनाथान्चा बचडा । ग वाई ॥ असा० ॥ ४ ॥

(२)

तें मन निष्ठुर कां केलें। जें पूर्ण दयेनें भरलें ॥ ध्रु० ॥ गजेंद्राचे हांकेसरसें। कळवळुनी गेलें ॥ १ ॥ प्रल्हादाच्या भावार्थासी। स्तंभीं गुरगुरलें ॥ २ ॥ पांचाळीच्या करुणावचनें। धांवुनियां आलें ॥ ३ ॥ एकाजनार्दन पूर्णकृपेनें। निशि-दिनिं पदिं रमलें ॥ ४ ॥

(३)

तूं माझा यजमान। रामा ॥ ध्रु० ॥ जननीजठरीं रक्षियलें मज। पोसुनि पंचहि प्राण ॥ रामा० ॥ १ ॥ बाहेर निघतां मातेचे स्तनिं। पय केलें निर्माण ॥ रामा० ॥ २ ॥ ऐसें असतां या पोटाची। कां करुं चिंता जाण ॥ रामा० ॥ ३ ॥ मध्वमुनीश्वर स्वामि रमापति। धरिं माझा अभिमान ॥ रामा० ॥ ४ ॥

(४)

माझं अचडं वचडं छकडं। माझं० ॥ ध्रु० ॥ विकसितपंकजलोचन ज्याचे। जननि म्हणे हें चिपडं ग ॥ माझं० ॥ १ ॥ त्रिभुवनपालक बालक त्याला। पांघरविते घोंगडं ग ॥ माझं० ॥ २ ॥ अंगणिं रांगत मंजुळ बोलत। माझं सोन्याचं ठिगडं ग ॥ माझं० ॥ ३ ॥ मध्वमुनीश्वर खेळवि अंकीं। ब्रह्मसनातन उघडं ग ॥ माझं० ॥ ४ ॥

(५)

भक्तांचीया काजासाठीं। साधूंचीया प्रेमासाठीं सोडिली मीं लाज रे ॥ ध्रु० ॥ दुर्योधनसदनीं गेलों। विदुराच्या गृहा आलों। आवडीनें कण्या प्यालों। जोंधळ्याची पेज रे ॥ भक्तां० ॥ १ ॥ धुतों अर्जुनाचे घोडे। सदा राहे मागें पुढें। घाली अंगणांत सडे। बांधूनिया मार्जे रे ॥ भक्तां० ॥ २ ॥ वेडीं गौळियांचीं पोरें। त्यांचें ताक प्यालों बा रे। खातां भिल्लीणीचीं बोरें। उच्छिष्टाची चोज रे ॥ भक्तां० ॥ ३ ॥ पूर्णब्रह्म म्हणती मातें। सर्वब्रह्म मीच त्यातें। ऐसियासी जाणीव ते। धरी अमृतराय रे ॥ भक्तां० ॥ ४ ॥

(६)

स्मरतां नित्य हरी। मग ते माया काय करी ॥ ध्रु० ॥ श्रवणें मननें अद्वयवचनें। पळतो काळ दुरी ॥ १ ॥ करुणाकर वरदायक

हरि जो। ठेवित हात शिरीं ॥ २ ॥ तोचि निरंतर उद्धवचरणीं। अमृतपान करी ॥ ३ ॥

(७)

हरि मज कसा करिल भवपार ॥ ध्रु० ॥ तन मन धन विषयांवरि वळतें। भजनीं आळस फार ॥ १ ॥ स्वात्मबुद्धि विचारुनि पाहीं। कोणि न करि उपकार ॥ २ ॥ अमृत म्हणे तुम्हि भजा निरंतर। श्रीधरगुरुचे पाय ॥ ३ ॥

(८)

धांव पाव सावळे विठाबाई कां मनिं धरिली अढी। अनाथ मी अपराधी स्मरतों उतरा पैलथडी। विठोवा कां मनिं ॥ ध्रु० ॥ एकनाथाघरीं पाणि वाहिलें गंगेच्या कावडी। कवीराचे ते शेले विणुनी त्याची घालिसि घडी ॥ कां० ॥ १ ॥ सांवत्यामाळ्याची भाजी खुडुनी त्याची बांधिसि जुडी। नरसीमेहत्याची हुंडी पटवुनि त्याचा झालासि गडी ॥ कां० ॥ २ ॥ जनाबाईचीं लुगडीं धुतलीं चंद्रभागेच्या थडी। सजन कसाई मांस विकतो त्याची लाविसी धडी ॥ कां० ॥ ३ ॥ दामाजीपंताचे वेळीं झाला महार तांतडी। पायीं वहाणा हातीं काठी खांद्यावर घोंगडी ॥ कां० ॥ ४ ॥ चोखामेळ्याचे घरीं येउनी ओढिसी ढोरें तांतडी। त्याची स्त्री बहु हाका मारी कोठें दिधली दडी ॥ कां० ॥ ५ ॥ गजेंद्राचा धांवा ऐकुनि वेगें घालिसी उडी। अर्जुनरथिं सारथ्य करूनी फेडिसी त्याचीं सांकेडीं ॥ कां० ॥ ६ ॥

(९)

अजि मी ब्रह्म पाहिलें

अजि मी ब्रह्म पाहिलें अगणित सुरगण वर्णीती ज्यासी कटिकर नटसम चरण विटेवरी उभे राहिले ॥ धृ० ॥ एकनाथाच्या भक्तिसाठीं, धांवत आला तो जगजेठी। खांदी कावड आवड मोठी, पाणी वाहिलें ॥ १ ॥ चोख्यासंगे ढोरे ओढितां, शिणला नाहीं तो तत्वता। जनीसंगे दळितां कांडिता, गाणें गायिलें ॥ २ ॥ दामाजीची

रासिद् पटविली, कान्होपात्रा ती उद्धरिली। अमृतराय म्हणे ऐसी माऊली, संकटा वारिले ॥ ३ ॥

(७)

सुश्लोक वामनाचा

वानोत निंदोत सुनीतिमंत। चळो असो वा कमला गृहांत ॥ हो मृत्यु आजीच घडो युगांतीं। सन्मार्ग टाकूनि भले न जाती ॥१॥ कीं तोडिला तरु फुटे आणखी भरानें। तो क्षीणही विधु महोन्नति घे क्रमाने ॥ जाणोनि हें सुजन ज्या दुवळीक आली। त्यांचीं कदा न करिती सहसा टवाळी ॥ २ ॥ वृक्ष फार लवती फलभारें लोंवती जलद घेउनि नीरें ॥ थोर गर्व न धरी विभवाचा। हा स्वभाव उपकार-परांचा ॥ ३ ॥ पुष्पापरी दों परिचीच साची। हे वृत्ति संभावित जे तयांची ॥ लोकांचिये एक शिरीं सजावें। वनींच कीं एक सुकोनि जावें ॥ ४ ॥ सुनितिपथ सेवणें मलिन कर्म मानेच ना। घडो मरण, नावडे खलजनांप्रति प्रार्थना ॥ विपत्तिसमयींहि जो प्रगटवीच ना दीनता। भल्याविण असें असिव्रत करूं शके कोणता ? ॥ ५ ॥ झाला क्षीण वहू क्षुधेस्तव जरी, कीं व्यापिला वार्धकें। आली कष्टदशा, घडो मरणही, कीं तेज गेलें निकें ॥ ऐसाही मृगराज जीर्ण तृण तो खाईल कीं काय हा ?। शौर्यें भेदुनि हस्ति-मस्तक-शुभ-ग्रासींच ज्याला स्पृहा ! ॥ ६ ॥ विपत्कालीं धैर्य प्रभुपणिं सहिष्णुत्व वरवें। सभे पांडित्याचा प्रसर, समरीं शौर्य मिरवे ॥ स्वकीर्तीच्या ठायीं प्रचुर रति, विद्या व्यसन जें। तयांचे हे स्वाभाविक गुण सदा सत्पुरुष ते ॥ ७ ॥ चंद्राला दिवसां प्रकाश नसणें, ये कामिनीला जरा। पद्मावीण तळें, निरक्षर मुखीं जो साजिरा गोजिरा ॥ दात्याला धनलोभ, नित्य वसतें दारिद्र्य विद्वज्जनीं। दुष्टाचा पगडा महीपतिगृहीं, हीं सात शल्यें मनीं ॥८॥ विद्या हें पुरुषास रूप वरवें, कीं झाकलें द्रव्यहि। विद्या भोगसुकीर्तिदायक पहा ! ते मान्य मान्यांसहि ॥ विद्या बंधु असे विदेशगमनीं, विद्या महादेवता। विद्या पूज्य, नृपास, हा नरपशू ती वेगळा तत्त्वतां ॥ ९ ॥

(८)

## नळराजाचें उद्यान

फनस जंबू जंबीर विविध निंबें।
कुंद चंदन माकंद दाडलिंबें।
तुंग नारिंगें विकसलीं कदंबें।
वसति जेथें शुकसारिका कदंबें ॥ १ ॥

लतेतळीं रुंद निरुंद कालवे।
गळोनि तेथें मकरंद कालवे।
परागहि सांद्र तयांत रंगती।
फुलांसवें भृंगतती तरंगती ॥ २ ॥

उपरि कंटक साचे।
परंतु सांचे जयांत सुरसाचे।
घोंस तसे फणसाचे।
षण्मासांचे कितेक वरसाचे ॥ ३ ॥

तया वनीं एक तटाक तोयें।
तुडुंबलें तामरसानपायें।
निरंतरामंद मरंद वाहे।
तयांतही यास्तव रिक्त नोहे ॥ ४ ॥

अमृतही पयही म्हणवीतसे।
उभय होय तसी रुचि वीतसे।
मधुर सारस तें जलगा तसें।
मधुर सारस यास्तव गातसे ॥ ५ ॥

वीतां मरंद उदरंभर वंभराचे।
जें होय मंदिरहि सुंदर इंदिरेचें।
तें पद्म जेथिल सहस्रदळा धरीतें।
प्रत्येक सूर्य किरणास विकासवीतें ॥ ६ ।

तया सरोवरीं राजहंस पाहे।
राजहंसांचा कळप पोहताहे।

तयासाठीं हे वापिकाचि पोहे ।
नळें केली हे कोण म्हणे नोहे ॥ ७ ॥
तया हंसाचे देह काञ्चनाचे ।
पक्ष झळकति वीज जशी नाचे ।
रंग माणिक चंचुचे पदांचे ।
जसे अधरींचे भीमकन्यकेचे ॥ ८ ॥
तेथील एक कलहंस तटीं निजेला ।
जो भागला जलविहार विशेष केला ।
पोटींच एक पद लांबविला दुजा तो ।
पक्षीं तनू लपवि, भूप तया पहातो ॥ ९ ॥

—रघुनाथ पंडित-

## (९)

### मयुराच्या केका

‘अगा प्रणतवत्सला!’ म्हणति त्या जनां पावलां ।
म्हणोन तुमच्याच मी स्मरतसें सदा पावलां ॥
‘करूं वरि कृपा, हरूं व्यसन, दीन हा तापला,’ ।
असें मनीं धरा; खरा भरवसा मला आपला ॥ १ ॥
मला निरखितां भवच्चरणकन्यका आपगा- ।
म्हणे, ‘अगइ! ऐकिलेंहि न कधीं असें पाप गा’ ॥
कर श्रवणिं ठेविते, नुघडि नेत्र, घे भीतिला, ।
न घालिन भिडेस मी, जरिहि कार्यलोभी तिला. ॥ २ ॥
दयाब्द वळशील तूं तरि न चातकां सेवकां— ।
उणें किमपि, भाविकां उबगशील तूं देव कां? ।
अनन्यगतिका जना निरखितांचि सोपद्रवा ।
तुझेंचि करुणार्णवा! मन धरी उमोप द्रवा. ॥ ३ ॥
तरेन तुमच्या बळें भवमहानदी नाविका, ।
तुम्हींच मग आतरास्तव मला सुदीना विका ॥

असें विदित वासही मज सदाश्रमींचा, करा- ।
दया, गुण पहा, सवें मज सदा श्रमीं चाकरा. ॥ ४ ॥

धना परिजना घरीं तुमचिया उणें कायसें ? ।
न लाभ मणिहेमभूपतिस जोडिल्या आयसें ॥
परि प्रभुहि संग्रहीं सकल वस्तुंला ठेविती ।
गुणा न म्हणतां उणा अधिक आदरें सेविती ॥ ५ ॥

अतर्क्य महिमा तुझा गुणहि फार, वा ! हे विधी- ।
श्रुतिज्ञहि म्हणे सदा, स्तविल आमुची केंवि धी ? ॥
तरी जन यथामति स्तवुनि जाहले सन्मती, ।
स्तवार्थ तुझिया, तुझ्यासम कवी कधीं जन्मती ? ॥ ६ ॥

प्रभो ! शरण आलियावरि न व्हां कधीं वांकडे; ।
म्हणोनि इतुकेंच हें स्वहितकृत्य जीवांकडे ॥
प्रसाद करितां नसे पळ विलंब, बापा ! खरें ।
घनांबु न पडे मुखीं उघडिल्याविना पांखरें ॥ ७ ॥

कृतान्तकटकामलध्वजजरा दिसों लागली, ।
पुरःसरगदांसवें झगडतां तनू भागली. ॥
सहाय दुसरा नसे तुजविणें बळें आगळा, ।
न हों जरि उताविळा, स्वरिपु कापितो हा गळा ॥ ८ ॥

न जें प्रिय, सदोष तें; प्रिय सदोषही चांगलें; ।
स्वतोक पितरां रुचे, जरिहि कर्दमीं रांगलें ! ॥
तुलाचि धरि पोटिशीं कशि तदा यशोदा वरें ।
जरी मळविशी रजोमलिनकाय तूं अंबरें ! ॥ ९ ॥

पिता जरि विटे, विटो; न जननी कुपुत्रीं विटे ।
दयामृतरसार्द्रधी न कुलकज्जलें त्या किटे ॥
प्रसादपट झांकिती परि परा गुरुचे थिटे ।
म्हणूनि म्हणती भले ' न ऋण जन्मदेचें फिटे ' ॥ १० ॥

(१०)

( पुढें कांहीं भूपाळ्या दिल्या आहेत. हीं भूप रागांत आळविलेलीं प्रातः स्तवनेंच होत. )

(१)

### भूपाळी गणपतीची

उठा उठा सकळिक । वाचे स्मरावा गजमुख । ऋद्धि-सिद्धींचा नायक । सुखदायक भक्तांसी । सुख दायक दासांसी ॥ ध्रु० ॥ अंगीं शेंदुराची उटी । माथां शोभतसे कीरिटी । केशरकस्तूरी ललाटीं । कंठीं हार साजिरा ॥ १ ॥ कानीं कुंडलांची प्रभा । चंद्र-सूर्य जैसे नभा । माजी नागबंदी शोभा । स्मरतां उभा जवळी तो ॥ २ ॥ कांसे पीतांबराची धटी । हातीं मोदकांची वाटी । रामानंद स्मरतां कंठीं । तो संकटीं पावतो ॥ ३ ॥

(२)

### भूपाळी श्रीकृष्णाची

ऊठिं गोपाळजी ! जाई धेनूंकडे । पाहती सौंगडे वाट तूझी ॥ ध्रु० ॥ लोपली हे निशी मंद झाला शशी । मुनिजन मानसी ध्याति तुजला ॥ १ ॥ भानु-उदयाचळीं तेज पुंजाळलें । विकसती कमळें जळामाजीं ॥ २ ॥ धेनुवत्सें तुला वाहती माधवा । ऊठ गा यादवा ! उशिर झाला ॥ ३ ॥ ऊठ पुरुषोत्तमा ! वाट पाहे रमा । दावि मुखचंद्रमा सकळिकांसी ॥ ४ ॥ कनकपात्रांतरीं दीपरत्नें वरीं । ओवाळिती सुंदरी तूजलागीं ॥ ५ ॥ जन्मजन्मांतरीं दास होऊं हरी । बोलती वैखरी भक्त तूझे ॥ ६ ॥ कृष्णकेशव करीं चरणांबुज धरी । ऊठ गा श्रीहरी मायबापा ॥ ७ ॥

(३)

### भूपाळी घनश्याम श्रीधराची

घनश्यामसुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला । उठिं लवकरि वनमाळी ! उदयाचळीं मित्र आला ॥ ध्रु० ॥ सायंकाळीं एके मेळीं द्विजगुण अवघे वृक्षीं । अरुणोदय होतांचि उडाले चरावया पक्षी ॥

अघमर्षणादि करुनि तापसी तपाचरण-दक्षी । प्रभातकाळीं उठुनि कापडी तीर्थपंथ लक्षी ॥ करुनि सडासंमार्जन गोपी कुंभ घेउनि कुक्षीं । यमुनाजळासि जाति मुकुंदा! दध्योदन भक्षीं ॥ मुक्तता होऊं पाहे । कमळणीपासुनिया भ्रमरा ॥ पूर्वदिशे मुख धुतलें । होतसे नाश तिमिरा ॥ उठिं लवकरि गोविंदा । सांवळ्या नंदकुमारा ॥ मुखप्रक्षालन करीं । अंगिकारीं भास्कर-काला ॥ उठिं ॥ १ ॥

घरोघरीं दीप अखंड त्यांच्या सरसावुनि वाती । गीत गाति सप्रेमें गोपी सदना येति जाति ॥ प्रवर्तोनि गृहकामीं रंगावळि घालूं पाहती । आनंदकंदा प्रभात झाली उठ सरली राति । काढी धार क्षीरपात्र घेऊनि धेनू हंवरती । दारिं उभे गोपाळ तुजला हांक मारुनि वाहती ॥ घे सुमनहार कंठीं घालि या गुंजमाळा । हातीं वेत्रकाष्ठ धरावें कांवळा घेई काळा । ममात्मजा मधुसूदना हृषिकेशि जगत्पाळा । हंवरताति वांसरें धेनुस्तन पान्हा आला ॥ उठिं ॥ २ ॥

प्रातःस्नानें करूनि गोपिका अलंकार नटती । कुंकुमादि चर्चुनी मंथनालागि आरंभिती । प्रेमभरित अंतरांत वदनी नामावळि गाती । अर्घ्यदान देउनियां द्विजजन देवतार्चन करिती ॥ नेमनिष्ठ वैष्णव ते विष्णु-पूजा समर्पिती । स्मार्त शिवार्चनसक्त, शक्तितें शाक्त आराधीती ॥ ऋषिगण आश्रमवासी । जे कां निरंजनीं धाले ॥ अरुणोदय होतांचि । आपुलें ध्यानिं मग्न झाले ॥ पंचपंच-उषःकालीं । रविचक्र निघों आलें ॥ एवढा वेळ निजलासि म्हणुनि हरि कळेल नंदाला ॥ उठिं ॥ ३ ॥

विद्यार्थी विद्याभ्यासास्तव सादर गुरुपायीं । अध्यापन गुरु करिती शिष्यही अध्ययना उदयीं ॥ याज्ञिकजन यज्ञकुंडिं आहुति टाकिताति पाहीं । रविप्रभा पडुनियां उजळल्या शुद्ध दिशा दाही ॥ हे माझे सांवळे पाडसे उठिं कृष्णाबाई । सिद्ध सवें बळिराम घेउनि गोधनें वना जाई ॥ मुनिजनमानसहंसा । गोपीमनःकमलभृंगा ॥ मुरहर पंकजपाणी । पद्मनाभ श्रीरंगा ॥ शकटांतक सर्वेशा । हे हरि प्रतापतुंगा ॥ कोटिरवींहुनि तेज आगळें तुझिया

वदनाला । होनाजी बाळा नित्य ध्यातसे हृदयीं नाममाळा ॥ उठिं ॥ ४ ॥

(११)

## देवांच्या आरत्या

(१)

### आरती गणपतीची

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची। नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची । सर्वांगीं सुंदर उटि शेंदुराची । कंठीं झळके माळ मुक्ताफळांची ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती । दर्शनमात्रें मनःकामना पुरती ॥ ध्रु० ॥ रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा । चंदनाची उटी कुंकुमकेशरा ॥ हिरेजडित मुगुट शोभतो बरा । रुणझुणती नूपुरें चरणीं घागरिया ॥ २ ॥ लंबोदर पितांबर फणिवरबंधना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ॥ दास रामाचा वाट पाहे सदना । संकटीं पावावें निर्वाणी रक्षावें सुरवरवंदना ॥ ३ ॥

(२)

### आरती शंकराची

लवथवती विक्राळा ब्रह्मांडीं माळा । वीषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा ॥ लावण्यसुंदर मस्तकीं बाळा । तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळां ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय श्रीशंकरा । आरती ओवाळूं तुज कर्पूरगौरा ॥ ध्रु० ॥ कर्पुरगौरा भोळा नयनीं विशाळा । अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा ॥ विभुतीचें उधळण शितिकंठ नीळा । ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ॥ २ ॥ देवीं दैत्यीं सागरमंथन पैं केलें । त्यामाजीं अवचित हळहळ जें उठलें ॥ तें त्वां आनंदें प्राशन केलें । 'नीलकंठ' नाम प्रसिद्ध झालें ॥ ३ ॥ व्याघ्रांबर-फणिवरधर सुंदर मदनारी । पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी ॥ शतकोटीचें बीज वाचे उच्चारी । रघुकुळटिळक रामदासा-अंतरीं ॥ ४ ॥

(३)

### आरती देवीची

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारीं । अनाथनाथे अंबे करुणा विस्तारीं। वारीं वारीं जन्म-मरणांतें वारीं। हारीं पडलों आतां संकट नीवारी ॥ १ ॥ जयदेवी जयदेवी महिषासुरमथनी । सुरवर-ईश्वर-वरदे तारक संजिवनी ॥ ध्रु०॥ त्रिभुवनभुवनीं पाहतां तुजऐशी नाहीं । चारी श्रमले परंतु न बोलवे कांहीं । साही विवाद करितां पडले प्रवाहीं । ते तूं भक्तांलागीं पावसि लवलाही ॥ २ ॥ प्रसन्न-वदने प्रसन्न होसी निजदासां। क्लेशांपासुनि सोड तोडी भवपाशा ॥ अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा । नरहरि तल्लिन झाला पदपंकजलेशा ॥ ३ ॥

(४)

### आरती मारुतीची

सत्राणें उड्डाणें, हुंकार वदनीं । करि डळमळ भूमंडळ सिंधूजळ गगनीं ॥ कडाडिलें ब्रह्मांड धोका त्रिभुवनीं । सुरवर, नर निशाचर त्यां झाल्या पळणी ॥ जयदेव जयदेव जय श्रीहनुमंता । तुमचेनि प्रसादें न भियें कृतांता ॥ ध्रु० ॥ दुमदुमिलें पाताळ उठिला पडशब्द । धगधगिला धरणीधर मानिला खेद ॥ कडाडिले पर्वत उड्डुगण उच्छेद । रामीरामदासा शक्तीचा शोध ॥ २ ॥

(५)

### आरती विठ्ठलाची

युगें अठ्ठावीस विटेवरी उभा। वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा । पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आलें गा। चरणीं वाहे भीमा उद्धरीं जगा ॥ १ ॥ जय देव जय देव जय पांडुरंगा । रखुमाईवल्लभा राहीच्या वल्लभा पावें जिवलगा ॥ जय देव० ॥ ध्रु० ॥ तुळसीमाळा गळां कर ठेवुनि कटीं। कांसे पितांबर कस्तुरि लल्लाटीं ॥ देव सुरवर नित्य येती भेटी। गरुड-हनुमंत पुढें उभे राहती ॥ २ ॥ धन्य वेणुनाद अनुक्षेत्रपाळा। सुवर्णाचीं कमळें वनमाळा गळां ॥

वदनाला। होनाजी बाळा नित्य ध्यातसे हृदयिं नाममाळा ॥ उठिं ॥ ४ ॥

( ११ )

## देवांच्या आरत्या

( १ )

### आरती गणपतीची

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची। नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची। सर्वांगीं सुंदर उटि शेंदुराची। कंठीं झळके माळ मुक्ताफळांची ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती। दर्शनमात्रें मनःकामना पुरती ॥ ध्रु० ॥ रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा। चंदनाची उटी कुंकुमकेशरा ॥ हिरेजडित मुगुट शोभतो बरा। रुणझुणती नूपुरें चरणीं घागरिया ॥ २ ॥ लंबोदर पितांवर फणिवरबंधना। सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ॥ दास रामाचा वाट पाहे सदना। संकटीं पावावें निर्वाणी रक्षावें सुरवरवंदना ॥३॥

( २ )

### आरती शंकराची

लवथवती विक्राळा ब्रह्मांडीं माळा। वीषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा ॥ लावण्यसुंदर मस्तकीं वाळा। तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळां ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय श्रीशंकरा। आरती ओवाळूं तुज कर्पूरगौरा ॥ ध्रु० ॥ कर्पुरगौरा भोळा नयनीं विशाळा। अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा ॥ विभुतीचें उधळण शितिकंठ नीळा। ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ॥ २ ॥ देवीं दैत्यीं सागरमंथन पैं केलें। त्यामाजीं अवचित हळहळ जें उठलें ॥ तें त्वां आनंदें प्राशन केलें। 'नीलकंठ' नाम प्रसिद्ध झालें ॥ ३ ॥ व्याघ्रांवर-फणिवरधर सुंदर मदनारी। पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी ॥ शतकोटीचें वीज वाचें उच्चारी। रघुकुळटिळक रामदासा-अंतरीं ॥ ४ ॥

( ३ )

## आरती देवीची

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारीं । अनाथनाथे अंबे करुणा विस्तारीं। वारीं वारीं जन्म-मरणांतें वारीं। हारीं पडलों आतां संकट नीवारी ॥ १ ॥ जयदेवी जयदेवी महिषासुरमथनी । सुरवर-ईश्वर-वरदे तारक संजिवनी ॥ ध्रु०॥ त्रिभुवनभुवनीं पाहतां तुजऐशी नाहीं । चारी श्रमले परंतु न बोलवे कांहीं । साही विवाद करितां पडले प्रवाहीं । ते तूं भक्तांलागीं पावसि लवलाही ॥ २ ॥ प्रसन्न-वदने प्रसन्न होसी निजदासां। क्लेशांपासुनि सोड तोडी भवपाशा ॥ अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा । नरहरि तल्लिन झाला पदपंकजलेशा ॥ ३ ॥

( ४ )

## आरती मारुतीची

सत्राणें उड्डाणें, हुंकार वदनीं । करि डळमळ भूमंडळ सिंधूजळ गगनीं ॥ कडाडिलें ब्रह्मांड धोका त्रिभुवनीं । सुरवर, नर निशाचर त्यां झाल्या पळणी ॥ जयदेव जयदेव जय श्रीहनुमंता । तुमचेनि प्रसादें न भियें कृतांता ॥ ध्रु० ॥ दुमदुमिलें पाताळ उठिला पडशब्द । धगधगिला धरणीधर मानिला खेद ॥ कडाडिले पर्वत उड्डगण उच्छेद । रामीरामदासा शक्तीचा शोध ॥ २ ॥

( ५ )

## आरती विठ्ठलाची

युगें अठ्ठावीस विटेवरी उभा। वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा । पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आलें गा। चरणीं वाहे भीमा उद्धरीं जगा ॥ १ ॥ जय देव जय देव जय पांडुरंगा । रखुमाईवल्लभा राहीच्या वल्लभा पावें जिवलगा ॥ जय देव० ॥ ध्रु० ॥ तुळसीमाळा गळां कर ठेवुनि कटीं। कांसे पितांबर कस्तुरि ल्लाटीं ॥ देव सुरवर नित्य येती भेटी । गरुड-हनुमंत पुढें उभे राहती ॥ २ ॥ धन्य वेणुनाद अनुक्षेत्रपाळा । सुवर्णाचीं कमळें वनमाळा गळां ॥

राही-रखुमाबाई राणीया सकळा। ओवाळिती राजा विठोबा सांवळा ॥ ३ ॥ ओंवाळूं आरत्या कुर्वंड्या येती। चंद्रभागेमाजीं सोडुनियां देती ॥ दिंड्या पताका वैष्णव नाचती। पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥ ४ ॥ आषाढी कार्तिकी भक्तजन येती। चंद्रभागे-माजीं स्नानें जे करिती। दर्शनहेळामात्रें तयां होय मुक्ती। केशवासी नामदेव भावें ओंवाळिती ॥ जय देव० ॥ ५ ॥

( ६ )

आरती खंडोबाची

पंचानन हयवाहन सुरभूषितलीळा। खंडामंडित दंडितदानव अवलीळा ॥ मणिमल्ला मर्दुनियां जो धूसर पिंवळा। करिं कंकण बाशिंगें सुमनांच्या माळा ॥ १ ॥ जय देव जय देव जय शिव-मल्हारी। वारीं दुर्जन वारीं, तारीं सज्जन तारीं, निंदक अपहारीं ॥ ॥ ध्रु० ॥ सुरवर संवर वर दे मज लागीं देवा। नाना नामें गाइन ही तुमची सेवा। अघटित गुण गावया वाटतसे हेवा। फणिवर शिणला ते किति नरपामर केवा ॥ जय देव० ॥ २ ॥ रघुवरस्मरणीं शंकर हृदयीं नीवाला। तो हा मल्लांतक अवतार झाला। यालागीं आवडी भावें वर्णीला। रामीरामदासा जिवलग भेटला ॥ जय देव० ॥

( ७ )

आरती बहिरोबांची

दक्षिण देशामाजीं भैरव तो देव। क्षेत्रपाल वंदी लोकत्रय भाव। भक्तासी देखूनी चरणीं दे ठाव। देवाचा तारक भैरव तो देव। जयदेव जयदेव जय भैरव देवा। सद्भावें आरती करितों मी देवा ॥१॥ वामांगीं जोगेश्वरी शोभे सुंदर। कासे पीतांबर वाद्यांचा गजर। भक्तासि देखोनि हरि कपाकर। रामदास चरणीं त्या मागें थार ॥ जयदेव जयदेव ॥ २ ॥

( ८ )

आरती ज्ञानेश्वराची

आरती ज्ञानराजा। महाकैवल्यतेजा ॥ सेविती साधुसंत। मनु

साहित्य सोनियाचिया खाणी
अनुक्रम ........ वि: ........
स्थळ ........ नों. दि. ........

वेधला माझा ॥ ध्रु० ॥ लोपलें ज्ञान जगीं । हित नेणती कोणी ॥ अवतार पांडुरंग । नाम ठेविलें ज्ञानी ॥ २ ॥ प्रगट गुह्य बोले । विश्व ब्रह्मचि केलें ॥ रामाजनार्दनीं । पायीं टकाचि ठेलें ॥ ३ ॥ ॥ आरती० ॥

( ९ )

## मंत्रपुष्पांजलि

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् । ते ह नाकं महिमानः सचंत । यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः ॥ ॐ राजाधि-राजाय प्रसह्यसाहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे । स मे कामान् कामकामाय मह्यं, कामेश्वरो वैश्रवणो ददातु । कुवेराय वैश्रवणाय महाराजाय नमः । ॐ स्वस्ति साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्याईस्यात् सार्वभौमः सार्वायुष आतादापरार्धात् । पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिती । तदप्येषः श्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन् गृहे । आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ॥

( १० )

## प्रार्थना

घालिन लोटांगण वंदिन चरण । डोळ्यांनीं पाहिन रूप तुझें ॥ प्रेमें आलिंगुनी आनंदें पूजिन । भावें ओवाळिन म्हणे नामा ॥ १ ॥ त्वमेव माता च पिता त्वमेव, त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव । त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव, त्वमेव सर्वं मम देवदेव ॥ २ ॥ कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा बुद्ध्यात्मना वानुसृतस्वभावात् । करोमि यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पयामि ॥ ३ ॥

( १२ )

## जानपदवाङ्मय

( आतांपर्यंत वैयक्तिक वाङ्मयाचे उत्तम उत्तम व प्रातिनिधिक नमुने दिले. ह्यानंतर महाराष्ट्रांतील कांहीं जानपद वाङ्मयाचे नमुने दिले आहेत. जानपद वाङ्मय म्हणजे जानपदांच्या मनाचा आविष्कार होय. लोकांच्या आशा, आकांक्षा, स्वप्नें, थोडक्यांत म्हणजे त्यांच्या सामुदायिक मानासिक व्यवहारांचें प्रकटीकरण

त्यांत असतें. समाजांतील सर्व थरांवरील—विशेषतः खालच्या थरांवरील लोकांच्या सामुदायिक मनाचा व तो पुनः सामुच्चयिक रीतीनें झालेला असा त्यांत आविष्कार असतो. ह्या वाङ्मयाचा कोणी एक विशिष्ट कर्ता असा सांगतां येत नाहीं, म्हणून ह्या लोकवाङ्मयाला अपौरुषेय वाङ्मयहि कधीं कधीं म्हटलें जातें. ह्याचा कर्ता कोणीच नाहीं असें कसें म्हणतां येईल ? कर्ता हा असतोच. कधीं तो अज्ञात तर कधीं ज्ञात असतो, कोणत्याहि समाजाचें खरें समाजमन व समाजहृदय ह्याच वाङ्मयांत प्रतीत होतें. महाराष्ट्राचें खरें हृदय ह्या पुढील वाङ्मयावतरणांनीं स्पष्ट दिसून येईल. )

(१)

झोंपाळ्यावरच्या ओंव्या

पहिली माझी ओंवी पहिला माझा नेम
तुळशी जवळी राम पोथी वाची
दुसरी माझी ओंवी दुधाची भावना
लक्ष्मी नारायणा विनंति माझी
तिसरी माझी ओंवी तिरकुटाच्या परी
ब्रह्मा विष्णूवरी बेल पत्री
चवथी माझी ओंवी चवथीच्या चांदा
मोतीयाच्या भांगा अंबाबाई
पांचवी माझी ओंवी पांचीं पांडवांसी
पूजा आरंभीसी विठोबाची

(२)

भावनापूर्ण निसर्गगीत

रुणझुण पांखरा—हूं हूं
जा माझ्या माहेरा—हूं हूं
सांग माझ्या वयेला — हूं हूं
माझ्या माहेरचा—हूं हूं
कमानी दरवाजा—हूं हूं
त्यावर बैस जा—हूं हूं

सांग माझ्या आईला — हूं हूं
सांग माझ्या बापाला — हूं हूं
दिवाळीच्या सणाला — हूं हूं
ये मला न्यायाला — हूं हूं

( ३ )

सामाजिक उत्सवगीत

दिन दिन दिवाळी । गाई म्हशी ओवाळी ॥
गाई म्हशी कोणाच्या । लक्ष्मणाच्या ॥
लक्ष्मण कोणाचा । आईबापाचा ॥
दे माई खोबऱ्याची वाटी। वाघाच्या पाठींत घालीन काठी ॥

( ४ )

झिम्मा

झिम्मा खेळु कडाकडिः अभे लंभुं कां तारा कुडिः ॥
झिम् पोरि झिम्ः कपाळांचं भिंगः
भिंग गळे कुटुंः पोरि हालां उठुंः ॥
पोरि तें पोरिः मिंचि गोरिः
हळधियां उंडाः रेशमीचां गुंडाः
चकमक संडिः विजे वराः ॥
सइ सुटियेः अंबा पिकतुः
रसु गळितुः कुंकमिचा राया माहाः
झिम्मा खेळतुः ॥

( ५ )

अंगाईगीत

पाळणा पांचूचा वर खेळणा मोतियांचा
आंत बाळ नवसाचा निद्रा करी
निजसर आले बाळा तुझे डोळे
अंथरूण केलें जाई जुंईचें
निजवितें बाळा तुला राजसा

अंथरुण केलें जांई मोगऱ्याचें
बाळ गोजिरें ग माझ्या ताईचें
नीज नीज बाळा म्हणूं किती तुला
गुलाबाच्या फुला राजसा
नीज नीज बाळ सोन्याच्या पालखीं
तुज रक्षण जानकी रघुनाथ
तिन्ही सांज झाली दिवे लागण्याची वेळ
थांबवीशी खेळ राजसा
नीज नीज बाळा लाडक्या विठ्ठला
अंगाई ही तुला चिमण्या.

( ६ )

## बाळाचा कुस्तीचा फड

कुस्तीच्या फडावरी लिंबू नारळ आदी फोडा
लाडक्या बाळाला शीन वगूनी गडी सोडा
कुस्तीच्या फडावरी उभा पैरन काढूनी
गड्या ग बाळकांनीं दिली रंजक झाडूनी
कुस्तीच्या फडावरी कोन कुनाला मारी हाळी
बाळानं कुस्ती केली झाली सक्यांची ग टाळी
कुस्तीच्या फडावरी कोन हिरव्या छतरीचा
माजा ग बाळराजा पैलवान ग खातरीचा
शेरभर दूध वाई पैलवानाची ग न्हारी
माजा ग बाळराजा गुंड उचली शिरी हरी
कुस्तीच्या फडावरी सभा बसली थोराची
माज्या ग बाळायाची हुती बैठक मोराची
कुस्तीच्या फडावरी सभा बसली न्हानथोर
सांवळा बाळराज मोर नाचतो अनीवार
पैलवान झाला चिट्टी आलीया लांबची
बाळाला थंडाई न्हारी देतें ग खोबऱ्याची

(७)

## महाराष्ट्राची लावणी

पंचकल्याणि घोडा अवलख ग । जिनावर कलावुत लखलख ग ।
बाई सूर्यपान कलगीचें । नाजुक झुकवर अंबिर वसले ।
छुम छनन छनन पायांत झांजर बोले ॥
संगे बहु थाटाची गर्दी । मागेंपुढें फौज अरधी अरधी ।
बाई शिलंगणाचें सोनें लुटून आणिलें । दसऱ्याच्या मुहूर्तानें
डेरे दिधले ॥

पतिवांचून महाल सुना ग । तुला नाहीं करुणा नारायणा ।
मेल्या उगाच राही रे मना । आशा रे नाहीं पुरली ॥
पोरपणींच मानिंच्या मनीं कल्पना जिरली ॥
हिंदुस्थान मुलुख नटनाट । पाहिला अजिंठ्याचा घाट ।
झाडी अस्सल जंगल दाट । कीं मैना बोले ।
जसें अक्रुरानें श्रीकृष्णा मथुरेसी नेलें ॥

(८)

## महाराष्ट्र देश सुंदरा

महाराष्ट्र देश सुंदरा ॥ ध्रुं० ॥
अहा, देश कैसा छान ।
माझं गेलं देहभान ।
हिरवं हिरवं रान ।
कुठं नागवेली पान ।
कसा पिकला ग गहूं हरभरा । हा शाळुमक्याचा तुरा ॥ हां ॥ जी ॥१॥
नदी वाहे अधीर ।
जणूं टाकी पदर ।
ना ठरे नजर ।
महाराष्ट्र देश सुंदरा । सोनेरी गुढी मंदिरा ॥ हां ॥ जी ॥ २ ॥
सह्याद्रि रांग ही भली ।
रांगोळी जेवीं शोभली ।

आमराई पेरु जांभळी ।
कोकिळा राघू शोभति ।
हें मखर केळींचें कसें ।
मोहक दिसे ।
त्यामध्यें मी वसें ।
कीं मनमोहना ।
ही मनोहरा । सुखसारा ॥ ह्यां ॥ जी ॥ ३ ॥

(१३)

## महाराष्ट्राचीं पराक्रमगीतें

(१)

### अफझुलखानाच्या वधाचा पोवाडा

सकळा देवा आदि देव, शिवा नमन धरुनि भाव । जैसा शिवाजीचा भाव, कलिमधिं प्रसन्न महादेव ॥ सांबाचा अवतार । छत्रपति राजा शिव । शिवाजीच्या तळ्यांत । पाणी पिती सर्व जीव ॥ राजगडासारिखा देवें दिला ठाव । सोनवा सहिल्या राजगडावरी सुवर्ण । गड हुडा दुर्ग चांगले । भाग्य मी राजाचें गाईन ॥ १ ॥ सांगेन शिवाजीच्या हिकमती । किल्ले दुर्ग किती झुलती । भले दुणेदार जाणती । मराठे राजकुमार ऐकती । मोऱ्या चंद्रराव धरिती । गड मग जावळीचा घेती । पावली चवली घेऊन मुलुख कावीज केला महाराजानं । धोंड पाताळ कोंकण घोटाचे किल्ले मी गाईन । सिरवळ सुफळ देश घेतले । घेतलीं बाराही बंदरें । भाग्य मी राजाचें गाईन ॥ २ ॥ कल्याण भिवंडी मारून नेली । फिर्याद विजापुरला गेली । वाच्छा त्या क्रोधी झाला । जैसा अग्नि प्रज्वाळिला । जिता धरा शिवाजीला । कुलवजिरांसी बोलिला । बोलवा बाजी घोरपड्याला । संगें इंगळ्या सुभानाला । सिद्धीला अबदुलखान । अवश्या वजीराचा कोट सदरे बैसले दिवाण । विडा पैजेचा उचलीला । खान विजापुरांत बोलीला । जो वाच्छाई नांवाजला । घोडा फिरंग सदरे दिला ।

सातशें उंट वाणांचे । भरले उंट वाणाचे । करडें लष्कर खानाचें । लष्कर चौदा हजार घोडा । चाले धरावया तोंडा । भांड सर्व देती । गडकिल्ले विलोकिती । खान दरमजली कुच केला । चालून तोरण्यासी आला । विनफत्तेमारिच्या विनिचा खालीं आला । कृष्णाजी वामण वोलीला । साहेव झाला अपशकुन । भाग्य मी राजाचें गाइन ॥ ३ ॥ खान दरमजली कुच केला । चालुन तुळजापुरा गेला । फोडिली भवानीला । मांडली माग त्यानं देवीला । खान दरमजली कुच केला । चालुनि पंढरीस गेला । पंढरीच्या विठोवाला भिवरेमंदी वुडविला । मशीद वांधली देवळाला । मग खानाचा भोग पुरला । खान दरमजली कुच केला । चालुनी वाईलागिं गेला । आपल्या मुलकामधीं राहिला । वरवेपणाचा कागद लिहिला । वामण कृष्णाजी पाठविला । हेजिव वोले शिवाजीला । हेजिव वोले राजाला । आला भेटाया खान । भाग्य मी राजाचें गाईन ॥ ४ ॥ शिवाजी जरी तूं भेटसी । उदंड दवलत देईन । शिवाजी हेजिवास वोलतो । खान मजला काय देतो । चहु आगळे चाळीस गड । मी खानाला देतों । मजवरी कृपा आहे खानाची । जावळी श्रृंगारितों । यावें तेथें भेटायाला । खानाची मी वाट पाहतों । तसलिमा दिल्या वामणाला । वामण खानाजवळी आला । शिवाजीचा हेजिव । शिवाजी राजानं हेजीव । शिवाजी म्हालदार धाडिला । खानापाशीं येऊन वोले । धड न अवदुल्याला । चौदा हजार घोडा आणिला । तुम्हीं कशाला । अहूत द्यावा जगदंबेला । वोलतां अवदुल्ला खवळला । शिवाजी म्हालदार । शिवाजी राजा जवळी आला । खान दरमजली कूच केला । चालून रडतोंडिचे घाटाला । चढून गड वेढा दिला । चवदा दिवस कोंड केला । खवर कळली महाराजाला । राजा गुपित न राहिला । शामराजा वोलविला । रघुनाथ पेशव्याला । धातोड्या माणकोजीला । इंगळ्या सुभानाला । मइफलीमाजीं राजा सदरेला वैसून । भाग्य मी राजाचें गाईन ॥ ५ ॥ सरदार वैसले वुद । पुसे सुभेदाराला । भाईनु अवदुल्लाखान आला । त्याचा धाक तो देवाला । कसा जाऊं भेटायला । वुद्धि

सांगा आम्हांला। गाईकवाड कृष्णाजी बोलिला। शिवबा शील चढवा अंगाला। पोलाद घातली गळां। कंवरवस्ता वेढा दिला। पट्टा म्हालदारला दिला। पट्टा शिवाजीला दिला। वाघनखें रायाच्या पंजाला। वरुनी वारीक झगा त्याला। भगवंताची दया त्याला। बाच्छाई साजा छरूनि आला। जिजाबाईस भेटी गेला। जिजा आली भेटायाला। पालखींत बैसून। भाग्य मी राजाचें गाईन ॥ ६ ॥ जिजा घेत अलाई वलाई। चढती दवलत येऊंदे तुला। घे यशाचा विडा। स्मर आपुल्या महादेवाला। तसलीम माझी येऊं तुला। शिवबा बोले जिजा-बाईला। सये एवढी प्राप्त झाली। भेटलों नाहीं दिवाणाला। बारे बुद्धिनें कार्य साधावें। उसनें संभाजीचें घ्यावें। वये येथून सलाम। सांगे शाहाजी राजाला। गड दिले गडकऱ्यांला। राज्य दिलें नेताजीला। राजानें पुतण्या उमाजीला। पांचशें लोक दिले त्याला। रडतोंडिच्या घाटीं आला। तुक्या भिवानें सदरा श्रृंगारिल्या। गाद्या पडगाद्या घातल्या। आतळशा कुमाशा वरता। संश्यांतल्या सोडिल्या। सुरंग खांब जडिताचे ॥ वरि घोंस पोवळीयांचे। माणिकांच्या वरव्या हरी। लाविल्या मोत्यांच्या हो वरी। सदरे तिणव्यांची मांडणी। सूर्य लखलखितो गगनीं। सारभवाणी नाचे पाणी। चांदवे जडिताचे चौकोनी। पलंग सोनेरी टाकिला। पडदा मस्तानी घातला। पडदा घातला नानापरिचीं चित्रें त्याला। घोस हिऱ्याच्या जडिल्या माळा। चोघे वळी बांधुनी फळी। चाहिले एका बोलीनं। भाग्य मी राजाचें गाईन ॥ ७ ॥ पहिल्या सदरेला गेला। कारकुन अबदुल्याला बोले। तिसऱ्या सदरेला गेले। मन कंचणींत बुडविलें। अबदुल्ला खदखदां हांसला। शिवाजी आले सदरेला। पहिला सलाम महादेवाला। दुसरा सलाम शहाजीला। तिसरा सलाम जगदंबेला। चौथा सलाम गडकऱ्यांला। सलाम पांचवा माझा। देतों अबदुल्या रे तुला। तू रे कुनबीका छोरा बनाया दिवानका सदरा। ऐसा सदरा नाहीं आला। इदलजा बाच्छाला। काय ज्याची करणी। भ्यावें रघुनाथाला। जाणतों

आम्ही खाना । तुम्ही जातीचे कोण । भाग्य मी राजाचें । गाईन ॥ ८ ॥ अवदुल्ला जातीचा भटारी । मिया करना दुकानदारी । विजापुरमें दुकान तेरा । लड्डू जिलबी वेचनहार । अवदुल्ल्यानें कव घातली । शिवाजी गवसून धरला सारा । चालवी कट्यारिचा मारा । शिल्यावरी न चाले जरा । राजानें बिचवा लावून दिला । वाघपंज्याचा केला मारा । त्याचें फाडिलें उदर । खानाची चरवी आली दारां ॥ चाल ॥ अवदुलखान लष्करी भला । अहो भला । पट्टा कमरेचा सोडिला । खचून हात फिरंगी घातला । अहो घातला । मारिला त्याचा गुंडाळा । अहो गुंडाळा । राजाचा शिरटोप तोडिला । अहो तोडिला ॥ चाल ॥ पांच वेढे हो मंदिलाचे । चवदा वेढे हो तोड्यांचे । तुटून जरासा लागला । जखम झाली महाराजाला । मारिला शिवाजीनें गुंडाळा । मान खांदा गवसुन केला । जानव्याचा दोरा देखिला । पडला खान । भाग्य मी राजाचें गाईन ॥ ९ ॥ सैयद्बंडा उठावला । त्यानें पट्टा मारिला । पट्टा त्याचा शिवाजीनें वरचेवर तोडिला । सैयद् बंडा जो मारिला ॥ खांद्यापासून सारा केला ॥ सैयद्बंडा देखिला पडला । त्याचा बामण म्होरे आला । परत परत रे माघारा । सरजा शिवाजी बोलिला । वामणा मारूं नये तुला । क्रिया देवाची आम्हांला । महाराज खद्खदां हांसला । हातींचा पट्टा टाकुन दिला । शिवाजीच्या म्हालदारानें घातली शीघ्र उडी त्यानें । वरचा वऱ्हाणपुरी काढिला । त्यानें अचाट फेंकून दिला । नाभीकमळीं बसला । बरच्या फुटला पाठिला । वामण हरहर बोलिला । त्याचा प्राण निघून गेला । कावजी राजाचा लेक । घ्या घ्या करीत जवळीं आला । भोयांच्या पाया वार केला । खटारा धरणीं पाडिला । शिवाजी आले घेऊन गेले । खानाचें शिर कापून । भाग्य मी राजाचें गाईन ॥ १० ॥

प्रतापगडाच्या भवानीला । वाहिलें शीर जगदंबेला । मातला गे होता बोकड जो बत्तीसदांती । अवदुल्ल्याची घ्यावी आहुती । व्हावी येथून कुल इशारत राजाच्या लोकांला । बारा तोफा मारा केला । आवाज प्रतापगडावर होती । कडका पायदळें

येती पडले धडधडा। वळले निशाणाचे हत्ती। त्रिमुख असे काकड्या सुरेराव। लोटले रणतोंडीच्या घाटीं। तुक्या भिवाजी भिलाड साटी॥ आरवाचा घोडा पाडाव केला। त्या क्षणीं हनु-मंत्या पायदळा। माईच्या नेई राज्याला। महाराज पनाळ्यावर। पनाळा चौफेरी वांधिला। कै दीन भांडून पनाळा। नाहीं देई वाच्छाहाला। सरदार मिळाले सदरेला। बाईनं शाहीर बोलाविला आज्ञिन दास कवीश्वर। त्यानें कडाका गायीला। दिला एक गांव। इनाम गांव वक्षीस त्याला। चढविले हाताला। लंगर सोन्याचे दोन। भाग्य मी राजाचें गाईन॥ ११॥

## (२)

### शिवाजी

देशाचा पालनवाला। तो शिवाजिराजा झाला।
धर्माचा रक्षणवाला। तो शिवाजिराजा झाला॥ ध्रु०॥

त्रिभुवनांत डमरू ज्याचें। नांदतांच नंदी नाचे।
जो परित्राण या भूचें। शंकर भोला। तो शिवाजी०॥ १॥

गर्जते भवानी मेघा। चमकते भवानी खांडा।
चाललाच भगवा झेंडा। रण-नाचाला॥ २॥

तुकयाचा प्रेमळ वीणा। गहिंवरवी अंतःकरणा।
करुणेच्या घेउनि ताना। उठवा हरिला॥ ३॥

प्रभु रामदास तो आला। राष्ट्राचा जादूवाला।
मावळा मंत्रिला सगळा। भालेवाला॥ ४॥

रणयज्ञ विजय-हेरंवा। पूजाया रणजगदंवा।
तोरणा रणप्रारंभा। नारळ फुटला॥ ५॥

त्या चंद्रराव मोऱ्याला। दास्याच्या सरदाराला।
भूमिच्या मूर्त नरकाला। जाळा जाळा॥ ६॥

तो विजापूरचा कोल्हा। वाघास दावि वागूरा।
परि वाघनखीं तरवारा। दिसे न त्याला॥ ७॥

साहित्य सोने... सांगी ... शाखा स्थ...
अनुक्रमांक ... दि. ...
नों. दि. ...

खिडींत शत्रुचे वाण। निज मरणावर तोलून।
त्राणांत भूप झेलून। बाजी पडला ॥ ८ ॥

पूण्यांत राजवाड्यांत। खड्गाचि रात्र कुजबुजत।
ऐकूनि मस्त शाइस्त। पळूनि गेला ॥ ९ ॥

तो पुरंदराचा झगडा। तो मुरारबाजी लढला।
हाताच्या करुनि ढाला। रिपु रोधीला ॥ १० ॥

तो औरंग्या दिल्लींत। शिवपवन धरी डावांत।
परि पवन डाव उडवीत। उडूनि गेला ॥ ११ ॥

मग सिंहगडाचें युद्ध। गड चढला वैभवसूर्य।
रक्ताचें देउनि अर्घ्य। तान्हा गेला ॥ १२ ॥

किती असे वीर वर्णावे। कितिजणां पवाडे गावे।
कवितेनें ओंवाळावें। कुणा कुणाला ॥ १३ ॥

श्रीस्वातंत्र्याची माला! वीरांनीं गुंफुनि विमला।
अर्पिली देशदेवाला। हरहर बोला! ॥ १४ ॥

वैकुंठ रायगड केला। लोक तो देवगण बनला।
शिवराज विष्णु झाला। वन्दन त्याला ॥ १५ ॥

—कवि गोविंद

## ( ३ )

## सिंहगडाचा पोवाडा

### ( १ )

धन्य शिवाजी तो रणगाजी धन्यची तानाजी।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ध्रु० ॥

देशामाजीं कहर गुजरला पारतंत्र्य-जहरें।
हलाहलहि ह्या परदास्याहुनि गळां गांठिता वरें ॥ १ ॥

गोमातांची मान आणि ती शिखा-ब्राह्मणांची।
परदास्याची सुरी बंधुंनो चिरीं एकदाची ॥ २ ॥

देश हिंदुचा हाय तयाचा मालक म्लेंछ ठरे।
परि परमेशा फार दिवस हें रुचेल केवि वरें ॥ ३ ॥

(चाल) मग आर्य देशतारणा। अधममारणा। कराया रणा।
परदास्यरात्रिनाशाला।
शिवनेरी श्रीमान् आला।
स्वातंत्रसूर्य उदयाला।
त्या सूर्याचा किरण रणांगणिं तळपे तानाजी।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

(२)

ठायीं ठायीं वीर मावळा सरसावुनि भाला।
रामदासमत छत्रपतींचा अनुयायी झाला ॥ १ ॥
स्वातंत्र–श्रीतोरण तोरणगड अवघड पडला।
भगवा झेंडा त्या भाल्यासह सरसर वरि चढला ॥ २ ॥
प्रतापगडची शांत कराया स्वतंत्रता देवी।
पुढती फाडुनि अफझुल्याला भग तो मग ठेवीं ॥ ३ ॥

(चाल) ते धन्य मराठे गडी। घेती रणिं उडी। करूनि तांतडी
देशार्थ मृत्युहि वरिला।
शाहिस्ता चरचर चिरिला।
गनिमानि वचक बहु धरिला।
झुरति रिपु परि अजुनि नांदतो सिंहगडामाजी
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

(३)

जरा ढिलाई पाहुनी वदली जिजा शिवाजीला।
गड सर केल्याविण वरणे ना अन्न शपथ तुजला ॥ १ ॥
परके वाला–भूमातेला ते लाथा देतां।
अन्न न गमतें गोमांसाच्या घांसचि तो घेतां ॥ २ ॥

गुलामगिरीची वेडी पायीं तशीच धरिता ना? ।
गुलामगिरीच्या नरकामाजीं तसेंच पचता ना? ॥ ३ ॥

(चाल) निर्जीव अन्न कां रुचे । उदर शत्रुचें । फोड तेथिचे ।
आंतड्यांनिं भूक शमवावी ।
रक्तानिं भूक शमवावी ।
मांसानिं भूक शमवावी ।
घ्या गड कडकड चावुनि अधरां धांवा ये काजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गांजी ॥ ४ ॥

(४)

धन्य माता जिजा तिलाची शिववा सुत साजे ।
स्वतंत्र झाल्यावीण सुताला अन्नहि दे ना जे ॥ १ ॥

स्वातंत्र्याच्या सुखनीमाजीं जन्म स्वतंत्रांचे ।
गुलामगिरिच्या उकिरड्यापरि गुलाम निपजाचें ॥ २ ॥

श्वानहि भरितें पोट वापुडें चघळुनियां तुकडे ।
शेणामाजी वांधुनि वाडे नांदति शेणाकिडे ॥ ३ ॥

(चाल) संसार असा जरि करी । मनुजता तरी । कशासी धरी ।
हो तुच्छ किडाचि न कां तो ।
जो गुलाम असुनी हंसतो ।
परदास्यीं स्वस्थचि बसतो ।
धिक् धिक वदला श्री शिव घेऊनि गड राखूं वाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा माजी ॥ ४ ॥

—स्वातंत्र्यवीर सावरकर, चौक ४

(३)

## पानिपतचा पोवाडा

भाऊनाला तरवार धरून । गेले गिलच्यांवर चढाई करून ॥ ध्रु० ॥

गिलच्यांनीं हुकमत करून भाऊ वेढीला बहु युक्तीनें । जठराग्नी

चेतला खवळला व्याघ्र पंचानन ॥ झांगड नौबती वाजती वाजती दणादण भेरे वाजे संगीन। डंके झाले पताकाच्या घोड्यावरती ठेविलें जीन ॥ फौजा झाल्या तयार निष्ठूर करवळाच्या मैदाना। चोर डाक एकही होती गिलचांची नाहीं कळलें संधान। गिलचा झाला घावरा आणि वेढा उठविला जलदीनें ॥ दोनीं दळें झालीं तयार त्या वेळेकरतां नारायण ॥ आदितवारीं लढाई नेमिली जलदिनें। भाऊस वातमी कळली जरीपटका गेला चालून ॥ गिलच्यांनीं रणखांब पूजीला भाऊशीं वर्तमान कळला। काय पहातां गलीम सांपडला। एकदांच हरहर केला ॥ रोखिले आघाडी जेजाला। कडाविन सुतरनाला ॥ ऐंशीं हजार होळकर भाला। शिंद्यानीं मार खूप दिला। वाण सुटती तीर कमानीला। अरब हपशी तो रोहिला ॥ गोसावी धुंदत चालला ॥ करवलानें घोडा चमकाविला ॥ वाराभाईच्या मंडपावर ढाला। फौजेचा मग वंद तुटला ॥ भाऊसाहेब अंबारींत डुल्ला। दादू महातानें हत्ती पुढें नेला। आंदु जडियले हत्तीला। तीर कमान हातीं धरला। कीं भीमसेन पांडव दळीं आला। कीं पार्थ वीर खवळिला ॥ दिली सरवत्ती तोफेला ॥ नऊ हजार गोळा उडाला ॥ तासे मर्फे ते तंबुरे किती वाजती। कर्णे कितीएक रणवाहिरी कर्कती। गिलच्यांच्या तोफा कुलुपी गोळे गर्जती। धुक्रोट वाण जशी ढगांत वीज चमकती। दणादण मेरू मांदार धरणी कांपती। आडुमाडु शिपाई व्याघ्र उड्डाण साठती। वीरास वीर तरकून पुढें सरकती। झाली हमका शत्रुला वीरास वीर घुमती ॥ केली खनाजंगी स्वारावर स्वार धडकती। वारा हजार पालखी भाऊची झाली रिती। तीन लाख घोडा गर्द जरिपटक्याचा हत्ती। ऐंशी हजार होळकर गुप्त नाहीं दिसती। पायदळाचे गोळे जागोजाग पडले किती। सोकला कंठ मग पाणी पाणी बोलती। जखमांची नाहीं गणती कवंध नाचती। स्वर्गींचे देव पाहती वर्णिती अमरावती। गगनीं झांकले सूर्यचंद्र भिऊनी ॥ ध्रु० ॥ भाऊनाना ॥

—सगनभाऊ, चौक १०

## (४)

## खर्ड्यांचा पोवाडा

लष्कर सगळें गुर्के। जरिपटक्याभोंताले घालिती गरर मानकरी गर्के। सुंदर गोरे भुर्के। घोरपडे पाटणकर महाडिक खानविलकर शिर्के। मुंगी मध्यें ना फिर्के। चव्हाण मोहिते गुजर घाडगे निंबाळकर दे चर्के ॥ चाल ॥ पुढें पसरले रिसालदार। मुसा मुत्रीम नामदार। सय्यद अहमद जमादार। अमीर आवास नव्हे नादार। शहामिरखां ते डौलदार। इतक्यांवर ते हुकुमदार। राघोपंत ते दौलतदार। तसे काशिवा वल्लाळ रानडे ॥ चाल ॥ गोरा मुसावास अमोल। मुसा नारद तो समतोल। विनायक पंतांचा गलोल। आवा काळे गुणीच डोल। टोपकराचे वोलती वोल। पायदळांचा वांधोनि गोळ। तंवुर ताशे वाजती ढोल। उठावल्या वैरखां निशाणें ॥ चाल ॥ संस्थानी याविराहित राजे। सेनासाहेव किताव साजे। राघोजीवावा नांव विराजे। वाणांचा भडिमार माजे। सरखेलांचा लौकिक गाजे। समशेर वहाद्दर गरीव नवाजे। अकलकोटी लोक ताजे॥ दुर्जनसिंग रजपूत हडोदी ॥ चाल ॥ दक्षिण उत्तर पश्चिम भागीं। पसरून तोफा जागोजागीं। तमाम गारदी त्याचे मार्गी। स्वारसैन्य त्यामागें झगागी। जरिपटका तो दुरून धगागी। कोणीच नव्हता त्यांत अभागी। त्वरित वक्षिस पावे विदागी। जासूद सांडणीस्वार धांवती ॥ चाल ॥ काय फलटणच्या फैरा झडती। पर्जन्यापरि गोळ्या पडती शिरकमळें कंदुकवत् उडती। छिन्न भिन्न किती होऊन रडती। कितिक पाण्याविण तडफडती। कितीक प्रेतामधींच दडती। वीर विरांशीं निसंग भिडती। सतींसारखे विडे उचलिती ॥ चाल ॥ पाऊल पाऊल पुढें सरकती। घाव चुकावुन शूर थडकती। सपुत वाघापरी गुरकती। हत्यार लावुन मागें मुरकती। खुणेनें शत्रुवर्म तरकती। मोंगल वच्चे मागें सरकती। जिववादादा मनीं चरकती। अररर शावास वापांनो॥ सुटती तोफा धुंद दणादण। गुंगत गोळे येती छणाछण। सों सों करिती वाण सणासण। खालेल घोडे उडती टणाटण। टापा हाणती दुरून ठणाठण। वाजति पट्टे खांडे खणा-

खण। नौबति झांजा झडती झणाझण। एकच गर्दी झाली धुराची ॥चाल॥ थोर मांडली रणधुमाळी। अगदींच बसली मग कांठाळी। फौज पसरली रानोमाळीं। लाखों लाख तरवार झळाळी। होळकराची फिरती पाळी। जिववांची मर्दुमकी निराळी। मोंगलाची केली टवाळी। सबळ पुण्य श्रीमंत प्रभुचें ॥ चाल ॥ अठरा घटका लाही फुटली। तोफ हजारों हजार सुटली। मिरजकरांची मंडळी झटली। भाउवरोबर निसंग तुटली। मोंगलसेना मागें हटली। त्या समयीं कैकांची उपटली। पेंढाऱ्यांनीं दौलत लुटली। गबर झाले एका दिसांत ॥ चाल ॥ शके सत्राशें सोळा भरतां। आनंद संवत्सरही सरतां। दहा दिवस शिमग्याचे उरतां। वद्य पंचमी सुवेळ ठरतां। तीन प्रहरांचा अंमल फिरतां। मोंगलांशीं प्रसंग करितां। पळाले मोंगल धीर न धरतां। चंद्र उदयीं खड्यांत कोंडिलें ॥ चाल ॥ गढींत खासे शिरले। मराठे मोंगल पठाण पुर्भे इतर घरोघर भरले। दैन्य दिवस हे आज सरले ॥

प्रभाकर— चौक पांचवा

(५)

## मर्दानी झांशीवाली

रे हिंदबांधवा, थांब या स्थळीं अश्रु दोन ढाळी
ती पराक्रमाची ज्योत मावळे इथें झांशीवाली ॥ ध्रु० ॥
तांबेकुलवीरश्री ती
नेवाळकरांची कीर्ती
हिंदभूध्वजा जणुं जळती,
मर्दानी राणी लक्ष्मीबाई मूर्त महाकाली ! ॥ १ ॥
घोड्यावर खंद्या स्वार
हातांत नंगि तवार
खणखणा करित ती वार
गोऱ्यांची कोंडी फोडित पाडित वीर इथें आली ॥ २ ॥

२५५४८ दि. ७.५.५८

कडकडा कडाडे बिजली
शत्रुचीं लश्करें थिजली
मग कीर्तिरूप ती उरली
ती हिंदभूमिच्या पराक्रमाची इतिश्रीच झाली ! ॥ ३ ॥
मिळतील इथें शाहीर,
लववितील माना वीर,
तरु, झरे ढाळितिल नीर,
ह्या दगडां फुटतिल जिभा कथाया कथा सकळ काळीं ! ॥ ४ ॥

— भा. रा. तांबे.

(६)

महाराष्ट्राची परंपरा

महाराष्ट्र मायभू आमुची । मराठी भाषिकांची । संत महंतांची । ज्ञानवंतांना जन्म देणार । नररत्नांचें दिव्य भांडार । समरधिर घेति जिथें अवतार ॥ जी ॥ शौर्याची अजरामर महती । आजही नांदती । सह्याचलावरती । मावळा दख्खनचा राहाणार । स्वाभिमानार्थ जिणें जगणार । मराठा मानी आणि दिलदार ॥ जी ॥

सह्याद्रि पसरला जिथें शेषासम गिरी ॥
दौलत घेऊनि सत्तावीस गड शिरीं ॥
भेसूर कड्यावर बुरुज पहारेकरी ॥
ताड, माड, सागाचीं झाडें त्यांच्या शेजारीं ॥
कळकिचें बेट आकाशांत झुकांड्या मारी ॥
करवंदी, वाभळ आणि बोरी ।
चिल्लार कठिण कांटेरी ।
खालीं सुपीक शेती जमिन काळजापरी ॥
महाराष्ट्राची ती शेतसरी । सूवर्ण आणि भूवरी ॥
कापूस, ऊस, गुळभेंडि, तूर, तिळ हर्बरी ॥
कराळा फुलें गोजिरीं । उधळून महाराष्ट्रावरी ।
राळ्याचें लोंब पुढें लवून मुजरा करी ॥

महाराष्ट्राच्या अंगणांत । सरिता या खेळ खेळत ॥
पंचगंगा, शीतल शांत । महाराष्ट्र शांतवीत ॥
कोयना कृष्णा चालत । घालून हातामध्यें हात ॥
जाऊनी पुढें धांवत ! आंध्रलाहि कुरवाळीत ॥
वारणा वाहे वेगांत । वायुला लाजवीत ॥
पैठण परभणींत । गोदाचें रमलें चित्त ॥

हीं अवनी आदिवाशांची । कोळी भिल्लांची । मांग रामोशांची । कैक ज़ातींची प्राणाहुनि प्यार । परंपरा ज्यांची असे अपार । पुढें शाहीर तीच गाणार ॥ जी ॥

— अण्णाभाऊ साठे, चौक पहिला

(१४)

( येथून पुढें अर्वाचीन मराठी वाङ्मयांतील कांहीं प्रसिद्ध महाराष्ट्रीय स्फूर्तिगीतें व महाराष्ट्राचीं गौरवगीतें दिलीं आहेत. ह्या गीतांत महाराष्ट्राची महती वर्णन केली असून महाराष्ट्रीय जनतेला तेजस्वी संदेश दिला आहे. हीं सर्व अस्सल भावगीतेंच आहेत. )

(१)

नवा शिपाई

नव्या मनूंतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहें,
कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें ।
ब्राह्मण नाहीं, हिंदुहि नाहीं, न मी एक पंथाचा,
तेच पतित कीं जे आंखडिती प्रदेश साकल्याचा ।
खादाड असे माझी भूक,
चतकोरानें मला न सूख,
कूपांतिल मी नच मंडूक,
मळ्यास माझ्या कुंपण पडणें अगदीं न मला साहे ।
कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें ।
जिकडे जावें तिकडे माझीं भावंडें आहेत,
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत:

कोठेंही जा – पायाखालीं तृणावृता भू दिसते;
कोठेंही जा – डोईवरतें दिसतें नीलांबर तें ।
सांवलींत गोजिरीं मुलें,
उन्हांत दिसतीं गोड फुलें,
बघतां मन हर्षून डुले,
तीं माझीं, मी त्यांचा, – एकच ओघ अम्हांतुनि वाहे ।
नव्या मनूंतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहें ॥ १ ॥
पूजितसें मी कवणाला ? – तर मी पूजीं अपुल्याला,
आपल्यामध्यें विश्व पाहुनी पूजीं मी विश्वाला,
'मी' हा शब्दच मजला नलगे; संपुष्टीं हे लोक
आणुनि तो, निजशिरीं ओढिती अनर्थ भलते देख !
लहान-मोठें मज न कळे,
साधु–अधम हें द्वयहि गळे,
दूर–जवळ हा भाव पळे;
सर्वच मोठे-साधु-जवळ, त्या सकलीं मी भरुनी राहें !
कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें !
हलवा करितां तिळावर जसे कण चढती पाकाचे,
अहंस्फूर्तिच्या केंद्राभंवतें वेष्टन तेंवि जडाचें;
आंत समचि निर्गुण तिलक, वरी सदृश सगुण तो पाक,
परि अन्यां वोंचाया धरितो कांटे कीं प्रत्येक !
अशी स्थिती ही असे जनीं !
कलह कसा जाइल मिटुनी ?
चिंता वागे हीच मनीं
शान्तीचें साम्राज्य स्थापूं बघत काळ जो आहे
प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहें !

— केशवसुत

(२)

## महाराष्ट्र प्रीति

पोटासाठीं भटकत जरी दूर देशीं फिरेन ।
मी राजाच्या सदनिं अथवा घोर रानीं शिरेन ॥
नेवो, नेतें जड तनुस या दूर देशास दैव ।
राहे चित्तीं प्रिय मम परी जन्मभूमी सदैव ॥ १ ॥

वेळोवेळीं तुजसि बघुनी नेत्र संतुष्ट व्हावे ।
इच्छा होते, परि तुजकडे चित्त हें मात्र धांवे ॥
यावें देहें, परि अससि तूं शेंकडों कोस दूर ।
आहे त्याच्या त्वरित गमना विघ्न हें दुर्निवार ॥ २ ॥

जेथें माझें जनन घडलें पूर्वपुण्येंच थोर ।
जेथें गेले दिवस, असतां बाळ, सौख्यांत फार ॥
जेथें होते करित वसती पूर्वज प्रेमभावें ।
कां त्या भूमिप्रति चिर न म्यां पूज्यभावें स्मरावें ? ॥ ३ ॥

पाथोधीची श्रवणिं पडतां गर्जना मंद धीर ।
वृक्षच्छायांतरिं झुळुझुळू वाहतां वात गार ॥
होतों अंकीं निजत, जननी ! जन्मभूमी । तुझ्या, ते ।
गेले कोठें दिवस ? झुरतों आठवोनी तयांते ॥ ४ ॥

होतों लहान बहु खेळुनि तृप्त झालों ।
अंकीं तुझ्या, तिथुनि थोरपणीं निघालों ॥
मातेसमीप असती, परि थोर होती ।
तेव्हां पिलें सहज सोडुनि तीस जातीं ॥ ५ ॥

लाटा आपटतां उठे ध्वनि शिरे तो ज्यांचिया कंदरीं ।
ऐसे पर्वत दुर्ग शोभति अति प्राचीन ज्याच्या शिरीं ॥
'धो धो' शब्द करीत त्यांतुनि झरे खालीं कसे धावती ॥
पाणी तेंच पिऊन बाग उठती शोभा तयांची किती ! ॥ ६ ॥

आंबे, पोफळि, साग, नारळि, तटीं दाटे तरूंचें वन।
झोके घेति सुरम्य चंचल जळीं छाया तयांच्या घन ॥
आकाशीं जणुं कीं विजा तळपती, मासे जळीं त्यापरी।
खाड्या त्या तव, जन्मभूमि नयनीं पाहीन केव्हांतरी ! ॥ ७ ॥

—वासुदेवशास्त्री खरे

( ३ )

कल्याणगुणधाम – आनंदवन

आनंद वन भूमि ! गा वीर – वरगान ! ।
देवी ! पुन्हां छान ! पूर्वीसमान ! ॥ ध्रु० ॥ १ ॥
दुर्गेपरी रूप धर कांतिमान ! ।
चढुं देच अवसान स्फुरणास पूर्ण ! ॥ आनंद० ॥ २ ॥
सह्याद्रिच्या शीर्षि हो गान मान ! ।
जावो दणाणून हें हिंदुस्थान ! ॥ आनंद० ॥ ३ ॥
मर्दानी रागांत घे मर्द तान ।
वीररस सिंधूस चढुं दे तुफान ! ॥ आनंद० ॥ ४ ॥
मर्दोनि पदिं मांड थैमान छान ! ।
होवो पराधीन हैराण रान ! ॥ आनंद० ॥ ५ ॥
तूं गान गाण्यास सामर्थ्यवान ! ।
हे गान गाईल तुजवीण कोण ? ॥ आनंद ॥ ६ ॥
हें गान गाऊन पूर्वीसमान ? ।
संरक्षि सन्मान मानाभिमान ! ॥ आनंद० ॥ ७ ॥
निर्मून जनिं वीररस पुण्यवान ! ।
घाली यशोमान जनतेस स्नान ! ॥ आनंद० ॥ ८ ॥
गा गान हें छान ! हें सुखनिधान ! ।
दे लोकदेवीस स्वातंत्र्यदान ! ॥ आनंद० ॥ ९ ॥
गा गान छान ! हें कीर्तिमान ! ।
कर राष्ट्र-लक्ष्मीस ऐश्वर्यवान ! आनंद० ॥ १० ॥

कल्याण गुणधाम गाऊन गान ! ।
हे वीरधीरांब ! दे एक दान ! ॥ आनंद० ॥ ११ ॥

दे दान तें जाण त्रैलोक्य त्राण ! ।
देवाधिदेवास जें स्वाधिष्ठान ! ॥ आनंद ॥ १२ ॥
शुभ दान ! प्रिय दान ! तें तेंच दान ! ।
दे देवि ! बलदान ! तेंच दान ! ॥ आनंद० ॥ १३ ॥
गा गान राष्ट्रास कर चिर महान ! ।
तुज रामदासाचि शिवबाचि आण ! ॥ आनंद० ॥ १४ ॥

—कवि गोविंद

( ४ )

## महाराष्ट्र-लक्ष्मी

महाराष्ट्र-लक्ष्मी मातें जगीं धन्य वाटे
यशोगीत तीचें गातां मनीं हर्ष वाटे ॥ ध्रु० ॥
पुनः पुन्हां परचक्रानें ताडिली विचारी
दीर्घकाल खचली होती पारतंत्र्यभारीं
द्वादशाब्द दुष्काळानें जाहली भिकारी
संकटांत तीच म्हणोनी करी उंच माथें ॥ १ ॥

मावळांत वास, न ठावे जया बाह्य वारे,
नेत्रधर्म ज्यांचें लोकीं कृपीकर्म सारें,
विळाकोयतीच जयांचीं काय तीं हत्यारें
तेच वीर बनले समयीं मावळे मराठे ॥ २ ॥
नये नीट धरितां ज्याला लेखणी करांनीं,
कृपादृष्टि संपत्तीची न ज्याचे ठिकाणीं,
परी यवनसत्तेची जो करी धूळधाणी
कोण तया शिवरायाच्या पावला यशातें ॥ ३ ॥

साधुसंत झाले, असती, तयांची न वाण
मात्र रामदासा लाधे समर्थाभिधान

जो मनीं स्वदेशहिताचें धरोनी निशाण
ध्वजा कौपिनाची मिरवी भारतांत थाटें ॥ ४ ॥

पूर्व दिव्य ज्यांचें, त्यांना रम्य भाविकाळ,
बोध ह्राच इतिहासाचा सदा सर्वकाळ,
कासया वहावी चिंता मनीं जग जहाल,
रात्र सरे तेव्हां उगवे दिनहि पूर्व वाटे ॥ ५ ॥

—विनायक

(५)

## महाराष्ट्र-गीत

बहु असोत सुंदर संपन्न कीं महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र-देश हा ॥ ध्रु० ॥

गगनभेदि गिरिविण अणु नच जिथें उणें
आकांक्षांपुढति जिथें गगन ठेंगणें
अटकेवरि जेथील तुरंगिं जल पिणें
तेथ अडे काय जलाशय-नदाविणें ?
पौरुषासि अटक गमे जेथ दुःसहा ॥ १ ॥

प्रासाद कशास जेथ हृदय-मंदिरें
सद्भावनांचींच भव्य दिव्य आगरें
रत्नां वा मौक्तिकांहि मूल्य मुळीं नुरे
रमणीची कूस जिथें नृ-मणि-खनि ठरे
शुद्ध तिचें शीलहि उजळवि गृहा गृहा ॥ २ ॥

नग्न खड्ग करिं, उघडे बघुनि मावळे
चतुरंग चमूचेंही शौर्य मावळें
दौडत चहुंकडुनि जवें स्वार जेथले
भासति शत-गुणित जरि असति एकले
यन्न मिपारसुनि रिपु शमित-बल अहा ॥ ३ ॥

विक्रम - वैराग्य एक जागिं नांदती
जरिपटका भगवा झेंडाहि डोलती
धर्म - राजकारण समवेत चालती
शक्ति - युक्ति एकवटुनि कार्य साधिती
पसरे यत्कीर्ति अशी विस्मयावहा ॥ ४ ॥

गीत मराठ्यांचें श्रवणीं मुखीं असो
स्फूर्ति - दीप्ति - धृतिहि देत अंतरीं ठसो
वचनिं लेखनींहि मराठी गिरा दिसो
सतत महाराष्ट्र-धर्म-मर्म मनिं वसो
देह पडो तत्कारणिं ही असे स्पृहा ॥ ५ ॥

—श्री. कृ. कोल्हटकर

( ६ )

## महाराष्ट्र महोदय

महाराष्ट्र माझा असे हा पवित्र ।
हरिप्रीतिला सर्वथा पूर्णपात्र ॥
असा पुण्यभूभाग अन्यत्र नाहीं ;
मला नावडे यापुढें स्वर्ग कांहीं ॥ १ ॥

इथें चंद्रभागातटीं देव राहे ।
इथें पुण्य गोदावरी नीर वाहे ।
त्रिलोकीं पहा ज्ञानदेवी समान ॥
नसे ग्रंथ सर्वांग संपूर्ण जाण ॥ २ ॥

महाराष्ट्र माझा त्रिलोकीं प्रसिद्ध ।
इथें नांदती सत्कवीसंत सिद्ध ॥
इथें शत्रु निर्दाळणीं शूर वीर ।
इथें नांदती मानवांमाजि हीर ॥ ३ ॥

इथें कार्यकर्ते इथें विश्वधर्ते ।
इथें शोकहर्ते इथें लोकभर्ते ॥

इहामुत्र सर्वां भवीं कर्णधार ।
इथें नांदले नांदती नांदणार ॥ ४ ॥

इथें गाजला मर्द राजा शिवाजी ।
तुकाराम भक्ताग्रणी वीर वाजी ॥
इथें रामदास प्रभू तो समर्थ ।
अशा ना मिळे कोणता हो पुमर्थ ॥ ५ ॥

असो आज गाईन या सुप्रसंगीं ।
कथा प्रेमळा सोज्वळा अंतरंगीं ॥
महाराष्ट्र सद्भाग्यसंपन्न झाला ।
स्मरूं आदरें पूर्वजांच्या यशाला ॥ ६ ॥

शिवाची विभूतीच राजा शिवाजी ।
महाभाग त्या जाहले विश्व राजी ॥
भले भावडे गावळे मावळे ते ।
तयां वेधिलें लाविलें क्षात्र पंथें ॥ ७ ॥

वळी मावळे वीर तानाजी वाजी ।
येसाजी प्रभूवीर मुरार बाजी ।
फिरंगोजि नेताजी आनाजि गाजी ।
शिवाजीहि सप्रेम ज्यांतें नवाजी ॥ ८ ॥

तया जेधवां होय राज्याभिषेक ।
निवालें सुखें हर्षले सर्व लोक ॥
चिरंजीव झाला खरा कर्मयोगी ।
जनांच्या मनीं नित्य साम्राज्य भोगी ॥ ९ ॥

प्रजा स्वप्रजाशा तयें लोकपाळें ।
पहा पाळिल्या त्या कृपाळें नृपाळें ॥
समस्तांसि सन्मानुनी प्रेमभावें ।
शिवें लोक आकर्षिले सुस्वभावें ॥ १० ॥

भवानी जिजाई गुरू रामदास ।
तयांच्या नमीं नित्य भावें पदास ॥

त्रिमूर्तिप्रसादें यशा पावला हो ।
स्मरूं त्या शिवाच्या सदा पावलां हो ॥ ११ ॥

असा धर्मशाली महात्मा उदार ।
सदाचार स्वाचारसंपन्न थोर ॥
शिवासारखा भूप झाला न कोठें ॥
स्वदेशी विदेशी पहा ग्रंथ मोठे ॥ १२ ॥

स्व-सौख्याभिलाषी न राजा शिवाजी ।
झिजे चंदनासारिखा लोककाजीं ॥
कलीमाजि राजर्षि ऐसा न झाला ।
दिलें राज्यही सद्गुरु माउलीला ॥ १३ ॥

' स्वकष्टार्जित प्राज्य राज्यास भोगीं
अकर्तात्मभावें अहंतेसि त्यागीं ।
प्रजापालनीं दक्ष राहोनि सेवी '
असें सांगुनी ( गुरु ) मस्तकीं हस्त ठेवी ॥ १४ ॥

नमो ब्रह्मतेजा नमो क्षात्रतेजा ।
नमो रामदासा शिवाजी सुतेजा ।
नमो सद्गुरो गा नमो शिष्यवर्या ।
सदा धांव गा, पाव गा, राष्ट्रकार्या ॥ १५ ॥

—ल. रा. पांगारकर

( ७ )

## महाराष्ट्र - भूपाळी

प्रभावशाली परममंगला महाराष्ट्रदेशा
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा ॥

– १ –

सह्याद्रीच्या सहस्रशिखरीं उन्नत झालेला,
गोदा, कृष्णा, भीमा ह्यांनीं पुनीत केलेला,
पश्चिम सिंधू बंधु पाठिशीं, पूर्वोदधि जामात,
विंध्याद्रीची उंची लक्षी सातपुडा प्रांत,

अलंकार जयाचे पैठण, पंढरपुर
आळंदी, चाफळ, देहू, तुळजापुर,
कीं पुणें, रायगड, शिवनेरी, सुंदर,
रजःकणाला लावुनि भालीं महाराष्ट्र देशा
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा !

– २ –

वरी, नाचणी, भात पिकवितो कोंकणचा प्रांत
गहूं, बाजरी, कापुस, शाळू देशावर होत
कांबळ खांदीं, वहाण पायीं, डोइस मुंडासें,
श्यामल वर्णी सान रूप तव सोज्वळ मज भासे
ते विळे कोयते शस्त्रें हीं हातिचीं
तीं बटें ठेंगणीं भीमेच्या कांठिचीं,
मिळविती धुळीला कीर्ति बादशाहिची
वीरांना त्या वंदन अमुचें महाराष्ट्रदेशा
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा !

– ३ –

वीर प्रतापी राय शिवाजी छत्रपती अमुचा;
धर्म रक्षण्या एकचि केला घोष स्वराज्याचा;
भगवा झेंडा धन्य करी हें आनंदवनभुवन;
स्वातंत्र्याच्या जरिपटक्याला लक्ष वेळ नमन
पुण्याई पुरली शिवभूपाची पुढें
पेशवे पुण्याचे वळले अटकेकडे,
साम्राज्य मराठी पसरे चोहोंकडे,
स्मरणें स्फुरतें हृदय वांकतें, महाराष्ट्रदेशा
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा !

– ४ –

भीमा वाही तिच्या सुरावर गाई जी गीत
तीच मराठी भाषा अमुची ठसली हृदयांत;

ज्ञानेशाची ओंवी, अभंगवाणी तुकयाची
श्लोक वामनी जिला भूषवी आर्या मयुराची:

एकनाथ, चोखा, गोरा, ज्ञानेश्वर,
रामदास, तुकया, नामा मुक्तेश्वर,
नच जात पाहतो भक्तांची ईश्वर,

संतमंडळा लववूं माथा महाराष्ट्रदेशा
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयीं प्रणाम परमेशा !

—५—

मुक्ताबाई, तशी जनाई आळविते देवा,
सद्भावाला सहज लाभतो मोक्षाचा ठेवा,
गतवीरांचीं पुण्य-चरित्रें गाउनि अंगाई
बाळा करिते महाराष्ट्रीची भगिनी वा आई ॥

शोभवी अहल्या होळकरांची पुरी,
ती सती रमा भटवंशाला उद्धरी,
स्वातंत्र्यलक्ष्मी प्रचंड संगर करी,

प्रणिपात असो ह्या देवींना महाराष्ट्रदेशा
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा !

—दत्तो अप्पाजी तुळजापूरकर

(८)

## महाराष्ट्र गीत

जय जय महाराष्ट्र बोला। स्वातंत्र्यदेवतेला।
वंदन स्मरुनी सारूनि अंतरीं श्रीशिवरायाला ॥

पांडित्य माजलें फार।
धर्मात शिरे अंधार।
तों प्रकटे ज्ञानेश्वर।

करि बंड लाविली तीट मराठी महाराष्ट्र-भाला ॥ १ ॥

सत्यावर चढलें कीट ।
पसरला दंभ मोकाट ।
तों अभंग लिहिले कोट ।
विठ्ठल-विठ्ठल तुकाराम या करि जयघोषाला ॥ २ ॥

तो थोर शिवाजी राणा ।
स्वातंत्र्य तयाचा बाणा ।
तो संत येथला जाणा ।
कीं महाराष्ट्र जो आज रक्षण्या देवदूत झाला ॥ ३ ॥

लोकांस करूनिया जागे ।
शिवराज रहस्या सांगे ।
निजधर्म उजळण्या लागे ।
तो राजकारणी संत एकला रामदास अपुला ॥ ४ ॥

दुर्दैव जरी ओढवलें ।
कर्तव्य सारखें केलें ।
पावित्र्य जीवनीं भरलें ।
ती राजयोगिनी सती अहल्या भूषण धर्माला ॥ ५ ॥

शेवटची चमके बिजली ।
ती राणी झांशीवाली ।
स्वातंत्र्य संगरीं पडली ।
महाराष्ट्राची लक्ष्मी देवी वंद्य भारताला ॥ ६ ॥

रणमर्द मराठे वीर ।
पूर्वजें कथियला थोर ।
स्वातंत्र्य-मंत्र गंभीर ।
तोडण्या शृंखला जपा मंत्र तो घ्या ह्या शपथेला ॥ ७ ॥
हरहर महादेव बोला । रणवीर गर्जनेला ॥

—दत्तो अप्पाजी तुळजापूरकर

(९)

## श्रीमहाराष्ट्रगीत

मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्रदेशा !
प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्रदेशा !

राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा !
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा !

अंजनकांचनकरवंदीच्या कांटेरी देशा !
बकुलफुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा !
भावभक्तिच्या देशा, आणिक बुद्धीच्या देशा !
शाहीरांच्या देशा, कर्त्या मर्दांच्या देशा !
जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा !
प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्रदेशा !
ठायीं ठायीं पांडवलेणीं सह्याद्रीपोटीं
किल्ले सत्तावीस बांधिले सह्याद्रीपाठीं

तोरणगडचा, प्रतापगडचा, पन्हाळगडिंचाही
लढवय्या झुंजार डोंगर तूंच सख्या पाही !
सिंधुदुर्ग हा, विजयदुर्ग हा ही अंजनवेल
दर्यावर्दी मर्दुमकीची ग्वाही सांगेल
तुझ्या भुकेला वरी नागली आणि कणीकोंडा
वहाण पायीं अंगिं कांबळी उशाखालीं धोंडा
विळा कोयता धरी दिगंबर दख्खनचा हात
इकडे कर्नाटक हांसतसे तिकडे गुजरात

मयूरकविच्या पूर्णयमकमय महाराष्ट्रदेशा !
कवि कृष्णाच्या निर्यमका हे महाराष्ट्रदेशा !

देवी ज्ञानेश्वरी करि जिथें भक्तीचा खेळ
तिथेंच गीतारहस्य वसवी बुद्धीचा मेळ

जिथें रंगलीं साधीं भोळीं जनाइचीं गाणीं
तिथेंच खेळे श्रीपादांची कलावती वाणी

विकावयाला अमोल असली अभंगमय वाणी
करी तुझी बाजार पेठ तो देहूचा वाणी

भीमथडीहुनि चहुंमुलखांवर फिरले धारकरी
भीमथडीवर चहुंमुलखांतुनि फिरले वारकरी
आळंदीच्या ज्ञानोबांची भिंत घेत धांव
पुंडलिकाचें नांव चालवी दगडाची नाव

गोलघुमट घुमवीत सारखा नवलाची भाक
जेजुरीवर चढी पायरी उभी नऊ लाख

शहर पुण्याच्या, शिवनेरीच्या, पंढरिच्या देशा !
पुंडलिकाच्या, शिवरायाच्या, टिळकांच्या देशा !

मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्रदेशा !
प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्रदेशा !

—गोविंदाग्रज

(१०)

## श्रीगोदावरीस्तवन

जय संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरी
येथ शिवानें जटा फटाफट आपटुनी तुज वाहविली,
गोवधतापें अनुतापाकुल गौतमतनु अवगाहविली,
धन्य महात्मा, आपण तरला, तारियलें जग निरंतरीं ।
जय संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरी ॥ १ ॥

गिरिशिखराहुनि जगदाधारा धारा ही तव अवतरते ।
छुम छुम झुमझुम जलकलरव हें नादब्रह्मच कीं नटतें ? ॥
राहिन हे तव जलधारारव अवधाराया या शिखरीं ।
जय संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरी ॥ २ ॥

भूतावरिचें तव वात्सल्यचि अमृतमिषें हें संभवलें ।
द्रवलें चंद्रकलामृत यांतचि शिवचरितामृत कालविलें ॥
त्रिगुणित ऐसें हे परमामृत पाजुनि तृष्णा दूर करी ।
जय संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरी ॥ ३ ॥

सकल मलांचें भंजन कीं हें ? विकल मनांचें रंजन कीं ? ।
विषयांधांचें अंजन कीं हें ? ज्ञानमधूच निरंजन कीं ? ॥
कीं संजीवन वैराग्याचें, शांतरसामृत खरोखरी ।
जय संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरी ॥ ४ ॥

हें मुक्तीचें केलिसरोवर, यांतुनि हो रममाण मना ।
जगदात्म्याचें निर्मल बिंबचि तूं प्रतिबिंब सजें सुजना ॥
परम सुखाचा डोह शरीरा । मार बुडी तूं स्नान करी ।
जय संजीवनि जननि यशोदे श्रीगोदे ! भवताप हरी ॥ ५ ॥

ध्यानहि जरि तव पावन करितें, स्नान तरी वद काय करी ? ।
स्नान, पान, गुणगानहि केलें, देशिल फल मग काय तरी ? ॥
अधिकाचें फल अधिकचि म्हणती, पण तें माझ्या ठेव करीं ।
जय संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे । भवताप हरी ॥ ६ ॥

जन्मुनि तीरीं, पिउनि तुझें पय, न करिति तव गुणगौरव हा ।
अधमपणास्तव चुकेल कां गे सांग मला तरि रौरव ? हा ॥
तव गुण गातां रमवुनि यमही झुलविन शब्दब्रह्म करी ।
जय संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे । भवताप हरी ॥ ७ ॥

—चंद्रशेखर, गंगाद्वारीं भजन

( ११ )

कृष्णाकोयनेचा संगम

सखे गे, सुरेख संगम किती, कृष्णा मिळाली कोयनेप्रति
किती विशाल तट हे अहा !
प्रिय सखे उभी तूं रहा
क्षण येथिल शोभा पहा ॥ सखे गे० ॥

बहु चकाकते यावरी
हीं सुरेख सिकता, परी
जाय गळुनि धरितां करीं ॥ सखे गे० ॥

जगिं असे सुखाचे क्षण
नर झटे धराया पण
जाति तयास ते फसवुन ॥ सखे गे० ॥

झष जलीं उड्या मारिती
भय न या सुखी हे किती
भवजलीं रमूं या रितीं ॥ सखे गे० ॥

बघ दोघिंचि मैत्री किती
एकमेकिस आलिंगिती
दोन असून एकच होती ॥ सखे ग० ॥

जर अशींच अपुलीं मतें
एक होतील गे प्रीतिनें
मग सुखास कुठुनी उणें ॥ सखे गे० ॥

स्थळ पवित्र हें गे जगीं
जन बघेल जो लोचनीं
अघ हरेल त्याचें क्षणीं
सखे गे सुरेख संगम किती ॥

—माधवानुज

(१२)

## माझा महाराष्ट्र

नकाशा पुढें पाहतां भारताचा महाराष्ट्र आधीं भरे लोचनीं
असें हीच माझी मायभूमी असे बोल येतात तोण्डांतुनी ॥
हिच्या वैभवोत्कर्षसंवर्धना मी, पडे प्रश्न, आयास केले किती ।
कळोनी परी आत्मनिष्क्रीयता ती तदा हाय पस्तावते मन्मति ॥ १ ॥

भूतावरिचें तव वात्सल्यचि अमृतमिषें हें संभवलें ।
द्रवलें चंद्रकलामृत यांतचि शिवचरितामृत कालविलें ॥
त्रिगुणित ऐसें हें परमामृत पाजुनि तृष्णा दूर करी ।
जय संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरी ॥ ३ ॥

सकल मलांचें भंजन कीं हें ? विकल मनांचें रंजन कीं ? ।
विषयांधांचें अंजन कीं हें ? ज्ञानमधूच निरंजन कीं ? ॥
कीं संजीवन वैराग्याचें, शांतरसामृत खरोखरी ।
जय संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरी ॥ ४ ॥

हें मुक्तीचें केलिसरोवर, यांतुनि हो रममाण मना ।
जगदात्म्याचें निर्मल बिंबचि तूं प्रतिबिंब सजें सुजना ॥
परम सुखाचा डोह शरीरा । मार बुडी तूं स्नान करी ।
जय संजीवनि जननि यशोदे श्रीगोदे ! भवताप हरी ॥ ५ ॥

ध्यानहि जरि तव पावन करितें, स्नान तरी वद काय करी ? ।
स्नान, पान, गुणगानहि केलें, देशिल फल मग काय तरी ? ॥
अधिकाचें फल अधिकचि म्हणती, पण तें माझ्या ठेव करीं ।
जय संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे । भवताप हरी ॥ ६ ॥

जन्मुनि तीरीं, पिउनि तुझें पय, न करिति तव गुणगौरव हा ।
अधमपणास्तव चुकेल कां गे सांग मला तरि रौरव ? हा ॥
तव गुण गातां रमवुनि यमही झुलविन शब्दब्रह्म करी ।
जय संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे । भवताप हरी ॥ ७ ॥

—चंद्रशेखर, गंगाद्वारीं भजन

(११)

कृष्णाकोयनेचा संगम

सखे गे, सुरेख संगम किती, कृष्णा मिळाली कोयनेप्रति
किती विशाल तट हे अहा !
प्रिय सखे उभी तूं रहा
क्षण येथिल शोभा पहा ॥ सखे गे० ॥

बहु चकाकते यावरी
ही सुरेख सिकता, परी
जाय गळुनि धरितां करीं ॥ सखे गे० ॥

जगिं असे सुखाचे क्षण
नर झटे धराया पण
जाति तयास ते फसवुन ॥ सखे गे० ॥

झष जलीं उड्या मारिती
भय न या सुखी हे किती
भवजलीं रमूं या रितीं ॥ सखे गे० ॥

बघ दोघिंचि मैत्री किती
एकमेकिस आलिंगिती
दोन असून एकच होती ॥ सखे ग० ॥

जर अशींच अपुलीं मतें
एक होतील गे प्रीतिनें
मग सुखास कुठुनी उणें ॥ सखे गे० ॥

स्थळ पवित्र हें गे जगीं
जन बघेल जो लोचनीं
अघ हरेल त्याचें क्षणीं
सखे गे सुरेख संगम किती ॥

—माधवानुज

(१२)

## माझा महाराष्ट्र

नकाशा पुढें पाहतां भारताचा महाराष्ट्र आधीं भरे लोचनीं
असें हीच माझी मायभूमी असे बोल येतात तोण्डांतुनी ॥
हिच्या वैभवोत्कर्षसंवर्धना मी, पडे प्रश्न, आयास केले किती ।
कळोनी परी आत्मनिष्क्रीयता ती तदा हाय पस्तावते मन्मति ॥ १ ॥

महाराष्ट्र माझा ! महाराष्ट्र माझा ! मुखानें वृथा चालते घोषणा ।
परन्तू न संसारभाराविना या दुजा कामधन्दा सुचेना मना ॥
फिरावें परीघांत एकाच, जैसा फिरे बैल घाण्यास जो जुम्पिला ।
स्वताचे सदा गाळुनी घर्मबिन्दू दुजाचा मळा मात्र मीं शिम्पिला ॥२॥
जिरूं लागल्या पार आतां उमेदी, सरूं लागलें पारतन्त्र्यीं जिणें ।
झुरूं लागुनी जीव खालीं वरी हो, जसें पाखरूं होय पंखाविणें ॥
कुणाचा धरूं हात हातांत आतां ? सुचेना वरूं मार्ग मी कोणते ।
न सेवा तुझी हातुनी जाहली या सदा शल्य हें मानसीं टोचतें ॥ ३ ॥
अमर्याद भूगोल विस्तारलेला किती त्यामधीं देश पुञ्जाळले ।
महाराष्ट्रभूचें परी त्यांत माझ्या दिसे सम्प्रती तेज मन्दावलें ॥
तयांसारिखा दिव्य तेजोगुणी हा महाराष्ट्र होईल केव्हां पुन्हा ?
महाराष्ट्रमाते ! जना बुद्धि दे या तुझ्या वैभवोत्कर्षसंवर्धना ॥ ४ ॥
सदा गव्हरांतून सह्याद्रिच्या जे इंथ स्रोत येतात देशावरी ।
पवाडेच गाती जणूं पूर्वजांचे स्फुरायास चैतन्य लोकान्तरीं ॥
निमाल्या महा पूर्वजांच्याच किंवा मनीषा मरुद्वैखरी बोलती ।
तयांनीं जित्या होउनी भावना या घडो हातुनी मायसेवाकृती ॥ ५ ॥
'महाराष्ट्र माझा' असें आज जरी जन्मलाभामुळें बोलणें ।
'महाराष्ट्र माझा' असें घातलेल्या कधीं भूषणांच्यामुळें बोलणें ॥६॥

—यशवंत

(१२)

## सह्याद्रि – स्तोत्र

सह्याद्रि नामा नग हा प्रचण्ड
हा दक्षिणेचा अभिमानदण्ड ।
ज्वालामुखींनी जरि निर्मियेला
पवित्र तो रामपदें जहाला ॥ १ ॥

शिरावरी शंभु विराजताहे
कन्याकुमारी पद धूत आहे ।

स्कंधावरी दुर्गम दुर्ग ज्याच्या
हातीं झळाळे परशू तयाच्या ॥ २ ॥

उन्मत्त–निर्दालन–दक्ष राही
निर्वासितां आश्रय लाभ देई ।
ही पुण्यभूमी तशि त्यागभूमी
स्वातंत्र्यभूमी तशि कर्मभूमी ॥ ३ ॥

आधार, आदर्शहि भारताला
प्रसाद त्याचाच अम्हां मिळाला ।
झेंडा तयाचा भगवा विराजे
तयापुढें मस्तक नम्र माझें ॥ ४ ॥

—स. आ. जोगळेकर

(१४)

मराठी संस्कृती—

माझ्या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा

हिच्या संगानें जागल्या
दऱ्याखोऱ्यांतील शिळा

हिच्या कुशींत जन्मले
काळे कणखर हात

ज्यांच्या दुर्दम धीरानें
केली मृत्यूवरी मात

कडेकपारींत उभीं
हिच्या शिवाचीं देवळें

तेज सरितांमधून
स्वाभिमानाचें ओहळे

माझ्या मराठी मातीला
    नका म्हणूं हीन दीन
स्वर्गलोकाहून थोर
    मला हिचें महिमान
दिवा झोंपडींत मंद
    पेटे त्यावर मशाल
तिच्या दीप्तीनें उजळे
    घर देशाचें विशाल
रत्नजडित अभंग
    ओंवी अमृताची सखी!
चारी वर्णांतुनि फिरे
    हिच्या काव्याची पालखी
येथें देवाचें मंदिर
    नाहीं श्रीमंत सोनेरी
हिच्यासाठीं रमापति
    राहे वाळवंटावरी
रसरंगांत भिजला
    येथें शृंगाराचा स्वर
येथें अहंता द्रवली
    झालें वसुधेचें घर
माझ्या दरिद्री मातीचा
    नका करूं अवमान
हिच्या दारिद्र्यांत आहे
    भविष्याचें वरदान
येथें फडकला झेंडा
    विळ्याकोयत्यांच्यासाठीं
खड्ग खंबीर राहिलें
    सदा कंगालांच्या पाठीं
नाहीं पसरला कर
    कधीं मागायास दान

स्वर्णसिंहासनापुढें
　　कधीं लवला ना मान
हिच्या गगनांत घुमे
　　आद्य स्वातंत्र्याची ग्वाही
हिच्या पुत्रांच्या वाहूंत
　　आहे समतेची ग्वाही
अन्यायाची सुलतानी
　　कधीं हिनें ना साहिली
आहे मृत्यूच्या दाराशीं
　　हिच्या श्रद्धेची हवेली
माझ्या मराठी मातीचा
　　लावा ललाटास टिळा
हिच्या संगें जागतील
　　मायदेशांतील शिळा

— कुसुमाग्रज.

(१५)

आली पंढरीची दिंडी

दारीं उभे भोये जीव
　　घरीं पयाले पाखंडी
टायमुर्दुंगाची धून
　　आली पंढरीची दिंडी
पुढें लाह्याची डालकी
　　वुक्कागुलालाची गिंडी
मधी चालली पालखी
　　आली पंढरीची दिंडी
आरे वारकऱ्या, तुले
　　नही ऊन, वारा, थंडी
झुगारत अवघ्याले
　　आली पंढरीची दिंडी

टायमुदुंगाच्यावरी
हरीनाम एक तोंडी
' जे जे रामकिस्न हारी '
आली पंढरीची दिंडी
शिक्यावर बालकुस्न
तठी फुटली रे हांडी
दहीकाला खाईसनी
आली पंढरीची दिंडी
मोठ्या तट्टयाच्या दमन्या
त्यांत सर्वा सामायन
रेसमाच्या कापडांत
भागवत रामायन
घ्या रे हातीं परसाद
लावा बुक्का कपायाले
करा एवढं तरी रे
दुजं काय रे संसारी
देखा घडीन तुम्हाले
आज पंढरीची वारी
कसे बसले घरांत
असे मोडीसन मांडी
चला उचला रे पाय
आली पंढरीची दिंडी

—बहिणाबाई चौधरी

( १६ )

केवळ माझा सह्यकडा !

भव्य हिमालय तुमचा अमुचा, केवळ माझा सह्यकडा
गौरीशंकर उभ्या जगाचा, मनांत पूजिन रायगडा
तुमच्या अमुच्या गंगायमुना, केवळ माझी भिवरथडी
प्यार मला हे कभिन्न कातळ, प्यार मला छाती निघडी

मधुगुंजन लखलाभ तुम्हांला, बोल रांगडा प्यार मला
ख्रिस्त बुद्ध विश्वाचे शास्ते, तुकयाचा आधार मला
धिक् तुमचे स्वर्गहि साती
इथली चुंबिन मी माती

या मातीचे कण लोहाचे तृणपात्यांना खड्गकळा
कृष्णेच्या पाण्यांतुन अजुनी वाहतसे लाव्हा सगळा
कबीर माझा, तुळशी माझा, ज्ञानेश्वर परि माझाच
जयदेवाचा जय बोला परि माझा नाम्याचा नाच
जनीं जनार्दन बघणारा तो 'एका' हृदयीं एकवटे
जनाबाईच्या ओंवीमध्यें माझी मजला खूण पटे
इंद्रायणिच्या डोहामधली गाथा ओली ती ओली
ती माझी मी तिचाच ऐशी जवळिक कायमची झाली
भक्तीचा मेळा दाटे
चोख्याची पैरण फाटे

निर्गुण मानवतेची पूजा करणारे करूं देत भले
माझ्यासाठीं भीमाकाठीं भावभक्तिची पेठ खुले
रामायण तर तुमचें माझें भारत भारतवर्षाचें
छत्रपतींची वीरकहाणी निधान माझ्या हर्षाचें
रजपूतांची विक्रमगाथा तुमच्यापरि मजला रुचते
हृदयाच्या ह्रहयांत परंतू बाजी बाजीची सुचते
अभिमन्यूचा अवतारच तो होता माझा जनकोजी
दत्ताजीचा शेवटचा तो शब्द अजुन हृदयामाजीं
बच जायें तो और लढें
पाउल राहिल सदा पुढें

तुम्हांस तुमचे रुसवेफुगवे घ्या सगळा नाजुक नखरा
माझ्यासाठीं राहिल गाठीं मरहट्टयाचा हट्ट खरा
तुमचेमाझे ख्यालतराणे दोघेहि ऐकूं गझला
होनाजीची सोनलावणी वेड लावते परि मजला

मृदुंग मोठा सुमधुर बोले, मंजुळ वीणा अन् मुरली
थाप डफाची कडकडतां परि बाही माझी फुरफुरली
कडाडणारा बोल खडा जो दरीदरीमधुनी घुमला
उघडुनि माझ्या हृदयकवाडां तोच पवाडा दुमदुमला
तटातटा तुटती बंद
भिवईवर चढते धुंद

औट हात देहांत अचानक वादळ घुसमटुनी जातें
उचंबळे हृदयांत पुन्हां तें इतिहासाशीं दृढ नातें
कळे मला काळाचें पाउल द्रुतवेगानें पुढतिं पडे
कळे मला क्षितिजाचें वर्तुळ क्षणोक्षणीं अधिकचि उघडे
दहा दिशांचे तट कोसळले, ध्रुव दोन्ही आले जवळी
मीही माझे बाहू पसरुन अवघ्या विश्वातें कवळी
माझ्या घरचीं विशाल दारें, खुशाल हीं राहोंत खुलीं
मज गरिबाची कांवळ वाकळ सकळांसाठीं आंथरली
मात्र भावड्या हृदयांत
तेवत आहे जी ज्योत
ती विझवाया पहाल कोणी मुक्त करुन झंझावात
कोटि कोटि छात्यांचा येथें कोट उभारूं निमिषांत

— वसंत बापट

(१७)

"समतेचें हें तुफान उठलें"

ऊठ ऊठ सह्याद्रि, घुमवित बोल मराठी खडे,
समतेचें हें तुफान उठले; उठले सागरकडे
हीच मराठी जिच्या मुखानें वदली ज्ञानेश्वरी
शिववानें तरवार घासली याच मराठीवरी;
हिच्या स्वागतासाठीं झडले तोफांचे चौघडे.
टिळक, गोखले, फुले, रानडे, आगरकर वैखरी—

स्वातंत्र्याच्या पांच मशाली जळती वेदीवरी;
ह्या ज्योतीवर दीप पेटवा चला भविष्याकडे.
स्वतंत्रतेचा मंत्र जयांना गर्भामध्यें मिळे;
तेच मराठे आम्ही; आम्ही सह्याद्रीचे सुळे
स्वराज्यांतुनी पुढें चला रे, चला सुराज्याकडे.
दर्याच्या भरतीच्या लाटा महाराष्ट्रअंगना
ककंणनादा भिउनि तयांच्या शत्रु सोडिती रणा;
वीज माळुनी वेणीवरती त्याही घुसल्या पुढें
ऊठ खेडुता, पुन्हां एकदां झाडुनिया घोंगडी;
ऊठ मजूरा, पुन्हां मारण्या आघाडीवर उडी;
एकजूट ही पाहून पडतिल अन्यायाला तडे.

—विंदा करंदीकर

(१८)

माझा महाराष्ट्र

माझा महाराष्ट्र, माझा महाराष्ट्र ।
माझा महाराष्ट्र हा सुंदर... ॥ ध्रु० ॥

गोदावरी कोयना आणि कृष्णा ।
भली चन्द्रभागा इथें वाहते
इंद्रायणी येथ देवा घरींची
गाथा मराठी शिरीं झेलिते ! ॥ १ ॥
'पूर्णा' सुखाची तशी 'वैनगंगा'
गातातिं या गायनें सुंदर
उभा धीर गंभीर सह्याद्रि मागें
पुढें नाचतो हा महासागर ! ॥ २ ॥
किती कोट किल्ले उभारूनि छाती
कथा सांगताती अजुनी जुनी;

मृदुंग मोठा सुमधुर बोले, मंजुळ वीणा अन् मुरली
थाप डफाची कडकडतां परि बाही माझी फुरफुरली
कडाडणारा बोल खडा जो दरीदरीमधुनी घुमला
उघडुनि माझ्या हृदयकवाडां तोच पवाडा दुमदुमला
तटातटा तुटती बंद
भिंवईवर चढते धुंद

औट हात देहांत अचानक वादळ घुसमटुनी जातें
उचंबळे हृदयांत पुन्हां तें इतिहासाशीं दृढ नातें
कळे मला काळाचें पाउल द्रुतवेगानें पुढतिं पडे
कळे मला क्षितिजाचें वर्तुळ क्षणोक्षणीं अधिकचि उघडे
दहा दिशांचे तट कोसळले, ध्रुव दोन्ही आले जवळी
मीही माझे बाहू पसरुन अवघ्या विश्वातें कवळी
माझ्या घरचीं विशाल दारें, खुशाल हीं राहोत खुलीं
मज गरिबाची कांबळ वाकळ सकळांसाठीं आंथरली

मात्र भाबड्या हृदयांत
तेवत आहे जी ज्योत
ती विझवाया पहाल कोणी मुक्त करुन झंझावात
कोटि कोटि छात्यांचा येथें कोट उभारूं निमिषांत

—वसंत बापट

## (१७)

### "समतेचें हें तुफान उठलें"

ऊठ ऊठ सह्याद्रि, घुमवित बोल मराठी खडे,
समतेचें हें तुफान उठले; उठले सागरकडे
हीच मराठी जिच्या मुखानें वदली ज्ञानेश्वरी
शिववानें तरवार घासली याच मराठीवरी;
हिच्या स्वागतासाठीं झडले तोफांचे चौघडे.
टिळक, गोखले, फुले, रानडे, आगरकर वैखरी—

स्वातंत्र्याच्या पांच मशाली जळती वेदीवरी;
ह्या ज्योतीवर दीप पेटवा चला भविष्याकडे.
स्वतंत्रतेचा मंत्र जयांना गर्भामध्यें मिळे;
तेच मराठे आम्ही; आम्ही सह्याद्रीचे सुळे
स्वराज्यांतुनी पुढें चला रे, चला सुराज्याकडे.
दर्याच्या भरतीच्या लाटा महाराष्ट्रअंगना
कंकणनादा भिउनि तयांच्या शत्रु सोडिती रणा;
वीज माळुनी वेणीवरती त्याही घुसल्या पुढें
ऊठ खेडुता, पुन्हां एकदां झाडुनिया घोंगडी;
ऊठ मजूरा, पुन्हां मारण्या आघाडीवर उडी;
एकजूट ही पाहून पडतिल अन्यायाला तडे.

—विंदा करंदीकर

(१८)

माझा महाराष्ट्र

माझा महाराष्ट्र, माझा महाराष्ट्र ।
माझा महाराष्ट्र हा सुंदर... ॥ ध्रु० ॥

गोदावरी कोयना आणि कृष्णा ।
भली चंन्द्रभागा इथें वाहते

इंद्रायणी येथ देवा घरींची
गाथा मराठी शिरीं झेलिते ! ॥ १ ॥

'पूर्णा' सुखाची तशी 'वैनगंगा'
गाताति या गायनें सुंदर

उभा धीर गंभीर सह्याद्रि मागें
पुढें नाचतो हा महासागर ! ॥ २ ॥

किती कोट किल्ले उभारूनि छाती
कथा सांगताती अजुनी जुनी;

माता भवानी अम्हां रक्षणारी
राजे शिवाजी प्रतापी गुणी ! ॥ ३ ॥

मराठी पहा आमुची एकभाषा
हें अमृताचें असे ताट हो !
घेऊं सुखें घास एका दिलानें
तो धर्मपंथी कुणीही असो ! ॥ ४ ॥

ज्ञानामृताचे घडे घेउनिया
समर्थांसवें नाथ, ज्ञानेश्वर;
वीणा करीं घेति नामा-तुकोबा
अंभगांतुनी बोलती 'विठ्ठल' ! ॥ ५ ॥

गीता प्रभूची जगा सांगणारे
इथें गाजले बाळ गंगाधर,
येथें महात्मा फुले, भीमराव,
कानांवरी येइ त्यांचा स्वर ! ॥ ६ ॥

हा भारताचा भुजदंड आहे
ध्वजा भारताची उभारीतसे
महाराष्ट्र हा शूर स्वातंत्र्यप्रेमी
छातीवरी वार झेलीतसे ! ॥ ७ ॥

इथें भक्ति, शक्ती इथें देशप्रीती
हें कीर्ति, प्रीती सुखाचें वन,
नवीं पुण्यक्षेत्रें फुलतात येथें
याला असो आमुचें वंदन ! ॥ ८ ॥

—वि. म. कुलकर्णी

( १९ )

## जय महाराष्ट्र

जय महाराष्ट्र संयुक्त महाराष्ट्राच्या गाऊं ताना ।
गाऊं उंचावुनी माना । घेऊं तानावर ताना ॥

भाषेचा थाट मराठी । अहिराणी कोंकणी घाटी
शब्दोच्चाराची खोटी । शत्रुला वाटते धास्ती ॥
ज्ञानेशापासुनि भिल्ल वारली । घेई नित नवरसना ॥

सौंदर्य महाराष्ट्राचें । क्षणक्षणां प्रत्यया येतें
माती सुगंध उधळिते । दरिकपार रिझवी मनातें
गोमांतक वेरुळ दावि अजंठा । अमर मानवी स्वप्ना ॥

कोयना नी गोदा, कृष्णा । भागवुनी आमुची तृष्णा
उदरांत मोती पिकवोनी । महाराष्ट्र उभा सुखवोनी
काधें उग्ररूप खंदक रूपानें पाणी पाजी शत्रूंना ॥

जय महाराष्ट्र ॥

जणुं संताजी अन् बाजी सह्याद्री सातपुडादी ।
आजही छाती उघडोनी । गर्जतसे पर्वतराजी ।
घाला घण अमुच्या छातीवर अन् पाहा मराठी बाणा ॥

जय महाराष्ट्र ॥

या पर्वतराजी कसल्या । कर्वतीच तापविलेल्या ।
महाराष्ट्रभोंवती पसरल्या । अरिसेना ज्यांनीं चिरल्या
ही परंपरा घेऊन मिरवितो । आमुचा मावळ तान्हा ॥

जय महाराष्ट्र ॥

अन् इतिहासाचीं पानें । भरलीं सारीं अभिमानानें ।
शतकानुतक पहा वळुनि । लिहिलीं आपुल्या रक्तानें ।
घेऊनी स्फूर्ति त्यांतून जागवूं जागत शक्तींना ॥

जय महाराष्ट्र ॥

कानडी, हिंदी, गुजराथी । आंध्र ओरिसाही साथी ।
राखुनी त्यांच्या हक्काला । बांधुनि लोक राज्याला
मुंबईपासुनी नागपूर सुखसनद वांटुं सकलांना ॥

जय महाराष्ट्र ॥

स्वातंत्र्य शांतता स्थापूं । अवघे जग त्यानें व्यापूं ॥
फडकवूं ध्वज समानतेचा । पर्वा न जिवाची करतां ॥
संयुक्त महाराष्ट्र दाखवूं । विभवाप्रत चढतांना ॥

जय महाराष्ट्र ॥

—अमरशेख

(२०)

## गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती !

जनतेच्या सत्तेची ज्योत जागती ।
गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती ॥
फिरंग्यास गोव्याच्या चारुनी खडे ।
माय मराठी बोली चालली पुढें ॥
एक भाषिकांची ह्यो येथ संगती ।
गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती ॥ १ ॥

हो निजाम, कोल्हापूर, औंध, जंजिरा ।
जनतेच्या दास्याच्या कुजट जंजिरा ॥
तोडी त्या एक महाराष्ट्रसंस्कृति ।
गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती ॥ २ ॥

सह्य पठारीच्या तेजस्वी रणकथा ।
रंगती शाहीर मुखें अजुनी ऐकतां ॥
इतिहासीं एक मिळे स्फूर्ति अन् गति ।
गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती ॥ ३ ॥

कोंकणच्या दुःखाचीं तरल स्पंदनें ।
नागपुरी जनतेचीं हलविती मनें ॥
माय एक धरणीला जेथ मानिती ।
गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती ॥ ४ ॥

शेतकरी जमिनीचा एथल्या धनी ।
कामगार जनतेचा येथ अग्रणी ॥
श्रमजीवी सत्तेची जेथ शाश्वति ।
गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती ॥ ५ ॥

भिन्न धर्म, जातींचीं सर्व बंधनें ।
तोडुनिया एकजीव जाहलीं मनें ॥
लोकयुगासाठीं जिथें रक्त सांडती ।
गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती ॥ ६ ॥

—डॉ. सुधीर फडके

[ ह्या प्रकरणांत महाराष्ट्रांतील सौंदर्यनिष्ठ कलांचा इतिहास दिला आहे. त्यांत शिल्प, चित्र, गायन–नर्तन, नाट्य ह्या कलांचा विचार केला आहे. राष्ट्राच्या संस्कृतींत ज्याप्रमाणें त्याची भौगोलिक परिस्थिति, लोकांचा स्वभाव, त्यांचा इतिहास, त्यांचा धर्म, त्यांची नीतिमत्ता व त्यांचें वाङ्मय ह्यांचा अन्तर्भाव होतो, तसा त्याच्या कलांचाहि अन्तर्भाव होतो. कला हें संस्कृतीचें एक प्रधान अंग आहे. राष्ट्राच्या प्रतिभेचा आविष्कार त्याच्या कलांत होतो. महाराष्ट्राच्या संस्कृतीचें पूर्णदर्शन त्याच्या कलादर्शनाशिवाय होणार नाहीं. कलांचा हा इतिहास देतांना आम्हाला त्यांचीं साधनें व त्यांचीं प्रतीकें देतां आलीं नाहींत. त्यांच्या ऐवजीं आम्हीं त्या साधनांवरून संकलित केलेला इतिहास दिला आहे. ]

## (१)

## महाराष्ट्राची शिल्पकला

महाराष्ट्र देश हा फार प्राचीन काळापासून शिल्पकलेबद्दल प्रसिद्ध आहे. ही शिल्पकला ह्या देशाच्या एकंदर नैसर्गिक परिस्थितीला अनुसरून आहे. ह्या प्रदेशाचा कांहीं भाग डोंगराळ आहे. पश्चिम बाजूस सह्यपर्वताच्या रांगा उत्तर दक्षिण पसरल्या तर आहेतच, पण त्यांचे फाटे व सुळके देशांत कित्येक ठिकाणीं आंत घुसले आहेत. डोंगर खडकाळ असून व शिल्पकलेच्या साधनांनीं संपन्न असा आहे. त्याला 'खडकाचा दगडाचा देश' असें म्हणतात. येथें दगड काळे भोर, खडक घट्ट, चुना विपुल, माती चांगली चिवट अशीं साधनें असल्यानें येथील शिल्पकला सुंदर व उपयुक्त झाल्यास नवल नाहीं. येथें देवालयें, मंदिरें, विहार, लेणीं, स्तूप, मूर्ति, वस्ती, घाट हीं जशीं धर्मक्षेत्रें आहेत तशी गड, कोट, जंजिरे, गढी,

मराठी ग्रंथ ... अनुक्रम...

तट हीं रणक्षेत्रें आहेत. धर्मक्षेत्रें काय किंवा रणक्षेत्रें काय; हीं प्राचीन कालापासून प्रसिद्ध आहेत. हीं बांधकामें धर्मभावनेनें केलेलीं असोत किंवा राज्यरक्षणाच्या दृष्टीनें केलेलीं असोत; तीं सर्व महाराष्ट्रांतील शिल्पकलेचीं सुंदर प्रतीकेंच होत. भाजें, भेडसा येथील चैत्य, अजंठा येथील लेणीं, वेरूळ येथील विहार व मंदिरें, घारापुरी येथील त्रिमूर्ति, नाशिक येथील पांडवलेणीं, कान्हेरी, जुन्नर येथील गुंफा, यादवकालांतील हेमाडपंती देवालयें, बार्शी येथील श्रीभगवानांची मूर्ति, शिवनेरी, पन्हाळा, रायगड, सिंहगड, प्रतापगड, पुरंदरचा गड हे भूमिदुर्ग, जयदुर्ग, विजयदुर्ग, वगैरे जलदुर्ग, त्र्यंबक, नाशिक, पैठण, वाई, कऱ्हाड, पंढरपूर वगैरे ठिकाणचे घाट इत्यादि सर्व महाराष्ट्रीय शिल्पकलेचे उत्तम नमुनेच आहेत.

## (१) भाजें

हीं लेणीं लोणावळ्याजवळ सात आठ मैलांवर डोंगरांतील खडकांत कोरलीं आहेत. हीं फार प्राचीन आहेत. इ. स. पूर्व पहिल्या शतकांतील हें खोदकाम आहे. येथें एक चैत्यमंडप असून प्रवेशांतच दोन द्वारपाल सायुध उभे आहेत. येथें आंत भिक्षूंना राहण्यासाठीं खडकांतच लहान लहान खोल्या खोदल्या आहेत. आंत सूर्य रथारूढ व इंद्र, गजारूढ अवस्थेंत दाखविले आहेत. येथून सहा मैलांवर भेडसा व कोंडाणें येथेंहि अशींच लेणीं आहेत व तीं भाजें येथील लेण्यांपेक्षां सुंदर आहेत.

## (२) कार्लें व कान्हेरी

भाज्याच्या समोरच कार्लें येथील लेणीं जरा कालाच्या दृष्टीनें नंतरचीं असलीं तरी फार भव्य आहेत. येथील चैत्य शोभायमान आहे. त्यावर कांहीं गजारूढ दिव्ययुग्में दाखविलीं आहेत. मंडपाच्या वर एक चैत्यगवाक्ष असून त्यांतून आंतील स्तूपावर प्रकाशकिरणें पडून स्तूप स्पष्ट दिसावा

अशी व्यवस्था केली आहे. तीन वर्तुळाकार प्रवेशद्वारांवर दात्यांच्या मूर्ति उठावदार रीतीनें कोरलेल्या स्पष्ट दिसतात. कान्हेरी येथील लेणीं अशींच असून त्यांच्या आंत बुद्धाच्या मूर्ति कोरलेल्या आहेत. ह्या लेण्यांत स्तंभ असून त्यांच्या वरच्या भागीं सिंह कोरून त्यावर धर्मचक्र दाखविलें आहे. कार्ल्याचा चैत्य हा दिव्यत्वाचा व भव्यतेचा एक उत्तम नमुनाच आहे. 'सर्वं क्षणिकं क्षणिकं' अशी जरी बुद्धाची जीवन-घोषणा असली तरी हें बुद्धशिल्प कलेच्या चिरंतनत्वाचीच घोषणा करतें.

## ( ३ ) नाशिक – जुन्नर

नाशिक येथील पांडवलेणीं कार्ले – कान्हेरीच्या लेण्यांसारखींच परंतु त्यांपेक्षां लहान आकाराचीं आहेत. हीं इ. स. दुसऱ्या शतकांत खोदलीं गेलीं. येथील चैत्यमंडपहि लहान असून प्रवेशद्वारावर सुंदर कमान आहे. आंत मध्यावर एक स्तूप असून सभोंवारहि लहान लहान कमानीखालीं स्तूप उभारले आहेत. येथें कोरींव लेख असून त्यांत उषवदात आणि गौतमीपुत्र शातकर्णी ह्यांचा उल्लेख आहे. ह्यांच्या मूर्तिमंडपांतील स्तंभावर क्षत्रपांचें सिंह व शातवाहनांचें हत्ती अशीं प्रतीकें खोदलीं आहेत. असेच स्तंभ जुन्नर येथील गणेशगुंफेतहि आहेत. मानमोड गुंफेच्या प्रवेशद्वारावर अर्धकमलाची आकृति असून त्याच्या पाकळ्यांवर श्रीलक्ष्मीची मूर्ति अधिष्ठित असलेली दाखविली आहे.

## ( ४ ) अजंठा

अजंठा येथील लेणीं हीं सर्वांत मुख्य होत. हीं तर संख्या, विस्तार चित्रकाम व खोदकाम ह्या दृष्टींनीं सर्व जगांत प्रसिद्ध आहेत. येथील गुंफांच्या भिंतीवर केलेलें चित्रकाम व त्यांत भरलेले विविध रंग हें तर जगांतील एक अद्भुत कलाकार्य समजलें जातें. जातककथांतील कितीतरी प्रसंग ह्या भिंतींवर हुबेहूब वठविले आहेत. प्राचीन भारतीय चित्र-कलेचा हा एक अजब नमुनाच आहे. जगांतील हें एक आश्चर्यच आहे.

## (५) वेरूळ

वेरूळ येथील लेणीं अजंठा येथील लेण्यांसारखींच जगप्रसिद्ध आहेत. कोणतीं कोणापेक्षां श्रेष्ठ आहेत, हें सांगणें कठीण आहे. अजंठा येथील रंगकाम श्रेष्ठ तर वेरूळ येथील कोरींव काम श्रेष्ठ. भव्यहि पण तें तितकेंच आहे. पूर्वी ह्या गांवाचें नांव एळापूर होतें. त्याचीच पुढें एलूर, एल्लोर, वेरूळ अशीं रूपें झालीं. हें गांव राष्ट्रकूट राजांच्या राजधानीचें शहर होतें. येथील लेण्यांचा हा विशेष आहे कीं येथें बुद्ध, जैन, हिंदु अशा तिन्ही धर्मांचीं लेणीं आहेत. कांहींत बुद्ध, कांहींत जैन तीर्थंकर व कांहींत हिंदु देवता ह्यांच्या प्रतिमा खोद-कामांत दाखविल्या आहेत. येथील 'कैलास लेणें' हें तर जगांतील एक आश्चर्यच आहे. त्यांत अद्भुतत्व, दिव्यत्व, भव्यत्व हे सर्व शिल्प-कलेचे गुण एकवटले आहेत. महाराष्ट्रीय शिल्पकलेचा उत्कर्षच येथें प्रतीत होतो.

महाराष्ट्रांतील प्राचीन शिल्पकला ही अशी सुंदर, भव्य, दिव्य व उज्ज्वल असून धर्मभावनेशीं अत्यंत संबद्ध आहे. मध्ययुगांतील महाराष्ट्रीय शिल्पकलाहि अशीच धार्मिक भावनेशीं निगडित आहे. व ती देवालयें, मंदिरें घाट ह्यांच्या स्वरूपांत दिसून येते. प्राचीन कला जशी दिव्य व भव्य तशीच मध्ययुगीन कलाहि दिव्य व भव्य आहे. महाराष्ट्र हा प्रदेश शिल्पकलेंत प्रसिद्ध आहेच. पण ह्या प्रदेशाची विशेष प्रसिद्धि तेथील दुर्ग, कोट ह्यांबद्दल आहे. ह्या शिल्पकलेच्या मुळाशीं स्वसंरक्षणाची भावना आहे. गडकोटाचें महत्त्व रामचंद्रपंत अमात्यांनीं पुढील प्रमाणें वर्णन केलें आहे.

## (२)

## महाराष्ट्राचे दुर्ग

**संपूर्ण राज्याचें सार तें दुर्ग. दुर्ग नसतां मोकळा देश परचक्र येतांच निराश्रय, प्रजा भग्न होऊन देश उद्ध्वस्त होतो. देश उद्ध्वस्त**

झाल्यावरहि राज्य असें कोणास म्हणावें? पूर्वी जे जे राजे झाले त्यांनीं आधीं देशामध्यें दुर्ग बांधून तो तो देश शाश्वत करून घेतला, आणि आलें परचक्रसंकट दुर्गाश्रयीं परिहार केलें.

...ज्या देशांत गड कोट नसतील त्या देशांत आपलें राज्याचे सरहद्दीपासून पुढें जबरदस्तीनें नूतन स्थळें बांधीत तो देश आक्रमावा. त्या स्थळांचे आश्रयीं सेना ठेवून पुढील देश स्वशासनें वश करावा. असें करीत करीत राज्य वाढवावें. गडकोटाचा आश्रय नसतां फौजेच्यानें परमुलखीं टिकाव धरून राहवत नाहीं. फौजेविरहित परमुलखी प्रवेश होणेंच नाहीं. इतक्याचें कारण तें गडकोटविरहित जें राज्य त्या राज्याची स्थिति म्हणजे अभ्रपटलन्याय आहे. याकारितां ज्यांस राज्य पाहिजे त्यांणीं गडकोट हेंच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचें मूळ, गडकोट म्हणजे खजीना, गडकोट म्हणजे सैन्याचें बल, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपलीं वसतिस्थळें, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे आपलें प्राणसंरक्षण, असें पूर्ण चित्तांत आणून कोणाचे भरंवशावर न राहतां आहे त्याचें संरक्षण करणें; व नूतन बांधण्याचा हव्यास स्वतांच करावा, कोणाचा विश्वास मानूं नये.

गडकोट संरक्षणाचें कार्य फार नाजूक. परम नाजूक स्थळास एखादा मामलेदारादि जे लोक ठेवणें, त्यांणीं भेद केलियामुळें अथवा शत्रु चालोन आला असतां नामर्दी केल्यामुळें अथवा त्यांचे गाफिलीमुळें स्थळास दगा जाहला तर स्थळसहित तितकें राष्ट्र हातींचें गेलेंच. उरल्या स्थळास व राष्ट्रास उपसर्ग लागला, शत्रु प्रबळ येऊन पावला असतां जो गेला किल्ला, त्या किल्लेकराचें वारें इतर राहिले किल्लेकरांस लागोन तेही स्थळास अपाय योजितात. म्हणजे एक एक राज्यासच धक्का बसतो. या कारणें किल्ले कोट जतन करणें ही गोष्ट सामान्य आहे असें न समजतां तेथील उस्तवारी व शासन यांस तिळतुल्य अंतर पडों न द्यावें.

......त्यास आधीं किल्ल्याचा जीव तो किल्ल्याचा हवालदार, तसाच सदर सरनोवत म्हणजे निस्पृह, कोणाचे निसपतीचे अथवा एकाचे आर्जवामुळें ठेवावे असें नाहीं, जे कुलवंत मराठे आणि शिपाई जे शरम धरत असतील, कवीलेदार विश्वासू, उद्योगी, अलालुची, अनिद्रिस्त, सकल लोकांचें समाधान रक्षून यथोचित सर्वांपासून स्वामिकार्य घेत हें स्थळ म्हणजे धन्यानें ही परमप्रिय ठेवी दिली आहे, आपले प्राणान्त यास दगा होऊं नये, असें पूर्ण चित्तांत आणून जे धन्यांनीं लावून दिली मर्यादा तीस तिळांश अंतर पडों न देतां, दिवसाचा उद्योग दिवसां, रात्रीचा उद्योग रात्रीं निरालस्यपणें करून सर्व प्रयत्नें स्थळ जतन करीत, असें ठेवावें.

गडास यावयाचे मार्ग असतील ते सुगम नसावे. सुगम असले तर ते मार्ग मोडून त्यावर झाडी वाढवून आणखीकडे परके फौजेस येतां कठीण असे मार्ग घालावे. या विरहित वलकुबलीस चोर-वाटा ठेवाव्या. त्या सर्वकाळ चालूं देऊं नयेत. समयास तेच खिडी अथवा दरवाजाचा रावता करून सांजवादा चढवीत जावा. तसेंच गडावर आधीं उदक पाहून किल्ला बांधावा. पाणी नाहीं आणि तें स्थळ आवश्यक बांधणें प्राप्त झालें तरी आधीं खडक फोडून तळीं, टांकीं पर्जन्यकाळपर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरे अशीं मजबूत बांधावीं. गडावरी झराहि आहे, जसें तसें पाणीही पुरतें, म्हणून तितकिया-वरीच निश्चिती न मानावी. किंनिमित्य कीं झुंजामध्यें भांडियांचें आवाजाखालीं झरे स्वल्प होतात, आणि पाणियाचा खर्च विशेष लागतो, तेव्हां संकट पडतें. याकरितां तसे जागीं जखिरीयाचें पाणी म्हणून दोन चार टाकीं, तळीं बांधावीं. त्यांतील पाणी खर्च होऊं न द्यावें, गडाचें पाणी बहुत जतन राखावें. गडावरी राजमंदिरा-विरहित थोर इमारतीचें घर बांधों नये.

दारुखान्यास नेहमीं राखणेस लोक ठेवावे. त्यांणीं रात्रंदिवस पाहाऱ्याप्रमाणें जागत जावें. परवानगीविरहित आसपास मनुष्य येऊं न द्यावें. गड पाहून गडाचे नाजूक जागे पाहून त्या त्या जागीं

व गडाचे उपराचे जागा, त्या त्या सारखीं भांडीं, झुंबरे, चरक्या आदिकरून यंत्रें बुरजा बुरजास तटोतट टप्पेगुजरे बांधून ठेवावीं.

(३)

## महाराष्ट्रांतील सौंदर्यस्थळें

भारतांतील इतर प्रदेशाच्या मानानें आपला महाराष्ट्र प्रदेश निसर्ग-सौंदर्य व मानवकृत सौंदर्य ह्या दोन्ही दृष्टींनी तितकासा प्रसिद्ध नाहीं. काश्मिर तर प्रत्यक्ष नंदनवनच आहे. भागीरथी ही तर स्वर्गंगाच आहे. मानवानें येथें भारतांत कोठें ताजमहालसारखें सौंदर्यप्रतीक निर्माण केलें आहे तर कोठें गोपुरांसारखीं उत्तुंग धर्मप्रतीकें निर्माण केलीं आहेत. अशी जरी वस्तुस्थिति असली तरी महाराष्ट्राच्या वांट्यास निसर्गसौंदर्य किंवा मानवकृत सौंदर्य अगदींच आलें नाहीं असें मात्र नाहीं. कांहीं कांहीं स्थळें निसर्गसौंदर्याचे उत्तम नमुने आहेत. निसर्गानें क्वचित् कां होईना पण हें वरदान दिलें आहे. मानवानेंहि आपल्या प्रतिभेच्या सामर्थ्यानें महाराष्ट्रांत कोठें कोठें सौंदर्याचें वर-प्रदान दिलें आहे. सह्याद्रि पर्वताच्या कुहरगव्हरांत व नद्यांच्या परिसरांत छोटीं मोठीं अशी कितातरी सौंदर्यस्थळें जशीं कांहीं दडून बसलीं आहेत. पाहणारा पाहिजे. सूक्ष्म दृष्टीस आवतींभोंवतीं निसर्गकृत व मानवकर्तृक सौंदर्य पदोपदीं आढळून येईल.

सह्यपर्वताच्या प्रत्येक घाटांतील दृश्यें प्रवास करतांना पाहून नेत्र सुखावतात. बोरघाटांतील तें पावसाळ्यामधील दृष्य! त्या अगाध खोल दऱ्या, ती दाट कीर्र् सळसळ ध्वनि करणारी झाडी, धूसर धुक्याचे ते झोत, लहान मोठ्या प्रपातांचा तो खळखळाट, शिखरापासून पायथ्यापर्यंत मंद वाहणारी ती दुधाची धार, हा देखावा पाहून कोणाचें मन उल्हसित होणार नाहीं? फोंडा घाट काय, अंबा घाट काय, अंबोली घाट काय—एकापेक्षां एक वरचढच. प्रत्येक ठिकाणीं निसर्गसौंदर्य ओसंडतच आहे. रामदासस्वामींना ह्या सौंदर्यानेंच आकर्षित केलें.

त्यांनीं आपल्या ध्यानासाठीं योग्य स्थळें निसर्गाच्या अशा रम्य ओसंगांतच निश्चित केलीं. वरंध्या घाटांतील शिवथरच्या रम्य घळींतच त्यांना दासबोध स्फुरला. कुंभारली घाटांतील हेळवाकची घळ, सज्जनगडावरील मोरघळ हीं अशींच निरागस, रम्य, शांत ध्यानस्थलें होत.

ह्या सह्य पर्वतावरील दुर्गम शिखरें हीं तर मानवानें आपलीं व आपल्या स्वातंत्र्याचीं संरक्षणस्थळेंच करून ठेविलीं आहेत. शिवनेरी गड हा शिवाजी महाराजांनीं तेथें जन्म घेऊन पवित्र केला. रायगड तर छत्रपतींनीं आपली राजधानी केली. सिंहगड तानाजीनें आपले प्राण अर्पून अमर केला. प्रतापगडनें अफजलखानाचा बळी घेऊन आपला दरारा बसविला. पन्हाळगडानें बाजीप्रभूची पावनखिंड पावन केली. गावीलगड, अशीरगड, बऱ्हाणपूर, नर्नाळा हे महाराष्ट्राचे द्वारपालच. ह्या स्थळांची शोभा, तेथील उत्तेजक हवामान, तेथील देवटाक्यांतील प्रत्यक्ष अमृतजल हीं ईश्वराचींच देणीं होत. हीं झालीं सह्याद्रीवरील संरक्षणस्थळें. जमिनीवरील टेहळणीच्या ह्या जागा तर विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, अर्नाळा, जंजिरा, वसई ह्या समुद्रावरील टेहळणीच्या जागा. सिंधुसागराच्या पाठीवर आंग्रे, धुळप वगैरे मंडळी मुलांसारखी बागडली खरी पण त्यांनीं किती परकीयांना जरबेंत ठेविलें! किती जकात वसूल केली! किती चांचेगिरीला पायबंद घातला! ह्या गिरिदुर्ग व जलदुर्गांची कामागिरी जरी मोठी असली तरी देवगिरी, नगर, सोलापूर, मिरज, येथील भूमिदुर्गांची कामगिरीहि पण कांहीं कमी दर्जाची नाहीं. दौलताबादचा किल्ला हा तर प्राचीन अभेद्य किल्ल्याचें सुंदर प्रतीक होय. चौल, दाभोळ, रेवदंडा, चिपळूण, राजापूर, मालवण ह्या बंदरांनीं त्या त्या काळांत जगाशीं आपला संबंध ठेवून आपलें वैभव दाखविलें. दापोलीजवळचें आसूद येथील केशवराज हें स्थळ नारळीपोफळींच्या बनांनीं इतकें रम्य केलें आहे कीं तें प्रत्यक्ष केशवाचें निवासस्थान वैकुंठच झालें आहे. पर्वताचीं

कांहीं कांहीं शिखरें त्यांच्या रम्यत्वामुळें व पावित्र्यामुळें कांहीं कांहीं देवदेवतांनीं आपलीं निवासस्थानें केलीं आहेत. महाबळेश्वर, भीमाशंकर, गौतमऋषि, यवतेश्वर, जरंडेश्वर, मेरुलिंग, बाबामलंग, कळसूबाई, सप्तशृंगी, शिंगणापूर महादेव, जेजुरीचा खंडोबा ह्या सर्व देवदेवतांनीं अशीं रम्य स्थळेंच अधिष्ठिलीं आहेत. निरानरसिंहपूर, बहेनरसिंहपूर, कमळबहिरी, सागरेश्वर हीं जशीं धर्मभावनेचीं क्षेत्रें आहेत, तशींच तीं निसर्गसौंदर्याचीं केंद्रें आहेत. महाराष्ट्रांतील देवतांचीं निवासस्थानें व साधुसंतांचीं समाधिस्थानें हीं सामान्यतः निसर्गरम्य ठिकाणेंच आहेत.

महाराष्ट्र इतका भाग्यवान् प्रदेश आहे कीं त्याला भेटायला प्रत्यक्ष गंगा कधीं गोदावरीच्या रूपानें तर कधीं कृष्णेच्या रूपानें येते. भीमा विठ्ठलाच्या दर्शनानें चंद्रभागा होते. ह्या नद्यांच्या तीरांवर महाराष्ट्रांतील साधुसंतांनीं भक्तीचे मळेकरून मोक्षाचा सुकाळ केला, तर शूरवीरांनीं स्वराज्याचीं उपवनें करून स्वातंत्र्याचा सुकाळ केला. महाबळेश्वर हें सौंदर्यामुळेंच सर्वांना प्रिय आहे. महाबळेश्वरीं पंचभगिनी जन्म घेऊन आपला स्वतंत्र संसार थाटण्यास निघतात. कृष्णेच्या तीरावरील मेणवली हें एक नितांत सुंदर व शांत स्थळ आहे. वाई ही तर दाक्षिण काशीच. काय ते सुंदर घाट, काय तीं मंदिरें! माहुली हें न्यायमूर्ति रामशास्त्री ह्यांचें जसें चिंतनाचें स्थल होतें, तसेंच ते रावबाजीचें विलासाचें स्थळ होतें. औदुंबर हें उगांच नाहीं श्री दत्तात्रेयांनीं निवडलें. स्थळ लहानच पण निसर्गसौंदर्याचें तें एक ठावकेंच आहे. बहे येथील शांत वातावरणांत श्रीरामचंद्रानें ध्यान केलें. त्याच्या ध्यानांत व्यत्यय होऊं नये म्हणून मारुतीरायानें कृष्णाबाईचा खळखळाट बंद केला. नरसिंहवाडीस पंचगंगा कृष्णाबाईच्या भेटीस आल्या. कृष्णाकोयनांचा कराडास प्रीतिसंगम होतो. इंद्रायणी ही महाराष्ट्राची सरस्वतीच. हिच्या तीरावरच 'ज्ञानदेवें रचिला पाया

व तुका झालासे कळस' हीं दोन्ही मंगल कार्यें झालीं. गोदावरी नदीच्या तीरावरील गंगाद्वार, त्र्यंबक, नाशिक, कोपरगांव, प्रवरासंगम, पैठण, गंगापूर, हीं फार सुंदर स्थळें होत. श्रीरामचंद्र, गौतम, सातवाहन, चक्रधर, एकनाथ, कृष्णदयार्णव, शिवदिन केसरी वगैरे देवऋषि, नृप , साधुसंत ह्या सर्वांनीं गोदावरीचें सौंदर्य स्तविलें आहे. अंभोऱ्यास वैनगंगा आहे व जोगाईचे अंब्यासहि दुसरी वैनगंगा आहे. अंभोऱ्यास त्रिवेणीसंगम आहे व तें स्थळ मुकुंदराजाच्या गुरूप्रगुरूंनीं पावन केलें आहे. आंबेजोगाई, परळीवैजनाथ, पैठण, नांदेड हीं मराठवाड्यांतील रम्य स्थळें होत. ह्यांशिवाय प्रवरा, पवना, वासिष्ठी, सावित्री, पूर्णा, वरदा, मांजरा, मुळामुठा, सीना, वारणा, कुकुडी, कऱ्हा, उल्हास ह्या महाराष्ट्रांतील नद्यांचीं तीरें सौंदर्यानें सुशोभित झालीं आहेत.

महादेव, मारुती, देवी, विष्णु, गणेश, रामचंद्र, कृष्ण ह्या देवदेवतांची ठिकाठिकाणीं असलेलीं मंदिरें आपआपल्या परीनें शिल्पसौंदर्याचे नमुने आहेत. प्राचीन हेमाडपंती मंदिरें—विशेषतः भुलेश्वर, सिन्नर, आंबेजोगाई—वगैरे ठिकाणचीं—जुन्या शिल्पसौंदर्याचीं प्रतीकें होत. कोल्हापूर, तुळजापूर, प्रतापगड येथील भवानीचीं मंदिरें पाहण्यासारखीं आहेत. ह्या मंदिरासारखींच कांहीं राजमंदिरें—विशेषतः निंबाळकरांचें वाठार, नागपूर, पुणें येथील—शिल्पसौंदर्याच्या व भव्यतेच्या दृष्टीनें उल्लेख करण्यासारखीं आहेत. मोरया गोसाव्याचें चिंचवड, गणपतीचें थेऊर व मोरगांव, गोरखनाथाचें बत्तीसशिराळें, कुंभोजचें रामलिंग, जोतिबाचा डोंगर, दत्तात्रयाचें गाणगापूर, गणेशाचें सिद्धटेक, समर्थांचें चाफळ व अकरा मारुतीमंदिरें वगैरे ठिकाणें धार्मिक अधिष्ठानें म्हणून जशीं प्रसिद्ध आहेत तशीं निसर्गसौंदर्याचीं अधिष्ठानें म्हणून प्रसिद्ध आहेत.

महाराष्ट्रांतील कांहीं कांहीं तलावहि त्यांच्या विस्ताराबद्दल प्रसिद्ध आहेत. ह्या दृष्टीनें नागपुरकडील रामटेकचा तलाव, कोल्हापूरचे रंकाळें, भातवडी येथील तलाव, सोलापूरचा एकरुख, जेजुरीचा होळकरांचा तलाव, कात्रजचा, पर्वतीच्या पायथ्याशीं असलेला, मस्तानीचा, नगर येथील, हे तलाव उल्लेख करण्यासारखे आहेत.

(४)

## महाराष्ट्रांतील गायनकला

महाराष्ट्र देश गायनकलेंत फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. येथील गायनकलेंत हिंदुस्तानी संगीत व कर्नाटक संगीत ह्या दोहोंचें सुंदर मीलन आढळून येतें. महाराष्ट्रीय गायनांत ध्रुपद, ख्याल, टप्पा, ठुमरी असे चार प्रकार आहेत. त्याप्रमाणें गायकांत कांहीं ध्रुपदिये तर कांहीं ख्यालिये, कांहीं टप्पागायनांत तर कांहीं ठुमऱ्या म्हणण्यांत वाकबगार असत. लोकगीतांपैकीं लावणीगायनांतहि कांहीं पटाईत असत. हीच पूर्वींची परंपरा आजतागायत चालली आहे.

देवगिरीचें यादव घराणें हें गायन कलेचें चांगलें आश्रयदाते होतें. गायनकलेला आश्रय देण्याची परंपरा त्या घराण्यांतील राजांनीं जी एकदां सुरू केली तिचें पुढें भोंसले, पेशवे, शिंदे, होळकर, गायकवाड घराण्यांतील गानषोकी राजांनीं व त्यांच्या सरदारांनीं पर्वांपर्वांपर्यंत चालविल्यामुळें गायनवादननर्तन ह्या कलांना उत्तेजन मिळून त्या चांगल्या भरभराटीच्या अवस्थेंत टिकून राहिल्या. त्यांच्या औदार्यानेंच कांहींनीं गायनशास्त्रावर ग्रंथहि लिहिले. अशा रीतीनें गायनाच्या दोन्ही शास्त्र व कला ह्या शाखांत भारतांतील इतर प्रदेशांप्रमाणें महाराष्ट्रानें आपलें वैशिष्ट्य कायम राखलें.

देवगिरीचा प्रसिद्ध यादवराजा जो सिंघण त्याचा दिवाण सोढळ, व त्याचा मुलगा शार्ङ्गधर हे दोघेहि गायनांत प्रवीण होते. शार्ङ्गधर

हा गायन कलेंत तर निष्णात होताच परन्तु ग्रंथकारहि होता. त्याचा 'संगीतरत्नाकर' हा गायनशास्त्रावरील ग्रंथ अद्याप प्रमाणभूत मानिला जातो. यादवांच्या पदरीं गोपाळ नायक हा एक प्रसिद्ध कलावंत होता. त्याचा आणि प्रसिद्ध गायनकलाविशारद अमीर खुशरू ह्या दोघांची एकदां हारजीत स्पर्धा झाली. गोपाळनायकाचा शिष्य बैजू हाहि आपल्या गुरूसारखा ध्रुपदगायनांत प्रवीण होता. ह्या ध्रुपद-गायनाची पद्धत पुढें छत्रपति व पेशवे ह्यांच्या अमदानींत नाशिक, पुणें, सातारा वगैरे ठिकाणच्या गायकांनीं उचलली. राणू शिंपी, विठू गुरव, त्र्यंबक आत्माराम, विठोबा पारनेरकर, दावलखान हे चांगले ध्रुपदिये असून ह्यांचा आवाज मर्दानी आणि म्हणण्याची ढबहि मनोरंजक असे. ह्या सर्वांना नानासाहेब पेशव्यांचा आश्रय होता. साताऱ्यास सखाराम बुवा मिरची ह्यानें ध्रुपदगायनांत नांव मिळविलें होतें. चिंचवडचे भगवद्भक्त मोरया गोसावी हेहि प्रसिद्ध होते. प्रसिद्ध गायिका व्यंकटनरसी ही त्यांना गुरुस्थानीं मानी, व्यंकटनरसी ही खरी व्यंकटाध्वरी ह्याची शिष्या. हिला पेशव्यांचा आश्रय होता. ह्यांशिवाय सदोबा अष्टेकर, भलोबा लिमये, रावजीबुवा बेलबागकर, वामनबुवा कवठेकर हे आपआपल्या परीनें ध्रुपदगायनांत प्रसिद्ध होते.

ह्या ध्रुपदियांबरोबर ख्यालगायनांतहि महाराष्ट्रांत नांव घेण्यासारखी मंडळी होऊन गेली. मिया हद्दूचे चिरंजीव रहिमतखां हे सर्वांत अग्रगण्य होत. ह्यांचा आवाज गोड, मधुर, सुरेल व खणखणीत होता. कोल्हा-पूरचे अल्लादियाखां हेहि त्यांच्यासारखे एक श्रेष्ठ सुरेल कलावंत होते. विष्णुपंत व काशीनाथपंत छत्रे हे त्यांचेच शिष्य. वासुदेवबुवा जोशी व त्यांचा मुलगा भय्या जोशी नागावकर, कृष्णशास्त्री शुक्ल, बाबा दीक्षित ही मंडळी ख्यालिये म्हणून प्रसिद्ध होती. भास्करबुवा बखले; बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, विष्णुबुवा पलुस्कर

ही मंडळी व त्यांचा शिष्यपरिवार ह्यांनीं गायनशास्त्रज्ञ व कलावंत म्हणून नांव मिळविलें आहे. औंधच्या प्रतिनिधींच्या आश्रयांतले मनोहरबुवा जोशी व भिकुबुवा व गुंडूबुवा इंगळे हे प्रसिद्ध ख्यालिये होते.

टप्पा गायनांत रावजीबुवा इचलकरंजीकर, नारायणबुवा फलटणकर, विष्णुबुवा रोडे वगैरे मंडळी प्रसिद्ध होती. ठुमरी गायनांतील अख्तरपिया, कदरपिया, सनदपिया व ललतपिया हे चारी प्रकार महाराष्ट्रांतील गवयांनीं चांगले आत्मसात् करून त्यांतहि त्यांनीं नांव मिळविलें होतें. लावणीगायकांत सोलापूरचे रामजोशी, संगमनेरचे अनंत फंदी, पुण्याचे बाळा—बहिरू, होनाजी—बाळा, प्रभाकर दातार, जेजुरीचे सगनभाऊ हे प्रसिद्ध होऊन गेले.

वादनकलेंतहि तसेच पुष्कळ श्रेष्ठ कलावन्त महाराष्ट्रांत आजवर होऊन गेले. बीन सर्व वाद्यांचा राजा समजतात. बीनवादांत दत्तोपंत फडके, मंगेशराव तेलंग वगैरे मंडळी नांव मिळवून गेली. सतारवादनांत साताऱ्याचे विष्णुबुवा मटंगे, पुण्याचे डॉ. विनायकराव लिमये, मुंबईचे विश्वनाथबुवा काळे, आण्णा घारपुरे हे प्रसिद्ध होऊन गेले. तबला मृदुंग वादनांत पेशवाईंत धर्मागुरव व नागूगुरव हे अत्यंत श्रेष्ठ समजले जात.

स्त्रीकलावंतांत अम्माक्का सावनूरकर, मूसाहेब, मैना, बया, हेमंती, मोहना पालकर, हिरा, सगुणा, चंद्रा, व सर्वांत मुख्य व्यंकटनरसी ह्या उत्तर पेशवाईंत नर्तकी म्हणून प्रसिद्ध होऊन गेल्या.

महाराष्ट्रांतील ह्या सौंदर्यनिष्ठ कलेचा हा असा थोडक्यांत इतिहास आहे.

(५)

## महाराष्ट्राची नाट्यकला

नाट्यकला—मग ती कोणत्याहि राष्ट्राची असो—धार्मिक समारंभा-

पासून उद्भूत होते. ऋग्वेदामध्यें जी संवादसूक्तें आहेत त्यांत नाट्याचें मूळ आहे. यज्ञसमारंभांत हीं संवादसूक्तें केवळ म्हटलीं जात असत इतकेंच नव्हे तर तीं नाट्यस्वरूपांत करून दाखविलीं जात असत. ऋग्वेदांतील ह्या सूक्तांनाच पुढें सामवेदामुळें गायन व अथर्ववेदामुळें नर्तन ह्या दोन कलांची साथ मिळाली. अशा रीतिनें नाट्याचे मुख्य जे तीन घटक--संवाद, गायन व नर्तन--हे निर्माण झाले. यज्ञाला मुख्य महत्त्व व ह्या आनुषंगिक गोष्टींना दुय्यम महत्त्व प्राप्त झालें. समाजामध्यें सुद्धां ह्या तीन गोष्टी सौंदर्यनिष्ठ कला असून देखील कमी लेखल्या जाऊं लागल्या. ही परिस्थिति महाराष्ट्रांत पर्वांपर्वा पर्यंत रूढ होती.

नाट्यकलेची ह्याच्या पुढची अवस्था म्हणजे रामायण-महाभारतासारख्या प्रसिद्ध ग्रंथांतील मुख्य प्रसंग नाट्यरूपांत दाखविणें ही होय. कंसवध, प्रलंबवध, चाणूरमर्दन हे प्रसंग पूर्वी गंधर्व-अप्सरा करून दाखवीत. ह्यांच्या पुढची अवस्था म्हणजे दशावतार, रामलीला ह्यांसारखे खेळ करून दाखविणें ही होय. ह्यांच्याच वळणा-वर समाजांतील खालच्या वर्गांतील लोकांच्या करमणुकीसाठीं गोंधळ, कळसूत्री बाहुल्या, भोरुपी, भारुडें, ललितें, तमाशे वगैरे खेळ करून दाखविले जात. ह्यांतहि नाट्य, गायन, नर्तन ह्या गोष्टी असत. ह्या गोष्टींपासून मध्ययुगीन नाटक उदयास आलें. ह्याच मध्ययुगीन नाटकांचें सुधारलेलें स्वरुप म्हणजेच आजचें नाटक होय. प्राचीन मराठी वाङ्मयांत साइखेडें, नट, वैतालिक, सूत्रधार, जवनिका (पडदा) वगैरे शब्द ठिकठिकाणीं वापरलेले आढळतात. त्यावरून नाट्यकलेच्या प्राचीन स्वरूपाची व परंपरेची कल्पना येते. हाल सातवाहनाच्या सप्तशतींत जसें गायन, वादन, नर्तनाचे उल्लेख सांपडतात, तसेंच तसेच नट, नटी, नाटक ह्यासंबंधींहि उल्लेख सांपडतात. त्यावरून हें

स्पष्ट आहे कीं समाजांतील वरील थरांवरील सुसंस्कृत लोकांत ह्या कला जशा प्रसृत झाल्या होत्या तशाच त्या खालच्या थरांवरील लोकांतहि होत्या. नाहींतर त्यांचा उल्लेख गाथा सप्तशतींत येता ना. सप्तशतींतील एक नटी हरितालमंडितमुखी आहे तर दुसरी एक रंगोत्तीर्णा नर्तिका आहे. त्याकाळीं नाटकांतील स्त्रिया तोंडाला हरताळीसारखा एखादा रंग लावीत. त्याचप्रमाणें सप्तशतींतील एका गाथेंत रंगभूमि व पूर्वरंग ह्यांचेहि उल्लेख आहेत. ह्यावरून खिस्ती शकाच्या आरंभीं महाराष्ट्रांत नाट्यकला चांगली परिणत दशेस पोहोंचलेली होती. पात्रें रंग लावीत, नाटकांत स्त्रिया भूमिका करीत, नाटकें रंगमंदिरांत होत असत व त्यांचा लाभ उच्चनीच थरांवरील सर्व लोक घेत. नाटकांतील नटांना त्यांच्या अभिनयकौशल्याबद्दल पारितोषिकेंहि दिलीं जात असल्याचा उल्लेख बाराव्या शतकांतील मुकुंदराजांच्या विवेकसिंधूंत आढळतो.

सोंग संपादितां तोखलेंपणें । नटासि दीजेती वस्त्रेंभूषणें ।
तो सोंग लटिका परि तीं भूषणें । नटासिचि अर्पिती ॥ ५–२० ॥

दुसऱ्याहि कांहीं प्राचीन ग्रंथांतहि असे नटनाट्याचे कळसूत्री बाहुल्या—साईखेड्याचे उल्लेख सांपडतात. भारुडें ह्या काव्यप्रकारांत नाट्याचाच भाग बराच असल्याचें स्पष्ट आहे. गोंधळ, दशावतार, रामलीला, तमाशा व कांहीं बाबतींत कथाकीर्तनहि हे सर्व नाट्याचेच प्रकार होत व महाराष्ट्रांत ह्यांची परंपरा फार प्राचीन आहे. दशावतारांखेरीज पुराणांतील कांहीं नाट्यपूर्ण प्रसंग नाटकांसाठीं निवडले जात. पौराणिक नाटकांत दक्षयज्ञ, बभ्रुवाहन कूर्मावतार, सीताहरण, वालीवध विराटपर्व, पारिजातक, रासक्रीडा, अंगदशिष्टाई, नरसिंहाख्यान, द्रौपदीस्वयंवर, सीतास्वयंवर वगैरे नाटकें केलीं जात. संस्कृत नाटकांचे तर्जुमेहि रंगभूमीवर केले जात.

नाटकाचे खेळ साधारणपणें देवळाच्या मंडपांत करून दाखविले जात. जयंत्युत्सवाच्या शेवटीं ललिताच्या कार्यक्रमांत एखादें पौराणिक नाटक दाखविलें जाई. नाटकांत काम करणें हें समाजांत जरा कमी प्रतीचें मानिलें जाई. शिष्टसमाजाचा जरी ह्यासंबंधीं कटाक्ष असला तरी सर्वसामान्य समाज नाट्यकलेचा षोकी असे. नाटक चांगलें यशस्वी व्हावें म्हणून कोणी आपल्या घरांतील बैठका, तर कोणी लुगडींपैठण्या वगैरे वस्त्रें, तर इतर कोणी दागिनेहि देत असत. सोन्याचा वर्ख, टोप, गंगावनें, मोत्याच्या जोड्या, ब्रह्मदेव, रावण वगैरेंचे मुखवटे वगैरे सामान स्थानिक मंडळीच नाटक करणाऱ्या लोकांना पुरवीत.

अव्वल इंग्रजी काळांतील कांहीं सरदार घराण्यांतील मंडळींनीं नाटक मंडळ्यांना दिलेला आश्रय व त्यासाठीं त्यांनीं सोसलेली झीज ह्याचे उल्लेख जुन्या कागदपत्रांत सांपडतात. इ. स. १८५५ च्या सुमारच्या एक दोन नाटक मंडळींची हकीकत 'पेशवाईच्या सावलींत' ह्या ग्रंथांत दिलेली आढळते. प्रत्येक नाटक मंडळीबरोबर त्यांचा एक स्वतंत्र नाटककार असे. व तो दहा दहा, बारा बारा नाटकें लिहून तयार ठेवी. नारो रामचंद्र सोहोनी म्हणून त्या काळांतील असाच एक नाटककार होता. त्याचप्रमाणें त्या काळांतील प्रमुख नटांमध्यें पुढील नांवें आढळतात. गोविंद काळे हा एक प्रसिद्ध स्त्रीनट होता. बाळशास्त्री आडकर, बापूजी बाजी खरे, वासुदेव जनार्दन ताम्हणकर, बाळकृष्ण पंत ओक, अण्णा सोहोनी, विठू सोहनी, वेदशास्त्रसंपन्न परशरामशास्त्री पाटणकर, मोरभट गोडबोले, व्यंकाप्पा वगैरे कांहीं प्रसिद्ध नट होते. विनायक गोपाळ फाटक हे सूत्रधाराचें काम करीत.

नाटकांना तिकिटेंहि कधीं कधीं लावीत. मोठें तिकीट रुपया व लहान तिकीट चार आणे असे. साधारणपणें ५००--६०० मंडळी

बसतील इतका मंडप मोठा असे. नाटक मंडळी-मंडळींत वैमनस्य असे. नाटकांतील काम करणारीं मुलें पळवून नेण्याचा प्रकार जुनाच आहे. शहरांतील मोठे मोठे अधिकारी, श्रीमंत, सरदारजहागिरदार ह्यांचा नाटकमंडळींना उदार आश्रय असे. नटहि आपआपल्या कामांत वाकबगार असत. कांहीं कांहीं नटांच्या कांहीं विशिष्ट भूमिका हातखंडा असत व त्या पाहण्यासाठीं केवळ लोकांच्या झुंडी येत. महाराष्ट्रांतील ही नाट्यकला भारतांतील सर्व जरी नाहीं, तरी कित्येक प्रांतांतील नाट्यकलेपेक्षां बरीच प्रगत असलेली आढळेल. अलीकडे तर त्या कलेची बरीच प्रगति झाली आहे.

## ( ६ )

## चित्रकला

महाराष्ट्र देश प्राचीन काळापासून चित्रकलेंत प्रसिद्ध आहे. इसवी सनाच्या पहिल्या शतकापासून तसे उल्लेख सांपडतात. त्याच्याहि पूर्वीच्या कांहीं प्रत्यक्ष चित्रकलाकृति उपलब्ध आहेत. चित्रकला काय किंवा मूर्तिकला काय, दोन्हीहि परिणत अवस्थेला पोंचलेल्या होत्या, असें त्या त्या कलाकृतीवरून वाटतें. भाजें येथील लेण्यांतल्या स्तंभावरील व अजंठा येथील भिंतीवरील चित्रकलाकृतींनीं साऱ्या जगाचें चित्त वेधून घेतलें आहे. आसनास्थ बुद्ध, पद्मपाणी बुद्ध, शृंगार करणारी स्त्री, उपदेश श्रवण करीत बसलेले भाविक नाग लोक, हीं दृश्यें तर विलोभनीयच आहेत. कैलास लेण्यांत महाकाव्यांतील कितीतरी प्रसंग कोरून चितारले आहेत. ह्या चित्रकृति जशा चिरस्थायी झाल्या आहेत, तशा त्यांतील रंगसंगतीहि इतक्या वर्षांच्या हवामानाचा मारा सोसूनहि चिरस्थायी झाल्या आहेत. हे चित्रकार महाराष्ट्रीयच असावेत. कारण चित्रांतील पशुसृष्टि व वनस्पतीसृष्टि ह्या अस्सल महाराष्ट्रीयच आहेत.

ह्याच्या पुढच्या कालांतील महाराष्ट्रांतील चित्रकलेच्या आकृति व त्यासंबंधीं उल्लेख कांहीं संस्कृत नाटकांत आढळतात. कांहींत भित्तिचित्रें, तर कांहींत प्रतिमा, कांहींत पूर्णलेख्य तर कांहींत शलाकालेख्य ह्यासंबंधीं वर्णनें दिलीं आहेत. चित्रें काढण्यासाठीं अगोदर पृष्ठभूमि तयार करीत. भित्तिचित्र असेल तर प्रथम भिंतीवर तुसाचा गिलावा करून त्यावर लेप देत. हेतु हा कीं रंग दिला तर तो पसरूं नये. ह्या लेप दिलेल्या पृष्ठभूमीवर प्रथम शलाकेच्या सूच्यग्रानें किंवा खारीच्या केंसाच्या झुपक्यासारख्या वर्तिकांनीं रेखाचित्र काढून नंतर योग्य ते रंग भरीत. चित्रें कधीं भिंतीवर तर कधीं फलकावर काढीत. ख्रिस्ती शकाच्या पहिल्या शतकांतील महाराष्ट्रीयांच्या चित्रकलेबद्दल उल्लेख आपणास गाथासप्तशतींत आढळतात.

मध्ययुगीन कालांतील चित्रकलेचीं गमकें आपणांस रामायण–महाभारतांसारख्या धार्मिक ग्रंथांतील कांहीं प्रसंगालेख्यांवरून दिसतात. त्याचप्रमाणें गायनांतील कांहीं रागांना अनुलक्षून चित्रकार आपल्या कल्पनेनें उत्तम चित्रें काढीत व त्या त्या रागाचें मर्म प्रकट करीत. राजे लोकांच्या पदरीं कांहीं चित्रकार असत. कांहीं राजांनाहि चित्रकलेचा नाद असे. चक्रधरांनीं आपल्या शिष्यांना 'चित्रींची स्त्री' सुद्धां न पाहण्याचा दंडक घातला आहे. त्यावरून स्त्रियांचीं चित्रें काढलीं जात हें उघड आहे. जशीं व्यक्तिचित्रें असत तशीं प्रसंगचित्रें व निसर्गचित्रेंहि असत. मराठ्यांच्या अमदानींतील चित्रकलेसंबंधीं उल्लेख फारसे आढळत नाहींत. जयसिंगाच्या छावणींत मनूची नांवाचा एक युरोपियन प्रवासी होता. शिवाजीमहाराज पुरंदरच्या किल्ल्यावर जयसिंगास भेटण्यास आले असतांना मनूचीनें महाराजांचें चित्र काढलें असा उल्लेख आहे. महाराजांचें जें चित्र आज आपण पहातों तें मूळ मनूचीच्या चित्रावरच आधारलें आहे असें म्हणतात. मराठशाहींतील

कांहीं छत्रपतींचीं व पेशव्यांचीं अस्सल चित्रें उपलब्ध आहेत. सवाई माधवरावांच्या दरबारचें चित्र अपूटनशीं पुरंदरच्या तहाचे वेळीं काढलेलें—पण ते एका युरोपियन चित्रकारानें काढलेलें उपलब्ध आहे. पेशवाईंतील चित्रकारांपैकीं माणकोजी चितारी, धनाजी चितारी, बापूजी चितारी वगैरे कांहीं तुरळक नांवें सांपडतात. ह्यांची चित्रकला मामुली स्वरूपाची असल्यामुळें पेशवाईंतील खासे मंडळी उत्तम उत्तम चित्रें दिल्ली, लखनौ, जोधपूर व जयपूरयेथील निधामल व त्याचे दोन मुलगे व इतर नामांकित चित्रकारांकडून तयार करून मागवून घेत. अलिकडच्या काळांतील राजा रविवर्मांचे मुख्य शिष्य महाराष्ट्र चित्रकार होत. पूर्वींच्या चित्रांत नसलेली दूरदर्शनाची कल्पना अलिकडच्या चित्रकलेंत नवीन सुरू झाली. धुरंधर, माळी, सातवळेकर, बाळासाहेब पंत, ठाकोरसिंग वगैरे मंडळींनीं महाराष्ट्रीय चित्रकलेला प्रमुख पद प्राप्त करून देण्याचे प्रयत्न केले.

(नाना फडणवीस ह्यांना चित्रसंग्रहाची कशी हौस होती हें पुढील कांहीं अस्सल कागदपत्रांतील उल्लेखावरून स्पष्ट होईल.)

**'आम्हांस श्रींच्या चित्रांचे मुरक्क्याची (चित्रसंग्रह) गरज आहे याकरितां दिल्लीस निधामल वगैरे जुने कारागिरांच्या हातच्या तसविरा श्रीकृष्णाच्या बहूत चांगल्या मेळवून विकत घेऊन त्यास सोनेरी हासिया (किनार) करून त्याची वही बांधवून बहुत मावजतीनें पाठवावी.**

—नाना फडणवीस ह्यांचें पत्र.

**वज्यावा पुरंधरे यांचें घरीं पूर्वींपासून चित्रांचा संग्रह आहे. त्याचा शोध त्यांजकडील कारभारी बोलावून जीं चित्रें असतील तीं झाडून घेऊन लिहून पाठविणें.**

—नाना फडणवीस ह्यांचें पत्र.

राजश्री आनंदराव गंगाधर चंद्रचूड यांस—उत्तम तसबिरा पाठविण्याबद्दल लिहिलें होतें. तुम्हीं दिल्लीस तसबिरा आणावयाकरितां पाठविलें. त्यास तेथें खासगी कोणाचें घरीं असल्या तर माहीतगारीनें हस्तगत जाल्या तर होतील. जयपूरकराचें घरीं तसबिरा फार चांगल्या आहेत.

—दुसऱ्या एका पत्रांतून

( खेळांपैकीं गंजिफावरील चित्रें कशीं असत ह्याची कल्पना येण्यासाठीं पुढें एक यादी दिली आहे. ही उत्तर मराठशाहींतील आहे. )

| राशी | चित्र | रंग | वाहनें |
|---|---|---|---|
| मेष | बकरेवर राजा | तांबडा | वजीर, मेंढा |
| वृषभ | बैलावर राजा | पांढरा | वजीर बैलावर |
| मिथुन | स्त्री-पुरुष उभयतां | हिरवा | वजीर घोडेवर |
| कर्क | कुरलेवर राजा | प्याजी गुलाबी | माणूस कुरलेपुढें |
| सिंह | सिंहावर राजा | अस्मानी | सिंहावर माणूस |
| कन्या | वायको, राजा | पंचरंगी | वजीर, बायको घोडेवर |
| वृश्चिक | विंचू राजा | पीरूराई | वजीर घोडेवर, पुढें विंचू |
| धन | राजा घोडेवर तोंड माणसाचें | | वजीर घोडेवर, तोंड माणसाचें |
| मकर | तोंड हरणाचें खालीं सुसर | तपकीरी | सुसरीवर माणूस |
| कुंभ | राजा पुरुष, घागर | पिवळा | वजीर घोडेवर पुढें घागर |
| मीन | मच्छासारिखा राजा | केसरी | वजीर मच्छासारिखा |

—पेशवाईच्या सांवलींत

———

## नमस्ते श्रीमहाराष्ट्रा

नमस्ते श्रीमहाराष्ट्रा स्वातंत्र्याच्या जवाहरा,
तीन कोटी मराठ्यांच्या पितृदेवा परात्परा।
संतांच्या वंद्य माहेरा, वीरांच्या बलसागरा,
तुला निर्मून ही झाली धन्य वाटे वसुंधरा।
महाराष्ट्रा, तुझ्यापायीं असो साष्टांग वंदन,
तुझ्यासाठीं झिजो माझ्या देहाचें नित्य चंदन।
तुझे गोटे, तुझे कांटे फुलांची शेज ही मला।
कणी कोंडा तुझा आहे गोड मांड्याहुनी मला,
महाराष्ट्रा, तुझ्यापायीं घालूं लोटांगणें किती ?
तुझीं गाणीं, तुझीं स्तोत्रें भक्तीनें गाऊं मी किती ?

—केशवकुमार

# परिशिष्ट

महाराष्ट्र व महाराष्ट्रीय लोक–मऱ्हाटे ह्यांच्यासंबंधीं निर्देश 'प्राकृत पैङ्गल' ह्या छंदःशास्त्रावरील ग्रंथांत आढळतात. हा ग्रंथ पिङ्गल नांवाच्या मुनीनें लिहिला. पिङ्गलाला कधीं मुनि, तर कधीं आचार्य, तर आणखी कधीं नाग असें ह्या ग्रंथांत संबोधिलें आहे. ह्या ग्रंथाचा काळ साधारणपणें खिस्ती शकाचें चौदावें शतक हा असावा. कारण एक तर ह्या ग्रंथांत हमीर ह्या रजपूत राजाचा उल्लेख कांहीं ठिकाणीं आला आहे. आणि ह्याची राजवट इ. स. १३०२ पासून १३६६ पर्यंत होती. दुसरी गोष्ट म्हणजे ह्या ग्रंथांत हिंदु–मुस्लीमांच्या संघर्षांचे उल्लेख आहेत. आणि तिसरी गोष्ट म्हणजे मराठ्यांच्या उत्कर्ष–वैभवकालाच्या पूर्वींचा हा ग्रंथ असावा, असें कांहीं उल्लेखांवरून वाटतें.

पिङ्गलाच्या नांवावर एक संस्कृत व एक प्राकृत असे दोन ग्रंथ आहेत. पहिल्या संस्कृत ग्रंथाचें नांव 'छंदःसूत्रम्' असें आहे. तर प्राकृत ग्रंथाचें नांव प्राकृत पैङ्गल असें आहे. ह्या दोन्ही ग्रंथाचे काळ भिन्न आहेत. 'छंदःसूत्र' हा ग्रंथ प्राचीन असून तो पाणिनिसमकालीन किंवा फार तर पतंजलिसमकालीन असावा; तर दुसरा 'प्राकृत पैङ्गल' हा ग्रंथ उत्तरकालीन म्हणजे इ. सनाच्या चौदाव्या शतकांतील असावा. हा दुसरा ग्रंथ अनेक शास्त्रकारांनीं तयार केला असण्याचाहि संभव आहे. इतकें मात्र खरें कीं पिङ्गल हा, संस्कृत काय किंवा प्राकृत काय, एक आद्य सर्वमान्य छंदःशास्त्रकार असला पाहिजे. महाराष्ट्र व मराठे ह्यांच्या संबंधाचे निर्देश प्राचीनच समजले पाहिजेत. हा उल्लेख प्राकृत पैङ्गलमधील १४५ ह्या श्लोकांत आहेत व तो पुढें दिला आहे.]

**भअ भंजिअ वंगा भंगु कलिंगा**
**तेलंगा रणमुक्कि चले,**
**मरहट्ठा धिट्ठा लग्गिअ कट्ठा**
**सोरट्ठा भअ पाअ पले।**
**चंपारण कंपा पव्वअ झंपा**
**ओत्था ओत्थी जीव हरे,**
**कासीसर राणा किअउ पआणा**
**बिज्जाहर भण मंतिबरे ॥ पद्मावती ॥**

संस्कृतछाया —

भयभग्ना वंगा भग्नाः कलिंगा स्तेलिंगा रणं मुक्त्वा चलिताः ॥
महाराष्ट्रा धृष्टा लीनकंठाः सौराष्ट्राः भयेन पाद्योः पतिताः ॥
चंपारणाः कंपिताः पर्वतनिलीना उत्थाय उत्थाय जीवाः पतन्ति ॥
काशीश्वर राजा कृतप्रयाणो विद्याधरेण वहु भण्यते मंत्रिवरेण ॥

काशीचे राजे दिवोदास ह्यांनीं प्रयाण केलें तेव्हां वंग देशचे राजे भयानें भग्न होऊन गेले, कलिंग लोक भीतिग्रस्त होऊन पळत सुटले, तेलंग देशचे लोक रणांगण सोडून चालते झाले, महाराष्ट्रीय लोक धीटपणानें रणांगणाची भीति सोडून सर्व दिशांना ताठ चिकटून राहिले, सौराष्ट्रांतील लोक भयानें गांगरून जाऊन पर्वतावरील वृक्षाप्रमाणें कांपत कांपत जेत्याचे पाय धरूं लागले, चंपारणचे लोक भीतीचा कंप सुटल्यामुळें उठत पडत, उठत पडत प्राण सोडण्याच्या अवस्थेला पोहोंचले. असें ( सर्व लोकांचें ) वर्णन मंत्रिश्रेष्ठ जो विद्याधर त्यानें केलें,

हें वरील वर्णन एका श्लोकांत पिंगलानें केलें आहे. ह्या श्लोकाच्या छंदाचें नांव पद्मावती असें आहे.)

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
REFBK-0011226

## शुद्धिपत्र

| पृ. | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १११ | खालून ४,५ | मी | मीं |
| ११४ | वरून १३ | मयुराच्या | मयूराच्या |
| ११६ | वरून १३ | भूपाळीं | भूपाळी |
| ,, | ,, २ | आळविलेलीं | आळविलेली |
| १३३ | खालून ४ थी | सातंत्र्य | स्वातंत्र्य |

[illegible] द्यालय, [illegible]
[illegible] .......... दि: ........
[illegible] ... ..................... नं: दि ................